१३०

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
नाटक

संग्रहालय क्रमांक
२४६
५७५

लेखक वि. स. [illegible]

पुस्तकाचें नांव [illegible]

सन

१३०

नाटक

৬৫৮
সা. ২৫৩
৭আসাম
গ্র. ২৫৩

आधुनिक पापाचारपरिस्फोट

# निर्मला नाटक

( पंचांकी )

हें

विष्णू सदाशिव फाटक शहापूरकर

यानें रचिलें

व

मुंबईंत, जगदीश्वर छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

किंमत १। रुपया.

( या पुस्तकासंबंधी, [ रंगभूमीवर प्रयोग करण्याविषयीं वगैरे ]
हरएक प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे राखून ठेवले आहेत. )
तारीख २ री सप्टेंबर सन १८९५ इ० मुंबई.

# भूमिका.

या भूपृष्ठावर जे देशविभाग आहेत त्या सर्वांत-धर्मकर्म, आचार विचार, विद्यावैभव आणि कलाकौशल्य इत्याद्यनेक गुणालंकृत भरत-भूमि सांप्रत अवदशेनें ग्रासली आहे याविषयीं विद्वान लोक आपआपल्या समजुतीप्रमाणें त्याचीं कारणें जनसमूहापुढें आणितात तीं सर्वथैव निराधार ह्मणतां येत नाहींत; परंतु देशापकर्षाचें उपादान कारण् अति पाप होय.

ईश्वर निर्मित सृष्टीमध्यें अनेक वस्तूंप्रमाणेंच अल्पस्वल्प पाप हा विषय असून, तो युगायुगाचे मानानें विस्तृत होऊन त्याचा परिणाम जें अत्यंत दुःख-दारिद्र्य याची वृद्धि होत आहे. सुख, सद्वर्तनाचें फल, तसें दुःख दुर्वर्तनाचें फल असें प्राचीन पुराणांवरून व अर्वाचीन इतिहासानें सिद्ध होतें.

ख्रिस्त, महंमदी आणि सर्व श्रेष्ठ वैदिक धर्म यांचे मार्ग देश, काल, मानाप्रमाणें भिन्न आहेत, ( गोमांसभक्षण व मद्यपान हीं कित्येक धर्मशास्त्रांस अनुसरून आहेत, आणि क्वचित्, परस्त्रीगमन विशेष दोषावह मानलें जात नाहीं. ) व त्यांतील चौर्य, असत्य भाषण, पर-निंदा, पैशुन्यादिकांच्या निषेधाचीं तत्वें एकच आहेत ह्मणून पाहिजे त्या धर्माचा अवलंब करणें हें–

॥ श्रेयान् स्वधर्मो विगुणः–स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥

या सर्व शास्त्रपुराणांच्या मथितार्थ गीतावचनावरून अनुचित होय.

॥ निजांगना यद्यपि रूपराशिस्तथापि लोकः परदारसक्तः ॥

या जनरुढी प्रमाणें केवळ परधर्म गृहणाविषयीं मन उत्सुक झालें असतें अथवा प्रत्येक धर्मांत जे निंद्य मार्ग ते एकत्र करून पृथकच पंथ स्थापित झाला असता, तरी धर्माचें रूप किंचित् तरी मर्यादित राहतें; परंतु पापविषयाचा विजय व्हावयाचा आहे ह्मणून विनाशकालीं विपरीत बुद्धि, ती कोणती ? तर–पशुतुल्य विषयासक्ति (+कन्या, स्नुषा, मित्रस्त्री, गुरुपत्नि, सापत्नमाता, अशा स्थलीं कामशांति ) खेड्यापाड्यांत अशिक्षितांतच नव्हे; तर शहरोंशहरीं सुशिक्षितांतहि कोठें कोठें ऐकण्यांत येणें केवढें आश्चर्य ? हाच विषय, आधुनिक पापाचार.

॥ प्राप्ते कलियुगे घोरे नराः पुण्य विवर्जिताः ॥ दुराचाररताःसर्वे सत्यवार्तापराङ्मुखाः ॥ परापवादनिरताःपरद्रव्याभिलाषिणः ॥ परस्त्रीसक्तमनसः परहिंसापरायणाः ॥ देहात्मदृष्टयो मूढा नास्तिकाः पशुबुद्धयः ॥ मातापितृकृतद्वेषाः स्त्रीदेवाः कामकिंकराः ॥ त्यक्तस्वजातिकर्माणः प्रायशः परवंचकाः ॥ स्त्रियश्च प्रायशो भ्रष्टा भर्त्रवज्ञाविनिर्भयाः ॥

इत्यादि भविष्योत्तर पुराणांतील कलियुगाच्या स्थितीचीं वाक्यें, प्राच्य, पाश्चिमात्य विद्वानांचे विविधविषयविवेचक, ग्रंथवाचन, व कोठें कोठें पशूसमान विषयप्रीतीची ऐकण्यांत आलेली अमंगल चर्चा, यांचे

दीर्घकाल मननानें साश्चर्य हृत्पटावर जें विचारबिंब प्रकाशित झालें त्याचेंच हें प्रस्तुतपुस्तक प्रतिबिंब होय.

संस्कृत, इंग्रजी ग्रंथांचें भाषांतर, किंवा आधारानें पुस्तक लिहिणें व त्यांचे यथार्थ ज्ञानाभावानें आपल्या देशाच्या चालीरीतींची सबब दाखवून मनःपूत रेटारेटी करण्यापेक्षां स्वतःच्या कल्पनाशक्तीचा कांहीं तरी उपयोग करणें प्रशंसनीय खरें; पण हें फार महत्वाचें कार्य साधणें मजसारख्या सामान्य मनुष्यास शक्य नाहीं. तथापि स्वभाषेची यथाशक्ति सेवा करण्याविषयीं यत्न करित असणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

नाट्य कलेचे आद्यजनक भरतमुनि व कालीदास, भवभूति, शूद्रक, बाण, आणि पाश्चिमात्य सहस्रात्मा शेक्सपिअर या कविरत्नांच्या दृश्य व इतर काव्यांचें ज्यांस थोडें तरी ज्ञान आहे अशा विद्वानांचें समाधान होण्यासारखें यांत कांहीं नसावें, पण रतिमात्र तरी समाधान या पुस्तकापासून झालें तर माझ्या श्रमाची सफलता झाली असें मानीन.

**अटक नसे त्या नाटक ह्मणती ॥ मूढमति ते अशिव कल्पिती ॥.**
**सुवड नसे तें अतिशय अवघड सुजन जाणती॥त्यांसीच रमवूं॥ १॥**

**( इतरांस नव्हे. )**

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत रा० रा० कृष्णाजी नारायण आठले एडिटर केरळकोकिळ या विद्वान निःपक्षपाती पंडितांस दाखविली त्यावेळीं त्यांनीं जीं दोषस्थलें दाखविलीं त्यांची जितकी सुधारणा करितां आली तितकी मीं केली. सर्वत्र मान्य अशा पंडितांच्या ग्रंथांवरहि कांहीं आक्षेप आहेत, मग मजसारख्या साधारण मनुष्याचे कृतींत दोष असणें काय आश्चर्य ? परंतु +**आधुनिक पापाचार—— परिस्फोट==निर्मला नाटक—**, या विषयविवेचनापैकीं जो हेतु त्याचें कितपत विवेचन झालें आहे याचा विचार करणें सूज्ञ वाचकांकडे आहे.

रा० रा० नारायण रामचंद्र सोहनी जगदीश्वर छापखान्याचे मालक व चालक यांनीं केवळ व्यवहारदृष्टि न ठेवितां जितकें त्यांस सहाय करितां आलें तितकें त्यांनीं केल्याबद्दल मीं त्यांचा फार आभारी आहें. माझे परम मित्र रा० रा० कृ० मा० चोणकर ग्रँट मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी यांनीं आपल्या परिक्षेच्या महत्वाच्या वेळांत वेळ करून प्रुफें तपासण्याची व इतर कांहीं सूचना करण्याची मदत केली त्याबद्दल कृतज्ञतेनें त्यांचे उपकार मानणें अवश्य आहे. तसेंच रा० रा० भिकाजी रामचंद्र फोंडेकर, गणेश राम[illegible] मराठे, नरसो माधव जनवाडकर, सखाराम हरी शाळ मास्तर, गंगाधर बाबुराव पेडणेकर या सद्गृहस्थांनीं अनुक्रमें ४०,३०,३०,२५,२५ व इतरहि कांहीं मित्रमंडळींनीं १०,५,४,२ प्रती घेतल्यानें पुस्तकाच्या खर्चाची मला बरीच मदत मिळाली तेव्हां त्यांचे उपकार मानलेच पाहिजेत.

**ग्रंथकर्ता, वि० स० फाटक.**

९५. २८०

# निर्मला नाटकांतील पात्रें.

दौलतराव .... .... .... रत्नपूरचाराजा

मानाजीराव .... .... दौलतरावाचा कनिष्ठबंधु, मणिपूरराष्ट्राचा चालक

प्रतापराव .... .... .... दौलतरावाचा प्रधान

जयदेवराव .... .... प्रधानपुत्र-नायक

उधोजीराव .... .... मणिपूरचा राजपुत्र

सुभानरावऊर्फ सदानंदस्वामि } एक अधीकारभ्रष्ट सरदार

सयाजीराव जाधवराव भवानराव } सुभानरावाचे अनुयायी

पद्मलोचना .... .... .... प्रधानाची द्वितीय संबंध स्त्री

वृंदाऊर्फरतिदृष्ठा .... मानाजीरावाची स्त्री

विलासिनी .... .... .... दौलतराव राजाची राणी

निर्मलाऊर्फ उदासगीर } जयदेवरावाची स्त्री, नायिका

सूत्रधार .... .... .... .... नाटकाध्यक्ष

विदुषक .... .... .... .... अध्यक्ष मित्र

रतनरामशेट गुलजारखानगवई ठमाबाई } नागरीक

वैद्य, सांडणीस्वार, गेनूगडी, गिरजा, कमळजा दासी, नोकरलोक वगैरे

# निर्मला नाटक.

## अंक १ ला. प्रवेश १ ला.

स्थल—कालीचें मंदीर.

मंगलाचरण.

॥ पद ॥

( नमामि महिषासुर- या चालीवर )—

**सूत्रधार**—

ब्रह्मादि दैत्यासुर वर्तिनी ॥ दशावतारा चित्र चालक वाहिनी ॥ कारिणी-तारिणी-सुरूपिणी-स्वामिनी-दुरित-वनदहना ज्वालिनी ॥ दैत्यासुर ॥ १ ॥ शास्त्रं-स्तोत्रं-वेदांत साक्षिणी ॥ भ्रांती-शांती-तूंचि विकारिणी ॥ सौख्यदायक सौभागिनी ॥ पतित पावन भय हारिणी ॥ संगितार्था रागिणी ॥ सकलकला प्रदर्शनी ॥ ब्रह्मांड मंडप सारिणी ॥ मधुरवाणी-विष्णुस्मरणी ॥ दैत्यासु-रवर्तिनी ॥ २ ॥

( सूत्रधार पुढें होऊन—सभासदांस )—

हे संपूर्ण विद्वान गुणग्राहक प्रेक्षकहो, सर्व व्यापक सर्व चालक अशी जी आदिशक्ति भवानी देवी, ती आपल्या मंगल दर्शनानें तुमचें दारिद्य व पाप नाहींसें करो. सभासदहो, मी तुमच्या संतोषाकरितां आज या रंगपटावर त्या आदिशक्तीच्या मायेचें एक अल्प स्वल्प सांप्रत स्थितीचें चित्र चरित्र करून दाखविणार आहें; तर सर्वत्रांचें अभयपूर्वक उत्तेजन मला असावें. ( सूत्रधार निघून जातो. )

ग्रंथ संग्रहालय नों. नं. २८ ता. १५।५।४८ ठाणे.

( पुजारी पूजार्चन करीत आहेत, इतक्यांत प्रतापराव प्रधान प्रवेश करून देवीस प्रदक्षिणा घालून सभामंडपांत एका बाजूस मांडून ठेविलेल्या बैठकीवर बसतो. एक पुजारी त्यास लागलेंच तीर्थप्रसाद वगैरे आणून देतो. )—

**प्रधान**—कसें काय भटजी महाराज, सर्व यथास्थित चाललें आहेना?

**पुजारी**—होय. आतां उत्सव जवळ आला आहे. दिवाणसाहेबांच्या स्मरणांत आहेच. यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं.

**प्रधान**—आज कोण तिथी? अं—श्रावण शुद्ध पौर्णिमा. ह्मणजे आज पासून बरोबर दीडच महिना अवकाश राहिला आहे. आतां हळुहळू तयारीला लागलेंच पाहिजे.

**पुजारी**—इथें मातोश्री देवीच्या दरबारांत काय कमी आहे? त्यांत आपली दक्षता. मग तयारीला काय विचारायचें आहे!

**प्रधान**—हो, तरी शेंकडों भानगडी असतात. सालमजकुरीं इच्छाभोजनाची पूर्वीपासून तयारी ठेविली पाहिजे. गुदस्तसालीं कशी त्रेधा उडाली लक्ष्यांत आहेना? ब्राह्मण तरी बिचारे आमचें सत्व घेण्याचीच इच्छा करितात. वास्तविकरीत्या त्यांत त्यांचाही दोष मानितां येत नाहीं. "इच्छाभोजन" या शब्दार्थाकडे लक्ष्य दिलें असतां त्यांचें मागणें यथार्थच.

**पुजारी**—असें जरी आहे, तरी त्यांतही विचार केला पाहिजे. बरें, पण यंदां आंब्याविषयीं कशी काय व्यवस्था ठेवावयाची? आंबे ह्मटले म्हणजे सरासरी चैत्रापासून श्रावण अखेर—झाली यत्ता.

**प्रधान**—त्याविषयीं काळजी नको. तिकडे सह्याद्रिपर्वताच्या दिशेला राहणाऱ्या एका मांडलीक राण्याला आमच्या दौलतराव सरकाराकडून आज्ञापत्र गेलें आहे. त्या प्रदेशांत अशा वस्तू कांहीं कर्तनें कोणत्याही ऋतूमध्यें उत्पन्न करीत असतात.

( इतक्यांत दुसरा एक ब्राह्मण येऊन, देवीच्या अंगावरील एक निर्माल्य पुष्पमाला प्रधानाचे गळ्यांत घालतो. )

**पुजारी**–झालें तर, इकडील इतर व्यवस्था आमची आहेच. या सालीं दक्षिणी ब्राह्मण पांचएक हजार यावयाचे आहेत. ह्मणजे आमच्या नित्य लक्ष ब्राह्मणभोजनाची संख्या झाली. ते दक्षिणी ब्राह्मण अतिशय भोक्ते, तशांची आमच्या महाराजांना फार भक्ति. यंदा उत्साह टोलेजंग उडणार.

**प्रधान**–(रामराम करून.) बरें, येतों आतां. ( पडदा पडतो. )

## अंक १ ला प्रवेश २ रा.

### राजमार्ग.

**सुभानराव**–हीच वाट त्यांच्या येण्याची आणि वेळ देखील हीच, पहावें आतां काय चमत्कार होतो तो. बहुधा योग साधणें कठीण; परंतु यत्न केला पाहिजे. ( प्रधान दृष्टीस पडतो त्यास पाहून ) रामराम दिवाणसाहेब.

**प्रधान**–रामराम सुभानराव, बहुधा स्वारी देवीच्या दर्शनास निघाली असावी असें वाटतें.

**सुभानराव**–देवीच्या दर्शनास ! छत्. अहो, ती दगडाची देवी. असल्या देवीचें दर्शन घेण्यापेक्षां तुमच्या सारख्या चालत्या बोलत्या देवोबाचें दर्शन घेतलें तर त्यांतच कांहीं कल्याण हो-ण्याचा संभव आहे.

**प्रधान**–इतर गोष्टींप्रमाणें देवीचीही थट्टा ? पहा बुवा ! पापपुण्याचा ज्याचा तो अधिकारी.

**सुभानराव**–कसचें पाप व कसचें पुण्य ! मी केवळ विनो दानें बोलतों असें तुह्मीं समजूं नये. आजकाल तुह्मी दौलतराव

महाराजांच्या दौलतीचे मुख्य प्रधान. केवढी सत्ता! लाहानाला थोर, थोराला लहान करण्याचें पूर्ण सामर्थ्य. मग माझें ह्मणणें-मिथ्या कसें होईल?

**प्रधान**–अहो, प्रकाश हा काजव्याला देखिल आहे; ह्मणून त्याला सूर्याची योग्यता कशी येईल? बरें तुमचें काय ह्मणणें आहे?

**सुभानराव**–दुसरें काय? आपल्या कृपेची इच्छा आहे. ती मिळाल्यास माझीं बायकापोरें आपणास दुवा देतील.

**प्रधान**–बरें पहातां येईल. इथें रस्त्यावर कशाला त्या गोष्टी.

**सुभानराव**–बुद्ध्या याच ठिकाणीं आपली भेट घ्यावी अशी संधी साधून आलों आहें. आपण बडे लोक. आमच्यासारखे वगैरेपैकीं नव्हे. आपल्या वाड्यांत नेहमीं लोकांची गर्दी. तेव्हां परक्या समक्ष तोंड पसरण्याची मला शरम वाटते.

**प्रधान**–सुभानराव, तुमच्या इच्छेप्रमाणें जुळून येईल असें मला वाटत नाहीं. मग विनाकारण तसदी कशाला घेतां?

**सुभानराव**–दिवाणसाहेबांनीं लक्ष्य पोंचिवलें तर दुसऱ्या कोणत्याही मार्गानें गरिबाचें कल्याण होईल. असा माझ्या मनाचा पूर्ण ग्रह झाला आहे.

**प्रधान**–अशी जर कांहीं सवड असेल तर हरकत नाहीं. हुं; बोला.

**सुभानराव**–पूर्वींचे सेनानायक पतंगराव, आज दोन महिन्याखालीं प्रतापपूरच्या लढाईत पडले, झालें. "एकुलताएक मुलगा तोही गमावला. आतां आपलें या लोकीं काय राहिलें" असें वैराग्य येऊन त्यांच्या वृद्ध मातापितरांनीं वीष खाऊन आत्महत्या केली, ही गोष्ट तर आपणांस माहितच आहे.

**प्रधान**–हरहर! तो प्रसंग शत्रूवरही येऊं नये. नको नको. त्याची आठवण सुद्धां नको.

**सुभानराव**—अर्थात, त्यांचें वतन सरकारानीं हल्लींच्या सेनानायकाला दिलें; परंतु त्यांची खाजगी दौलत जी हुजुरांत जप्त आहे, ती मला मिळण्याची सवड व्हावी; मी त्यांचा वारस आहें. पाहिजे असल्यास दाखला हजर करतों.

**प्रधान**—मी जरी सर्व कारभार पहातों, तरी सरकारहुकुमाखेरीज मला कोणचीही गोष्ट करण्यास स्वतंत्रता नाहीं.

**सुभानराव**—बरें तेंही असो. येथून उत्तरेच्या बाजूस पांच योजनांवर रामतीर्थ आहे. त्याचे पुजारी दयाघन ब्रह्मचारी आतां लवकरच महायात्रेस जाणार असून पुढें तिकडेच निरंतर राहण्याचा त्यांचा बेत झाला आहे. अशा मजकुराचा अर्ज काल दरबारांत आल्याची शहरांत बातमी आहे. त्या ठिकाणी माझी योजना झाल्यास अनायासें स्वार्थ परमार्थ हीं दोन्हीं होतील.

**प्रधान**—हो, हो, त्या ठिकाणीं दुसऱ्या कोणाची योजना करण्याकरितां महाराजांचा हुकूमही झाला आहे.

**सुभानराव**—झालें तर. ही आपल्या हातची गोष्ट आहे.

**प्रधान**—तुह्मांकडून सर्व गोष्टीस तयारी आहे; परंतु ती देवता मोठी कडक आहे. त्या ठिकाणीं महाकर्मठ ब्रह्मचारी पुजारी असला पाहिजे. तुह्मी पूर्ण नास्तिक, चार्वाकानुयायी, तर हें कसचें जमतें? शिवाय—

**सुभानराव**—आपण देवस्थान माझ्या नांवानें चालवावें. मग ज्या ज्या त्या देवतेच्या शर्ती आहेत, त्या त्या प्रमाणें सर्व व्यवस्था चोख ठेवितों.

**प्रधान**—जो पुजारी तोच अधिकारी असा पूर्वीपासूनचा करार आहे; शिवाय त्या ठिकाणीं महाराज नेहमीं येणार जाणार. श्रावणमासीं सतत महिनाभर तेथेंच मुक्काम. तेव्हां तुह्मीं जर सहजी त्यांच्या दृष्टीस पडलां तर कसें?

ना १३०
ना १३०

**सुभानराव**-मीं काय असा राजद्रोह केला आहे? बरें, महाराजांची एकवार समक्ष भेट होईल अशी संधी तरी यावी, म्हणजे स्वतः विनंति करतां येईल.

**प्रधान**-तुम्हीं जीं जीं आजवर कृत्यें केलींत त्यांना राजद्रोह नव्हे, तर आम्ही काय समजतों अशी तुमची समजूत आहे? महाराजांपुढें नेऊन तुम्हाला उभें करण्याचें साहस कोणी करील असें मला वाटत नाहीं.

( इतक्यांत एक हुजऱ्या येतो. )

**हुजऱ्या**-( राम राम करून ) धनिसाब, सरकारांनीं आपणाला बोलीवलें आहे. कांहीं जरूरीचें काम आहे, तर लवकर-

**प्रधान**-मी दरबारांतून आतां नुकताच आलों, पुन्हां इतक्या जरूरीचें कायरे काम? बरें, तूं पुढें हो. मी आलोंच.

( तो निघून जातो )

**सुभानराव**-माझ्या विनंतीचें काय झालें?

**प्रधान**-मला आतां अवकाश नाहीं. महाराजांकडे असा परस्पर जाणार. तुम्हीं अस्तमानीं आमचे वाड्याकडे यावें. एऱ्हीं आमच्याकडे येण्या जाण्याला कोणची हरकत आहे? पूर्वींप्रमाणें नेहमीं अवश्य येत जावें. ( जातो. )

**सुभानराव**-( आपल्याशीं ) छत्, सब झूट आहे. खुषामत करण्याचा मला मनापासून तिरस्कार आहे, तरी माझ्या प्रतिकूल प्रसंगाला जाणून या हरामखोराची हांजी हांजी केली; परंतु त्याचा कांहींच उपयोग नाहीं. अरे दुर्बल प्रारब्धा, तुझी कमाल आहे! जो हा राजकारस्थानी पुरुष सुभानराव, मोठमोठ्या सरदारांना माना खालीं करूं लावणारा, ज्याच्या हुकूमावांचून कोणतीही गोष्ट होणें दुरापस्त, तोच हा मी भिक्षुकाप्रमाणें निदान पुजारीपणाची वृत्ति पत्करण्यास कबूल झालों असून तीही मिळणें

अशक्य, अशी माझी स्थिति व्हावीना ? अरेरे ! वेळ कठीण गुदरला. आतां अफू खाऊन घरांतल्या घरांत टांचा घांसून मरून जाण्याची पाळी आली. आजवर घरांत असलेले सोन्यामोत्याचे डाग विकून निर्वाह चालविला. पडदे, कनाती, भांडींकुंडीं, तींही पोटासाठीं विकलीं. आतां हा मी मात्र शेष राहिलों. काय, करूं तरी काय ? मी अगदीं गोंधळून गेलों आहें. कांहींच कल्पना चालत नाहीं. अद्याप या बेरडाला दया आली तर निभाव लागेल; पण तो, तो रामोशी कसचा वळतो ! तो आपल्याच घमेंडींत. काय त्याला त्याच्या अधिकाराची आढ्यता वाटते ! काय लेका तूं !, आणखीं तूझें सरकारी काम ! काय त्याचा मला बाऊ सांगतोस ? सांग,-सांग तुझी सध्यां वेळच तशी आहे. तें कसेंही असो; पण पुढें माझी गत काय ? अं. ( कांहीं वेळ थांबून ) हं हं बस्स; झालें काम, आणि आतां असेंच केलें पाहिजे. देवोबा जर प्रसन्न होत नाहीं, तर त्या देवीलाच वळवूं या. हो हो आणखीं मी खात्रीनें तेंच कृत्य साध्य करणार. देवीला हरतऱ्हेनें वळविण्याचें काम माझें. हें सर्व आयुष्य जर अशा कामांत घालिवलें तर मग कां भ्या ? दमधर, हरामखोरा, तुला पाहून घेईन. हा सुभानराव ह्मणजे तुला अगदीं तुच्छ वाटला अं. ? अनेक कल्पनांची टांकसाळ माझ्या डोक्यांत आहे. चला तर फक्कड आतां त्या उद्योगाला. याच पावलीं त्याच्या बायकोकडे जाऊं या, आणि कपटाचें जाळें पसरून त्यांत तिला धरूं. तीही खात्रीनें माझ्या सपाट्यांत येणार. ही गोष्ट यापूर्वी कधींच साधली असती. मी होऊन आजवर दुर्लक्ष्य केलें; पण त्यावांचून गत्यंतरच नाहीं व तिच्या कडूनही ना नाहीं. असें तिच्या आजपर्यंतच्या लक्षणांवरून दृढ अनुमान होतें. चला तर.

( जातो. )

## अंक १ ला. प्रवेश ३ रा.

( स्थळ.–जयदेवरावाचा खाजगी दिवाणखाना. )

**जयदेवराव**–( आपल्याशीं ) आज प्रातःकालपासून डावा डोळा लवतो आहे. सर्व दिशा शून्यवत् दिसत आहेत; त्या योगानें मन अगदींच अस्वस्थ झालें आहे. हीं लक्षणें कां बरें होत असावीं ? डोळा लवणें, बाहू स्फुरणें, हीं केवळ पित्तप्रकोपाचीं लक्षणें आहेत; यांत शुभ किंवा अशुभ असें कांहींच नाहीं, असेंही ह्मणणारे कांहीं लोक आहेत; पण हा त्यांचा समज निव्वळ चुकीचा आहे. ( पुन्हां डोळ्यास हात लावून ) अरे, डोळा फारच लवूं लागला. काय अरिष्ट कोसळणार आहे तें कळत नाहीं. ( कांहीं थांबून ) माझा सूर असा वहातो, बहुधा तिची ( बायकोची ) प्रकृति जास्त बिघडली असेल. तिला तिकडे माहेरीं पाठवून देण्याचें माझ्या बिलकुल मनांत नव्हतें; परंतु बाबासाहेबांच्या इच्छेचा मला प्रतिकार करितां येईना. ही गोष्ट त्यांची त्यांना समजायास पाहिजे होती. एवढा राज्यशकट चालवितात परंतु गृहकृत्यांतील साधारण बाब त्यांच्या ध्यानांत येऊं नये ? तरुणांना स्त्रीवियोग मोठा दुस्सह वाटतो; तसाच स्त्रियांना पतिवियोग आहे. मनापासून तिच्याही मनांत तिकडे जायचें नव्हतें. मजप्रमाणें तिलाही. असें वाटणें साहजिक आहे. दिवस इकडे तिकडे कसाही उद्योगांत निघून जातो. परंतु ती बारा तासांची रात्र बारा वर्षांप्रमाणें होते. साऱ्या दिवसांतून एकदोन घटका तरी तिच्याशीं हंसून खेळून घालविल्यावांचून शीण उतरलासें वाटत नाहीं. बाबासाहेब, अशा प्रकारें मन चंचल होण्याचें कारण तुह्मी असें मनांत येऊन, पूर्ण विचार करण्याचे पूर्वीं मजविषयीं तुमचें ममत्व कमी असावें असें

मला वाटतें. नको ते विषय संबंधीं विचार. ते मनांत घोळूं लागले ह्मणजे आपल्या पूज्य वडील मनुष्यांच्या संबंधानें मनांत अपूज्यता उत्पन्न होते. ईशकृपें, तिची ( बायकोची ) तब्यत लवकर दुरुस्त झाली ह्मणजे पुन्हां भेट होईलच. ( समोर पाहून ) अरे, हा समोरून कोणी सांडणीस्वार मोठ्या जलदीनें येत आहे. त्याच्या दृष्टीचा रोखही इकडेच आहे. होय, हा इकडेच आला. हा कोठून आला असावा ? असो. काय तें आतां समजेलच; पण या मनाला कोठें धीर आहे ? पहा, आतांच्या आतां, या इतक्या अवकाशांत, या मनाची कोठवर गती झाली ! व किती विचार उपस्थित झाले !

( इतक्यांत एक सांडणीस्वार येऊन भेटतो. )

**स्वार**–तकसीर, गुलाम खाविंद कदमके उप्पर सीर धरता हय. ये खरीता लीजिये, और जो कुछ जबाब देना हय, सो मेहरबानीसे जल्द लिखकर ताबेदारके हवाले कर देव. क्योंके मुजकू फौरन् आजके आज वापस जाना जरूर हय.

**जयदेवराव**–भला बैठो. सब खुष खैरीयत ?

**स्वार**–जी-हुजूर-कुल खुष खैरीयत हय.

**जयदेवराव**–( मनांत ) बरें, खुष खैरीयत, हीं तुझ्या तोंडचीं अक्षरें आईकलीं, आतां मनाला समाधान वाटलें. ( उघड ) घडीभर बैठरहो इतने आरसेमे मै तुमकू खत लिख देताहूं. अछा हाल हमारे ससरेकी मिजाज कैसी हय ? चंद रोजके पिछे बुखारेसे और जाडेसे उनके मिजाजमे बहुत खलल हुवा था ऐसी कैफीयत मैने सुनीथी. उस्से मेरा दिल बहुत रंज था. और बाजेलोग उनका अंजामभी अजमायषकर रहे थे. ये मजमून सच्च हय, या झूट ?

**स्वार**–इन बातोंके निसबत मुजकू बिलकुल खबर नही. सो-

ये बंदा क्या जबाब देगा? और, येभि यकिन हयके हम जंयसे अदना शक्सका वंहातकू पैगाम पहोंचानेके लिये जानाभी मुष्कील. वयंसे अमिर लोगोंके हमराह जो षब ओरात रहेते हय उन इनसानको इसबारेमे कुल अखबार जाहेर हो जाता हय.

**जयदेवराव**-बेशक. तुह्मारा कहेना दुरुस्त है. लेकिन कुछ कम ओ बेश हकिकत वखत्पर एकसे एककू समजनेमें आती. और जद तुम बस्तीमें उनके रहते तो क्यौंकर मालुम नहीं? ये कहना तुमकु सजावार नहीं.

**स्वार**-ऑय खुदा येक्या जुलूम है! मैने आजतक उनकी सुरत न देखा या उनके मुल्ककू गया.

**जयदेव०**-फिलहाल आप कंहासे आये? किसीने भिजवा दिया?

**स्वार**-आपके पिदर दिवान साब.

**जयदेवराव**-हमारे बाबाजानके तर्फसे?

**स्वार**-जी.

**जयदेवराव**-(आणलेल्या लखोट्याकडे निरखून पाहून आपल्याशीं) अरे होय! हें बाबा साहेबांच्याच हातचें अक्षर, असें कां बरें? शहरांतल्या शहरांत मुद्दाम खांडणीस्वाराबरोबर पत्र देऊन पाठविण्याचें काय कारण? हें पहा-मना, थाऱ्यावर नसलेंस ह्मणजे हे असे सहजी प्रमाद होतात. (पत्र काढून वाचतो.)

“चिरंजीव विजयीभव रा. रा. जयदेवराव ऊर्फ बाळासाहेब रत्नपूरकर-यांसीं अनेक आशीर्वाद-मजला दौलतरावमहाराजांनीं मणिपुराहून, आपले कनिष्ठ बंधू मानाजीराव राजे यांस आणण्याकरितां परस्पर इकडे रवाना केलें. सविस्तर मजकुराचें पुढच्या मुक्कामाहून लवकरच पत्र पाठवीन-” हर हर! राज्याधिकाराचें सुख ह्मणून जें लोक ह्मणतात तें हेंच. बाबासाहेबाची इच्छा नसतां, केवळ महाराजांची नाखुषी होईल ती न व्हावी,

सबब मणिपुरास जाणें भाग पडलें. घरच्या मनुष्यांना भेटून जाण्याचीही सवड मिळूं नये ! एखाद्या गरीब मजुराला, जें आपल्या घरच्या मनुष्यापासून संसारसुख मिळतें, त्याचा शतांश तरी आह्माला आहे ? आज दोन वर्षे सतत लढाई चालली आहे, ती संपते न संपते, तीन रात्रीचीही विश्रांति नाहीं, तों इतक्यांत ही दूरदेशची सफर. त्यांचा वृद्धापकाल झाला. आतां तरी त्यांना विसावा मिळावा, बरें प्रत्येक काम त्यांनींच केलें पाहिजे हा न्याय कोठचा ? दुसरे पुष्कळ सरदार, शिलेदार, वांकड्या पगड्या डोकीवर ठेवून मांडीला मांडी लावून बसणारे आहेत; त्यांतून कोणा एकाला मणिपुरास पाठवितां तर झालें असतें-नाहीं, पण तसेंही ह्मणतां येत नाहीं. हे सरदार ह्मणजे शुद्ध भाडेकरी भोजनभाऊ. त्या नामधारी सरदारांपैकीं एकाला धड हातांत हत्यार धरण्याची किंवा प्रसंग लक्ष्यांत आणून दोन शब्द सरळ बोलण्याची ही मारामार. केवळ पोषाकी लोक. खरोखर एका अर्थी मूर्ख ह्मणवून घेणें फार सुरेख. त्याच्या मागें कांहीं व्याप नसतो. परंतु चतुर किंवा पराक्रमी असा जो पुरुष त्याच्या मागें हजारों पंचाइती उरकण्याचें काम. जो राघू सुंदर, उत्तम बोलका, त्याला पिंजऱ्यांत दिवस काढावे लागतात, अशीच प्रत्येक गोष्ट.

( गेनू नांवाचा चाकर येतो. )

**गेनू**-धनिसाब भाईर फाकड आल्याति.

**जयदेवराव**-कायरे, कां आला होतास ? काय खबर आहे ?

**गेनू**-फाकड आल्याति नऽहका.

**जयदेवराव**-कोण आहे ? मूर्खा काय तें स्पष्ट सांग. अर्धवट बोलूं नकोस. तुला चांगल्या रीतीनें जर बोलतां येत नसेल तर आपल्या कामाला जा.

**गेनू**-अं. अस का जी धनीसाब, मी आपल्या पायांतलं

खेटार; आन मजवर काय ह्मनूनशानी इत्का राग ! म्यां काय केल जी ?

**जयदेवराव**–गेन्या, अरे वेड्या, तूं असा कसा? शुद्ध वेडगळा सारखें करतोस, अरे. इतके दिवस आमच्या सहवासाला असून तुला धडपणें बोलतांही येऊं नये ?

**गेनू**–धनीसाब, हामी अक्शी कुनबट गडी. सनान केलं, पोंती पूंजा केली, ह्मनुनशेनी कुनब्याचा बामन व्हइल कायजी ?

**जयदेवराव**–बरें बाबा, पुरे तुझी बडबड. आला होतास कां तें सांग.

**गेनू**–फाकड्या आलाया. काय तेच नांव त्येचीबी याद होईना ( आठवून ) हं. हं. आतां आलं धेनांत. सुबानराव, सुबानराव ह्मनत्याती. त्यो.

**जयदेवराव**–कां आला आहे तो नरपशू ? काय त्याचें काम आहे ?

**गेनू**–व्हय इचे भन. पसूच अक्शी. आन त्योबी आमावानी पसू न्हव. अक्शी गाडाव.

**जयदेवराव**–बरें, मी येथें नाहीं असें जाऊन त्याला कळीव. रिकामी साडे साती, येथें नेहमीं त्याचें काय काम आहे ?

**गेनू**– धनीसाब, हत घरामंदी न्हायती ह्मनुन बी म्यां सांगितलं तर काय ह्मनतोया, " बर न्हाईती तर म्याबी हात्तच बसतो. "

**जयदेवराव**–असें ह्मणतो ? तर मोठा वस्ताद आहे.

**गेनू**– काय जी धनीसाब, त्या मुरदाडाचा का पाई येवडा तोरा. मला हुकूम सुटू द्या, झंजी लावतो. वादाड त्या खरखर मुंड्याला. अक्क्षी साडेसाती बगा. रात न्हाई, दिस न्हाई कवाबी बगा पीर पीर उगा.

**जयदेवराव**—पहातां येईल. त्याचे शंभर अपराध पूर्ण झाले ह्मणजे त्याला शासन देणारा ईश्वर समर्थ आहे असो. त्याला पुन्हां जाऊन सांग कीं—मी भेटण्याकरितां बुध्या त्याच्याच वाड्याकडे गेलों असें त्याला कळीव. ( गेनू जातो. )

**जयदेवराव**—या हरामखोराबद्दल लवकरच कांहीं तरी विचार केला पाहिजे. याची नेहमीं इकडे बैठक कोणत्या हेतूनें होते, तें तत्व बहुतेक माझ्या ध्यानांत येऊन चुकलें आहे.

**सांडणीस्वार**—सरकार मुझको बहोत देरी होती हय. जल्द नहीं गया तो आपके वालेद खपा हो जायेंगे.

**जयदेवराव**—आपका कहेना मुनासिब हय. चलो मैं जबाब देताहूं.

( दोघे निघून जातात. )

## अंक १ ला. प्रवेश ४ था.

### सुभानराव. ( आपल्याशीं )

असें होण्याचें काय बरें कारण असावें ! " जयदेवजी मला भेटण्याचे उद्देशानें बाहेर गेला, " असें गेन्या ह्मणतो. तर मला भेटण्याजोगें याचें मजपाशीं काय काम आहे ? छे, ही शुद्ध लबाडी. शिवाय गेन्याची मुद्राही रागीटच दिसली व पुरतेसें माझ्याशीं न बोलतां निघून गेला. यावरून खचित मजविषयीं त्यांच्या मनांत संशय आला आहे. तेव्हां मला तोंड न दाखविण्याची ही त्यांची युक्ति. अहाहा ! प्रारब्धा तूं बलवत्तर आहेस, यांत कांहीं शंका नाहीं. ज्या सुभानरावाची एकवार तरी भेट व्हावी, ह्मणून लोक देवाला नवस करीत असत; तोच सुभानराव पैशापासरी होऊन लोकांच्या घरीं स्वतः छपन्न वेळां

चालून येतो, तरी तेच लोक त्याच्या दृष्टीस पडूं इच्छित नाहींत. जयदेवजी, लोक तुला मोठा शहाणा असें ह्मणतात; तें हेंच का तुझें शहाणपण ! अरे-चढती, पडती, वेळ सर्वांना आहे, असाच नेहमीं माझा काळ चालेल; अशी कोणीही घमेंडी मारूं नये. त्यांतून राजाश्रयाची शाश्वति तर फारच क्षणिक असते. असे गाजीचे पाजी व पाजीचे गाजी, या रत्नपुरांतच आज हजारों आहेत. तुझी थोरवीही कायम राहील असें तुला वाटलें अं ? ह्मणून मला तोंड दाखवीत नाहींस ? बरें तर, मलाचसें काय, व या शहरांतसें काय ! साऱ्या दुनियेभर तुला आणि तुझ्या बापाला तोंड दाखविण्याला जागा उरूं देत नाहीं. नाकच कांपतों. या पूर्वीं कधींच ही गोष्ट झाली असती; आतां तसें करणें तुमच्याच कृतीनें भाग पडलें. ही पहा बांधलीच कंबर. पहा आतां लोकांनो आमचा गमतीचा खेळ.

( जातो. )

## अंक १ ला. प्रवेश ५ वा.

**स्थळ- महाल.**

**पद्मलोचना**-( आपल्याशीं ) अडचणीची एखादी वस्तु सांडली, ह्मणजे कांहीं सुचत नाहीं, नी तें मनुष्य जसें भांबावल्या सारखं होतं, तशी नेहमीं माझी स्थिति होत आहे. साऱ्या दिवसांत एक घटकाभर दिखील मनाला समाधान असं वाटत नाहीं. एवढें तरी आशा आहे, असं ह्मणून दिवस काढावेत, तर तेंही दिसतच आहे. जसं जसं माझं तारुण्य वाढतं, तसंतसं तिकडं म्हातारपण होत चाललं आहे. बरं, सर्व गोष्टी बाजूला ठेवून मनासारखं वागावं, तर लोकलज्जा आहेना ! मेले लोक तरी कसे

टवाळ आहेत. कांहीं नसतांही विनाकारण संशय घेतात; पण पुढं मागं माझ्या नशिबीं तेंच आहे. किती मन आवरूं ! किती धीर धरूं ! किती जीव जाळूं ! घटकाभर पुराण ऐकायला जावं ह्मटलं तर तिथंही मेल्या त्याच गोष्टी. जितक्या ह्मणून तिथं बायका जमतात त्यांतून शपथेला एकीचं तरी पुराणाकडे लक्ष ! छे. आपलें. जों पहावं, तों प्रत्येकीचं आपल्या नवऱ्याचं कौतुक. पण मी वेडी, त्यांना काय ह्मणून मूर्ख ह्मणतें. तें सुख माझ्या कपाळीं नाहीं, ह्मणून मला कां त्यांचा मत्सर वाटावा ! आणखीं इतका जो व्याप करायचा, तो तरी त्या करतांच. देव करायचा, धर्म करायचा, तो एका संसारसुखासाठीं, नी-मेल्या त्या पुराणांत तरी दुसरं काय आहे ! रामसीतेच्या, राधाकृष्णाच्या कथा. विष्णूनं अवतार घेऊन पुष्कळ लीला केल्या, त्यांचीं शास्त्रं पुराणं झालीं. हांशील काय ? एका विष्णुलक्ष्मीपासून तों सगळ्या जगभर नवरा बायकोच्या प्रपंचाच्या गोष्टी. देवा, तुला दिखील बायको वांचून एक क्षणही जात नाहीं. एक पायाजवळ लक्ष्मी नी एक उरावर तुळशी, शिवाय दुसऱ्या किती तरी! वृंदेच्या तर वेडा होऊनच पाठीस लागलास ! विष्णु देवा, तूं देव तुझी जर ही दशा तर मग आमच्या सारख्या अज्ञाणी मनुष्यांनां मात्र तुझीं पुराणं नी पुस्तकं ! देवा आह्मी कसारे हा जन्म काढावा !- अग बाई ! बाई ! साऱ्या अंगाची आग होऊन सारख्या ज्वाळा येत आहेत. अमळ जाऊन जर पलंगावर निजावं ह्मटलं तर तिथं गेलं ह्मणजे हजारों कल्पना सुचतात. अगबाई, ! कपाळाचे तर शंभर तुकडे झाले. घटकाभर इथंच पडून रहावं.

( मदनव्यथेचा अभिनय करून पडते. )

( इतक्यांत गेनू येतो. )

गेनू- आईसाब, मेना तयार झालाया. ( उत्तर नाहींसे

पाहून पुन्हां ) का जी आईसाब झोंप लागलीया होयी ? मुई कवाच्यान खालत वाट बगत्याती.

**पद्मलोचना**-( चपापून उठते ) ( आपल्याशीं ) अगबाई ! हा मेला केव्हांचा येऊन उभा राहिला असेल कोण जाणे. माझं बोलणं तर यानं ऐकलं नसेलना ! मी जागी असून निजल्या सारखी झाल्यें आहे.

**गेनू**-का जी, आईसाब मी कवाच्यान् आरडतुया आन् एक सबुदबी न्हाईजी. राग आलाया हुई. आन् म्यां गरीबानं काय केलजी ?

**पद्मलोचना**-अरे न बोलायला काय झालं ? तूं गरीबानं माझं काय केलं आहेस ! गेन्या, आज गड्या माझं कीं नाहीं, भारीच कपाळ दुखतं आहे.

**गेनू**-मंग काईबी औसुद लावाव का न्हाई बाइसाब ?

**पद्मलोचना**-झालीं बाबा. पुष्कळ औषधं झालीं. ( आपल्याशीं ) माझा कर्मभोग मला माहीत. त्याला असल्या वर उपचारी औषधानं काय होणार ?

**गेनू**-बाईसाब, वाईच बिब्बा घालावा; ह्यंजी सार चट् दुकन कसलबी असल तरी जातया. आन दोन रोज जेवानबी न्हाई कामाच.

**पद्मलोचना**-कोणीरे मेल्या तुला हें बिब्ब्याचं औषध सांगितलं ? कपाळ दुखतं, घाल बिब्बा. पोटशूळ झाला तरी तेच. हातापायाची आग झाली, डोळे दुखायला लागले, कोणतं ही दुखणं असलं तरी त्याला बिब्ब्याचंच औषधना ?

**गेनू**-आम्मा गरीबाचं त्येच औसुद अन् आमासनी त्येनच गुन येतूया. तुमा शिरिमंत लोकावानीं मात्रा, काढ, आन् भसम आमासनी कुट गवसतया ? त्येला व्होवा बक्कळ पैसा. त्यो कुट

हाय ? ह्मनुनशेनी बिब्ब्याचं अँसुद आन् तिक भाकरीचं पत्त-ह्मंजी टुकन जातया पळुनशेनी.

**पद्मलोचना**–बरं, बाबा तुझंच ह्मण खरं कां होईना. गेनू, त्या भोयांना जाऊन सांग कीं–तुह्माला जर कुठं जायचं जरुरीचंच काम असलं तर जाऊन लवकर या. माझं जर कपाळ दुखायचं राहिलं, तर मग पहातां येईल. ( गेनू जातो. ) कसली बागनी कसलं काय. ज्याचं मनच थाऱ्यावर नाहीं, त्याला ह्मणून जितक्या आनंदाच्या गोष्टी, त्यानंच उलट दुःख होतं. तिथं बागेमध्यें ह्मटल्या ह्मणजे राणीसाहेब, त्यांच्या सगळ्या मानकरणी जमतील. त्यांच्यामध्यें गेलें कीं, झाला मग थट्टामस्करी करण्याला प्रारंभ. "ह्मातान्या यजमानाची राणी" ( दोन वेळा ) हेंच. थट्टेथट्टेनं पाण उतारा. मी वरवर हसून घालीवतें, पण त्यांच्या थट्टेनं मला मरणापेक्षां मरण होतं. आतां या ह्मातान्याशी सारा जन्म फुकट घालवायचाना ! आईबापांनीं–मी एकुलती एक, मला सुख लागावं, ह्मणून या दिवाणगिरीला भुलून दिली. परंतु नुसत्या दागिन्यानं, वस्त्रानं, का बायकांना सुख मिळतं ? माझ्यापेक्षां ज्या भाग्यवती गरीब आहेत त्यांना सुख अधिक. नवरे त्यांच्या अर्ध्या वचनांत असतात. बायका ह्मणजे त्यांना मोठी अपुर्वाई वाटते. तसं कुठं श्रीमंताचं आहे ? त्यांना काय ! एक मेली दुसरी. दुसरी मेली तिसरी केली, बायका बायका ह्मणजे काय मेली होतकरू वस्तु आहे. आई तुझी मजवर प्रीति, तेव्हां तुझ्या बद्दल जरी माझ्या मनांत कांहीं वाकडं आलं, तरी मी होऊन तसलं वाईट उच्चारणार नाहीं. परंतु, मागं पुढं जर का माझं वाकडं पाऊल पडलं तर त्या पापाला तूं वांटेकरी आहेस. कारण द्रव्यलोभानं या घरीं तूं माझा विक्रा केलास, तर देव तुला शासन केल्यावांचून रहाणार नाहीं; हें

खचित आहे. ( दीर्घ श्वास सोडून ) नारायणा, ही माझी व्यथा कुणाजवळ सांगूं ! हाय हाय ! ( पुन्हां जमिनीवर पडते. )

( सुभानराव येतो. )

**सुभानराव**–( आपल्याशीं ) देव जर प्रसन्न होत नाहीं, तर देवीलाच वळवूं या. एक दोन वेळा देवीनें उजवी बाजूही पण दिली आहे. डोळ्यानें बऱ्याच वेळां खाणा खुणा झाल्या आहेत. तर त्याजबद्दल आतां बिलकुल काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. अं–( कांहीं थांबून ) चंद्रोदयानें चंद्रविकासी कमल विकसित होणें, हा त्याचा स्वभाव आहे; परंतु मजकरितां हें कमल फुललें आहे, असें भ्रमरास वाटून तो पुष्परस पान करण्याकरितां, त्यांत प्रवेश करून बंधन पावतो, त्याचप्रमाणें सहाजिक हसणें, मुरडून चालणें, या स्त्रियांच्या सहजी चेष्टा आहेत. कामी पुरुष, तो संबंध आपल्याकडे ओढून घेऊन परिणामीं फसतो, तद्वतच माझा मूर्खपणा आहे. विषाची परीक्षा पहाण्यासारखें हें कृत्य ! ( कांहीं भय पावून ) अरे, मला एव्हांपासूनच कां भीति वाटूं लागली ? सर्वांगाला कंप सुटला आहे; पहा कसा चमत्कार आहे ! हातीं ज्याच्या शस्त्र, अशा रणशूरावर जाण्याला आह्मांसारख्या शिपाई बच्चांना अगदीं भीती वाटत नाहीं; परंतु अबला ह्मणविणाऱ्या स्त्रियांवर जाण्याचें आह्माला मोठें भय वाटतें. परस्त्रीचा संबंध ह्मणजे असा भयावह आहे ! असो, कांहीं असो. असें धैर्य खचूं देतां कामा नये, प्राणाची किंवा मानाची बिलकूल आशा उपयोगाची नाहीं. कांहींतरी अशा प्रकारचें धाडस केल्याशिवाय मनुष्य वैभवास पोंचत नाहीं. बरें, आह्मी तर तयारच आहों " बुरेसे खुदा डरे " हेंही यथार्थच. परंतु मी जसा निःसंग होऊन पापकर्मासक्त झालों आहें, तशी ती माझ्या इच्छेला

अनुकूल होईल काय ? हां. एवढें मात्र निश्चित अनुमान करितां येतें कीं, सुंदर स्त्री पाहिली ह्मणजे कोणाही पुरुषास तत्काल कामेच्छा होते, तद्वत सुंदर असा पुरुष पाहिला ह्मणजे स्त्रियांनाही प्रेम उत्पन्न होतें, मग तिची सध्यांची स्थितीही विलक्षण आहे. ज्या स्त्रियेचा पति वृद्ध, कुरूप आहे, अगर तिजपेक्षां लहान असून रोगी अशक्त आहे, अथवा पुष्कळ दिवसापासून देशसंचार करितो आहे, जिला शेजार व्यभिचारिणी स्त्रियांचा, अन्नावस्त्राची मारामार, पति बाहेरख्याली, अशी जेथें स्थिति, ती चंचलप्रकृति होणारच. ती सुंदरी अद्याप माझ्या दृष्टीस प्रत्यक्ष रीतीनें पडली नाहीं, तरी तिची मूर्ति माझ्या समोर आहेच. तिचें तें हसतमुख, तुटक भाषण, चोरून पहाणें, नेहमीं आंगठ्यानें जमीन उकरणें व अशा प्रकारचा कांहींतरी सदां चाळा करीत असणें, हीं देखील पूर्वोक्त स्त्रीचींच लक्षणें होत. अरे, मी बोलत बोलत अगदीं तिच्या महालाजवळ आलों ( तीस निरखून पाहून. ) अहाहा ! नेत्रांनो तुमचें सुख तुह्मांला मिळालें. इतर इंद्रियांनो, आतां क्रमाक्रमानें तुमचीही इच्छा पूर्ण होणारच ! पहा ही अप्सरा, मोर जसा मेघाकडे दृष्टी करून आपला पिसारा पसरून आनंदांत असतो, त्याप्रमाणें ही पद्माक्षी आपलें वस्त्र पायघोळ पसरून मोठ्या ऐटीनें आपली मान वांकडी करून कोणा तरी पुरुषाचें चिंतन करीत आहे. अरे, पण अशा राजविलासी स्त्रियांचें पाऊलही जमिनीस लागणें असंभवनीय; आणि ही सुंदरी तर वालुकामय प्रदेशीं मोत्याप्रमाणें चमकत येथें लोळत पडली आहे, केश अस्ताव्यस्त झाले आहेत, तोंडावर घाम आला आहे व क्षणोक्षणीं श्वासोश्वास सोडते आहे. ( आनंदानें टाळी वाजवून ) ओ-हो. मी तरी मोठ्या नाजुक वेळेवरच आलों. जी तिला व्यथा तिचा प्रतिकार करणारा हा वैद्य-

चला तर फक्कड सुभानराव, आतां आस्तेकदम सरकार स्वारी झुलत. हिच्या या अशा स्थितीमुळें आजना उद्यां कधीं तरी ही दुसऱ्याच्या हातीं लागणार. मग आपण कां शिकार सोडा? इतर कुलस्त्रियांना दूषित करण्याचा जर मी यत्न केला असता, तर दोष लागला असता उलट हें पुत्रदानकेल्याचें पुण्य लागेल. न जाणो अशाच रीतीनें माझें दैव उदयास आलें तर– (पद्मलोचना पावलें ऐकूं आलींसें करून चपापून उठून उभी राहाते व सुभानराव तिला निरखून पहात एके बाजूस उभा रहातो. )

**पद्मलोचना**–( आपल्याशीं ) या चतुर सुंदर पुरुषाशीं आपलं प्रेम असावं असं मला पुष्कळ दिवस वाटतं आहे. त्यालाही पण माझी आशा आहे; ह्मणून गोंडा घोळायला रोज खेपा घालतो, तर मी याच्या ह्मणण्याला कबूल होऊंका?——नको पण, कांहीं नसतां माझ्या नांवाचा इतका बोभाटा! मग तसं झाल्यावर काय विचारतां? बाहेरच्या मनुष्याचा बोभाट हा होणारच. माझ्या मनांत आहे तसं जमलं तर मग माझ्या सारखी दैववान दुसरी कोण आहे? तर याला निक्षून सांगतेंच. ( सुभानरावास उद्देशून, उघड ) घरांत कोणी नाहींत. सर्व मनुष्यं बाहेर गेलीं आहेत.

**सुभानराव**–बरें, नाहींत तर नाहींत. ( एकीकडे ) दुसरें कोणी नाहीं तेंच मला पाहिजे होतें. ( उघड ) बसाबसा. तुह्मी कां उभ्या? मी कोणी परका का आहें? अहो, मी तुमचाच ( मनांत– ) दिलदार.

**पद्मलोचना**–तर वाळा साहेबांची गांठ का घ्यायची होती? तेही बाहेर गेले.

**सुभानराव**–ऊंहुं:

**पद्मलोचना** –तर कोण पाहिजे?

**सुभानराव**–दिवाण साहेबांच्या भेटीकरितां आलों होतों. सहजी आल्यासारखें आपल्याला भेटून जावें ह्मणून इकडे वळलों.

**पद्मलोचना**–( मनांत ) अं-हं-अरे मेल्या, असं का? आलं ध्यानांत.

**सुभानराव**–आज आपलें तोंड अगदीं उतरल्यासारखें दिसतें ?

**पद्मलोचना**–होय बाई; आज दोनतीन दिवसांपासून बारीक ताप येत असतो; अन्नतर अगदीं जात नाहीं.

**सुभानराव**–( हळूच- ) ताप होण्याचे हे आपले दिवसच आहेत. ( मोठ्यानें ) बरें कांहीं औषधोपचार? कांहीं नसेल ?

**पद्मलोचना**–झालीं पुष्कळ औषधं.

**सुभानराव**–त्याला वर्मी औषध पोंचलं पाहिजे. ह्मणजे तत्काल बरें वाटेल.

**पद्मलोचना**–कोणाला ठाऊक आहे ? काय त्याचं वर्म आहे तें ?

**सुभानराव**–( आपल्याशीं ) कर्मानें तें वर्मस्थान थंडगार केलें पाहिजे. ( उघड ) मला आहे माहित त्याचें वर्मी औषध. ( हळूच. ) त्या जागची कळ दबली पाहिजे.

**पद्मलोचना**–( मनांत ) पुरुष जितके शहाणे ह्मणवितात, तितके वेडे असतात. त्यांच्या मतं आपलं बोलणं बायकांना समजत नाहीं; पण असल्या संबंधाचं बोलणं पुरुषांपेक्षां स्त्रियांना लवकर समजतं. पहा मेला कसा घामाघुम झाला आहे. एखादी तरुण, रूपवान, चटकदार बायको मेल्या पुरुषानं पाहिली, कीं मग कुठं त्यांचं शहाणपण जातं तें कळत नाहीं. मी याच्या ह्मणण्याला कबूल होऊं कां ? छे ! नको-नकोच तें.

**सुभानराव**–अबब ! काय हें वेड ! असल्या कामांत

इतका विचार तो कशाला ? मी एकवार सांगितलेंना ? मी कोणी परकी नाहीं. आपलाच आहें. शिवाय, प्राण गेला तरी गोष्ट फुटायची नाहीं.

**पद्मलोचना**–मी एकदां सांगितलंना ?

**सुभानराव**–( घाईनें. ) काय तें ? हो. हो. कधींच नाहीं बोलायचा.

**पद्मलोचना**–काय बोलायचा नाहीं ? मी काय सांगतें, कीं घरांत कोणी नाहीं. पुरुष बाहेर गेले आहेत. तुह्मीं सदांनकदां बायकांमध्यें येऊन बोलत बसतां, मी पर्यायानं दोन तीन वेळां सुचिवलें, तुमच्या लक्षांत येत नाहीं; ह्मणून आतां स्पष्ट सांगणं भाग पडलं. पुन्हा इकडं तुह्मीं अगदीं येत जाऊं नका. समजलांत ?

**सुभानराव**–अरे इच्या, काय करावं आतां ! अद्याप ध्यानांत येत नाहीं ?

**पद्मलोचना**–तुह्माला कोण पाहिजे ?

**सुभानराव**–सांगतोंच तर; पण रागाऊं नका. मला तुह्मीच पाहिजेत.

**पद्मलोचना**–अहाहा ! तुमच्या तोंडावर नी माझ्या, लोक थुंकतील ( रागानें ) समजली अक्कल ! वाहवा ! तुह्मी कोणाशीं बोलतां ? स्मरण आहे का ?

**सुभानराव**–हो. हो. स्मरण ह्मणजे ? स्मरण पक्कें आहे.

**पद्मलोचना**–हां. बाहेर व्हा आतां. नाहींतर चांगली शोभा होईल. आज तुह्मी शुद्धीवर नाहीं. कुठून शेण खाऊन आलां अहांत. अगबाई, तोंडाची घाण इथपर्यंत येत आहे.

**सुभानराव**–हें मात्र तुह्मीं बरोबर ओळखलंत ( मनांत ) ती दवा पोटांत आहे ह्मणूनच अशी मजा चालली आहे.

( इतक्यांत जयदेवराव येतो. )

**जयदेवराव**–पत्र माझ्या शेल्याच्या शेवांतच आहे. चला मातोश्रीस कळवूं या.

**पद्मलोचना**–अशी धुंदी उतरूं द्या. तुह्माला जर भलत्यासलत्या ठिकाणीं तोंड घालण्याची संवयच असली तर ती कोण सोडविणार ? पण " सकट घोडे बाराटक्के " असं करूं नये. आई, बहिणी यांची ओळख ठेवावी लागते.

**सुभानराव**–अं. अं. असें कां करतां हो ! मी तुमच्या पाया पडतों.

( दारवेचा थोडा अम्मल आल्यामुळें झिंगून पडतो. )

**जयदेवराव**–( मनांत ) अरे–हें काय प्रकर्ण ? आजचा हा रंग नेहमींपेक्षां अधिक दिसतो. याचा स्वभाव मला पुष्कळ दिवसांपासून माहित असून आजवर मी उपेक्षा करीत आलों, त्याचा हा परिणाम !

**पद्मलोचना**–अहारे ध्यांना! शेणाचे दिवे ओंवाळा.

**सुभानराव**–मला शेणाचे दिवे ? ( हंसून ) हां. मला पंचारती करणार होय ?

**जयदेवराव**–( आपल्याशीं ) वा ! वहावा ! काय प्रेमांत आला आहे ! या नरपशूच्या तोंडचे हे घाणेरे शब्द ऐकणें ह्मणजे आपला अपमान आपण करून घेणें, तसा हा प्रकार. ( रागानें ) पुढें होऊन याचे कान धरून या हरामखोराचें तोंड फोडून टाकूं काय ? ( कांहीं विचार करून ) नको पण. परस्पर शोभा चालली आहे, त्यापासून दुसरी एक आनंदाची गोष्ट ही कीं, मातोश्रीच्या संबंधानें थोडीबहुत कुरकूर माझ्या कानीं आली होती; तो संशय दूर झाला. बरें, तसा प्रसंगच आल्यास पहातां येईल. तर या उभयतांच्या दृष्टीआड उभें रहावें.

(जयदेवराव एके बाजूस उभयतांचा संवाद ऐकत उभा रहातो.)

**पद्मलोचना**-कारे कोडग्या निलाजऱ्या, इथून जातोस कीं नाहीं ? का शिपायाला हाक मारूं ? ह्मणजे चांगला चतुर्भुज होशील. लोचट कुत्रं मेलं. अगदींच लाज नाहीं ह्मणजे काय ?

**सुभानराव**-कुत्रें ! छे ! मी जरी तुझें कुत्रें असतों तरी या देहाचें सार्थक झालें असतें. नेहमीं तुझ्या हाता खांद्यावर बसलों असतों, तुझ्या बिछान्यांत लोळलों असतों. यापेक्षां आणखीं काय पाहिजे ?

( तिजकडे पूर्ण दृष्टीनें पहात उभा राहतो. )

**पद्मलोचना**-पहातो पहा कसा मेला टोणगा. फुटले याचे डोळे ( बोटें मोडते ) थुः मेल्या तुझ्या तोंडावर. ( तोंडावर थुंकते. )

**सुभानराव**-अहाहा ! ( आनंदानें हंसून टाळ्या वाजवून ) कामसंतापानें या देहाची लाही झाली होती; परंतु अमृताचा वर्षाव झाल्यानें पुनर्जीवनच झालें. सुंदरी, तूं कशाला या सेवकाकरितां कष्टी होतेस ? तो अमृताचा उगम अधर माझ्या स्वाधीन कर ह्मणजे झालें.

( असें ह्मणून तिला धरूं जातो व ती एकीकडे होते. )

**पद्मलोचना**-पुरे, पुरे. तुझ्या मुरदाडपणाचा कळस झाला. हा निर्लज्यपणा पुरे कर. एकदां माणसानं सांगितलेलं लक्षांत आणावं. अति लघळपणा बरा नव्हे. तुह्मी ह्मणजे चारचौघा संभावित गृहस्थांमध्यें बसणारे उठणारे; पण अशा गुणानं कोणी पायपोसापाशींही उभे करायचे नाहींत. तर सांगतें, चांगला कानाला खडा लावून घ्या, नी पुन्हां असा मूर्खपणा करणार नाहीं ह्मणून शपथ घ्या. दुसरं कोणी असतं तर चांगली धिंड काढली असती, मी ह्मणून क्षमा केली.

**सुभानराव**-माझेंही पण तसेंच ह्मणणें आहे. असे तुमचे हे शब्द दुसरा कोणी एक क्षणभर देखील सहन करणार नाहीं; परंतु मीं ते कां सहन केले ? तर हे तुह्मी मनापासून बोलत नाहीं. तुमचा स्वभाव आज पुष्कळ दिवस मी जाणून आहें. शिव्याचशा काय ? पण दोन लाथा माराल तरी त्याचा मला आनंदच आहे. लाडके, अधिक काय सांगूं ? तूं माझी एवढी गोष्ट कबूल कर, मग या शरिराची तूंच मालकीण, तुझा बंदा गुलाम होऊन राहीन.

**पद्मलोचना**-तुझीं शंभर वर्षे पुरीं भरलीं असलीं तर कोण तुझं मरण चुकवणार ? हें तुझं बोलणं दुसऱ्या कोणी ऐकलं नाहीं, ह्मणून अजून वांचलास; नाहींतर हाड दिखील जाग्याला उरलं नसतं. चला, या मेल्या पाप्याचं कर्मचांडाळाचं तोंड दिखील पाहूं नये ( जाऊं लागते, पण सुभानराव तीस आडवून धिटाईनें )

**सुभानराव**-हं. खबरदार. हा प्राण गेला, तरी तुला येथून जाऊं द्यायचा नाहीं. अरे वाः मी आज आरंभापासून तुझें बोलणें समजतों आहें. एकदां असं व एकदां तसं; घटकेंत तीन रंग ! आजवर मला मधाच्या बोटाचें आमिष लावून आतां तोंडघशी देणार ? तूं पाहिजे तो बहाणा कर, तूं किती किंमतीची बायको आहेस, याची शहरांतील सर्व लोकांना ओळख आहे. या नाकबुलीनें काय परिणाम होईल, हें मी पूर्ण जाणून आहें, तुझा तो बुढ्ढा थेरडा नवरा, महाराजांच्या नाकांतील बाल आहे, त्याला ही गोष्ट तूं जाऊन कळवलीस ह्मणजे तो माझा प्राण घेईल, आणि तूं पतिव्रता चांगुणा होऊन बसशील येवढेंचना ? पण लक्ष्यांत ठेव, नांवाचा सुभानराव फाकडा आहे. तूं होऊन माझ्या गळां पडूं पहातेस आणि मी ना असें ह्मणतों ह्मणून मजवर बलात्कार केल्याचा आरोप आणतेस. असेंच सर्व

लोकांना सांगून तुझी फटूफजीती करीन. हें लक्ष्यांत आणून काय तें कर.

**जयदेवराव**–( एकीकडे ) चोरा, हा तुझा वस्ताद येथें उभा आहे. मी ह्मणें लोकांना असें सांगतों. धर्मराजच तुझी, दम धर मूर्खा, अंगाला तूं स्पर्श कर ह्मणजे या जंबियानें तुझी मान तोडून जीभ बाहेर काढतों.

**सुभानराव**–हं. आटप काय तो तुझा बेत ठरूं दे. माझें ऐकलेंस तर माझा प्राण तुला अर्पण, न ऐकलेंस तर तुझा आज प्राणच घेतों.

**पद्मलोचना**–( आपल्याशीं )अगबाई ! हा काय या मेल्याचा जुलूम!हा ह्मणतो तसें करायला चुकायचा नाहीं. लोक काय विचारतां? तशा रीतीनेंही दूषण द्यायला कमी करायचे नाहींत. तर आता फार शहाणपण उपयोगाचं नाहीं. या काळतोंड्याची नजर चुकवून पळून जाण्यांतच शहाणपण आहे. ( असें ह्मणून पळून जाते व तिच्या मागें सुभानराव जातो व त्याच्या मागें जयदेवराव जंबिया उपसून जातो. )

( पडदा पडतो १ अंक समाप्त. )

## अंक २ रा. प्रवेश १ ला.

( स्थळ–मणिपूर महाल. )

( वृंदा उर्फ रतिद्रष्टा आणि तिचा जार उधोजीराव. )

**रतिद्दष्टा**–किती जरी आपण मला धीर दिला, तरी माझी भीति जात नाहीं. त्यांचा स्वभाव किती रागीट आहे, त्याचा आपल्याला अनुभव आहेच. त्या दिवशींचा शिकारखान्याजवळचा प्रकार लक्ष्यांत आहेना ? पिंजऱ्यांतून वाघ सुटून मोकळा

होऊन टाळा पसरून डुरकण्या फोडीत अंगावर आला; पण त्याची काडीभर भीति न मानतां त्याच्यावर तुटून पडून त्याचे सारखे दोन तुकडे केले. चाकराला तरवार घेऊन यायला कुठं थोडा उशीर लागला, ह्मणून त्या बिचाऱ्याचा दिखील बळी. अगबाई ! काय हा राग नी केवढं शौर्य ! ती आठवण झाली ह्मणजे अंगावर कांटा उभा रहातो.

**उधोजीराव**–झालें, हेंच तें वेड. त्यानें वाघ मारला, यांत तुला काय येवढें आश्चर्य वाटलें ? मग जर एखादी तूं लढाई पाहिलीस तर तुझी त्रेधा होऊन जाईल. माझा अजमास असा होता कीं, हा तुझा मानाजीराव शुद्ध रानवट मनुष्य आहे. याला पुढचा पोंच अगदीं कमी. हा जर त्या मोकळ्या वावावर हत्यारावांचून गेला, तर खचित प्राणाला मुकून औषधावांचून ब्याद टळेल; परंतु तें अनुमान चुकलें.

**रतिद्दष्टा**–माझ्या नशिबीं अद्याप या अटकेंत दिवस काढायाचे आहेत, ह्मणून ते वांचले.

**उधोजीराव**–तूं बिलकुल काळजी करूं नकोस. मी रात्रंदिवस त्याच वाटाघाटींत आहें. लवकरच त्याचा निकाल लावतों.

**रतिद्दष्टा**–नकोग बाई. एक करतां भलतंच व्हायचं. नी तसं जर का कांहीं वाकडं झालं तर मग कुत्रं दिखील माझे हाल वनवास खाणार नाहीं.

**उधोजीराव**–हंः, पांच बोटें तुझ्या अंगाला लागतील, त्या दिवशीं त्याचा प्राण घेईन. नाहींतर शेवटीं मी तरी मरून जाईन.

**रतिद्दष्टा**–असं अभद्र बोलूं नये. आपलं जर कां कांहीं भलतं सलतं झालं तर मी कशाला प्राण ठेवूं ? माझ्या करतां कां मला वाईट वाटतं ?

**उधोजीराव**—मजविषयीं अशी तुझी अप्रतिम भक्ति आहे, याकरितांच मीहि अत्यंत लंपट झालों आहें; नाहींतर परस्त्री इच्छा ! छत्. परस्त्री ह्मणजे कालकूट विष होय. याचें प्राशन केलें कीं, तत्काल मृत्यूचें बोलावणें आहेच. हें मी जाणून तुझ्या प्रेमपाशांत गुंतलों.

**रतिदृष्टा**—पुन्हां मात्र असं बोलूं देणार नाहीं; सांगून ठेवतें. ( रागावते. )

**उधोजीराव**—कां बुवा इतका राग कशा करतां ? असा काय मीं अपराध केला ?

**रतिदृष्टा**—कां नाहीं राग येणार ? मी ह्मणे त्या मेल्याची बायको. आपण व्हा पाहिजे तर त्याची बायको.

**उधोजीराव**—( हंसून. ) ठीक ठीक ! मी त्याची बायको होऊं ? फार चांगलें. अहो, चारचौघांमध्यें, देव ब्राह्मणांच्या साक्षीनें तुह्मी जर बायको झालां, तर आतां ना ह्मणून कसें चालेल ?

**रतिदृष्टा**—हा कसला मेला जुलमाचा रामराम ? मी कुठं त्या गोष्टीला कबूल होतें ? मनानं मीं आपल्याला वरिलं आहे. गंधर्वविवाह हाच क्षत्रियांना मान्य आहे; तर मी त्या जुलमी कसाबाची बायको कशी झालें ?

**उधोजीराव**—पूर्वीं तुमचा माझ्याशीं विवाह ठरला असून, नंतर मानाजीशीं विवाह तुमच्या वडिलांनीं केला. केवढा हा विश्वासघात ! हें कृत्य त्यांच्या वयाला, बडेजावीला अगदीं अयोग्य होय. राज्याभिषेकाचा माझा बेत फसला मात्र, लागलेंच सर्व उलटलें. एकंदरींत लक्ष्मीला सर्व वश. मनुष्याची पारख फारच थोड्या लोकांना असते. तुमची बायकांची एक ह्मण आहेना, कीं–" जिकडे तोलतें तिकडेच झुकतें. " तसें झालें.

**रतिदृष्टा**—तें कांहीं असो. दुसऱ्याचा मी कांहीं निरवाळा देत नाहीं; पण मीं नाहींना आपलं वचन मोडलं ?

**उधोजीराव**—काय सांगू लाडके, तूं दुसऱ्याची बायको होणार, हें जेव्हां मला समजलें तेव्हां मी अगदीं वेडा होऊन गेलों. जेवणखाण, झोंप, सर्व विसरलों. कांहीं सुचेनासें झालें; पण सुदैवानें एक युक्ति सुचली कीं, जोशीबुवाला तरी जाऊन विचारावें कीं, हें कसें काय लग्नाचें होणार ? त्याप्रमाणें त्यांना भेटून सर्व झालेली हकीगत सांगितली. त्यावेळीं ते ह्मणाले कीं, प्रत्यक्ष रीतीनें जरी ती तुह्माला मिळाली नाहीं, तरी तिच्या सौख्याचे भोक्ते तुह्मी, हें ब्रह्मलिखित असें समजा. हें त्यांचें भाषण ऐकलें तेव्हां काळजी दूर झाली; व मी नंतर प्रत्यक्ष लग्नाच्या भानगडींत पडलों नाहीं.

**रतिदृष्टा**—प्रियकरा, हें भविष्य जोशांना कसें समजतें ? कोणी ह्मणतात कीं, देव रात्रीचा येऊन त्यांच्या कानांत सांगतो. खरं कां हें ?

**उधोजीराव**—( हळूच तिच्या गालावर दोन बोटांनीं मारून. ) हा वेडे ! देव कधीं मनुष्याच्या आजवर दृष्टीस पडला आहे ?

**रतिदृष्टा**—पहा बरं, हें बोलणं आपल्याच गळ्यांत येईल. सांगू का या प्रश्नाचं उत्तर ?

**उधोजीराव**—हां-हां. आतां वेदांतांमध्यें का तुमची गती चालूं लागली ? सांगा तर काय सांगणार तें.

**रतिदृष्टा**—जी वस्तु जगांत आहे, ती कधींकाळीं तरी मनुष्याच्या दृष्टीस पडते. जी नाहीं तिला नांवच नाहीं. तशी ईश्वर ही वस्तु जगांत कुठं तरी आहे, ह्मणूनच तिला नांव आहे; तर तो दृष्टीस पडला पाहिजे. दृष्टीस पडत नाहीं तर देव मुळीच नाहीं असें होतें.

**उधोजीराव**-शाबास प्रिये, कमाल आहे तुझ्या शहाणपणाची. अग तुला मी अगदीं भाबडी समजत होतों. असलें हें रत्न त्या मानाजी पशूला ! माकडाला मुक्ताफल तशी ही गत ! असो. याचा तुला खुलासा सांगतों ऐक " त्वं प्रतीयसे ज्ञानदृशां " असें एके ठिकाणीं ह्मटलें आहे. त्याचा अर्थ-हे देवा, तूं सर्वत्र भरला असून कोणाच्या दृष्टीस पडत नाहींस. या चर्मचक्षूंना तूं दिसत नाहींस. तरी योग्यांच्या ज्ञानदृष्टीनें तूं दृश्य आहेस. ' अक्कलसे खुदा पछानना ' असें जें ह्मणतात तें हेंच.

**रतिदृष्टा**-बरं तें असो. हें भविष्य ज्योतिषाला कसं समजतं?

**उधोजीराव**-अग हें गणितशास्त्र आहे. त्या गणितशास्त्राच्या अभ्यासी पुरुषांना ज्योतिषी असें ह्मणतात. कित्तेएकांना त्या शास्त्राचा गंध नसतां पोट भरण्याकरितां ढोंगहि माजवितात.

**रतिदृष्टा**-पण तसे हे ढोंगी नाहींतना ? नसले तर त्यांना आणखीं एक प्रश्न करावा कीं, पुढें माझ्या नशीबीं आणखीं काय काय सोहाळे होणार आहेत ?

**उधोजीराव**-त्यांनीं एक मला विपरीत गोष्ट सांगितली; परंतु ती निःसंशय खोटी असावी. केवळ तुजविषयीं माझा ग्रह कसा आहे, हें पाहण्याकरितांच त्यांनीं असें सांगितलें असावें.

**रतिदृष्टा**-पुरे पुरे हे आढेवेढे. गोष्ट काय ती समजूं द्या ह्मणजे झालं.

**उधोजीराव**-सांगतोंच तर आतां. शेवटीं तुझा अंत माझ्या हातून होणार आहे.

**रतिदृष्टा**-हात् तिच्यारे. इतकंचना ? असं जर होईल तर ही ईश्वराची मजवर मोठी कृपा समजली पाहिजे. माझीही मनापासून तशीच इच्छा आहे.

( इतक्यांत घंटा वाजलेली ऐकूं येते )

**उधोजीराव**–किती वाजले? दिवस बराच आलासा वाटतो.

**रतिहृष्टा**–अगबाई! बोलत बसलं ह्मणजे भान जसं मुळींच रहात नाहीं. आपणाला वेड तर नाहींना लागलं. आतां त्यांची (नवऱ्याची) येण्याची वेळ झाली.

**उधोजीराव**–वेड ह्मणून काय विचारतेस. हें बाइलवेड मोठें वाईट असतें. हें ज्या पुरुषाला लागलें, त्याचा शेवटीं त्यांतच अंत होणार.

**रतिहृष्टा**–हं, आटपा; पुरेही थट्टा. आज फारच उशीर झाला. त्यांच्या जर कांहीं दृष्टीस पडलं तर उभयतांचा मोक्ष होईल.

**उधोजीराव**–अग जा. त्याची काय प्रतिष्ठा लावली आहेस. हें आपलें कर्म आज ना उद्यां उघडकीस येणार. हें जर मला समजतें, तर मी त्याला भिऊन तुझा नाद सोडला नसता का? त्याची मला कांहींच पर्वा वाटत नाहीं.

**रतिहृष्टा**–ईश्वर करो आणि त्या मेल्याचा सत्यानास होवो. ह्मणजे माझें मन स्वस्थ होईल. बरं, आतां आपण चलावं. आज फारच उशीर झाला.

**उधोजीराव**–होय, माझे लक्षांत आहे; पण काय करूं? माझें पाऊलच उचलत नाहीं. कायग, मला तूं जादू तर केली नाहींसना?

**रतिहृष्टा**–मीं कांहीं जादू केली नाहीं; पण तुह्मीं मात्र खरोखर मला जादू केलीत. बरं आपण नाहींना जात?

**उधोजीराव**– लाडके, मजविषयीं इतकें तुझें निष्ठुर मन असून मीच वेडेपणा करून तुझ्या मायापाशांत सांपडलों. हेंच का तुझें माझ्यावर प्रेम?

**रतिदृष्टा**-जिवलगा, असें मला टोंचून बोलूं नका. मी सुखा संतोषानं का तुह्माला जा असं ह्मणतें ? पुढच्या प्रसंगाला भ्यालं पाहिजे.

**उधोजीराव**-बरें तर जातों; पण एक अमृताचा घोंट !

**रतिदृष्टा**-मी नाहीं जा ( हंसते )

**उधोजीराव**-( तोंड परतून रागानें ) तर खचीत तुला माझा कंटाळा आला.

**रतिदृष्टा**-इतका नको राग. हं, होऊं द्या एकदां इच्छा पूर्ण. ( पडदा पडतो )

## अंक २ रा. प्रवेश २ रा.

( **स्थल**-शहराबाहेरील एक ओसाड मैदान. )

( भवानराव, जाधवराव व सयाजीराव येतात. )

**भवानराव**-रामराम सयाजीराव. जाधवराव, तुह्मालाही रामराम.

**जाधवराव**-होय खरोखर आतां राम, राम, ह्मणण्याचीच पाळी आहे.

**सयाजीराव**-बाबानों, ही तुमची डावपेंचांची भाषा सुरू झाली ह्मणजे स्वस्थ तुमच्या तोंडांकडे मला पहात बसावें लागतें. मी साधा मनुष्य आहें. माझ्याशीं जर तुह्माला बोलायाचें असेल, तर साधें बोलणें चालूं द्या.

**भवानराव**-होय, मी तेंच विचारणार होतों. करावयाचा रामराम कसा असतो आणि ह्मणावयाचा कसा असतो ?

**जाधवराव**-रामराम असें तुह्मी केव्हां ह्मणतां ?

**सयाजीराव**-केव्हांसे काय ? आपल्या स्नेह्याची गांठ पडली ह्मणजे.

**भवानराव**-हां-आतां आलें माझे ध्यानांत. मरतेवेळीं राम, असें ह्मणतात.

**जाधवराव**-झालें तर. ह्मणा आतां राम. झांका डोळे.

**सयाजीराव**-ते कां ?

**जाधवराव**-ते कां ? कां ह्मणजे पोटाला अन्न मिळत नाहीं, ह्मणून राम ! !

**सयाजीराव**-हें बोलणें तुह्माला शोभत नाहीं; परंतु सध्यां माझी वेळ मात्र तशी आहे. कारण आह्मी पडलों इनामदाराचे बच्चे. आजपर्यंत वडिलांनीं मिळवून ठेविलेला पैसा सर्व संपून गेला.

**भवानराव**-माझी तीच अवस्था झाली आहे. शिलकी पैसा गेला सारा ऐषआरामींत. वेतन होतें तें सरकारांनीं काढून घेतलें. आतांशा आपले तुमच्यासारख्या धूर्त लोकांचे धोरणानें चालतों ह्मणून कसा बसा गुजारा चालला आहे; पण पुढें प्रसंग कठीण आहे.

**सयाजीराव**-रास्त आहे भवानराव. हे जाधवराव ह्मटले ह्मणजे हरहुन्नरी. यांना हें भाषण शोभत नाहीं. अहो जाधवराव, तुह्मी लाथ माराल तेथें पाणी काढाल. वाघासारखे शूर वाघ तुह्मी व अशी दिलगिरी ? मग आह्मीं काय करावें ?

**जाधवराव**-गड्यांनों, तें आमचें शहाणपण आतां कांहीं चालत नाहीं. आज काल दिवस शूरांचे नव्हेत. खुशामती, धूर्त, अशा चोरांचे दिवस आले आहेत. अरे, माझें तर नांवच नको; पण वाघापेक्षां सवाई वाघ जे सुभानराव, त्यांची पहा कशी बितली आहे. सुभानराव हे एक या शहरांतले जरीपटक्याचें निशाण. काळाप्रमाणें ज्याचें नांव घेण्याची लोकांना दहशत वाटे, तो सुभानराव -वाघ- आज पिंजऱ्यांत सांपडून बायकापोरांनीं त्याची विटंबना करावी ?

**सयाजीराव**-( घाबरून ) काय ? काय ह्मणतां ? सुभानराव पिंजऱ्यांत सांपडले ? छे ! अहो सर्व लोक ज्यांना भितात; ते कोणाला भितील ?

**जाधवराव**-अहो हळू बोला. नाहींतर सध्यां आह्मांला अंधारकोठडींत जावें लागेल.

**भवानराव**-हें काय बुवा आश्चर्य ? राजद्रोह केल्याचा त्यांच्यावर गुन्हा शाबीत झाल्यावरून त्यांना नौकरीवरून दूर केलें होतें; परंतु पुन्हां ते प्रतापरावाच्या वतीनें खाजगी दिवाण होणार, असें ऐकलें असून मध्यें हें काय विघ्न उपस्थित झालें ?

**जाधवराव**-अरे, तो प्रतापराव तोच गुलाम मोठा नीच मनुष्य आहे. आजपर्यंत झालेल्या अनर्थाला व पुढें होणाऱ्या अनर्थाला तोच कारण आहे. बरें आहे ह्मणावें. प्रतापरावा, पाहून घेऊं.

**सयाजीराव**-आजचा हा तुमच्या बोलण्याचा रंगच निराळा दिसतो.

**जाधवराव**-होय, तो पूर्वीचा रंग गेला. चट सारी काळ्य रंगाची छाया आली. त्या अर्थीं आतां लवकरच काळें केलें पाहिजे

**सयाजीराव**-पण असें झालें तरी काय ? आज सुभानराव कोठें आहेत ?

**जाधवराव**-अरे गड्या, हळू बोल असें एकदां सांगितलेंना?

**भवानराव**-जाधवराव, तुह्मी देखील ज्या अर्थीं इतके भितां त्या अर्थीं खचीत कांहींतरी बिकट प्रसंग आहे, यांत संशय नाहीं; पण कारण समजेल तर कांहीं उपाय करतां येईल.

**जाधवराव**-तुह्मांला सर्व सांगतों; पण येथें एक अक्षर उच्चारितां उपयोग नाहीं. आह्मी त्रिवर्ग सुभानरावाचे साथीदार

असें ठरल्यावरून आह्मांलाही पकडून कैद करण्याबद्दल सरकारी हुकूम सुटला आहे, तर चला त्या पडक्या देवळाजवळ जाऊं. सुभानरावही तेथेंच येणार आहेत. तेथें गेल्यावर सर्व हकीकत ते स्वतः सांगतील.

( सर्व निघून जातात. )

## अंक २ रा. प्रवेश ३ रा.

### स्थळ–( राजमहाल. )

( वृंदा ( रतिद्दष्टा ) व मानाजीराव. )

**मानाजीराव**–कसें काय सरकार, मला बरोबर एक महिन्याची रजा पाहिजे, ठरल्या मुदतीपेक्षां जास्त दिवस लागल्यास आपल्या मर्जीस येईल तो दंड करावा.

**वृंदा**–मी जाऊं द्यावयाची नाहीं, हा माझा एकच शब्द. इतकें सांगत असून जर जाणें असेल तर माझी वाट लावून मग काय तें खुशाल करावं.

**मानाजीराव**–समजदार मनुष्यानें असा हट्ट धरूं नये. मी देखील जावें, जावें, असें तोंडानें ह्मणतों; परंतु मनाची धांव मागें मागें ओढ घेत आहे. तुजवांचून एक क्षणभर तरी मला गमतें ? पण काय करूं ? रत्नपुरास जाणें भाग आहे.

**वृंदा**–मेली मीच वेडी. मलाच लाज नाहीं, असं ह्मटलं पाहिजे. मघांपासून भाटासारखी बडबड करितें आहें, पण इकडं कांहीं मनावर घेणं होतं आहे का ? 'येरे माझ्या मागल्या.' शेवटीं असंचना ? आपल्याला खरोखर जाणं असेल तर मग कशाला विचारावं ? पण एक सांगतें. पुनः मी कांहीं दृष्टीस पडावयाची नाहीं.

**मानाजीराव**–वा ! मग तर फारच शहाणपण ! काय

मला चेटूक करून मारून टाकिलें आहेस ! ईश्वर जाणे. पालीला पाहून विंचू जशी आपली नांगी खालीं टाकितो, त्याप्रमाणें तुझ्या जवळ आलों ह्मणजे माझा राग, अभिमान जागच्या जागीं जिरून जातो.

**वृंदा**–हो. हो. बोलणं मात्र तेवढं ऐकून घ्यावं. अगदीं जशी खडीसाखर. पण करणी–

**मानाजीराव**–बरें. आह्मीं आपल्या तोंडानें सांगण्यांत काय अर्थ आहे ? त्या बिचाऱ्या ईश्वराला डोळे आहेत. तो सर्वसाक्षी आहे. अरेरे प्रिये, तूं ह्मणतेस तसा माझा स्वभाव निदान तुजपाशीं नाहीं. आह्मीं पुरुषांनीं तुमच्या सारख्या माशुक मनुष्याजवळ जरी आपलें शिर कापून ठेविलें तरी तुमचा विश्वास नाहीं तो नाहीं. अग, मनुष्य कसाही तिरंदाज, कावेबाज असो, त्याचीं कपटकारस्थानें इतर ठिकाणीं चालतील; परंतु बायकांजवळ तो शुद्ध वेडा होऊन जातो. या गोष्टीचा तुला अनुभव आहेच. पहा, ज्या मानाजीपुढें कोणताही मनुष्य उभा राहण्यासही धजत नाहीं, तोच मी हा मानाजीराव तुजजवळ गोगलगाय होऊन गेलों आहें.

**वृंदा**–अग बाई ! थट्टेच्या बोलण्यांत इतकं कशाला निर्वाण पाहिजे ? नी मनाला तरी इतकं कां वाईट वाटून घ्यावं. माझ्यावर आपली किती प्रीति आहे हें मला नाहीं का ठाऊक ? तें मीं वरचेवर बोलून का दाखविलं पाहिजे ? इतर बायकांप्रमाणं तोंडपुजेपणा करायला मला नाहीं येत; पण मी असं विचारितें.–आपल्याला जर गेलंच पाहिजे तर मला बरोबर न्यावी. मी बरोबर आलें तर लाज का वाटते ?

**मानाजीराव**–याचें कारण सांगूं तर ? ऐक. ( मागें पुढें कोणी नाहीं असें पाहून ) हें पहा–हा आपला उधोजीराव. त्याचा

अलीकडे अगदीं चमत्कारिक स्वभाव झाला आहे. भारीच त्याची चंचलवृत्ति झाली आहे. आजपर्यंत जितका माझ्या हुकमांत वागत होता, तितका गैरहुकमी झाला आहे. मला वाटतें त्याला कोणी तरी भेदी सामील झाला आहे. आपण उभयतांही येथून निघून गेलों आणि पश्चात् त्यानें जर कांहीं राज्याची उलटापालट केली, तर आपली केवढी हानी होईल? सबब आह्मां दोघांपैकीं कोणीतरी येथें जरूर राहिलेंच पाहिजे. शिवाय मी एकटा सडा गेल्यानें परत लौकर येण्याला चांगलें साधन होईल. हेंच तुह्मा-ला न नेण्याचें मूळ कारण आहे. तुमचीही मजप्रमाणेंच त्याला दहशत आहे.

**वृंदा**-बारा वर्षांत एक निरोप नाहीं, कां कधीं एक दिवस कोरडा समाचार दिखील घेतला नाहीं, नी अकस्मात् कसा आप-ल्याविषयीं भावोजींना भेटीचा पान्हा फुटला ?

**मानाजीराव**-लहानपणीं आमची एकमेकांवर अतिशय प्रीति होती. तीर्थरूपांच्या पश्चात् दौलतरावांना राज्याभिषेक झाला, तोच द्वेषांकुर इतका विस्तृत झाला कीं, एकमेकांनीं एक-मेकांचें पुनश्च मुखावलोकनहि करूं नये. ते पूर्ण सत्ताधीश, त्या अर्थी आमच्या वांट्याला परतंत्रता आलीच. ती मला सहन होईना, राज्यविभागाविषयींचें माझे भगीरथ यत्न निष्फल झाले. त्या प्रकरणांत माझ्या पक्षाचे व प्रतिपक्षाचे सर्वच लोक अधिकार-भ्रष्ट झाले; परंतु सुदैवानें त्याच संधीस या मणिपूरच्या जनकोजी-राजाचें मला निमंत्रण आलें. पुढें सहजीं तुमचाहि लाभ झाला. झालें. आमचा अन्नोदकाचा ऋणानुबंध इकडेच आहे, असें सम-जून आह्मी तिकडचें नांवच सोडून दिलें.

**वृंदा**-अगबाई ! काय ह्मणतातना ? ‘ डोंगरचे आवळे, नी समुद्राचं मीठ.’ तशी गत. आपण इकडं आलांत ह्मणूनना मला

पदरांत घेतली? परंतु इतक्या लांब आपल्यालाच काय ह्मणून बोलावणं आलं?

**मानाजीराव**–हा उधोजी जसा आमचा गुरुबंधु, त्याचप्रमाणें जनकोजीराव राजे व आमचे तीर्थरूप गुरुबंधु असून परम स्नेही. लहानपणच्या माझ्या साहसी स्वभावावरून जनकोजीची मजवर फार प्रीति. त्यांचा जेव्हां अंतकाळ होण्याचा समय जवळ आला, त्यावेळीं हा उधोजी अगदीं लहान असल्यामुळें राज्यसूत्र चालविण्याकरितां माझें कारण पडलें. ( दासी येते तीस पाहून ) कां ग?

**दासी**–बाहेर छोटे सरकार उभे आहेत. ते आंत येण्याची परवानगी–

**मानाजीराव**–( तिरस्कारानें ) कोण? सरकार? हंः हंः तुह्मांसारखीं तोंडपुजीं माणसें आहेत, त्यांचीं सापा सारखीं तोंडेंच चेंचून टाकलीं पाहिजेत; चारगट. हरामखोर. ( वेडावून ह्मणतो ) "सरकार आले आहेत." खबरदार, पुन्हां सरकार सरकार ह्मणून ह्मणालीस तर नाक कापून टाकीन. समजलीस?

**वृंदा**–अगबाई, उभी रहा. परकं मनुष्य जर जनानखान्यांत येत आहे, तर मला पडद्याच्या आड झालं पाहिजे.

**मानाजी**–प्रिये बैस. उठण्याचे श्रम कशाला. तो आपला उधोजी ह्मणजे पोराप्रमाणें नौकर, त्याला काय भ्यावयाचें कारण?

**वृंदा**–इश्श! ह्मणून काय झालं? परकी मनुष्य, त्यांतून जाणता पुरुष तो. त्याच्या मी नाहींग बाई दृष्टीस पडायची.

**मानाजी**–कायगे ए झोटिंग, सैतान, उभी कां? जा त्या तुझ्या सरकारदिरकारला घेऊन ये.

( दासी व वृंदा आंत जातात. )

( उधोजी प्रवेश करून )

**उधोजीराव**-प्रतापराव दिवाण रत्नपूरकर आपल्या भेटीस येत आहेत.

**मानाजीराव**-नको कोणीं ह्मटलें आहे ?

**उधोजीराव**-मी सूचना करण्याकरितां आलों होतों.

**मानाजीराव**-सूचना ? ती कशाला ? त्याचें काय कारण? ( तुच्छपणानें ) प्रतापराव ह्मणजे ते कोणी वाघ, हत्ती, आहेत किंवा राक्षस ? अगर परचक्र ? तेव्हां त्यांची भीति मनांत आणून आह्मीं सावध रहावें, याकरतां ही तुमची हुषारी ? वा, वहा-वा ! उधोजीराव. कोण्या रीतीचें हें तुमचें भाषण ? अहो, बोलावूं पाठविल्या मनुष्याला पुन्हां परवानगीचें कारण काय ? पहा बुवा, कांहीं धोरण संभाळून बोलत चला. आजपर्यंत आह्मीं होतों, कशाही रीतीनें संभाळून घेतलें. आतां हा राज्यभार तुमचा तुह्माला संभाळावा लागेल.

**उधोजी**०- ( मनांत ) शाबासरे गाजी ! लुच्चा पाजी ! पहा ! कसा सत्ताधिशपणा गाजिवतो ! कसा बादशाही घाट घालतो आहे ! तें तुझें धोरण, तुझें शहाणपण, तुझें तुलाच असो.

**मानाजीराव**-कां उभे कां ? शकुन कसचा पहातां ?

**उधोजी**- ( मनांत ) शकुन तुला सुळावर चढविण्याच पहातों.

**मानाजी**-प्रतापराव येत आहेत ह्मणून सांगितलेंत, ते कुठें आहेत; घोड्यावरून येत आहेत कीं हत्तीवरून ?

**उधोजी**-( मनांत ) त्यांना कशाला पाहिजेत हत्ती घोडे ! ते पायींच येत आहेत. तुला मात्र येथून गाढवावर बसवून पाठवून देतों. ( उघड ) नाहीं सरकार ते पायींच येत आहेत.

**मानाजी**-बोलवा तर त्यांना लवकर. जास्त बोलल्यानें माझी तब्यत बिघडते.

**उधोजी**-( मनांत ) मेलास तर फारच उत्तम होईल. काय करूं रे चोरा, हे तुझे वाग्बाण माझ्या मर्मस्थानाचा भेद करिताहेत. हरामखोरा, तूं माझ्या वरांत शिरून अशा रीतीचा अम्मल मजवर ? अरे विकत घेतलेल्या गुलामावर देखील अशा प्रकारचा कडक हुकूम कोणी चालवीत नसतील. बरें बरें, दगडाखालीं हात सांपडला आहे तो सोईनेंच काढला पाहिजे. अशा वेळीं मी क्रोधवश झालों तर पुढील माझे बेत निष्फल होतील; इतकेंच नाहीं, तर चिरकाल मला बंधन होईल. (उघड) मानाजीराव, प्रतापराव आले. ( प्रतापराव दिवाण येतात. )

**प्रधान**-( लवून मुजरा करून. ) महाराजांचा जयजयकार असो.

**मानाजी**-हं चूप. जयजयकार असो; आहे जयजयकार. रत्नपुरांत आमचा तुम्हीं पुष्कळ जयजयकार केलात. पुन्हां तसाच जयजयकार करण्याकरितां आलांत कीं काय ?

**प्रधान**-सरकार, मी आपणा उभयतां सरकारांचा हलाल नौकर आहें. आपणांविषयीं कृत्रिम मी कधीं करणार नाहीं. लबाड लोकांनीं आपल्याला भलत्या सलत्या गोष्टी सांगून आपलें मन बिघडविलें.

**मानाजी**०-बस्स बस्स. बडबड करूं नका. मी तुह्माला पुरा ओळखून आहें तुह्मी लोक कसे आहांत ? गोडबोले, स्वार्थसाधू, कल पाहून तोल देणारे, तुमच्या कानमंत्राचे हे परिणाम.

**प्रधान**-सरकार, आपण ज्याअर्थीं असें ह्मणतां, त्याअर्थीं तें सत्यच असावें. माझा दोष कदाचित् मला कळून आला नसेल. खरोखर मजविषयीं आपला असा पूर्णग्रह झाला असेल तर शिर हजर आहे.

**मानाजी**-पुन्हां आपलेंच. फक्त निरोप काय तो कळवा.

**प्रधान**-निरोप दुसरा कांहीं नाहीं. दौलतराव महाराजांना आपल्या वांचून दुसरें कांहीं सुचत नाहीं. "आपल्या येथें कितीहि व कशाही अडचणी असल्या तरी बाजूस ठेवून रात्रीचा दिवस करून मला जरूर भेटावें. जर भेट न होईल तर मी हें राज्य सोडून अरण्यांत निघून जाईन मी यापुढें या जगांत कांहीं दिवस जिवंत असावें असें तुह्मांस वाटत असल्यास मला भेटलें पाहिजे." त्यांना केवळ आपला ध्यास लागला आहे.

**मानाजी**-कालचक्र माझ्या स्वाधीन नाहीं. तें स्वाधीन असतें तर तुमच्या इच्छेप्रमाणें दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस मी स्वतंत्र रीतीनें केला असता. भाषा पद्धतीची तुमची खूप कमाल आहे. माझ्या वियोगानें दौलतरावांना अति काळजी लागली आहे. तुह्मालाही महाव्याधि जडली असेल. होयना ? वाः !

**प्रधान**-सरकार प्रत्यक्ष अवलोकनानें जें मला दिसलें तें चरणांपाशीं निवेदन केलें आहे. तात्पर्य, प्रतापपूरच्या लढाईंत आमचे लढाऊ सरदार पडले त्या वेळेपासून सरकार फारच हवालदिल आहेत. ( मध्येंच मानाजी निघून जातो ) ( उधोजीस उद्देशून. ) अं, हा काय प्रकार ? माझें बोलणेंही पुरें न ऐकून घेतां सरकारस्वारी उठून गेली. दुर्दैव माझें !

**उधोजी**-तुमच्या सरकारास पित्ताचा फार विकार असल्यानें त्यांची तब्यत अगदीं तोळामासा झाली आहे. त्यांच्या बडेज़ावीला ह्मणा अगर दुसरें कांहीं ह्मणा, फार बोलणें सहन होत नाहीं; प्रकृति फारच नाज़ुक.

**प्रधान**-परंतु हे जर रत्नपुरीं आले नाहींत, तर आमच्या हुज़ूर सरकारांची फार दिलगिरी होईल. काय करावें ?

**उधोजी**-बिनूतोड काम, त्याला उपायच नाहीं.

**प्रधान**-आपण कोण ?

**उधोजी**-मी आपला आहे असाच एक इश्वराच्या घरचा पापी प्राणि. मला उधोजी असें ह्मणतात.

**प्रधान**-तीर्थरूपांचें नामाभिधान ? व आपला अधिकार ?

**उधोजी**-कसूचा अधिकार, अधिकारही नाहीं व आधारही नाहीं, ही सध्यांची स्थिति आहे.

**प्रधान**-छे ! छे ! हें दिलगिरीचें आपलें भाषण दिसतें; परंतु हें आपलें राजतेज कांहीं छपत नाहीं. शिवाय आपण राजगृहांतच जर प्रवेश करितां तर यापेक्षां अधिकार तो कोणता पाहिजे ?

**उधोजी**-हं ! राजगृहांत प्रवेश झाल्याची मातब्बरी कोणती ? राजपदच मिळालें पाहिजे, अशा कुळांत माझा जन्म. परंतु प्रारब्धदशा ! मी जनकोजीचा पुत्र. माझें नांव उधोजी. सध्यांचा अधिकार गुलामगिरीचा.

**प्रधान**-येथील माजी राजे जनकोजी आपले तीर्थरूप ? ओ हो हो ! ! महद्दोष ! महद्दोष ! मी अपराधी आहें. मला क्षमा करा. ( पायां पडतो. )

**उधोजी**-भलतेंच नाहीं तर ! आपण मजजवळ क्षमा मागण्यासारखा अन्याय तरी कोणचा ? मी आपल्या सारख्या वडील बुद्धिमान् पुरुषांना माझ्या तीर्थरूपाप्रमाणें मानितों, जसा आपला जयदेव तसाच मलाही पुत्र समजावें. मीं मात्र आपणापाशीं क्षमा मागणें हें योग्य आहे. कारण आपणासारखे सद्गृहस्थ माझ्या घरीं पाहुणे आले असतां त्यांचा कांहींच सत्कार न होणें ही केवढी लज्जेची गोष्ट ?

**प्रधान**-सरकार, या आपला ह्मणवलेल्या नोकराचा पाहुणचार कशाला ? असा कोण मी अरेराव ?

**उधोजी**-आपली अरेरावी नाहीं, ह्मणूनच तशा मानाला पात्र आहांत.

**प्रधान**-खऱ्या कुलशील राजकीय पुरुषाची योग्यता याच लक्षणांवरून जाणायची कीं-आपल्याकडे कमीपणा घेऊन कमी मनुष्याला थोरपणा द्यावयाचा. बरें आतां मी कसें काय करावयाचें ? नकार किंवा रुकार मला कांहींच समजला नाहीं.

**उधोजी**-उं:-त्याविषयीं तुह्मीं निष्काळजी रहा. त्यांचा रत्नपुरास निघण्याचा बेत पूर्वींच ठरला आहे; परंतु असुकच दिवशीं असुकच वेळीं निघतील हें मात्र ठाम सांगतां येत नाहीं.

**प्रधान**-देव करो आणि आपल्या वाणीला यश येवो. ( दासी येते. )

**दासी**-महाराजांनीं असें सांगितलें आहे कीं, "सर्व लव्याजम्यानिशीं आजच्या आज तुह्मीं रत्नपुरास जाण्याकरितां निघा. मीही आजच निघणार."

**प्रधान**-उधोजी महाराज, आपला तर्क खरा झाला. हें आपल्या कसें लक्षांत आलें ? ही आजच्या आज तयारी तरी कशी व्हावी ?

**उधोजी**-तर्क कसूचा ? असा काय त्यांत वेदांत सिद्धांत आहे ? काय सांगूं दिवाण साहेब, तुह्मी लोक युधिष्टिर शकांतले, तेव्हां या सैतान शकांतील नीच लोकांचे बालंपेंच तुह्माला कसे समजतील ? अहो, तो बायकोची परवानगी मागण्याकरितां गेला आहे. या कर्मकांडांतील कथा सांगण्याची देखील लज्जा वाटते. पुष्कळ प्रीतीच्या स्त्रीपुरुषांचे मीं जोडे पाहिले; परंतु या बाइलबुद्ध्या मानाजीचा मासला फारच क्वचित्. गुरूचें, बापाचें, मित्राचें, वचन ह्मणजे साळीचा कोंडा. यांचें दैवत, श्रुति, स्मृति, ह्मणजे बायको !

**प्रधान**-ईश्वर करो व तीं आहेत अशाच आनंदांत राहोत.

**उधोजी**-( मनांत ) आहेत अशा स्थितींत खुशाल जन्मभर

राहोत. आमच्या सुखांत व्यत्यय न आला ह्मणजे झालें. ( उघड ) बरें चला. तुह्मीं सर्व तयारी लवकर केली पाहिजे.

**प्रधान**—दहा बारा घटका दिवस राहिला, इतक्या अवकाशांत ही येवढी तयारी कशी होणार ? दोहोंकडून संकट.

**उधोजी**—मी जे आपल्याला बालंपेंच ह्मणून सांगितले ते हेच. आपला मतलब, किंवा दोष लोकांना न समजूं देण्याचा हेतु. प्रसंग पडेल तशी वाचाळपंचविशी. कोणी खरें सांगो खोटें सांगो. अहं विशेषः.

**प्रधान**—कसेही असोत, आह्माला ते वंद्य आहेत; बरें चला तर.

**उधोजी**—ठीक आहे. हा मी निघालों, आपल्या मदतीला ( मनांत ) हा गृहस्थ पापभीरु आहे, याजवळ जास्त बोलतां कामां नये ( दोघे निघून जातात. )

## अंक २ रा. प्रवेश ४ था.

( वृंदा ( रतिदृष्टा. ) व मानाजी पूर्ववत आसनस्थ दृष्टीस पडतात. )

**वृंदा**—घटकेंत हजार बुद्धी. “ मी रत्नपुरास जात नाहीं. ” असं मला वचन एकवार दिलं नी पुन्हां कोणा मेल्याचा उपदेश झाला ?

**मानाजी**—मी कोणाच्या उपदेशानें वळणारा आहें ? फक्त तुह्मीं—

**वृंदा**—जावं, माझं निश्चयांत मात्र अंतर होणार नाहीं (रडते.)

**मानाजी**—प्रिये, असें कां बरें? मी लवकर येतों. लाडके, रडूं नको. तुझ्या नेत्रांतून एकेक अश्रु बिंदु पडतो, तितके माझ्या हृदयांतून रक्तबिंदु पडत आहेत. उगा उगा माझ्या जिवलगे, रडूं नकोस. आनंदानें मला एकदां जा असें ह्मण.

**वृंदा**-जाणार तर जा. ही पहा मी विहीरीची वाट धरली. ( दूर जाऊन उभी रहाते. )

**मानाजी**-अबबब् ! हा असा अनर्थ होणार तर मी कधींच जायचा नाहीं. अरे, इतके जे परिश्रम करावयाचे ते कशाकिरतां? एक तुझ्या साठीं. ती तूंच जर दुःखी तर मला सुख कोठून ! या, या, सरकार, मी शपथ वाहूं का ? मी खरोखर जात नाहीं.

**वृंदा**-( दुरूनच मनाशीं ) आतां फार आग्रह करून उपयोग नाहीं. माझंच शहाणपण मला नडायचं; तर याला जाण्याचा रुकार द्यावा. जाऊं दे साडेसाती. पण आणखीं थोडंसं याला रडून दाखविलं पाहिजे. ( उघड ) शपथ कशाला द्यायला पाहिजे, मी जाऊं नको असं कशाकरितां ह्मणतें, तर मजवांचून एक क्षण गमत नाहीं, मग इतके दिवस कसे जातील ? तिकडं गेल्याचा पश्चात्ताप होऊन माझ्या काळजीनं जर कांहीं आपल्या जिवाचं भलतंसलतं करून घेतलं तर ? ह्मणून रडायचं ( मनांत ) आणखीं थोडं रडून असंच बोललं पाहिजे ह्मणजे तेवढ्याच थोरपणानं स्वारी जीव द्यायलाही कमी करणार नाहीं. ( उघड रडत ) पुन्हां भाऊजींचं अपेश माझ्या कपाळीं येणार. शिवाय तिथं गेल्यावर कदाचित् आपल्या वांटणीचं राज्य मिळेल, तो तोटा होणार; नी सर्व हें एक माझ्यामुळं, तर माझंच च्यार दिवस काय होईल तें होवो. पण सांगून ठेवतें, एका महिन्यावर रहातां उपयोगी नाहीं. ( मनांत ) आतां काय करावं ! जितकं संभाळायला जावं तितकं फसतं. याला एका महिन्यानं ये, असं ह्मटलं, तर महिन्याचा दुसरा दिवस दिखील उजाडूं द्यायचा नाहीं. बरं पुढं आणखी काय ह्मणतो तें ऐकून घेऊन त्या प्रमाणं करावं. (उघड) आलं का लक्षांत, इकडची आठवण असूं द्या. नाहींतर भाऊजींच्या प्रेमांत माझा विसर पडेल.

**मानाजी**–तुझा विसर ! व तो मला ! नांव कशाला घेतां? अग तुझे करितां मी आपला प्राण देण्यालाही तयार आहें, तो दुसऱ्याची पर्वा बाळगणार ? विशेषतः जाण्याचें मुख्य कारण तर तुला सर्व माहितच आहे. आपण होऊन ज्याअर्थी त्यानें बोलाविलें, व मी त्याच्या मानास्तव जाणार, तर मी ह्मणेन तसें त्याला ऐकणें भाग आहे. एका महिन्यापेक्षां जास्त दिवस लागायचे नाहींत.

**वृंदा**–( मनांत ) झालं. मी ह्मणायची फुरसद, एकाच महिन्यांत येण्याची कबुली ! ( उघड ) गेल्या सारखे च्यार दिवस अधिक लागले तरी चिंता नाहीं; पण काम फत्ते झालं पाहिजे. आज ना उद्यां हें राज्य जाणारच. मग आपण कुठं जायचं ? तेव्हां आधिच सोय पहावी.

**मानाजी**–हें मणिपूरचें राज्य आतां परत उधोजीला मी तर देतच नाहीं. एखाद् दिवस संधी साधून त्याला गोळी द्यावी, ह्मणजे निकाल. पण हें काय बरं प्रिये, तूं दूरच उभी राहिलीस, जवळ ये.

( वृंदा जवळ येऊन बसते. )

**वृंदा**–तर मग खास निश्चय झालाना ? अग बाई, आतां मला कसं करमेल ? मला झोंप कशी येईल; अन्न कसं गोड लागेल ! मुहूर्त देखील निघण्याचा आतांच ठरला असेल, नाहींतर ह्मणणार होतें. आजची रात्र तरी सुखानं गेली असती. प्रियकरा, एकदां शेवटचं आपल्याला डोळे भरून पाहून घेतें ( आलिंगून ) या पुढं माझा प्रियकर कधीं दृष्टीस पडेल तो पडो. जा–जा. मी डोळे झांकतें. महाराज, तिकडं गेल्यावर माझा विसर पडणार नाहींना ? ( डोळे झांकून बसते. ) गेलां का ? नसलां गेलां तर आणखी एकदां या पापिणीला दर्शन द्यावं.

**मानाजी**—सखे तुला पापिणी असं कोण ह्मणेल ? तुझ्यासारखी पतिव्रता या जगांत कोण आहे ? परपुरुषानेंचसें काय, परंतु या सूर्यनारायणानें अद्याप पाहिलें नाहीं. वायूनें या तुझ्या पवित्र शरिराला स्पर्श केला नाहीं. अशी तूं महासाध्वि स्त्री. बरें तर येतों आतां, फार उशीर झाला. येथून निघाल्यापासून प्रत्येक घटके घटकेचा तुला समाचार कळवीत जाईन, वेळेवर अन्नपाणी घेत जा. वेळेवर निजत जा. प्रकृतीला जपण्यांत आळस करूं नको.

( पडदा पडतो. )

## अंक २ रा. प्रवेश ५ वा.

कचेरी बाहेरील दालन.

( उधोजी व प्रधान प्रवेश करतात. )

**प्रधान**—या अपरिचित स्थळीं कोणाशीं परिचय नव्हता, कामगिरी तर अशा प्रकारची नाजुक. त्यांत घाई पराकाष्ठेची ! सर्वच गोष्टीनें माझी त्रेधा उडाली असती; परंतु दैवबलानें आपली गांठ पडली ह्मणून सर्व निभावलें. चांगल्या वाईट स्वभावाच्या कित्येक लोकांचा माझ्याशीं बराच संबंध आहे; परंतु असा सुस्वभाव, परकार्य दक्षता, मनमिळाऊपणा, फार कमी. बरें, इतकें माझें आगतस्वागत करण्याची माझी योग्यता ! तर तीहि नाहीं.

**उधोजी**—असें काय भलतेंच बोलावें. असें माझें कोठें संचित पुण्य आहे कीं, आपणासारख्या वडील मनुष्यांची माझ्याकडून आणखी कांहीं दिवस सेवा घडावी ! प्रसंगानें गांठी पडतात, त्यावेळीं परस्परांनीं यथाशक्ति सहाय करणें हें मनुष्य ह्मणविणाऱ्या प्राण्याचें कर्तव्यच आहे. आतां योग्यताच पाहूं गेल्यास सर्वगुणसंपन्न, निर्दोष असा एक ईश्वर आहे. इतर सर्व डाग

लागलेलेच लोक आहेत. आह्मासारखे उथळ स्वभावी अल्पस्वल्प सत्ताबलानें दुसऱ्याचे दोष उघड बोलून दाखवितात इतकेंच. तसें परवश मनुष्याला बोलून दाखवितां येत नाहीं.

**प्रधान**—सरकार, भाषणाचाच ओघ आला ह्मणून बोलतों, आपली बेअदबी झाली असेंहि आपल्या मनांत येणार नाहीं, ह्मणून विश्वासून सांगतों— या दूरदर्शी पोक्त विचारानें माझ्या बाळासाहेबाची मला आठवण झाली, तोच एक गुणी असा मला जो अभिमान होता तो गेला. त्याच्यापेक्षां आपण कांकणभर गुणानें अधिक. योग्यता पाहिली तर आपण सेव्य, तो सेवक, इतकें महदंतर! खरोखर आपला स्वभाव पाहून मला फार संतोष वाटला.

**उधोजी**—मला चांगलें ह्मणावें इतकाच आपला हेतु. वस्तुतः गुणगंधाचा अभाव. एखाद्या पवित्र ब्राह्मणाला सूर्याची उपमा देतात, ह्मणून सूर्याची योग्यता ब्राह्मणाला येईल ? सूर्य तो सूर्य, ब्राह्मण तो ब्राह्मण. त्याचप्रमाणें जयदेवाची सूर्याप्रमाणें योग्यता असून उपमा कारण मी. बरें त्याला माझा कुशल वृतांत कळवा. हल्लीं त्याचें शास्त्रादि अध्ययन सर्व संपलें असेल. आमच्या विद्यानिधी आच्चार्यांचे आपले चिरंजीव पट्टशिष्य झाले होते. प्रसाद त्यानेंच मिळविला.

**प्रधान**—जशी गुरुकृपा तशी राजकृपाही त्यानें मिळविली आहे. माझ्या पश्चात् राजकारभार तोच पहात असतो. स्वभाव त्याचा व आपला एकच- आकारांत काय तो बदल आहे. येथें आपला आंरभीं परिचय झाला, त्यावेळीं समाधान वाटलें परंतु आतां वियोग होणार ह्मणून दुःख वाटतें. स्नेह ह्मणजे दुःखाचें मूळ असें ह्मणतात तें वास्तविक. बरें येतों आतां.

**उधोजी**—बरें, यावें तर. माझा लोभ आपल्याला बाधक होईल. रत्नपूरकर सर्व माझ्या गुरुबंधु सरदार मंडळींना रामराम सांगावे, ( पायां पडून ) आपल्याही मी पायां पडतों.

**प्रधान**—ज्याची तुह्माला इच्छा आहे तें देव देवो. रामराम.

( प्रधान निघून जातो. )

**उधोजी**—( आपल्याशीं ) आतां इच्छित असें एक मरण मला लवकर आलें तर सर्व मिळिवलें. या पापभूमीवर जितकें अधिक जगणें तितकी पापवृद्धि व पुण्यक्षय. मनुष्याला पुढें जी अवस्था प्राप्त होणार त्याप्रमाणें तो बोलूं लागतो व शेवटीं तसेंच अनुभवास येतें, असा कांहीं लोकांनीं कयास काढला आहे. त्याप्रमाणें मला मरणाची इच्छा प्राप्त झाली ती पूर्ण होवो. मनुष्यस्वभाव हा गंगोदकाप्रमाणें मूळचा स्वच्छ असा आहे. त्या उदकाशीं ज्या रंगाचें मिश्रण होतें तद्रूप तें उदक बनतें. तद्वत ज्या स्वभावाशीं आपल्या स्वभावाचें संबंध कारण होतें, तसें वर्तनांत अंतर पडूं लागतें. या रत्नापूरकर प्रतापराव प्रधानाचा क्षणमात्र सहवास झाला, तितक्या अवकाशांत माझा स्वभाव पालटला. किती तो थोर मर्यादशील पुरुष ! मी त्याच्यावर काय बरें उपकार केला ? कांहीं नाहीं. मुलानिमित्य जसें बापाचें मन द्रवतें तसें त्याला माझ्या वियोगानें दुःख वाटलें. देवा, अशीं सर्वच सद्गुणीं मनुष्यें जर तूं आपल्या जगांत उत्पन्न केलीं असतींस, तर जे अनर्थ आज चालूं आहेत ते सर्व नाहींतसे होते. देवा, तूं जे जे मार्ग स्थापित केले आहेस, ते व इतर ज्या कांहीं गोष्टी त्यांविषयीं पूर्ण विचार केला असतां तुझी योजना सर्वच कृत्यांत फार उत्तम आहे; परंतु एका विषयाच्या संबंधानें तुजशीं माझा थोडा वाद आहे; मग तो वाद निर्दोष आहे असें माझें बिलकुल ह्मणणें नाहीं. अगर दुसऱ्या एखाद्या मला अपरि-

चित अशा ग्रंथांत या शंकेचें कोणी विद्वानानें समाधानहि केलें असेल व तो ग्रंथ अद्याप माझ्या पाहण्यांत आला नसावा. अथवा जसा कठीण अशा काव्याचा अर्थ, मूळचा एक प्रकारचा असून लोक अज्ञानानें त्याचा भलताच अर्थ करितात, तशीहि कदाचित् स्थिति असेल. वाद तो हाच कीं, अनेक जीवजंतूंनीं-युक्त अशा उच्चनीच वस्तूंनींपूर्ण, असें हें जग तूं निर्माण केलें आहेस. या जगांतील एक साधारण तृणाग्राचेंहि चलन तुझ्या सत्तेवांचून होत नाहीं. ही गोष्ट सामान्यतः सर्वत्रांना मान्य आहे. तर मनुष्य तुझ्या इच्छेवांचून पाप किंवा पुण्य कांहींच करण्यास समर्थ नाहीं; पाप करविण्याच्या किंवा पुण्य करविण्याच्या कामीं तुझीच इच्छा. मग तुझ्याच इच्छेनुरूप वर्तन करणारांवर पापाचा आरोप करून शासन कशा करितां ? यावर कांहीं आक्षेप आहे कीं, पापपुण्य हें पूर्वकर्माचें फल आहे. होय, कबूल. परंतु पुण्याचरणाचें फल हें राज्यपद. होय. व पापाचें दास्यत्व. पण या अनेक युगांचे आरंभीं जेव्हां सृष्टि उत्पन्न केलीस, त्यावेळीं देखील कांहीं राजे व कांहीं दास असे तूं निर्माण केलेस; सर्वच कांहीं राजे किंवा सर्वच दास नव्हते. पुढें राजे असणाऱ्या जीवांनीं पाप केलें ह्मणून त्यांना पूर्वकर्मदोषामुळें दास्यत्व पत्करावें लागलें. तसें कारण जगाचे अगदीं आरंभापूर्वीं नव्हतें. मग हा तुझा बलात्कार कां ? असो. याचें नांवच–ब्रह्मघोंटाळा–त्याचा उलगडा कधीं होणार नाहीं. तर हा पारमार्थिक विचार सोडून लौकिक विचारांकडे वळूंया. तूं केवळ आपल्या कर्मणुकीकरितां हें जगरूपीं नानाविध विषयांनीं पूर्ण, विकट कथानकाचें नाटक रचिलें आहेस. कारण साधें कथानक चित्तवेधक, व चटकदार होत नाहीं; त्याप्रमाणें कांहीं भले, बुरे, असे भिन्नभिन्न प्रकृतींचे जीव उत्पन्न करून

त्यांच्याकडून अनेक चेष्टा करवितोस हेंच खरें. तसें सर्व समान असतें तर प्रधान प्रतापरावाविषयीं पूज्यबुद्धि व मानाजी विषयीं तिरस्कार, असे निरनिराळे तरंग माझ्या मनांत आलेच नसते. कांहीं असो. या प्रतापरावासारखा भला मनुष्य फार विरळा. तो दुष्ट मानाजीराव प्रत्येक शब्दामध्यें त्याचा अपमान करी; परंतु त्याला त्या गोष्टीचा बिलकुल खेद वाटूं नये ! अरे-मी सहजीं त्याच्याशीं दोन प्रेमळ शब्द बोललों, तेवढ्यानेंच त्याला किती धन्यता वाटली, जसें कांहीं मीं त्याला एखादें राज्यच बक्षीस दिलें-अगर देण्याघेण्यावर काय आहे ! ( रागानें ) ज्या हरामखोराला मीं आपलें राज्य दिलें, तो नीच माझ्याच वर उलटून पडला. 'शिवसत्य जगमिथ्य' असे साधुलोक ह्मणत असतात. तर त्या या जगांत सर्वच लबाडीचा व्यवहार ! जो आपलें कल्याण करील असा विश्वास धरून रहावें, तोच नाशास कारण होतो. जेथें विश्वास तेथेंच घात ! आपण जरी सद्धर्मानें वागलों, पापाचें भय मनांत बाळगून कोणाचेंही अनहित इच्छिलें नाहीं, तरी दुष्ट लोक आपला पिच्छा सोडीत नाहींत. त्यानें आपण होऊन माझ्याशीं बेइमानपणा केला, तेव्हां मींहि त्याच्याशीं कृत्रिम करावें, अशी कल्पना सुचूं लागली. तर आतां पुराच सूड उगिवण्याचा यत्न ज्यारी केला पाहिजे. हें मला रत्नपूरच्या सुभानरावाचें पत्र आलें आहे. याच संधीला हा दुष्ट मान्याहि तिकडे जात आहे. आ-हा-फारच उत्तम ( पत्र काढून वाचून पहातो ) श्रीमंत प्रतापध्वज-पुरे हा माना. ही श्रीहि नाहीं व प्रतापाचा ध्वजहि आतां राहिला नाहीं. तर मुख्य मजकूर काय आहे तो पाहून घेऊं. दौलतरावमहाराजांकरितां मी मानाजीरावाशीं वाकडा झालों; परंतु शेवटीं तेही मजवर उलटले. सबब मी सर्व प्रकारें हल्लीं निराधार आहें, तर अशा संकटसमयीं

आपल्या बालमित्राला कोणत्याही प्रकारें सहाय करावें. खऱ्या प्रेमाची परिक्षा होण्याची हीच वेळ आहे. आपण अद्याप राज्यपदारूढ झाला नाहीं, सबब गरिबीची स्थिति कशी असते, हें आपल्या मनांत चांगलें वागत असेलच. अलीकडे मानाजींशीं आपला बेबनाव झाल्याचें ऐकतों. तर ही वार्ता खरी होवो व या संबंधांत आपणांस मजकडून कशाहि तऱ्हेचें सहाय पाहिजे असल्यास कडेकोट तयारी आहे कळावें. ( समाप्त ) तर असेंच करावें.

( निघून जातो. )

## अंक ३ रा. प्रवेश १ ला.

स्थळ—रत्नपूर व मणिपूर यांमधील

वनप्रदेश.

( सुभानराव, भवानराव, सयाजीराव, जाधवराव,
प्रवेश करितात. )

**सुभानराव**—माझ्या दिलदार जानी दोस्तांनों, आपण एकमेकांना प्राणासमान आहोंत. वडिलार्जित संपत्तिविभागामुळें अथवा विषयप्रीतीमुळें, स्त्रीवश झाल्यानें, प्रत्यक्ष पाठचे बंधूहि परस्पर वैरी होतात; परंतु खऱ्या मित्रांत कधींहि द्वेष नसतो व ते पाहिजे तें अघटित घटित करण्यास समर्थ होतात, तर बोला, ही वेळ तशीच आहे. मीं जो हेतु मनांत आणला आहे, त्याला तुमचें सहाय पाहिजे.

**जाधव०**—आपल्या हुकमाचा अवकाश. हा पहा कंबर बांधून तयार आहें. आपणाकरितां जीव राहो कीं जावो.

**भवान०**—तुम्हीं जो हेतु मनांत आणित असतां, त्यांत केवळ

तुमचाच फायदा असतो, असें कधीं घडल्याचें माझे पहाण्यांत नाहीं. जें करतां तें जर सर्वांचे हिताकरितां आहे, तर आमचे कडून नकार नाहीं.

**सयाजी**०—माझेंहि तसेंच ह्मणणें आहे. जेथें तुमचा एक पाय तेथें माझी गरदन. जर तुमच्या केंसाला धक्का तर माझ्या जिवाला धक्का. बस्स ?

**सुभान**०—असें जर आहे तर घ्या शपथ. ठेवा माझ्या गळ्यावर हात. ह्मणजे आज तीन चार दिवसांत झालेली सर्व हकीकत, व पुढें करावयाचें कृत्य सांगतों.

( सर्वजण हो हो, असें ह्मणून त्याच्या पायांवर हात ठेवून शपथ वहातात व हातांत हात देतात. )

**सुभान**०—ऐका तर. त्या दुष्ट प्रतापरावाचें व माझें आज बऱ्याच दिवसांपासून वैर आहे. थोडीबहुत आशा होती ह्मणून मी वरकांतीं त्याच्याशीं बोलत होतों; ती आशा समूळ आज नाहींशी झाली. त्याची ती पत्नी स्त्री, तिच्याशीं माझी बरीच बोलाचाली झाल्याचें जयदेवरावाला समजल्यावरून त्यानें मला पकडून कैद करण्याचें मनांत आणिलें आहे.

**जाधव**०—परंतु त्या पत्नीची व आपली दोस्ती असल्याबद्दलचा पुकारा सर्व शहरभर पसरला आहे. मग मध्येंच हें काय विघ्न उपस्थित झालें ?

**सुभान**०—मित्रांनों, आजवर मोठ्या मी ह्मणविणाऱ्या स्त्रियांच्या नाकाला चुना लावण्याला मला उशीर लागला नाहीं; पण सध्यां वेळ खोटी आहे.

**भवान**०—परंतु प्रतापरावाच्यानें किंवा त्याच्या लेकाच्यानें, शरमेमुळें या गोष्टीचा परिस्फोट करवणार नाहीं. मग इतकी भीति कशाला ?

**सुभान**०-गड्यांनों, याविषयीं पूर्वींच डंका वाजून गेला आहे. मग मीं तुह्माला, जयदेवरावानें कैद करण्याकरितां आपला तपास चालविला आहे, ह्मणून जें सांगितलें त्याचा अर्थ काय ?

**सयाजी**०-भवानराव, तुह्मी ह्मणतां तसें होणें दुर्घट आहे. ही पद्मावती कशीही असो; पण थोरामोठ्यांच्या नांवावर विकते. तेव्हां ती जर उलटली तर आपल्याला भय बाळगलेंच पाहिजे. अहो, या बड्या धेंडाची गोष्ट बाजूला राहूं द्या; परंतु नांवाचा नवरा असून, उघड कसब करणाऱ्या औरतीनें जरी आमच्या सारख्या कानफाट्यावर खोटा आळ घेतला, तर तिचा नवरा, मग तो तृतीय प्रकृति असला तरी बायकोच्या अभिमानानें प्राण जाई तोंपर्यंत आपल्याशीं भांडावयास येणारच. मग ही तर प्रधानस्त्री.

**भवान**०-स्त्री जर वश आहे, तर तिच्या नवऱ्याची किंवा नवऱ्याच्या बापाची भीति नाहीं; आणि ती जर उलटली तर ब्रह्मदेवालाहि भय आहे.

**सयाजी**०-आतां पुढें विचार कसा? शहरांत राहतां उपयोगी नाहीं. बाहेर जावें तर निर्वाह कसा होणार? चोहोंकडून संकट आलें आहे.

**सुभान**०-मित्रांनों-या जगांत मोठें भय किंवा मोठी हानी कोणती तर मृत्यूची. बरें जों जों त्या मृत्यूला भिऊन दूरदूर रहावें तों तों अधिकाधिक विपत्ति. तर त्या मृत्यूचीच प्रथम भीती सोडली पाहिजे. ही सतत दैन्यावस्था सोसण्यापेक्षां मरण बरें.—गड्यांनों, या दुष्ट प्रतापराव दिवाणानें कित्येक जुनीं बडी-बडी घराणीं मातीला मिसळून टाकलीन. याच्या अमलांत सर्व उद्योगधंदेहि बुडाले. अलीकडे लढाया बुडाल्या, त्या चालू होत्या तोंपर्यंत निदान कोठें लुटालूट तरी करितां येत असे. बरें, दुसरी कांहीं ठकबाजी करावी तर जो मनुष्य पहावा तो आपल्यापेक्षां महाठक आढळतो. अरे-भावार्थानें एखादी खरी

गोष्ट जरी दुसऱ्याजवळ सांगितली तरी ती त्याला खोटी वाटते; लोकांचें शहाणपण इतक्या शिखराला पोंचलें आहे. सयाजीराव, मी तुह्माला असें विचारितों, तुह्मी आज बऱ्याच दिवसांपासून कसाबसा या वैद्यकीचा धंदा करतां, त्यांत तुमचा निर्वाह होण्यासारिखा फायदा होतो का ?

**सयाजी**०—रामाचें नांव ! रोग्याचा हात पाहून पुढें जों आपण चिकित्सा करावी त्या पूर्वींच, " हा अमुक रोग असेल याला तें अमुक औषध घ्यावेंना? " असा प्रश्न निघतो. मग आपलें महत्व काय राहिलें ?

**भवान**०—अशी नाजुक वेळ आली आहे खरी. पूर्वींचें आमचें सर्व वैभव गेलें, सबब या पोटाकरितां अनेक व्यवसाय केले. कोणतेंही कसब हातचें जाऊं दिलें नाहीं; परंतु आतां पोटभर अन्न मिळण्याची मारामार ! आजपर्यंत लोकांची छां–छू–वर थोडीशी भक्ति होती, तीहि आतांशा नाहींशी झाली. चुकून कोणी देवभोळा गृहस्थ आमच्याकडे आल्याचें इतर लोकांनीं पाहिलें, तर त्याला लागलेंच भाबडा व गांवढळ ठरवून त्याची फजीती करितात. असें होऊं लागलें ह्मणजे त्या भावीक लोकांची आमच्यावरील श्रद्धा उडते. काय करूं ! मी अगदीं भांबावून गेलों आहें. कांहीं सुचत नाहीं.

**जाधव**०—( वेडावून ) आ–ह्मीं–क्याय क्यरूं ! रडा लेको. अरे, या सुभानरावासारख्या हिम्मतदार मनुष्याच्या संगतीला कोणी नामर्द मनुष्य राहिला, तर तो हरहुन्नरी होतो. तुह्मीं फुकट दिवस घालिवलेत. हातांत कांकणें घालून दळत बसा.

**सयाजी**०—बरें बुवा. तुह्मी ह्मणतां तेंच खरें. आह्मी अगदीं शेंदाडशिपाई कुचकामी. आपला तरी आतां काय कीर्तिध्वज फडकिवणार तो सांगा. ऐकूं दे.

**जाधव**०–मी ? मी आतां अगदीं चोरीचा धंदा करणार. त्यावांचून एक छदामहि दृष्टीस पडावयाचा नाहीं. चला कोणाहि श्रीमान बनियाच्या जवाहिराचें दुकान लुटून स्वस्थ जन्मभर खात बसूं या.

**भवान**०–वाहवा–मला चमत्कार हा वाटतो, जो तो ह्मणतो मी चोरी करतों, पण ती साधावी कशी ? पापपुण्य तें मी जुमानीत नाहीं. पाप ह्मणजे दारिद्र्य व पुण्य ह्मणजे सुख, येवढें मी जाणतों. कशाही रीतीनें द्रव्य मिळविलें ह्मणजे तो सुखीप्राणी पुण्यवान झाला. कायहो चोरी करण्याला तुह्मीं राजी आहांत, पण विचार करा, लोकांनीं आपलें द्रव्य रस्त्यावर कां टाकलें आहे? अरे, लोक एक कवडी जवळ असली तर ती पन्नास गांठी मारून सात पडद्यांच्या आड पाताळांत पुरून ठेवितात, तें द्रव्य तुह्मांला कसें मिळावें ? आपल्याच घरांत आपली वस्तु स्वतःल वक्तशीर मिळत नाहीं, मग परक्याचे घरीं अवेळीं अंधारांत, छपिवली वस्तु कशी मिळावी ? बाबारे, इतर विद्या सोप्या आहेत; तरी त्या साध्य होण्याला तपांचीं तपें घालवावीं लागतात. मग या चोरीची विद्या पाहिजे त्यांना कशी करितां येईल ?

**सयाजी**०–हां,–ती विद्या मी शिकवितों. चोरीच्या कामांत जी युक्ति प्रयुक्ति पाहिजे ती मी सांगतों; परंतु पुढारीपणा घेणारा मनुष्य उरफाट्या काळजाचा पाहिजे. तशा वेळीं जर कोणी आपल्या कृत्यास आड आला, तर तत्काल त्याला छाटून टाकिला पाहिजे. कां-कू-करतां कामां नये.

**जाधव**०–चला तर तुमचा चोरांचा नाईक मी होतों. मिळकतीच्या कामांत प्रत्यक्ष बाप किंवा पोटचा पोर आड आला, तरी त्याला ठार करीन.

**सुभानरा**०–भलेरे गाजी. मला हेंच पाहिजे होतें. आपल्या

पुढील कृत्याला हा शकूनच ह्मटला पाहिजे. तर हें घ्या ( पत्रें काढून देतो ) पहा, मणिपूरकर उधोजीरायाचें मला पत्र आलें आहे, व हें दुसरें पत्र, त्याला पाठवावयाचें उत्तर आहे. दोन्हीं वाचून जी मसलत ठरवावयाची ती, व दुसऱ्याहि कांहीं तुह्माला गुप्त गोष्टी सांगावयाच्या आहेत, त्यांचाहि पण मार्गानें विचार ठरवूं या. इतःपर उघडपणें फिरणें मोठें धोक्याचें आहे.

( सर्व निघून जातात. )

## अंक ३ रा. प्रवेश २ रा.

रत्नपूर.

**पद्मलो**०–गिरजेला जाऊन चार घटका झाल्या, तरी अद्याप तिचा ठिकाण नाहीं. ती जवळ असली ह्मणजे बोलण्याच्या नादांत दिवस जातो. ( गिरजा येते ) कां बाई, आलीसका ? इतक्या लवकर बरीग तुला आठवण झाली ?

**गिरजा**–जी. आईसाहेब, मला लवकर येण्याबद्दल ताकीद झाल्यापासून या दोन महिन्यांत आजच थोडा उशीर लागला. पण बाईसाहेब, सगळं सोडून आज तुह्मीं इकडं कां येऊन बसलां, नी हें आज नेसलां आहांत तरी काय बाई, इश्श. हें लुगडं कांहीं आपल्याला शोभत नाहीं. तुह्माला तो काजळी शालु चांगला शोभतो.

**पद्मलो**०–पुरेग तुझं कौतुक, काय करायचं आहे; या शरीराला, नी रूपाला. जळून कां जाईना मेलं. मला याचा भारी कंटाळा आला आहे.

**गिरजा**–हें काय बाई भलतं अमंगळ बोलणं. पुरुषांना सुख मिळण्याला साधन विद्या. तसं बायकांना श्रीमंती मिळायची ह्म-

णजे रूप चांगलं पाहिजे. ज्या बायका सुंदर असतात, त्यांची पुरुष फार आवड करितात. आईसाहेबाचं तरी असंच आहे. काय सांगूं आईसाहेब, नाहींतर ह्मणाल काय ही मेली तोंडदेखलं बोलते, तर खरं खरं सांगतें. त्या दिवशीं वसंतोत्सवांत सर्व शहरांतल्या बायका, राणीसाहेब, वरकड मानकरणी, वनभोजनाला आल्या होत्या. त्या सर्वांत सुंदरपणा असा एक आपलाच. जसं रेखलं चित्र. मेल्या कोणा पाप्याची नजर देखील लागायची !

**पद्मलो०**–कां गिरजे, आज भारीच तोंड सोडलं आहेस; इतकी शेफारूं नकोस. मला नाहीं असा चावटपणा खपायचा.

**गिरजा**–आईसाहेब, आपल्याला राग येत असेल तर मी बोलत नाहीं; पण ह्मणतें हें कांहीं खोटं नव्हे. शपथ वाहून सांगतें.

**पद्मलो०**–बरं बाई. तुझंच ह्मणणं कां खरं होईना. तूं उदंड शहाणी आहेस. गिरजे, गडे आज कीं नाहीं अगदींच करमत नाहीं. एखादी गोष्ट सांगग.

**गिरजा**–आईसाहेब, आह्मां कुणबटांच्या कावळ्या चिमणीच्या गोष्टी तुह्माला काय रुचणार आहेत ?

**पद्मलो०**–हो तर, बरी होशील अडाणी. पुष्कळ शहाणी आहेस. अंधेरांत पायानं मारलेली गांठ आह्मांला उजेडांत हातानं सुटायची नाहीं ! बरं, तें तुझं गाणं तरी ह्मण. पुष्कळ दिवस कुठं ह्मटलं नाहींस- आजचा दिवसच जाईना.

**गिरजा**–पण तुह्मी गंभीरराव सेनापतींच्या घरीं नाहीं का जात ? त्यांच्या मुलाचं आज बारसं आहेना? तुह्मीं जर आज गेलां नाहीं, तर उद्यां तुह्माला मुलगा झाला ह्मणजे त्या तुमच्या वरीं कशा येतील ?

**पद्मलो०**–( मनांत ) देवा, मला मुलगा झाला. असा आनं-

दाचा दिवस उगवेल का ! छे.-( उघड ) मी नाहींग बाई जात. तुला गाणं ह्मण असं ह्मटलं, तर हें मध्यें तिसरंच रडगाणं कशाला काढलंस ? मी विसरलें नाहींहो. हं. आटप.

**गिरजा**-बाईसाहेब, माझा खरोखर गळा बसला आहे. येईल तसंच ह्मणूं का ?

**पद्मलो०**-चॅं- डौलच अधिक ! ह्मणे, या अप्सरेचा गळा बसला आहे. ह्मण असं ह्मटलं ह्मणून हें ओढून चंद्रबळ. नाहीं तर सदानकदां चालूं असतं.

**गिरजा**-बरं तर ह्मणतें, माझ्या बरोबर आपणही ह्मणूं लागा.

( दोघी बसून गाणें ह्मणूं लागतात. )

॥ पद ॥ बतादे सखी या चालीवर. ॥

कांत कुठें रमला ॥ आज गडे ॥ प्राण कसा गमला ॥
दाउनि वरवर प्रीती लटकी ॥ फसवियलें मजला ॥ आज० ॥
कामीनर मन व्यथितचि होतां ॥ करिति मधू बोला ॥
ऐशी असुनी करणी त्यांची ॥ भ्रम कसा पडला ॥
भ्रमरापरिगे जात तयांची ॥ रस सेवुनि गेला ॥ आज०॥१॥

**पद्मलो०**-झालं का ? हें कायग चावट गाणं तुझं. हं. पुढें चालूं दे.

**गिरजे**-दुसरं ह्मणतें. कृष्णानं, एकदां राधेची पुष्कळ विनवणी केली, तरी तिला त्याची दया येईना; ह्मणून राधा कठोर आहे, इचं पुन्हा तोंड पहाणार नाहीं, असा निश्चय करून कृष्ण रुसून गेला. बायकाचं मेलं कोणतंहि अति. पुरुषांनीं किती आर्जवं केलीं तरी ऐकायचं नाहीं. मग मात्र दुःख करीत बसायचं. असो. तेंव्हां राधा ह्मणते, कृष्णा-

**पद्मलो०**-अहाहाग! पुराणिका सारखी पुराणं सांगूं लागलीस. बरं, तर तुह्मी राधा होऊन त्या कृष्णाला समजावून आणा.

**गिरजा**-बाईसाहेब, त्यांची योग्यता मला माकडाला कशाला पाहिजे. ( ह्मणूं लागते. )

॥ पद ॥ शांतनुराजा. या चालीवर. ॥

रुसुनी कांरे जाशी ॥ जाशी परसदना ॥ चुकली काय सांग ललना ॥ रुसु० ॥ ह्मणुनी मुकली सौख्याला ॥ लागुनी तुझ्या संगतीला ॥ रु० ॥ दृष्ट तुला झाली ॥ झाली कुण्या सवतीची ॥ दृष्टी जळो पापिणीची ॥ ॥ रु० ॥ अन्न वर्ज केलें ॥ केलें तव विरहानें ॥ गांजिलें मजसी क्रूर मदनें ॥ रु० ॥ चरण चुरीन प्राणा ॥ प्राणा सांडुनीयां ॥ मजवरी असो तुझी माया ॥ ॥ रुसुनी० ॥ १ ॥

**पद्मलो**०-( आपल्याशीं ) जयदेवजी, तुह्मीं जर एकदां मला वश झालां, तर मी तुह्माला कधीं छळायची नाहीं; अर्ध्या वचनांत राहीन. ( दीर्घ श्वास सोडते. )

**गिरजा**-बाईसाहेब असा श्वास कां सोडतां ? तुह्माला इतकं वाईट काय ह्मणून वाटलं ?

**पद्मलो**०-छेग. मला कशाकरितां वाईट वाटेल. (इतक्यांत जयदेव येतो. दासी दूर उभी राहते. )

**जयदेव**०-आईसाहेब, बाबासाहेब मणिपुराहून निघाले. हें पहा पत्र आलें. ( दासीस ) गिरजे, त्या पत्र घेऊन येणाऱ्या जासुदाची व्यवस्था लावून ये.

**पद्मलो**०-( मनांत ) तिकडं गेल्या बद्दल जर मला दुःख झालं असेल, तर आल्याचं वर्तमान ऐकून समाधान होईल. ( उघड ) पत्र का आलं ? चला बाई, मी काळजींतून सुटलें. वाचा पाहूं ? काय मजकूर आहे तो.

**जयदेव०**–मजकूर कांहीं विशेष नाहीं इतकेंच लिहिलें आहे कीं–मी ज्या कार्यानिमित्य इकडे आलों होतों, तें कार्य झालें व लवकरच निघतों.

**पद्मलोचना**–( मनांत ) तिकडंच काळं झालं असतं तर पिडा टळली असती.

**गिरजा**–बाहेर देवडीवर कोणी शिपाई नाहीं, नी त्या जासुदाचं मला बोलणं समजत नाहीं. तो आपलं नांव घेऊन "कुठं गेले ?" ह्मणून खुणेनं विचारित आहे.

**जयदेव०**–बरें, चल हो पुढें. मी आलोंच. आईसाहेब जातों तर मी.

**पद्मलोचना**–कां ? फारशी गडबड ! बसा. ( दासीस ) अग गिरजे–

**गिरजा**–जी आईसाब, काय हुकूम.

**पद्मलो०**–अग तिकडं चौकांत जा. तिथं ते खासगीकडचे जमादार असतील, त्यांना त्या जासुदाची नीट व्यवस्था लावायला सांग. ( दासी जाते ) बाळासाहेब, अष्टौप्रहर किती ही दगदग ! दिवसांतून एक प्रहर तरी विसावा घ्यावा. इथं सध्यां तुमची विश्रांति नाहीं, ह्मणून का वाईट वाटतं ? अहो भुकेच्या वेळीं मिळेल तें खावं, ह्मणजे भूक निवते, नी दुसऱ्या एका पदार्थाची चव समजते. ( बुद्ध्या हंसते. )

**जयदेव०**–आईसाहेब, आपण स्वतःच जर थट्टा करूं लागला तर मग—

**पद्मलो०**–छेहो, थट्टा कसली त्यांत; ज्या दिवसातलं त्या दिवसांत पाहिजेच.

**जयदेव०**–आईसाहेब, मला ते दिवसाचें व रात्रीचें कांहीं समजत नाहीं.

**पद्मलो०**-हं. हं. अस्सं. अस्सं. रात्रीचं कां समजतं ( पुन्हां बुद्द्या हंसून त्याची मुद्रा पहाते ) आतां कसं खुद्‌कर हसूं आलं ? ( मनाशीं ) याला हसूं नाहीं आलं तरी आपण मुद्दाम असंच बोलून अदमास घेतला पाहिजे. देवा ! या जवळ मी ती गोष्ट काढूं का ? ( उघड ) बाळासाहेब मी एक गोष्ट तुह्माला सांगणार आहें. बोल ह्मटलंत, तर बोलतें.

**जयदेव०**-हो. हो. काय हुकूम आहे बोला. मला पुत्राला तो शिरसावंद्य आहे.

**पद्मलो०**-हुकूम हो कसला त्यांत. हें बघा, तुह्मीं मला आई-साहेब आईसाहेब असं ह्मणूं नका. मला त्याची लाज वाटते बाई.

**जयदेव०**-कां असं कां ? या लेंकराचा कंटाळा ?

**पद्मलो०**-कंटाळा कसा येईल ? तुह्मीं मला प्राणापेक्षां प्राणप्रिय.

**जयदेव०**-( मनाशीं ) या भाषणाचा काय बरें उद्देश असावा? छेः सहजीं असेल. आपलेंच मन पापी, तेव्हां अशी भलतीच कल्पना होते. ( उघड ) आईसाहेब, तुह्मीं मला जन्म दिला नाहीं, ह्मणून काय झालें ? माझें रक्षण करितां, त्याअर्थी मला वडील आहांत.

**पद्मलो०**-वडील ! वडील कसली ? तुमच्या बायकोपेक्षां लहान आहें. लोक थट्टा करितात, ती तुह्मीं दिखील आईकली असेल ! लोक विचारतात मला-" तुह्मीं निर्मलेच्या सासू, कीं-निर्मला तुमची सासू " ? नी ह्मणे, ती कांहीं तुह्माला बायको शोभत नाहीं, आई शोभते. नी मी ह्मणे तुह्माला बायको शोभतें. होय, आतां नाहीं का तसं होणार ?

**जयदेव०**-( आपल्याशीं ) देवा! हिला मी " आईसाहेब " असें ह्मणतोंना ? अशा प्रकारचें हिचें हें माझ्याशीं भाषण शिव-

शिव ! माझे कान फुटून आंत किडे पडून मी बहिरा झालों असतों, तर फार नामी होतें. या पापविषयप्रस्तावाचा शेवट काय होणार ? माझाच नाश ! तोच होवो; पण हें कृत्य ! नको.

**पद्मलो०**–अहो, मी होऊन जर कबूल आहें, तर भिण्याचं कारण नाहीं.

**जयदेव०**–या तुमच्या प्रश्नाचें मला उत्तरच देतां येत नाहीं. आश्चर्य ! महदाश्चर्य ! असो. आईसाहेब, मला जरूरीचें काम आहे, सबब लवकर गेलेंच पाहिजे.

**पद्मलो०**–मग मी सांगतें तें काय ? तुह्माला काम आहे, त्यापेक्षां मला अधिक काम आहे. त्या कामसंतापानं मी अशी बावरी झालें आहें; तशीच तुमचीहि अत्यावस्था झाली आहे. पहा हे काळे हरिणासारखे डोळे रक्तासारखे लाल झाले आहेत, सर्व तोंडावर घाम आला आहे, अंगावर शहारे आले. अहाहा ! हें चाफ्याच्या कळी सारखं सुरेख नाक किती तरी शोभतं ! प्रियकरा, कामसंतापानं का अशी तुझी दशा झाली ? मग माझ्याकडून ना नाहीं.

**जयदेव०**–"आईसाहेब" अशी तुह्माला मी हाक मारतों, तुह्मीं मला "बाळा" असं ह्मणतां, याचा तरी विचार करा. ( दुःखाकुल होऊन ) आईसाहेब, मी तुमच्या पायां पडतों. मजसमक्ष तुह्मी असले घाणेरडे, अमंगळ शब्द उच्चारूं नका. मला पाहून जर तुमची अशी स्थिति होत असेल, तर हे माझे डोळे फोडा. माझें नाक कापून टाका. अरेरे ! असें पापकर्म करून हें नाक वर करून जिण्यापेक्षां तें कापून टाकणें अथवा मरून जाणें फार चांगलें.

**पद्मलो०**–हाच विचार करून मी आजवर दिवस लोटले. आतां ही वेदना मला सहन न होऊन मी तुमची प्रार्थना करितें,

या शब्दावांचून मला कांहीं दिसत नाहीं नी ऐकूं येत नाहीं. अहो, पाप पुण्य हे लोकांनां समजतं; पण तशी वेळ आली ह्मणजे, देवा सारखे दिखील वेडे होतात.

**जयदेव०**–देवा! काय हा मजवर दुर्धर प्रसंग! असें कोणचें दुष्कर्म मीं केलें? राज्यप्राप्तीसारख्या लाभाकरितां असत्य भाषण केलें नाहीं. पद्मिनीसारखें रूप असणाऱ्या स्त्रियेकडे वर दृष्टि करून पाहिलें नाहीं. त्याचा हाच प्रभाव? देवा, या पापापासून मुक्त होण्याची मला कल्पना दे. काय हें अपवित्रस्थल! ह्मणून तूं निघून गेलास?

**पद्मलो०**–मनोहरा, प्राण गेला तरी ही गोष्ट बाहेर फुटूं द्यायची नाहीं. पुरे पुरे हा विचार. माझे प्राण जाण्याची वेळ आली.

**जयदेव०**–फार उत्तम. त्या बरोबर माझेहि प्राण देण्यास मी राजी; परंतु स्वप्नांतहि ज्या पापकर्माची कल्पना होणें नाहीं, तें कर्म मी करूं? हाय हाय! मजवर वज्रपात किंवा शूलप्रहार होवो. आकाशांतून वीज कडकडून माझ्या अंगावर पडो; परंतु हा प्रसंग कधींहि मजवर न येवो.

**पद्मलो०**–अग बाई, पुरुष किती तरी खोल मनाचे असतात! मी आपली लज्जा मर्यादा सगळी गुंडाळून ठेवली, तरी यांनां खरं वाटूं नये? असं जर कपट तुमच्या मनांत अद्यापि असेल तर ही पहा मी जवळ आलें.

( ती जवळ येऊन त्याच्या अंगाला मिठी मारते. जयदेवराव तिला खालीं पाडतो. )

**जयदेव०**–दमधर दुष्टे, तुला जिवानिशी मारून या पृथ्वीचा भार कमी करतों. अग दुष्टे, नेहमीं जारकर्म करणारे, त्यांनांहि कांहींतरी बंधन ह्मणून असतें. गणिकेचा व्यवसाय करणाऱ्या ज्या स्त्रिया, त्यांनांहि कांहीं कारणामुळें, एकवार आईबहीण

असें मानिलें, तर ते जारपुरुष पुन्हां त्यांच्याशीं संबंधहि ठेवित नाहींत. मग तूं कुलस्त्री असून माझी सावत्रआई ह्मणवितेस आणि तुझी अशी दुष्ट वासना! (अंगावर धांवून) मारूं तुला ठार? (तिजकडे पाहून व शांत होऊन) नको नको. इला त्या पापी दुष्ट मदनानेंच पुरी मारून टाकली आहे. मग या दीन-अबलेचा नाश करून स्त्रीहत्येच्या दोषास मीं कशास कारण व्हावें-सौंदर्यप्रीति, हेंच पापवासनेचें बीज होय. अहाहा! सुः-जगांतील सर्व प्राणिमात्रांच्या उलट माझी स्थिति आहे. कुरूप असणें, हें प्रत्येक व्यक्तीस खेदकर, परंतु सौंदर्य हेंच मला दुःखकर झालें आहे. कमजास्त प्रमाणानें कोणाहि मनुष्यावर निरनिराळे प्रसंग येतात, यांत संशय नाहीं. व्यासकृत १८ पुराणें, वाल्मिकी रामायण व इतर अनेक प्राचीन, अर्वाचीन कवींचीं काव्यें माझ्या अवलोकनांत, श्रवणांत आहेत; परंतु अशी कथा कोठेंच नाहीं. नसणें हें उघड आहे. कारण तो काल निराळा व हा सध्यांचा कलीकाल निराळा. असो. आतां पुढें मार्ग कोणता? हा एकतर्फी वाद झाला. आतां यांचे संबधानें विचार केला असतां, सर्वथैव दोष मातोश्रीकडेहि नाहीं. कारण तारुण्य एक प्रबल रोग स्त्रीपुरुषांस ईश्वरानें जडिवला आहे. या रोगाच्या बाधेनें देवादिकांमध्येंचसा काय, पण योगी, तापसी लोकांत, आजवर मोठमोठे अनर्थ झाले आहेत. मग या मृत्युलोकच्या अज्ञानी प्राण्यांनीं पापाचरण करणें सहाजिक आहे. दुष्काळ पडला ह्मणजे थोर ह्मणविणाऱ्या ज्ञातीचे लोकहि अंत्यजा घरीं अन्नव्यवहार करितात. जसा जठराग्नि प्रदीप्त झाला ह्मणजे त्याला जाडेंभरडें अन्न कां असेना, त्याची आहुती दिली ह्मणजे मग त्या प्राण्याची पक्वान्नाकडे विशेष दृष्टि जात नाहीं, तसाच मदनाग्नि पेटला असतां त्याची शांती झाल्यावर तो अनावर

होऊन भलतीच सौंदर्यादि विषयांची इच्छा करित नाहीं. भूक लागल्या वेळीं जर पुढें अन्न सिद्ध आहे, तर पोटाकरितां भिक्षा मागण्याचा किंवा चोरी करण्याचा प्रसंगच येत नाहीं. या अनुमानानें पाहतां अष्टविवाहांपैकीं ब्राह्मविवाह फारच उत्कृष्ट; कारण लग्न झाल्यानंतर वयांत येऊन रतिसुखाची इच्छा होणार तोंच, स्त्रीस पति व पतीस स्त्री, हीं संनिध होतात. नाहीं-तर पुरुष किंवा स्त्री उपवर होऊन गेलीं आणि त्यांचा इच्छित मार्ग बंद असला, ह्मणजे स्त्रिया आहेत त्या पति पाहूं जातात व पुरुष स्त्रिया पाहूं जातात. याच न्यायानें पाहतां मातोश्री, तुह्मींच केवळ दोषी आहां, असें ह्मणतां येत नाहीं; तर बाबासा-हेब, हा दोष तुमच्या मस्तकीं आहे. कारण मातोश्रीच्या या वयांत तुह्मीं नेहमीं प्रवासांत राहिलां, तर त्यांची गति काय? दुसरा एक माझा तुह्माला सवाल कीं—अशा या तुमच्या वार्धक्यांत, तुह्मांला हा लग्नाचा हव्यास कशाला पाहिजे होता? यांत काय भूषण आहे, उपहास्यतेची प्राप्ति! लग्नाच्या पूर्वी या संबधानें तुह्मांला सुचवावें असेंहि माझ्या मनांत अनेक वेळां आलें; परंतु मर्यादेचें घोडें आड आलें व पितृइच्छेचा प्रतिकार केल्या दो-षाचें भय वाटलें. खाण्याला उत्तम पदार्थ, बहुमोल वस्त्रालंकार, विलासाकरितां तरुण रूपवती स्त्री, हीं सर्वत्र सर्वांस प्रिय आहेत; परंतु या उपभोगाची ज्याला इच्छा होईल त्यानें आपली यो-ग्यता व वयाचें मान पाहिलें पाहिजे. पंचाणव वर्षांचे वृद्ध स्त्रीशीं जर वीस वर्षांच्या तरुण मुलाचा विवाह गैर आहे, तर चाळिशी लोटल्यावर पुरुषानें विवाह करणें अप्रशस्त होय. यावर कोणी लाडके पुरुष मूर्खपणाची शंका घेतील, तर ती वृथा वल्गना ह्मटली पाहिजे. कारण वणवा पेटला असून त्याच्या गगनापर्यंत ज्वाला जात आहेत, तर तो वणवा शांत होण्याला योग्यवेळीं

मेघराजाची विपुल वृष्टि पाहिजे. जारकर्मांचा प्रतिकार होण्याचीं जीं कित्येक पाखांड्यांनीं थोतांड मतें माजविलीं आहेत, तीं केवळ स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्या पुरतीच. माझ्या मतें वयातीत पुरषांचें द्वितीय संबध करणें बंद झालें तर, हें पुर्वोक्तकर्म बऱ्याच अंशीं कमी होईल. असो. चला मातोश्रींनां उन्मादवायूची लहर आली आहे, त्यावर कांहींतरी उपचार केला पाहिजे.

( जातो ) पडदा पडतो. )

## अंक ३ रा. प्रवेश ३ रा.

स्थळ-राजमहाल मणिपूर-

उधोजीराव, रतिद्दष्टा ( वृंदा )

**उधोजी**०-आतां आपण बेफिकीर झालोंना? मागें कांहींच उपाधि राहिली नाहीं. बस्स. सामराज्य झालें.

**रतिद्दष्टा**-आपण कांहीं समजा. माझ्या मनांतली भीति काडीभर कमी झाली नाहीं. तो काळ स्वप्नांत दिखील माझी पाठ धरून आहे.

**उधोजी**०-तुला खात्रीनें सांगतों, मानाजी या जगांतून गेला असें समज. माझा दोस्त सुभानराव, याचें पत्र तूं पाहिलेंच आहेस व मीं त्याला उत्तर लिहिलें तें तुझ्याच समक्ष. झालें तर, त्याप्रमाणें तो सर्व व्यवस्था करणार. ही दगडावरची अक्षरें, असें समज.

**रतिद्दष्टा**-पण ते चांगलें विश्वासू आहेतना? नाहींतर हे दिवस आहेत खोटे. बाप, लेंकाचा हाडवैरी होतो. मग दुसऱ्याची काय कथा सांगू?

**उधोजी**०-तशापैकीं तो इसम नव्हे. माझा त्याचा लहान-

पणापासून परमस्नेह आहे. तसाच मानाजीशीं वैरभाव आहे. त्या बिचाऱ्या सुभानरावाची जी दुर्दशा उडाली, त्याचें कारण हाच पाजी कृतघ्न मानाजी बहुतेक अंशीं कारण आहे.

**रतिदृष्टा**–तें सारं कदाचित् खरं असेल; पण हा मेला ( मानाजी ) राक्षस, काळ त्याच्या तोंडाकडं पहाण्याची दिखील भीति वाटते, त्याच्या पुढं त्या सुभानरावाचा निभाव लागेल का ?

**उधोजी०**–हें काय विचारतेस ? या मान्यासारख्या चौघांनां तो मीठ घालावयाचा नाहीं. मोठा साहसी ! मोठा धूर्त ! ! मनांत मात्र कांहीं गोष्ट एकदां भरली पाहिजे. मग प्राण जाईतोंपर्यंत बोली–! ! 'अर्थंवा साधयेत्–देहंवा पातयेत्' हाच सिद्धांत.

**रतिदृष्टा**–आपल्या घरचे तीन तेरा झाले ह्मणून ही इतकी पंचाईत ! मांमजी असते तर, आज ही दुसऱ्याच्या हातानं पाणी पिण्याची पाळी कशाला आली असती ?

**उधोजी०**–सर्व खरें; परंतु आह्मी असे हे कमनशिबाचे झालोंना ? अनिष्ट ग्रहांवर माझा जन्म झाला, त्यावेळीं मला मारून टाकावें असें पुष्कळ लोकांनीं सांगितलें; परंतु पुत्रमोह कसा सुटावा ! उलट माझ्या संबंधानें कोणत्याहि गोष्टींविषयीं रतिमात्र गरज अशी त्यांनीं केली नाहीं. माझा अभ्यास चांगला होऊन मीं विद्वान व्हावें, हा त्यांचा विशेष हेतु. सबब मला रत्नपूरच्या पाठशाळेंत ठेवलें. त्यामुळेंच रत्नपूरकर राज्यमंडळाचा व आमचा विशेष परिचय. पहा कसा चमत्कार आहे ! मनुष्य ज्या ज्या गोष्टी मनांत आणतो, त्या उलट सर्व प्रकार होतो. तूं मला बायको मिळावीस, याकरितांच तीर्थरूपांनीं तुझ्या बापाचा किती तरी देव्हारा वाढविला होता; परंतु माझी जशी त्यांच्या मरणानें पडती वेळ आली, तसा तुझा बाप उलटून पडला व त्यानें तुमचें लग्न मानाजीशीं केलें. एकदरींत मनुष्य पैसा पहातो.

**रतिदृष्टा**—नका गडे, ती लग्नाची गोष्ट पुन्हां काढूं नका. त्यापेक्षां मला मरण पुरवलं. कुठं जर लग्नाकार्याला गेलं, नी तिथं नांव घेण्याची पाळी आली तर माझ्या जिवावर तो प्रसंग येतो.

**उधोजी**०—आतां ही गोष्ट काढलीस, त्यावरून मला आठवण झाली. सामान्य प्रतीच्याहि लोकांत सहजी घडून येणारा लग्न-सोहळा, तो मी राजघराण्यांत जन्मलों असून घडूं नये ? या कारणानें एखादें वेळीं मनाला फारच दिलगिरी वाटते. विड्या तोडणें, नांवें घेणें, वगैरे अनेक खेळ, नवऱ्याबायकोचें आप्तवर्गानें कौतुक करणें, यांचें प्रत्येकाला मोठें सुख वाटतें. संसारामध्यें राहून जर असा सोहळा नाहीं, तर त्याचें जिणें व्यर्थ आहे. त्यापेक्षां " करतल भिक्षा तरुतल वासः " हें पारलौकिक सुखसाधन साधणें बरें-

**रतिदृष्टा**—तो कोरडा सोहळा काय उपयोगाचा ? मला न्हा—णू—आल्या—(लाजून थांबते—मध्येंच उधोजी घाईघाईनें ह्मणतो)

**उधोजी**०—काय ? ( हसून ) काय आल्यापासून ? पुन्हां तेच शब्द आणखीं एकवार मला ऐकूं देत.

**रतिदृष्टा**—हो तर—येवढी विद्या कशी केसागणती भरली आहे. ऐकायचं दुसरं काय ? एक दिवस दिखील नुस्तं मन मोकळं करून, दोन फुकाचे शब्द बोल्लें नाहीं. काय तें तन मन धन इकडं ओढवलं आहे.

**उधोजी**०—तें तुझें अप्रतिम प्रेमच या माझ्या जिवाचें जीवन आहे, ह्मणूनच मी अद्याप जीवंत आहें; नाहींतर एव्हांनां माझ्या मरणाची वार्ताहि जुनी पुराणी झाली असती. परंतु कायहो- हें तुमचें कृत्रिम, विवाहित पतीशीं योग्य नव्हे. याचें पातक आहे.

**रतिदृष्टा**–तें सारं चट् पातक माझ्या वडलांनां.

**उधोजी०**–वहावा! हा न्याय नव्हे.

**रतिदृष्टा**–माझी इच्छा नसतां त्याच्याशीं लग्न कां लावावं? बायका ज्या बिघडतात त्याचं खरं कारण कोण पहातो? प्रीति कर, असं कोणीं सांगून होत नाहीं, हें ज्याचं त्यालाच वाटलं पाहिजे.

**उधोजी०**–पण असें न वाटण्याचें कारण काय? मानाजी-प्रमाणें शूर शिपाई फारच क्वचित्, देखणा ही तसाच, पूर्ण राज्य-सत्ता व गर्भश्रीमान्, न्यून्य असें त्याच्यांत कांहीं नाहीं.

**रतिदृष्टा**–दूध हें पाण्यापेक्षां अधिक खरं. पण माशांनां त्याचा काय उपयोग! पाणी हेंच त्यांचा प्राण. तसे आपण माझे पंचप्राण.

**उधोजी०**–इश्वरीलीला अगाध आहे. मायोपाधी जीव असें ह्मणतात तें खरें आहे. या मायारूप स्त्रीपुढें कसाहि विवेकी पुरुष वेडा होऊन जातो. काय हें स्त्रीचरित्र! नैसर्गिक प्रीतिगुणा-भाव असतां, ती आहे असा पतीचा ग्रह करणें हें केवढें चातुर्य! ( रतिदृष्टेस ) काय हो, पण या तुमच्या अपूर्व कृतीचा त्याला कधीं संशय तरी आला आहे का?

**रतिदृष्टा**–छेः अगदीं. उलट त्याला वाटतं कीं, अद्यापि मला आपण डोळ्यांनीं पाहिली दिखील नाहीं. अगदींच भाबडं!

**उधोजी**–तसाच तुजपाशीं मोहकपणा आहे. मीं तुझें नांव रतिदृष्टा असें ठेविलें त्याचें हेंच कारण. मुखावलोकन केलें कीं, रतिसुखाची इच्छा होते.

**रतिदृष्टा**–पुरे बाई या गोष्टी. दोन प्रहर रात्र होत आली. माझे डोळे भारीच चुरचुरताहेत.

**उधोजी०**–( हंसत उभा राहून ) चला. उशीर कोणाकडून?

**रतिद्दष्टा**-आपण आधीं जाऊन निजावं. ( लाडीकपणानें )
ऊं-मी नाहीं जा. रोज रोज मेला त्रास.

**उधोजी०**-( हंसत ) हो बरी आठवण झाली. अलीकडे आपण ह्मणे वात्सायनऋषीकृत शृंगारशास्त्राचा अभ्यास करित असतां; तर चला पाहूं कशी काय तयारी आहे ती.

**रतिद्दष्टा**-या बोलण्याचें अनुसंधान माझें लक्षांत आलें.

**उधोजी०**-अनुसंधान लक्षांत यावें हीच माझी इच्छा, ह्मणजे मला संधान करण्याला बरें. चला-हं-उठा.

**रतिद्दष्टा**-मी कांहीं गच्चीवर यायची नाहीं. माझ्यानें त्या पायऱ्या चढवत नाहींत.

**उधोजी**-हं. आलें लक्षांत. आमच्या कडेवर बसण्याची ही विद्या. ( हंसून ) हूं. बसा. कडेवर बसा, खांद्यावर बसा, डोकीवर, जिथें इच्छा असेल तिथें बसा. ( तिला कडेवर घेतो. )

**रतिद्दष्टा**-( हंसत ) जसा कांहीं आपल्याला त्या गोष्टीचा कंटाळाः

( पडदा पडतो. )

## अंक ३ रा. प्रवेश ४ था.

मणिपूर नगराबाहेरील मैदान ( तंबू ).

सुभानराव व त्याचे साथीदार.

**सुभानराव**-गड्यांनों, वेळ मोठी सुरेख आहे. एका उद्योगांत अनेक कार्यभाग साधण्याचा संभव आहे. पूर्वींचा आमचा मुख्य हेतु ह्मटला ह्मणजे प्रतापराव प्रधानाला मारण्याचा; आतां अनायासें आपला हाडवैरी मानाजी, तोहि मारला जाणार. आजचा हा योग फारच उत्कृष्ठ आहे. मणिपूरकर उधोजी व मानाजी या

उभयतांमध्यें जो बेबनाव आला आहे, तो आपल्या चांगल्या पथ्यावर आहे. जर कांहीं शिकार साधली तर आह्मा सर्वांचें नष्टचर्य संपलें असें समजा.

**जाधव**०–हा आपल्या कार्याला शुभ शकून समजला पाहिजे. हें पहा आह्मी कंबर बांधून तयार आहों.

**भवान**०–मानाजी राजे, प्रतापराव प्रधान वगैरे सर्व लोक याच बागेंत आहेतना ? वाः उत्तम ( आनंदानें टाळ्या वाजवितो. )

**सयाजी**०–आपल्या ज्या मुख्य शिकारी, त्या या इकडील दक्षिणेच्या मोठ्या भव्य तंबूमध्यें आहेत.

**सुभानराव**–हां, आतां गलबला बिलकुल उपयोगाचा नाहीं. आपआपल्या पायांतले जोडे काढून ठेवा. कारण बागेंत चोहोंकडे वाळु पसरली आहे. त्यावरून जोडे घालून चाललें असतां मोठा अवाज होतो.

**भवान**०–होय, नाहींतर ते निजले आहेत ते जागे होतील; मग सर्वच फसेल. एक प्रतापरावच दहा इसमांनां पुरे आहे.

**सुभान**०–बरें, आतां सर्व व्यवस्था सांगतों. जाधवराव, तुह्मी हत्यारबंद होऊन तंबूच्या तोंडाशीं उभे रहा. आंतून जर कोणी बाहेर पळूं लागला, तर त्यास तेथल्या तेथें चीत करा.

**सयाजी**०–मी त्या तंबूजवळील वडाचे झाडावर चढून आंत कोणी जागे आहेतसें पहातों.

**सुभानराव**–भवानराव, तुमची आसपास फिरती नजर असूं द्या. कोणी आल्यास लागलेंच आह्मांस कळवा. मी स्वतः आंत शिरतों व जे दृष्टीस पडतील त्यांनां कापून टाकतों.

( ते आंत जातांच धरा, पकडा, मारा; असा शब्द होतो, सुभानराव पळून जातो, वरकड त्रिवर्गीस प्रतापराव एकटाच धरून आणतो. )

**प्रतापराव**—अरे चोरांनों, आतां हा उद्योग आरंभलात काय ? दमधरा, तुह्मांला रत्नपुरास नेऊन तोफेच्या तोंडीं उडीवतों. कायरे ? तो पळाला तो कोण ? तो जर माझ्या हातीं लागता तर त्याला चिरून त्याची भाजी केली असती. त्या हरामखोरानें मला निजलेला पाहून माझ्या अंगावर तरवारीचे वार केले. तरी ईशकृपा असें ह्मटलें पाहिजे, कारण मानाजीराव राजे अद्याप आले नाहींत; नाहींतर चोरांनों, आज तुह्मीं घात केला असता. बोला बोला. आतां कां माना खालीं ? ( चाकरास उद्देशून ) कोण आहेरे तिकडे ? ( इतक्यांत दोन नोकर येतात ) या तिघांनां तुरंगांत ठेवा. ( नोकर जी असें ह्मणून जातो ) आतां या सर्व जखमा धुऊन टाकून दुसरा पोषाक करावा.

( पडदा पडतो. )

## अंक ३ रा. प्रवेश ५ वा.

**स्थल राजमार्ग.**

**मानाजी०**—कठीण आहे. कालकूट वीष प्राशन करवेल, परंतु स्त्रीवियोगजन्य दुःख कधींहि सहन करवणार नाहीं. बालपणीं माता मरण पावली असतां जी मुलाची दुर्दशा, त्याहीपेक्षां तरुणजनाला विरहव्यथा दुस्सह ! प्रियेला सोडून मला थोडाच अवकाश झाला; तों ही माझी अवस्था ! याउपर रत्नपुरास जाऊन परत येईतों माझी व माझ्या लाडकेची काय गत होईल? अहाहा ! काय हें अनुरूप रतिसौख्य ! त्या विलाससुखस्मरणानेंच किती आनंद होतो व मनाची काय स्थिति होते ! या विषयसुखानिमित्य, देव, गंधर्व, यक्ष, किन्नर, पशुपक्षी सर्वच आसक्त आहेत; इतकेंच नाहीं, तर अवधूत दिगंबर झालेले

तपस्वीहि कुत्रीं होऊन स्त्रियांच्या मागें लागले. प्रसंगीं असंख्य जीव जिवाला मुकले, परंतु या विषयापासून अनासक्त असें कोणाच्यानें होतां येत नाहीं. ही स्त्रीरूप मोहनी विधात्यानें अपूर्व चातुर्यानें उत्पन्न केली आहे. विधात्या, या कामीं मात्र तुझे आमच्यावर फार उपकार आहेत. प्रिये, फक्त तुझ्या ध्यानानेंच शरीर रोमांचयुक्त होऊन गुदगुल्या होत आहेत. असें असतां मीं महामूर्ख, तूं जी प्राणाला प्राण देणारी, त्या तुला सोडून द्रव्यलोभानें माझ्या प्राणावर उदार होणाऱ्या बंधूला भेटण्याकरितां जात आहें. तो कशा करितां? तर त्याला पूर्व अनन्वित कृत्याची उपरती होऊन त्यानें मला राज्यविभाग देण्याचें कबूल केलें आहे ह्मणून. नाहींपेक्षां तो मृत्यु पावल्याचें वर्तमान ऐकलें असतें, तरी मला बिलकुल विषम वाटलें नसतें. असो. आज आपण नगरासमीपच तळ दिला आहे, तर इतक्या संन्निध असतां आलिंगन सुखविमुख होणें हें आह्मां कामुकांनां दोषास्पद आहे, चला तर. मी हा उदी रंगाचा पोषाख केला आहे; त्याअर्थीं परक्या इसमाला, मला पछानताहि यावयाचें नाहीं. यद्यपि मीं राजा आहें मजविषयीं चर्चा करण्याला कोण धजणार नाहीं. अशीच माझी सर्वत्रांनां दहशत आहे. आतां हा मीं अगदीं राजद्वाराजवळ आलों. हे पहा, पहारेकरी खुशालपणें झोंपून गेले आहेत. अरे, पागलहो, माझ्या पश्चात् असाच तुह्मी बंदोबस्त ठेवणार? दमधरा, येथून परत जातेवेळीं तुह्मां सर्वांनां दावणीला बांधून छाटून देतों.
अं:—असें कां बरें? निष्कारण माझा उत्साह अशा आनंदाचे वेळीं नष्ट होऊं लागला! अरेरे, खचित—कांहीं तरी दगा आहे खास. माझ्या मनांत भलभलत्या कल्पना येऊन फार भीति वाटते. प्रियेला वियोगसमुद्रांत लोटली, सबब तिनें आपल्या कोमल अंतःकरणाला तें दुःख सहन न झाल्यामुळें प्राण दिला असेल? अरे

देवा, आतां काय करूं ? ( खालीं पडून व पुनः उठून ) छेः क-
ल्पनेनेंच धैर्य खचूं देणें हा प्रशस्त मार्ग नव्हे-हें पहा—तसें झा-
ल्याचें चिन्हहि येथें कांहीं न दिसतां आज हा राजमहाल
विशेष शृंगारलेला दिसत आहे. चंपक, कुंद, बकुल, मोतिया, गुल-
छबू, मदनमस्त, अशा सुगंध पुष्पमाला जिकडे तिकडे लटका-
वल्या आहेत. पाच, गुलाबादि सुवासिक दीप पेटले आहेत.
उघडच आहे. दुःखविस्मृति ज्या मार्गानें होईल तसें करणें
जरूर आहे. स्त्रिया, पुरुष उपरोधपर गीत गातात—काय ?—
पुरुष जात बेमान ॥ नाहीं दया ना भान ॥ १ ॥ हें त्याचें ह्म-
णणें तूं सार्थ केलेंस. अरे कठोरहृदय मानाजी, ही तुझी प्रिय
या एकांतरूपवनामध्यें तळमळते आहे, तर या हरिणीला
दृढालिंगन दे— ( पुढें जातो, तोंच पडदा उघडतो व पलंगावर
वृंदा आणि उधोजी एकत्र निजलेली दृष्टीस पडतात ) अति
दुःख झाल्यामुळें इला गाढ निद्रा लागली आहे. जवळ दुसरें-
हि कोणसेसें आहे. परपुरुषाची तर कल्पनाच नको; कारण जि-
च्या पातिव्रत्याला सूर्यनारायण भितो, तेथें दुसऱ्याचा पाड काय?
मला वाटतें, ही इची बहीण भानुमती इचें समाधान करण्याकरि-
तां आली असावी. ( हंसून आनंदानें टाळ्या वाजवून ) ओहो !
तर आज काय मजा आहे. मेव्हणी ह्मटली ह्मणजे अर्धी बाय-
कोच. तेव्हां तिच्याशींहि आज विनोद करण्याची संधी बरी मि-
ळाली. भो कामदेवा ! ( हात जोडून हंसत ) हा तुझा उपासक
तुझ्या पूर्ण भक्तीनें विषयानंद सुखाचा पूर्णानुभवी होणार. ( जवळ
जाऊन अंगावरील वस्त्र काढतो व लागलाच मूर्च्छित पडून
बरळूं लागतो ) सूर्यग्रहण, खग्रास सूर्यग्रहण ! पण रात्रौ सूर्य-
ग्रहण होणें आश्चर्य नव्हे काय ? छेः या तंबूमध्यें प्रकाश येण्या-
ला मार्ग नसल्यानें अंधःकार झालासा वाटतो, पण मी तंबूंत

नाहीं. तर प्राणप्रियेची गांठ घेण्याकरितां बागेंतून महालांत आलों आहें; तों हें विपरीत कर्म दृष्टीस पडलें. होय होय, हा भास नव्हे. हें प्रत्यक्ष! ( शुद्धीनें उभा राहून रागानें ) अरेरे! गगनापर्यंत भेदून गेलेला माझा कितींध्वज कोसळून माझ्या शत्रूच्या पायां खालीं चुरडून गेला. ओ-हो माझा अभिमानसागर शुष्क झाला. माझ्या थोरपणाचा फडशा उडाला. आतां काय करूं-( संतापून ) नेत्रांनों, हें दुष्कर्म तुह्मांला कसें मानवतें? अरे मानी मानाजी, तूं अगदींच कसा पौरुषहिन होऊन गेलास? ज्या तुझ्या हुकुमाला फेर जबाब देण्याला कोणी शक्य नसे तो तूं, प्राण हरण करणारा अपमान सहन करित आहेस! छत् ( दांत ओंठ खाऊन ) या कट्यारीनें उभयतां दुस्मानांचे तुकडे करतों. अग डाकिनी, तुला अगोदर ठार मारतों ( अंगावर धांवतो इतक्यांत उभयतां उठतात ).

**उधोजी०**—हां. हां. खबरदार हात आंवर. नाहींतर वरच्यावर हात कलम होईल.

**वृंदा**-( शोकानें ) अग आई, शेवटीं घातच झालाना? आतां मीं काय करूं? कुठें जाऊं! आतां नको या जीवाची आशा.

**मानाजी०**—अरे चोरा, कोण आहेसरे तूं? उधोजी, तूंच कारे नीचा?

**उधोजी०**—होय मीच तो तुझा बाप. राजमदानें तुझे डोळे धुंद झाले आहेत, त्या तुझी धुंदी घालिवणारा हा शूर उधोजी.

**मानाजी**—उधोजी, अरे, हा तुझ्यापुढें प्रत्यक्ष यमस्वरूपी काळ, त्या तूं मला ओळखत नाहींस? तुझ्या तोंडांतून काय अक्षरें निघत आहेत, याचें तुला भान नाहीं. अरे हरामखोरा.

**उधोजी०**—कोणरे तूं, कोणत्या झाडाचा पाला? अगांतुका, तुला कोण भिणार व तें कशाकरितां? मीं या मणिपूरचा राज्या-

धिकारी असून मला तुझी भीति ? वाः हा सुरेख न्याय ! असें असतां मला हरामखोर ह्मणतोस, सांग पाहूं कोण हरामखोरतो ? आमच्या जनकोजी महाराजांनीं तुला चार दिवस राज्यव्यवस्था पहाण्याकरितां आणलें. कां ? तर त्यांच्या अंतकालसमयीं मीं लहान होतों ह्मणून, तें स्मरण न ठेवितां कपटानें सर्व लोक वश करून माझें राज्य बळकाविलेंस. बलात्कारानेंच या माझ्या प्रियेशीं लग्न लावलेंस, या सर्व अपराधांबद्दल तुझें या पूर्वींच शासन केलें असतें; परंतु तशी संधी न मिळाल्यानें आजवर तुझ्या पाजीपणाच्या आचरणाची चढ होत गेली. आतां माझ्या हातीं सांपडला आहेस, घेतों तुझा समाचार. ही पहा. पोकळ डौलानें जिला आपली विवाहित स्त्री ह्मणवितोस ती मजजवळ आहे. सामर्थ्य असेल तर तिला घेऊन जा.

**मानाजी०**-( अंगावर धांवून जातो ) कोठें आहे ? कोठें आहे ती कपटकृत्या. अग जारिणी, पाहूं दे तुझें तोंड. डाकिणी, ये अशी माझ्या पुढें. तुझें तें नाकच कापून टाकितों.

**उधोजी०**-( मानाजीस अडवून व धिक्कारून ) अरे चलधूत्त-हो दूर हो. तिचें नख तुझ्या, आतां तिच्या पायां पडल्यानेंहि दृष्टीस पडावयाचें नाहीं.

**वृंदा**-देवा देवा ! आतां काय करूं ! ही दीन गाय या कसाबाचें हातीं सांपडली. ( उधोजीस ) महाराज, माझा तर आतां अंत होणार, पण आपण सावधपणानं आपल्या जिवाचं रक्षण करावं.

**उधोजी०**-प्रिये, तुला बिलकुल भीति वाटूं देऊं नको. मीं जिवंत असतां तुला धक्का लागूं दिला, तर मीं माझे जनकोजी महाराजांचे पोटीं जन्मच घेतला नाहीं असें समज. अग, तुझ्या छायेला शिवूं देणार नाहीं. अधिक काय सांगू, तुजकडे डोळे उ-

चढून पाहील तर त्याचे डोळे फोडून टाकीन. असा कोणाचा प्राण वर आला आहे ? अशी कोणाची माय व्याली आहे ?

**मानाजी**०–कोणाची माय व्याली आहे ? अरे माझी. ( अकस्मात् त्याचे ( उधोजीचे ) अंगावर वार करतो. ) हें पहा प्रत्यक्ष प्रमाण. मीं अगदींच मेल्या आईचें दुध प्यालों नाहीं बरें.

**उधोजी**०–( खालीं जमिनीवर व्याकुल होऊन पडतो ) हाय हाय ! मेलों मेलोंरे दुष्टा. ( उठून रागानें मानाजीचे अंगावर वार करावयास जातो. मानाजी वार चुकवून एकीकडे धांवतो व वृंदा येऊन पुन्हां उधोजीस आलिंगते. )

**वृंदा**–अग आई ! देवी जगदंबे, झालाग बाई, माझ्या जन्माचा, सर्व सुखाचा सत्यानास झाला; आटपलाग बाई माझा संसार. ( उधोजीस उद्देशून शोकानें ) प्रियकरा, आपण सावध आहांना ? बोला, लवकर बोला, माझे हात पाय गळून गेले.

**उधोजी**०–प्रिये, ही पाहिलीस माझे उरावरची जखम, मीं यांतून खचित वांचत नाहीं. ( शोकानें ) प्रिये, आतां तुझा माझा वियोग होणार, ह्मणून मला वाईट वाटतें. अग, मनुष्य जो जन्माला येतो तो जन्माबरोबर मृत्यूहि घेऊन येतोच. राव असो वा रंक असो, सर्वांची हीच दशा. पण पुढें होणाऱ्या तुझ्या स्थितीचें अनुमान लक्षांत येऊन माझा प्राण अधिकाधिक कासावीस होतो.

**वृंदा**–असं जर आहे, तर मज निमित्य आपण अगदीं काळजी करूं नये, नी मीहि आपल्याविषयीं कांहींच काळजी करित नाहीं. आपण जसे या लोकींच्या व्यापांतून सुटलां, तशी मीहि आपली सुटका करून घेतें. आणा ती तरवार मींच आपल्या हातानं आपली मान धडा पासून मोकळी करतें ( उधोजीचे हातांतील तरवार घेते. )

**मानाजी०**–( वृंदेचे अंगावर धांवून ) अग जारिणी, तूं आपण होऊन जरी आपला नाश करून घेतलास तरी तें माझ्या इच्छेच्या प्रतिकूलच होय. मीं स्वतः जर तुझा नाश केला तर म्यां सूड पुरा उगवला असें होईल, तर हें घे तुझ्या पापाचें प्रायश्चित्त. ( वृंदेचे अंगावर वार करतो, वृंदा वार चुकवून बाजूस होते. )

**उधोजी०**–सखे इकडे आण ती तरवार, हा कपटी लांडगा तुझा मजप्रमाणेंच नाश करील. मीं घेतों याचा आतां खरपूस समाचार.

**वृंदा**–आपण, मला तरी काय कमी समजतां ? ( मानाजीस उद्देशून क्रोधानें ) मेल्या काळतोंड्या, जसा तुझा सूड उगवला नाहीं, तसा आमचाहि उगवला नाहीं. तो आतां उगवतें. पहा माझा स्त्रीचा पराक्रम ( मानाजीचे अंगावर वार करावयास जाते, मानाजी वार चुकवावयाकरितां उडी मारतो परंतु तो वार पायावर होऊन खालीं पडतो. )

**उधोजी०**–( वृंदेस आलिंगून ) शाबास शाबास सखे. ज्या दुष्टानें माझी नजर चुकवून मला जखमी केलें, त्या माझ्या हाडवैऱ्याचें रक्त पाहिल्यानें मीं सुखी झालों ( पुन्हां जमिनीवर पडतो ) परंतु प्रिये, काय करूं मला मूर्छा येते. जखमेचा प्रहार मर्मस्थानावर झाला, त्याअर्थीं मीं खास मरणार.

**वृंदा**–( शोकानें ) आपण मरणार तर मीं तरी कशाला वांचूं ? आतां पायांजवळ एक मागणं आहे. तेवढं पुरवावं. आपण आपल्या हातानं मला आतां शेवटचं कंठस्नान घालावं, नी या मेल्यानं माझ्या शरिराला जो स्पर्श केला आहे, त्या पापापासून मला मुक्त करावी. हां आटपा. सोडा तो मायापाश, नी चटदिशीं मला मोकळी करा; पण थांबा आणखी एक हौस आहे ते-

वढी आशा पुरवून घेतें. ( सक्रोध होऊन मानाजीस ) अरे मेल्या, झाला तुझा सत्यानास, ज्या हातानं माझ्या प्रियकराला कपटानं जखमी केलंस त्या तुझ्या हाताचें कोळसे होऊं देत. त्या तुझ्या अंगाला कोड फुटून भगंदरें पडूं देत. तुझा कुलक्षय होऊं दे. ( इतक्यांत मानाजी सावध होऊन तिचे अंगावर येतो, पण त्याचें उधोजी तरवार परताळून निवारण करितो. )

**मानाजी०**–जारिणी तोंड आटप, तोंड आटप; नाहींतर बत्तिशी पाडून जीभ व नाक कापून टाकीन.

**वृंदा०**–प्रियकरा, तुह्मीं तरवार घेऊन क्षणभर सावध रहा, मला आणखी थोडीशी याची चांगली खेटरपूजा करूं द्या.

**उधोजी०**–चालूं दे तर तुझा उद्योग. आतां मीं पूर्ण सावध आहें.

**वृंदा०**–मेल्या, माझं कारे नाक कापणार ? माझं तुटकं खेटर तरी तुझ्या पुन्हां दृष्टीस पडेल ? ( क्रोधानें ) चंडाळा मांगा, शिपाया सारखा शिपाई ह्मणवितोस, पण मीं बायको मनुष्य असून मला जो अभिमान किंवा रीत आहे, ती कांहीं तुला नाहीं. तूं मला पाहिजे तीं नांवं ठेव; नी ठेवलीस तरी त्याची आतां मला भीति नाहीं, पण माझ्या मतें मीं कांहीं पाप केलं नाहीं. ज्या माझ्या प्रियकरांनां मीं हा देह एकवार अर्पण केला त्यांच्याच करितां आतां त्यांच्यासह, स्वर्गी जाणार. आजवर मला बलात्कारानं "बायको बायको" ह्मणून नाडलीस त्या तुला जन्मजन्मांतरी बायको मिळायची नाहीं.

**मानाजी०**–( अंगावर धांवतो पण उधोजी त्याचें निवारण करितो ) अग जा. डाकिनी, व्यभिचारिणी, असल्या कावळ्याच्या शापानें माझें काय होणार ? या बहाद्दरास बायकांनां काय तोटा आहे ? तुजपेक्षां सवाई चढ अशा शेंकडों बायका

मिळवीन. तुजप्रमाणें कुलटा मिळूं नयेत अशी माझीहि इच्छा आहे.

**वृंदा०**–मांगा, आमच्या नरकांत पडशील. नीचा, जरी बायका मिळीवल्यास तरी त्या तुझ्या हातावर तुरी देणाऱ्याच मिळोत. जो दुसऱ्यांच्या बायकांची इच्छा करितो त्याची बायको तिसऱ्याचे हातीं लागणार, हा देवाचे घरचा न्यायच आहे. (शोकानें) आमच्या प्रीतीची इथं ताडातोड केलीस तरी स्वर्गांत आह्मीं आनंदानं राहूं. ( उधोजीस ) महाराज, सोडवा आतां माझा गळा. मीं पुढं जाऊन देवाची प्रार्थना करून आपल्याला विमान पाठवितें; पण प्रियकरा माझं मागं स्मरण राहूं द्या. आपण जर तिकडं आला नाहीं, तर मला त्या स्वर्गांतहि सुख नाहीं बरं. हां आटपा. धरा ही वेणी. मीं आतां देवाचं नांव घेतें.

**उधोजी०**–ऐकऐक. मान्या, हें भाषण लक्षांत वागव. अरे ती स्त्री असून जो समंजसपणा आहे, तो तुझ्यामध्यें नाहीं. हा महत्वाकांक्षीपणा, द्रव्यलोभ, परदाराभिलाष सोडून दे. या आमच्या उभयतांचें भाषणानें तूं आश्चर्यचकित झाला असशील तर हाहि तुझा मूर्खपणा आहे, कारण वास्तविक प्रकारानें सर्वतोपरी आमची पूर्ण सत्ता आहे. तो रागाचा उद्वेग तशाच अडचणी आल्यामुळें दबून होता. असो. ( वृंदेस ) प्रिये, तुझी तयारी कर.

**वृंदा०**–उशीर आपल्याकडूनच. ( मानाजीस ) आतां आह्मीं परलोकी गेल्यावर तूं नर्कांत राहूनच आह्मांला पहा.– (उधोजीस) थोडा दम धरा, आपली मूर्ति आणखी एकदां पाहून चांगली ध्यानांत घेतें. ( वृंदा कांहीं वेळ उधोजीस पूर्ण रेखून पहाते, नंतर उधोजी तिला ठार मारतो. )

**उधोजी०**–मान्या, कुत्रा जसा मांसाच्या तुकड्यावर लक्ष ठेवून टेहळणी करितो, त्याप्रमाणें आह्मांवर पूर्ण डोळा ठेवून

आहेस; परंतु लक्षांत ठेव, आधीं तुझा चांगला समाचार घेतों व मग जिकडे माझी प्रिया गेली त्या स्वर्गींची वाट धरतों. ( सक्रोध ) काय करूं रे चोरा, फांसे पारध्या, कांहीं वेळ तरी माझें हस्तकौशल्य पहावयाचें होतेस. मरण हें मला तृणासमान आहे. मीं खुषीनें आपली मान तुझे स्वाधीन केली असती; पण मसलत फसली. अरे दगलबाज, तूं खरा जातिवंत शिपाई नव्हेस; तुझे बीजांत निःसंशय कांहीं तरी दोष असला पाहिजे. ( इतक्यांत वृंदेकडे दृष्टि जाऊन शोकाकुल होऊन तिचे अंगावर पडतो. ) शाबास प्रिये, सामान्य वस्तूंविषयीं निरपेक्ष बुद्धि असणें, हा गुण अनेकांत असतो; पण तूं प्राणासारख्या प्याऱ्या वस्तूवर उदार झालीस; केवढें औदार्य !

**मानाजी०**-( आपल्याशीं ) या घडून आलेल्या सर्व प्रकारावरून मींच दोषी असें माझें मन मला सांगतें; परंतु हा दुस्सह प्राण घातक अपमान कसा सहन करूं ? पण नाहीं; अविचारानें केलेलें कृत्य हितावह होत नाहीं. त्यांतून हा मोठा पराक्रमी असून दुखावलेल्या कालसर्पाप्रमाणें खवळून गेला आहे. मींहि या पायाचे जखमेनें जाया झालों आहें. तर याच्याशीं कपट केल्यानेंच परिणाम आहे. ( उघड ) शाबास ! शाबास ! उधोजीराव, तूं अलौकिक पुरुष आहेस. या तुझ्या दिलदार तब्बेतीला मीं फार खूष आहें. तूं स्वमुखानें जें वदलास तें अक्षरशः खरें आहे. वास्तविक पहातां तूं सेव्य आणि मी सेवक, हें आमचें परस्पर नातें. तें विसरून मीं तुझ्याशीं निव्वळ लबाडी केली, याचा मला फार पश्चात्ताप झाला आहे; सबब मीं तुला शरण आहें. या उप्पर हें तुझें राज्य तूं सुखानें कर. ( मनाशीं ) केवळ भाटबानी उपयोगाची नाहीं व तसें करणेंहि थोडेंसें अविश्वास वाटण्यासारखें होतें; तर याला आपल्या भाषणाचा खरेपणा वाट-

ण्यासाठीं किंचित् उलट बोललें पाहिजे. ( उघड ) उधोजीराव, पण या तुझ्या स्त्रियेचा मात्र मला अनिवार राग होता; पण ती आतां मरून गेली. आतां त्याचें काय ? इतःपर आपण स्नेह्यां-प्रमाणें वागूं.

**उधोजी**०–तुला खरोखर जर पश्चात्ताप झाला असेल, तर तुजवर माझा बिलकुल रोष नाहीं; परंतु या जखमेमुळें मीं आतां वांचत नाहीं आणि वांचलों तरी मला या जगांत रहाणें नाहीं. कारण मीं माझ्या प्रियेला स्वर्गीं येण्याविषयीं वचन दिलें आहे. तर तुझी तरवार घेऊन माझा गळा छाट. हा शिपाई बच्चा आहे; याला तशा मरणावांचून बिछान्यावर पडून गति नाहीं.

**मानाजी**०–( मनाशीं ) असे मूर्ख देवभोळे लोक असले तरच आह्मांला फर्जीचा डाव साधणार. ही संधी बरी आहे. (उघड) उधोजीराव, तसें कृत्य आतां माझे हांतून होणार नाहीं. सख्या! ये ये, मला एकदां कडकडून भेट दे. ( उधोजी जवळ येतांच भेटण्याचे मिषानें त्यास दाबून खालीं पाडून मोठी जखम करतो आणि तसाच क्रोधावेषानें वृंदेस लाथ मारून ) ऑय मालजादी, अगे डंकन, तूंच का ती मघापासून वटवट चालवली होतीस ? उघड, उघड तुझी जिबली. तिनें यावेळपर्यंत फार चळवळ चालवली होती. कां ? नाहीं ऐकत माझा हुकूम ? काय? तिला दांतांत छपवून ठेवतेस ? बरें तर. दांतच तुझे ठोसा मा-रून पाडतों दांत पाडून मग जीभ कापतो हां अस्सें. अस्सें केलें पाहिजे. आतां ते हात कुठें आहेत ? कोणत्या हातानें मला जख-म केलीस ? ते हात मुळापासून छाटून काढतों. काय करूं ? तरी मन शांत होत नाहीं. ( अतित्वेषानें ) कोण तूं गरीब गाय अं ? तर हा पहा वाघ तुझें नरडें फोडून गटगट रक्त पितो. तसें करून ) मला, मला फसवितेस ? काय पहा कपटी रांड. मीं

मणिपुराहून रत्नपुरास जावयास निघालों तर, केवढा आक्रोश ! किती तरी आकांत ! अरे ! आपल्या अत्यंत प्रीतीचें मनुष्य समक्ष मेलेलें पाहिलें तरी इतकें रडून दाखवतां येणें मुष्किल; पण तुझा गोंधळ केवढा तरी ! हें इल्म ( विद्या ) तुला कोणत्या बदमाष गुरूनें पढिवलें ? अशा कोणत्या शाळेंत अभ्यास केलास ? काय तुला बक्षीस देऊं ? ( पुन्हां लाथ मारतो ).

**उधोजी**०–( जमिनीवर पडला असतांच ) वाः वहावाः केवढा तरी तुझा पुरुषार्थ ! शाबासरे भागुबाई, प्रत्यक्ष प्रेतावर वार करणारा ! धन्य तुझी ! या कृत्यानें 'गाजी' असें तर कोणी ह्मणावयाचें नाहीं, पण 'पाजी' हा किताब मिळेल. खाशी नीति!

**मानाजी**०–चालूं दे. पांचजन्य शंखध्वनि करणारा कृष्ण मरून गेला; तूं आतां शंखध्वनि करून त्याचें नांव चालीव.

**उधोजी**०–अरे कम नशीब मानाजीराव, आतां मेल्यामागें वृथा द्वेष काय उपयोगाचा ? तुझ्याच इच्छेप्रमाणें सर्व साधलें होतें. मीं होऊन मरणाला कबूल असतां हिंसादोष कशाला घेतलास ? आतां तरी शांत हो. मानाजीराव, माझा गळा सुकून गेला आहे. मला थोडेंसें पाणी आणून दे. तुला पुण्य घडेल.

**मानाजी**०–नको नको. मीं त्या पुण्याला इतका भुकेला नाहीं. अरे चोरा दगलबाजा, जमीन धरलीस ह्मणून आतां लाडीगोडी चालिवलीस. तूं पाणी मागतोस पण पाणी या ठिकाणीं नाहीं. परंतु इच्छा असल्यास गाईचें मूत तुझ्या घशांत ओततों, ह्मणजे तहान भागून तुला पुण्यहि लागेल. ( उधोजी पडला असतां लोळत येऊन मानाजीचे पायावर पुन्हां वार करितो. मानाजी मेलोंरे मेलों असें ह्मणत खालीं पडतो व उधोजी पाणी-पाणी असें ह्मणत प्राण सोडतो. पडदा पडतो. )

( अंक ३ रा समाप्त. )

# अंक ४ था. प्रवेश १ ला.

## स्थळ—रत्नपूर.

( प्रतापराव बिछान्यावर विवळत पडला आहे. निर्मेला पाय चेपते आहे. जवळच पद्मावती व कांहीं अंतरावर जयदेवराव बसला आहे. )

**प्रताप०**—जगदीश, जगदीश. देवा नारायणा.—अं—अं—या साधारणशा जखमेनें काय माझी ही दुर्दशा उडाली ! भरज्वानींत लढाई मध्यें कित्येक जखमा होऊन रक्ताच्या चिळकांड्या उडत, तरी त्याची पर्वा न करितां शत्रूच्या अंगावर चढ करून जाण्याला सदां सिद्ध. त्या भ्यां प्रतापरावानें साधारण चोरा मारेकऱ्यांचे मारानें बेदम होऊन बिछान्यावर कुंथत पडावेंना ? अं—प्रभो, तुझी इच्छा ! जवळ कोणीं आहे का ? बाळासाहेब आहेस का तूं ?

**पद्म०**—( तिरस्कारानें ) इथं उशापायथ्याशीं, आह्मीं धरणं धरून बसलों आहों. कां ? काय कमी पडलं ? जवळ कुणीं आहे कीं नाहीं, याची दिसून का शुद्धि नाहीं ? भारीच कौतुक तर मग त्या जिवाचं !

**जयदेव०**—बाबासाहेब, मीं आपल्या पायांजवळच बसलों आहें. कां हाक मारली ? आपल्याला काय पाहिजे होतें ? आतां कांहीं आराम वाटतोना ?

**प्रताप०**—अं— अं— कांहीं नको. बाळासाहेब.—

**जयदे०**—जी.—

**प्रताप०**—बाळा, देवानें मुलगा दिला, तर तुझ्या सारखाच द्यावा. किती तरी ही तुझी पितृभक्ति ! बाळा— अं. तूं होतास जवळ, ह्मणून मी दुःखण्यांतून निभावलों. तान्ह्या मुलाला जसें सं-

भाळतात, तशी माझी शुश्रुषा चालिवली आहेस. किती तरी तुझे उपकार !

**जयदे०**-भलतेंच. उपकार ह्मणण्याला मीं कोणीं परकी का आहें ? देवा जवळ मुलें मागतात तीं कशाकरितां ? मातोश्रीनें व आपण मला हा एवढा मनुष्यदेह दिलात, लहानाचा थोर केलात, माझ्या प्राप्तीकरितां, उपासतापास, हजारों नवस, देवधर्म केलेत, ते कशाकरितां ? वृद्धापकाळीं मीं आपल्या उपयोगीं पडावें ह्मणून. तसें जर मीं केलें नाहीं, तर माझें कर्तव्य झालें ?

**प्रताप०**-बाळा, तें सर्व खरें. पण अशीं ययाति, दशरथादिकांच्या संततीप्रमाणें संतति होणें कठीण आहे. ( मध्येंच ) ओ-ओ-अं अं-देवा-देवा-जखमेपेक्षां औषधानेंच शरिराची भारी तलखी होते. काय करूं ? अं-

**जयदेव०**-असें जर आहे तर वैद्यराजांनां आतांचे आत घेऊन येतों. बरें, पण आतां थोडीबहुत पूर्वींहून अधिक शक्ति आहेना ? तें शक्तीवरचें औषधहि आणखी एक सप्तक तरी घ्यावें, असें मला वाटतें. मग मर्जी.

**प्रताप०**-मला वाटतें, वैद्यराजांनीं शक्तीवरील औषधाची फारच उत्तम योजना केली आहे. रक्तस्राव अति झाल्यानें उठून उभें रहाण्याचें देखील सामर्थ्य नव्हतें, पण या औषधानें पूर्वीपेक्षां बळ आलें आहे. तरी या-ओं-ओं जखमेची व औषधाची आग होते ती सहन करवत नाहीं. अं-

**जयदेव०**-हा पहा मीं निघालों. ( आईस व बायकोस उद्देशून ) संभाळा बरें, मीं इतक्यांत आलों; जवळ बसून राहिलें पाहिजे. बाबासाहेब, मीं वैद्यांनां घेऊन येतों. पण विनंती इतकीच कीं, स्वस्थ बिछान्यावर पडून रहावें. विनाकारण जिवाला

त्रास करून घेतल्यानें अधिक कासाविशी होते. ( बायकोस उद्देशून ) येथून बिलकुल कोठें जातां कामां नये. मीं जातों.

( जातो )

**पद्म**०–मलाहि आतां जाऊं द्या. दोन तीन बोलावणीं येऊन गेलीं. ही मेली वरची कटकट नेहमींची आहे. " सदां मरे त्याला कोण रडे ? "

**प्रताप**०–मला एकटा येथें टाकून जाण्याचें काय अडलें आहे ? ( मध्येंच ) ओ– ओ– जखमेची आग–आग. आतां काय करूं ? देवा–देवा–बाळासाहेब अद्याप आला नाहीं का ?

**पद्म**०–मला हीं असलीं सोंगं खपत नाहींत. जगामध्यें दुखणेकरी पुष्कळ असतात. जों जों जपावं तों तों अधिकाधिक. जसं सहा महिन्यांचं मूल. इश्श !

**प्रताप**०–अग वैरिणी, अशी मला लावून बोलूं नकोस. अग " परदुःख शीतळ असतें. " हेंच दुःखणें तुला असतें तर मग पाहिलें असतें.

**पद्म**०–ही का आणखी इच्छा आहे ? ( दांत खाऊन ) लागली तोंडाला–हळद. याच गुणानं अशी दशा झाली. दुसऱ्यांन काय म्हणून भलतं बोलावं ?

**प्रताप**०–चुकलों. चुकलों. अशी कां मला प्रत्येक गोष्टीला शिक्षा लावतेस ? मीं चुकलों. शरिराची तळमळ होते अं–देवा–कसें करूं ?

**पद्म**०–निर्मले, जा बाई, बाहेर जाऊन पाहून ये. तुझा नवरा आला नसला तर दुसरं कोणीं मनुष्य पाठीव. ( निर्मला जाते. )

**प्रताप**०–ती बिचारी माझे पाय चेपीत बसली होती, तिला कशाला उठिवलीस ? बरें, तूं क्षणभर पाय चेप.

**पद्म**०–मीं नाहीं, त्या पायांनां शिवायची दिखील नाहीं.

" तूं पाय चेप, " ती कां ? गडी मनुष्यं सगळीं मेलीं का ? एवढंच आतां उरलं आहे.

**प्रताप०**-बरें, मर्जी. थोडेंसें पाणी तरी मिळेल का ? हें जखमेचें औषध धुऊन टाकतों.

**पद्म०**-( उदकपात्र मोठ्यानें आपटून ) हां-हें पाणी.

**प्रता०**-अलिकडे कर, मला उठवत नाहीं.

**पद्म०**-( पायानें पात्र जवळ करून ) आयतं मिळूं लागलं ह्मणजे सगळं आठवतं. इतकं अडून बसणं नडेल हें.

**प्रता०**-चालूं दे. एक शब्दहि रिकामा जाऊं देऊं नकोस.

**पद्म०**-आपले गुण कुठं चांगले आहेत ? जशास तसं.

**प्रता०**-असें कां बरें सरकार ? कांहीं तरी मला सुख दे. ( सावकाश उठून तिच्या खांद्यावर हात टेंकावयास झेंपावतो. ती हात झाडून दूर होते. प्रतापराव खालीं पडून पुन्हां कुंथत उठतो. ) " देवा देवा ! प्रारब्ध ! " ( असें ह्मणून जखम धुऊन बिछान्यावर पडतो. )

**पद्म०**-( आपल्याशीं ) जशी काय केवळ मदनमूर्ति ! पाण्यावर शेवाळ माजतं तसं तोंडावर केसांचं जाळं पसरलं आहे. डोळे पिची-पिची-भरले आहेत. लाळ काय गळते आहे. नाक तर कायग बाई-ओ-अक्षय गळत असतं. अंगाच्या घाणीनं तर जवळ सुद्धां बसवत नाहीं. ( जाऊं लागते )

**प्रताप०**-कुठें निघालीस ? पाय चेपणें जर तुझ्या मानाल पुरवत नाहीं तर नाहीं; पण जवळ तरी बैस.

**पद्म०**-मीं काय ह्मणतें, हें आपल्या मानाला नाहीं का पुरवत ? इतका नको थोरपणा; विचारते आहें, इतका तरी मान पाहिजे तर राखावा.

**प्रता०**-अग कसला मान नी कसला अपमान ! अलिकडे

तो मीं हिशोबच ठेविला नाहीं. " मीं जातें मीं जातें " ह्मणून जी जपमाळ घेतली आहेस, ती तूं निघालीस कोठें. अशी काय लग्न घटिका तुजनिमित्य नडली आहे ?

**पद्म०**—कुठं ह्मणजे राजवाड्यांत. राणीसाहेबांचीं दोन तीन बोलावणीं येऊन गेलीं. मीं जर त्यांच्या हांकेसरशीं गेलें नाहीं, तर त्या काय ह्मणतील ? " सकट घोडे बारा टक्के " असं करून कसं होईल ?

**प्रता०**—तें सर्व खरें. पण एक दिवस गेली नाहींस तरी चालेल.

**पद्म०**—तें कांहीं नाहीं. मला गेलेंच पाहिजे. वाड्यांत ह्मणे कोणी थोर साधू आले आहेत, त्यांच्या दर्शनाकरितां बारा बारा कोसांवरून लोक येत आहेत. बायका, मुलं, ह्मातारींकोतारीं, सर्वच त्यांच्या भेटीला जातात. नगरांत ग बाई जशी यात्रा चालली आहे. कायग बाई त्यांचा महिमा लोक सांगतात ! मनांत जी इच्छा करावी ती पूर्ण होते. कां नाहीं होणार ? सामर्थ्यच तसं ! बारा वर्षे झालीं, ह्मणे अन्नाचा कसला तो विटाळ नाहीं. संधेच्या पळीभर देवाचं तीर्थ मात्र घेतात. अशा जर साधूंचं दर्शन घ्यायचं नाहीं तर काय मेलं या संसारांतच कुजत पडायचं ?

**प्रता०**—असें असेल तर लवकर जा. पण त्या निर्मलेला पाठवून दे. ती जवळ असली ह्मणजे मला कोणाचीच जरूर नाहीं, पण लवकर परत ये.

**पद्मलो०**—जाण्याचे आधीं येण्याचीच का घाई ? वाः मला वाटेल तेव्हां येईन. अबब ! केवढा हा हुकूम !

**प्रता०**—तरी उत्तम.—चला चला. डोळ्यापुढें उभी राहूं नकोस. ( प० जाते. ) काय करावें ? अगदीं मला बोलूं देखील देत नाहीं. स्त्रीवांचून आपले दिवस जाणार नाहींत व भलतेंच

करावें लागेल, असें समजून पुन्हां लग्न केलें; पण ही बुजऱ्याशिंगीप्रमाणें करते. ती इतकी मला टाकून बोलते, पण ही नकोशी वाटत नाहीं. अलिकडे हें शक्तीवरचें औषध घेऊं लागल्यापासून मन फारच व्यग्र होतें. त्यापुढें ही जखमेची व्याधि कांहींच वाटत नाहीं. असो. हें चालूं पौष्टिक औषधच आधीं पुरें करूं; आणि आतां खाणेंपिणेंहि बेताचें ठेवलें पाहिजे. एखादे वेळीं स्मरण झालें—ह्मणजे देहभान विसरून जातें. तशा स्थितींत कांहीं कमजास्त झालें तर—राजेलोक चार चार लग्नें करितात, व साधूंनां एकहि स्त्री लागत नाहीं; पण त्याच साधूला गृहस्थाचे घरीं मिष्टान्न भोजनाची पुडी मिळूं लागली कीं साधु भ्रष्ट होतो. अं—अं—क्षणभर कोठें फेरफटका करून यावें ह्मणजे—याचें विस्मरण होईल ह्मणावें तर या दुखापतीमुळें बाहेर जाववत नाहीं. आह्मांसारख्या व्यवसायी लोकांनां रिकामपण सर्व प्रकारें शत्रु आहे. वहातें पाणी पुष्कळ दिवस अडवून ठेवलें ह्मणजे तें खराब होऊन त्याचा प्रवाह भलत्याच मार्गानें होतो; तसा अविचार न होवो हेंच देवा तुजपाशीं मागणें आहे. ( पडदा पडतो ) ( पद्मावती येते. )

पद्म०—( आपल्याशीं ) आतांशा पहातें, तों एकेक चमत्कारच दृष्टीस पडतो. "माझी निर्मला, माझी निर्मला, ती मजपाशीं असली ह्मणजे मला दुसऱ्या कोणाची जरूर नाहीं." तशी तीहि आपली सदां न कदां डोकं धरून बसलेली—तरीच—आतांशा पूर्वीप्रमाणें मजशीं लाडीगोडी दिसत नाहीं ( नवऱ्याची. ) कशाला असणार आहे! एक मिळाली झालं काम. अग वाः निर्मले, धन्य बाई तुझी! हीं मेलीं असलीं दिसण्यांत साधीं दिसणारीं माणसं मोठी लबाड असतात. खचित, ह्माताऱ्याचं नी निर्मलेचं कांहीं तरी सूत आहे. पण हें जमलं कसं, नी कधीं? हां—आलं

लक्षांत. हे पाय चेपित बसण्याचे प्रताप! रात्र नाहीं दिवस नाहीं अष्टौप्रहर पाय कसले चेपते? आपल्या कर्माचे? उघडच आहे. चार चार महिन्यांत झाताऱ्याला, मीं आपल्या अंगाला हात दिखील लावूं देत नाहीं. आधींच पुरुषाची जात उतावळि. त्यांत ही गोरी गोमटी तरणी ताठी पोर नेहमीं जवळ. झालं.-विस्तवापाशीं लोणी, मग काय विचारतां! काय बरं यांत मर्म असेल? कां उगीच आपला मला हा संशय? होय संशय नाहीं तर काय? नक्षत्रासारखा नवरा, तो सोडून या थेरड्याच्या तोंडाला ती कशाला आग लावायला जाणार आहे? (विचार करून) पण तें कांहीं असो. तिचा भलेपणा मला काय करायचा आहे? पुढं मागं, "कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ" तशी हीच मेली निर्मला मला बाधक होईल. तर हा संशय खरा करून तिचा घरांतून पाय काढावा. (आनंदानें) अहाहा-निर्मलेचा नवरा जितका शहाणा तितकाच संशयी असून देवभोळा आहे. त्याला ही खोटी गोष्ट खरी करून दाखवावी. पुष्कळ दिवस माझ्या मनांत आहे कीं, या मेल्या जोडप्यांत बिघाड कसा येईल? तर तो असा आणला पाहिजे; हीच गोष्ट खरी-कशाहि रीतीनं ही गोष्ट बाळासाहेबांच्या मनांत भरवून दिली पाहिजे. आणखी तेंहि याच संधींत दोघांत वाकडं आलं, ह्मणजे निर्मला या घराला अंतरली. पुढं बाळासाहेब सुद्धां अब्रूच्या लाजेनं देशांतरावर काळं करील मग- (हंसून) मग आपलंच राज्य. नवराबायकोमध्यें जर वांकडं आणायचं तर हजार उपायांमध्यें हाच उपाय. (रागानें) अरे, मेल्या जयदेवराया, माझ्या सारखी सुंदर बायको आपण होऊन तुला राजी झाली, तर तिचा अपमान करून थोरपणा मिरवितोस? दमधर तुझ्या जन्माचंच वाटोळं करतें. मोठा मेला शुकाचा अवतार. भद्रकपाळ्या, तुझ्या नशिबींच जर नसेल तर

कसं घडेल ? ( वेडावून ) “आपण मला मातोश्रीप्रमाणं मग मीं असं पाप कसं करूं ?” हा मेला जिवंत असे तोंपर्यंत मला तोंड वर करून बोलण्याला जागाच नाहीं; तर यालाच नाहींसा करावा. ( सचिंत ) पण हें घडावं कसं ? मीं आपल्या कडून कंबर बांधली, जाळं पसरलं, आतां शिकार कशी साधेल ? त्यांतून मीं पडलें सावत्र सासू. दुसरं—कानफाटी; ती दिखील प्रत्यक्ष जयदेवरावा जवळ, नी हेंच मला शेंवटपर्यंत नडणार. मोठा मेला सत्य अवतारी. आजच्या काळांत गांवोगांव कुठें नाहीं कुठें या गोष्टी आहेतच. धारपूर ह्मणून कायसं ह्मणे एक शहर आहे; तिथं प्रत्यक्ष आपल्या लेंकीशीं एकाची प्रीति जमली होती. तसंच जंबुकपूर नगरांत आईशीं लेकाची सोबत होती, ही गोष्ट लहानापासून तिथल्या राजापर्यंत माहीत आहे. हेंचसं काय ? अशा शेंकडों गोष्टी घडत असलेल्या नी घडलेल्या सगळ्या दुनियेला ठाऊक आहेत; तर त्याची कसली चोरी ? मीं तर काय, कशास कांहीं थांग ! सावत्र आई. मगरे मेल्या, कशाला तें कानांत तुळशीपत्र ? बरं मेल्या पहा आतां. एवढं बोट सांपडलं कीं, हात गिळणारी ही बायको आहे. डोळ्यांत तेल घालून बसतें. मोहरीचा मेरू नी पराचा कावळा करून दाखिवला पाहिजे; ह्मणजे झालं माझं काम. आजपर्यंत ही युक्ति माझे लक्षांत आली नाहीं. मेल्या जयदेवराया—( अकस्मात् जयदेवराव येतो. )

**जयदेव०**—काय हुकूम आईसाहेब ? राग कशाकरितां ? मजकडून काय अपराध झाला ? ( जयदेवरावास पाहून खजील होते. )

**पद्मलो०**—( ओंठास बोट लावून ) अरे माझ्या कर्मा ! ( आपल्याशीं ) आतां बोलणं फिरवलं पाहिजे. ( स्फुंदत ) काय सांगूं माझं कपाळ ! माझंच दैवं खोटं. यापेक्षां मरण आलं तर सर्वांनां सुख होईल. ( रडूं लागते )

**जयदेव**०–अरे राम राम ! आईसाहेब, हें काय भलतेंच ! इतकं दुःख कशाकरितां व त्याचें कारण काय ?

**पद्मलो**०–( पूर्ववत् शोकानेंच ) मीं सांगितलंना–कीं मींच दैवहीन; माझ्यामुळं सर्वांनां दुःख होतं आहे.

**जयदेव**०–आईसाहेब, पायांपाशीं विनंती आहे कीं, आपण रडूं नका व दुःखाच कारण सांगा. एक माझे बाबासाहेब खेरीज करून दुसरा कोणी आपल्या दुःखाला कारण झाला असेल, तर तो कसाहि पंचहत्यारी असला तरी त्याची खोड तोडीन.

**पद्मलो**०–( अधिकाधिक रडूं आल्याचा भाव करून ) मीं नाहीं त्या बिचारीचं नांव सांगायची. तिच्याकडे काय अपराध ? जसं माझं कर्म तशी लोकांनां बुद्धि होते. सांगूंच लागलें तर-पुष्कळ आहे.

**जयदे**०–सांगा सांगा. जें असेल तें सर्व सांगा; पण आधीं रडें आटपा. पहा मीं आपली शपथ घातली आहे.

**पद्मलो**०–( कांहीं शांत होऊन ) आतां शपथेमुळं माझा उपाय थकला. बाळासाहेब. ( पुन्हां रडूं लागते )

**जयदे**०–हां, पुन्हां तेंच. पहा शपथ मोडल्यास मीं मरून जाईन.

**पद्मलो**०–मीं स्वस्थ होतें. पण कारण सांगायची नाहीं.

**जयदे**०–कारण सांगितलें नाहीं तरीहि माझी शपथ.

**पद्मलो**०–नका नका. बाळा साहेब, तुह्मीं आपली शपथ वालूं नका. चारी वेळा सारख्या असत नाहींत. बाळा, तसं जर कांहीं झालं ( अकस्मात् हंबरडा फोडल्याप्रमाणें ) तर मग बाळा, आह्मांला तुझ्यावांचून पाणी देणारा कोण आहे ?

**जयदे**०–तें कसेंहि असो. पण दुःखाचें कारण आधीं सांगा.

**पद्मलो०**—तुमचा फारच आग्रह आहे, तेव्हां माझा निरुपाय झाला; पण हें कोणच्या थरावर जाईल याची भीति वाटते.

**जयदे०**—कांहीं असो. कारण समजलेंच पाहिजे.

**पद्मलो०**—मघां तुह्मीं वैद्याकडे गेला. लागलीच मींहि वाड्यांत जाण्याकरितां निघालें. पुन्हां मनाला वाटलं, त्यांनां दुखणेकरी एकटे टाकून कशी जाऊं! तशीच तुझी बायको बिचारी सारावेळ जवळ तिष्ठत बसते, तिलाहि क्षणभर विसावा मिळेल ह्मणून परत आलें. आपला जीव दुसऱ्याकरितां कावरा बावरा होतो.

**जयदे०**—( गडबडीनें ) तें असो. तुमच्या दुःखाचं मला कारण समजूं दे.

**पद्म०**—हो हो सांगतें पण, मीं जों आलें तों तुझी बायको नी इकडून ( नवरा ) कुजबुजत बसलेलीं पाहिलीं.

**जयदे०**—इतकेंचना ? बसेनात.

**पद्म०**—माझ्या संबंधानं चर्चा चालली होती. आणखी ह्मणत काय, "माझं नी तुमचं ह्मणे एक मन. आह्मीं दोघ मिळून त्यांनां शिव्या देतों." ह्मणून तुझी बायको नी वरांतून, आह्मां दोघांनां सारख्या शिव्या चाललेल्या होत्या. सांगा बरं, काय आमचं त्यांच्या विरुद्ध एक अक्षर तरी ? तुह्मीं माझा मान राखतां, माझा रात्रंदिवस समाचार घेतां, कांहीं लागलं सवरलं तर आणून देतां, ह्मणून तुमच्याकडे माझा जीव ओढतो. ( शोकानें ) ह्मणून का यांनीं मला असं भलतं बोलावं ?

**जयदे०**—( हंसून ) हात् तिच्यारे, इतकेंचना ? आईसाहेब, आपल्याला सांगतों, बायका किती शहाण्या असल्या तरी त्यांचा समज थोडासा वेडगळपणाचा असतो. बाबा साहेबांनीं आपल्याला किंवा मला शिव्या दिल्या, हा तुह्मांला उगाच संशय आहे. जरी आह्मीं कांहीं त्यांच्या मर्जीविरुद्ध वागलों नाहीं, तरी मनुष्य

दुखण्याचे त्रासानें एखादे वेळीं कमजास्त बोलतें. तें आपण लक्षांत आणतां कामां नये. वडिलांनीं रागाचे भरांत जरी शिव्या दिल्या, तरी त्यांत त्यांचा हेतु वावगा नसतो. आपल्या मनुष्याचं अनहित व्हावें, अशी गोष्ट त्यांचे स्वप्नांतहि येणें नाहीं. बस्स. हेंच तत्व आपण लक्षांत वागवावें.

पद्मलो०-( मनाशीं ) यानं तर उलटी मलाच मूर्ख ठरवली. तर यावेळीं इतकंच राहूं द्या. ( उघड ) मीं मजकरितां इतकी कष्टी होत नाहीं, तुह्मांला मजनिमित्त बोल.

जयदे०-बरें, आपली स्वारी इतक्या गडबडीनें कोठें निघाली ?

पद्मलो०-वाड्यांत. राणीसरकाराकडून दोनचार बोलावणीं आलीं.

जयदे०-मलाहि साधूमहाराजांचें दर्शनाकरितां तिकडे यावयाचें आहे.

पद्मलो०-( मनाशीं ) हा मेला कशाला मजबरोबर ! मीं चाललें आहें माझ्या नाजुक कामाला. ( उघड ) चला तर. नाहीं तर मीं पुढं होतें. तिथं पुरुषांची दाटी झाली ह्मणजे मग आम्हां बायकांनां दर्शनाची अडचण होते.

जयदेव-हरकत नाहीं. मीं जवळ असतां दर्शनाविषयीं काळजी नको. बरें, पण बाबासाहेबाजवळ कोण आहे ?

पद्मलो०-मग इतका वेळ सांगितलं तें काय ? दोघांमध्यें तिसरं मनुष्य खपत नाहीं. मीं दूर असावं, असं तुझ्या बायकोच्या मनांत.

जयदेव-ह्मणजे ? याचा अर्थ ?

पद्मलो०-तें तसंच कांहीं गूढ आहे नी तें मला बोलून दाखवितां येत नाहीं. ( शोकानें ) कारण मींच सर्वस्वी खोटी,

असा तुह्मां सर्वांचा ग्रह झाला आहे. अग बाई, त्या दिवशीं काय माझ्या अंगांत भूत शिरलं होतं, तें ईश्वराला माहीत. प्राण गेला तरी तसं पापकर्म करणारी मीं बायको नव्हे. पण बोलून उपयोग काय ? त्यामुळं माझी मींच लज्जेनं मेल्यापेक्षां पलिकडे होतें, नी हें काळं तोंड तुह्मांला दाखवायला जिवंत राहिलें. देवा, या पापिणीचे डोळे झांक एकदां.

**जयदेव**–छे छे. आईसाहेब. ईश्वर साक्ष, ती गोष्ट मीं मनांत ठेवली नाहीं. असो चला आपण समक्षच जाऊन काय तें पाहूं.

## अंक ४ था. प्रवेश २ रा,

( प्रतापराव निजला आहे निर्मला पाय चेपित बसली आहे. )

**प्रताप०**–निर्मले काय सांगूं ? तुजकडे पाहिलं ह्मणजे तुझी मला फार दया येते. माझ्या साठीं तुला चईन नाहीं. बस्स, वरकड पाहूं गेलें तर सर्वच यथातथा. तिनें ( स्त्री ) तर माझी दरकारच राखली नाहीं. मला वाटतें कीं, तिनें दिवसांतून क्षणभर तरी माझी सेवाचाकरी करून मला थोडें सुख द्यावें; पण तें आमचे नशिबीं नाहीं. तूं होतीस ह्मणून या दुखण्यांत माझा निभाव लागला. असो देव कोणाकडून तरी कोणाला सुख देतो. होयना ? कां ? बोलत नाहींस ?

**निर्मला**–मीं काय बोलूं ? मला काय समजतं ? वडील माणसांची होण्याजोगी जी सेवाचाकरी करण्याची रीत आहे ती करावी. यांत अधिक तें काय बोलूं ? मला अडाणीला दुसरं काय समजणार ?

**प्रताप०**–( हसून ) हं. हं.–सर्व तुला कळतें. कदाचित् लाज वाटत असेल, ही गोष्ट कबूल आहे-बरें, आतां पाय चेपणें पुरे कर. ये अशी अलिकडे–तुझे हात दुखत असतील. ये ये, अशी लाजूं नकोस. बायकांनां बुवा भारीच लाज!

**निर्मला**–मीं इथं बसलें आहे ती ठीक आहे. माझ्या योग्यतेनं मीं असावं, तरच वडलांचा मान; नाहींतर आपणच मनांत काय ह्मणाल ?

**प्रताप०**–तें खरें. पण विनाकारण मनुष्याला छळणें, आपणाजवळ बसवून न घेणें, नेहमीं त्यांचे कडून कष्ट करविणें, ह्या वेड्या समजुती आहेत. तुह्मीं परक्याच्या मुली. तुह्मांला आह्मीं आणल्या, तर होईल त्या रीतीनें होईल तितकें तुह्मांला सुख द्यावें. पण काय करावें, तशाच कांहीं अडचणी येतात, त्या बोलूनहि दाखवितां येत नाहींत.

**निर्मला**–हें काय ? अडचणी कसल्या, नी मला दुःख तरी कसलं ? चाललं आहे इतकं जर दैवानं चाललं तर माझ्या सारखी भाग्यवान कोण आहे ?

**प्रताप०**–अग अडचणी व दुःख नाहीं ह्मणतेस, पण तें आमचें आह्मांला सर्व कळतें. काय करावें या पोराला ? बोलण्याची देखील चोरी. न बोलावें तर झुरणीला लागत चाललीस. या दिवसांत तुह्मीं कसें आनंदांत असावें. अगे, बायकांन वेळीं खाण्यापिण्याला जरी कमी पडलें, तरी तें त्यांनां पुरवतें; पण या वयांत तुह्मांला नवऱ्याचें सुख पाहिजे. काय करावें या बाळासाहेबाला ( पुत्राला ) तूं त्याची बायको, तुझी त्यानें विचारपूस करावी, तें कांहीं नाहीं. पोराचें चिन्ह मला कांहीं बरें दिसत नाहीं.

**निर्मला**-आपलं मनुष्य चांगलं असलं तरी वडिलांनां असंच ह्मणावं लागतं.

**प्रताप०**-बुढ्या आपल्या मनुष्याला वाईट असें ह्मणावयाचें कारण नाहीं. या वयांत तुह्मीं उभयतांनीं कसें मिळून मिसळून आनंदानें राहून संसारसुख अनुभवावें.

**निर्मला**-आपल्या मुलानं पुष्कळ खावं, प्यावं, दागदागिने घालावे, असं थोरांनां वाटत असतच.

**प्रताप०**-छेः ग. अशा वाटण्यापैकीं माझें बोलणें नव्हे, त्याचें लक्षणच मला कांहींसें-निराळें दिसतें. ही आपली बायको असें ह्मणण्याचें त्याला कांहीं कळत नाहीं. परवां मीं त्याला सहज ह्मटलें-अरे, ही तुझी बायको दिवसेंदिवस झुरणीला लागत चालली, हिची तूं कांहीं विचारपूस करित नाहींस असें कां?-तर काय ह्मणतो-"मीं काय तिची विचारपूस करावयाची? आपण आहांतना; तिला काय कमी पडेल तें पुरवितांच. झालें तर, मीं आणखीं काय करावयाचें?" असें त्यानें उत्तर दिलें. व्यर्थ बुडालीस. असो, त्यानें जर असें उत्तर केलें व तुझी त्याला कशाहि संबंधानें जरूरी नाहीं, तर मला तुझी हौस पुरविली पाहिजे-होयना? नाहीं तर आह्मीं जावें बरें करण्याकरितां व तुह्मीं जर तें मनास आणलें नाहीं व भलताच हट्ट केला तर-तसें तूं करणार नाहींस ह्मणा; तूं शहाणी आहेस, तुला सर्व कांहीं समजतें. आतां आरंभींच ह्मटलें ह्मणजे थोडीशी लाज वाटणें साहजिक आहे.

**निर्मला**-( आपल्याशीं ) नशीब माझं! असो. आतां इथं बसण्यांत कांहीं थोरपणा नाहीं. ( उघड ) वडील आहांत त्याअर्थी बोलाल तें शोभणार आहे, असो. माझी आंग धुवून तुळशीला जाण्याची वेळ झाली तर मला जाऊं द्या-

**प्रताप**०-माझें बोलणें तुला जर समजलें आहे, तर मग आधीं अंग धुण्याची घाई कशाकरितां ? ये, ये, लाजूं नकोस. ( तिला धरूं जातो ती दूर होते )

**निर्मला**-मला असलं कोणाचं बोलणं समजत नाहीं, नी तें समजून घेणंहि नको आहे.

**प्रताप**०-भिऊं नकोस. एकदां मीं तुला आपली अशी ह्मणवली, तर भिण्याचें कारणच उरलें नाहीं. हें पहा, एक तुला माहीत किंवा मला. बस्स हें वचन.

**निर्मला**-( कांहींसें रागानें ) मामंजी, आपलं बोलणं मीं केव्हांची समजून आहें, नी याचा जबाबहि दिला असता; परंतु मीं कोण, आपण कोण, हें लक्षांत घेतलं ह्मणजे तोंडाला खीळ घालावी लागते.

**प्रताप**०-घरच्या सर्व मनुष्यांनींच जर मला असें झिडकारिलें तर कसें बरें ? तुजवर माझें व मजवर तुझें जें गुप्त प्रेम आजवर होतें, तें उघड होऊं दे. ये-त्याला काय होतें ?

( तीस धरतो व ती पुन्हां त्यास धिःकारून दूर होते )

**निर्मला**-( रागानें ) मामंजी पुरे करा. कांहीं लाज धरा. सुने सासऱ्याची मर्यादा पुष्कळ झाली. पुन्हां जर असलं भाषण काढलंत, किंवा अंगाशीं झोंबी घेतलीत, तर जीभ हांसडून पायांशीं प्राण देईन. वहावा हो वहावा ! सून ह्मटली ह्मणजे लेंकी सारखी, नी तिच्याशीं हा लघळपणा ! (कांहीं शोकानें) त्यांचा (नवऱ्याचा) स्वभाव भोळसर पाहिलात, ह्मणून का ही अशी मांगाची करणी ! सासूबाईचं पोट पिकलं ह्मणून मीं तुमच्या घरीं पडलें. आपल्या पदरीं पडल्या मनुष्याशीं ही का तुमची वागणूक ! या करतांच का मुलांचीं लग्न करावयाचीं ! वाः- अग बाई ! ! ! बरोबरीचीं मुलं झालीं, हे नातू पहाण्याचे दिवस. आतां जर अशी लाज

सोडली, तर मग तरण्याताम्यांनीं आपल्या आईबहिणी दिखील ओळखूं नयेत. मग झालं. जनावरं काय नी माणसं काय, कुठंहि तोंड घालायचं. म्हाताऱ्या, तुझीं लांकडं गेलीं स्मशानांत, जाग्याचं उठवत नाहीं. म्हातारपणीं देवाचं नांव घ्यायचं तें हें का तुमचं लक्षण ! ( सक्रोध ) अरे कसाबा–नव्या नवसानं सोन्यासारखं एक रत्न पोटीं आलं, त्याचं हेच का कल्याण इच्छिणार ? पाहूं गेलं तर तिळभर ज्याच्या मध्यें दुर्गुण दृष्टीस पडणार नाहीं, त्यांनां हीं असलीं दुषणं ! तीं कशा करतां- तर आपली पापवासना जाळण्याकरितां–चागलं, फार चांगलं करतां !

**प्रताप**०–( मनाशीं ) मिर्च्यांची धुरी देऊन- पूजा केली म्हणजे भूतबीत चट् सारें पळून जातें. तशी माझ्या मस्तकांतील मस्ती झर्रदिशीं निघून जातांच मीं शुद्धीवर आलों. ( उघड ) शाबास बाई ! माझे आई, माझे घरचे लक्ष्मि, धन्य मीं व माझा बाळासाहेब! बाळे, या तुझ्या शिव्या नव्हेत. हे आशीर्वाद आहेत. बाळे, शांत हो. ऐकून घे. मला एक दुष्ट स्वप्न पडलें होतें, त्याचा अनुभव पहाण्याकरितां मीं असें बोललों. नाहींतर असें वर्तन माझ्यानें होईल ? ( कृत्रिम रोषानें ) ज्या हरामखोरानें ही गोष्ट मला कळविली, त्याचें उदईक डोकें उडवीन तेव्हांच स्नान करीन. निर्मले, भोळीग तूं अगदीं भोळी. बाळा, आतां मला कोणाशीं काय करावयाचें आहे. ती ( स्वस्त्री ) एक माझी वैरीण आहे, तिला मीं सर्वस्वी बुडवली, याचाच मला पश्चात्ताप होत आहे. माझ्या बाळासाहेबाचे गुण जितके गावे तितके थोडे आहेत. त्याची निंदा स्वमुखानें ? छेः ! तें फक्त तुझा अदमास घेण्याकरितां. दुसरें कांहीं नाहीं. हें पशूचें कर्म माझें हातून ? शिव शिव! मुली, तूं मोठी शहाणी म्हणून मीं तुला मागें नांवाजतों. पण यावेळीं अगदीं फसलीस. होयना ? तुझीचशी गोष्ट काय ?

स्वर्गांतून विमानांत बसून एखादी अप्सरा आली, तरी ती मला लेंकी सुनेप्रमाणें आहे, मग तूं तर प्रत्यक्ष सून.—अं. अं—त्र मान करण्याची देखील शक्ति राहिली नाहीं. मग हे खेळ कशाला पाहिजेत.—ओय—ओय—ओय. दोन शब्द तुझ्याशीं जास्त बोललों, त्यामुळें जीव कासावीस झाला, बाळा मला थोडें पाणी दे. जीभ कोरडी पडली.

**निर्मला**—मामंजी, मीं खुळी भाबडी पोर. आपल्या बोलण्याचा मला कांहींच सुमार राहिला नाहीं. अगबाई! मीं चांडाळणीनं बोलूं नये तसलं बोलून वडलांचं मन दुखविलं. आपण सहजी मन पहाण्याकरितां बोललां, देवा त्याचं मीं इतकं वाढिवलंना! जळो माझी जीभ!

**प्रताप०**—( उचकी लागलीसें करून ) ओ. ओ. पा. पाणी. णी.—

**निर्मला**—अग बाई! पाणी मागितलं तें माझे ध्यानांतच नाहीं. मला आधीं जाऊन पाणी आणूं दे कसं. मग दुसरें काम. ( निर्मला जाते )

**प्रताप०**—( मनाशीं ) आरंभीं मनुष्याचे हातून एखादें नीच कर्म होतें; नंतर त्या कृत्याबद्दल पूर्ण पश्चात्ताप होऊन मनाची जी स्थिति होते व कृतकर्माविषयीं जशी तिरस्कारबुद्धि उत्पन्न होते, तोच विचार जर पूर्वीं होईल तर—प्राणीमात्राकडून असें पापकर्म फार क्वचितच घडेल. छेः, पण असें कसें व्हावें! मदनप्रताप, माया, मोहादि दुर्जय आहेत. शिव शिव शिव! श्रीमान्, बुद्धिमान्, कसाहि गुणसंपन्न मनुष्य असून तो जर कुमार्गी आहे, तर तो नालायक होतो. विशेषतः अयोग्य स्थळीं कामेच्छा बाळगणारा कवडीमोल होऊन प्राणास मुकतो. इतर त्याचे शतशः सद्गुण असले तरी त्याची धुळधाण होते. अहाहा! समुद्रांतून नि-

घालेलें विष मोठें जाज्वल्य ह्मणतात, असेल कदाचित्. व तें उत्पन्न झालें त्याच वेळीं, काय तो थोडाबहुत लोकांनां त्रास सोसावा लागला न लागला, तोंच महादेवांनीं तें पिऊन नाहींसें करून टाकलें. आतां दृष्टांतापुरतें त्याचें नांव मात्र शेष राहिलें. परंतु हें जारकर्मरूप विष जग उत्पन्न झाल्यापासून आहेच व शेवटीं हेंच जगाचा नाश करून नंतर नाहींसें होणार. याचा प्रभाव कोणावर नाहीं असें नाहीं. हें पाप थोडेंबहुत कोणी करित आले, पण मीं ज्याची इच्छा केली त्या पापाला नांवच नाहीं; व यमराजापाशींहि याची तोड करण्याला नरक नाहीं. हरि हरि हरि! कशाचा हरि नी कशाचें काय! त्यावेळीं जर आठिवला असता हरि तर गोष्ट खरी. आतां देवा देवा—ह्मटल्यानें देव ऐकणार आहे? आतां देव ह्मणतो जसें केलेंस तसें निभाव. त्यावेळीं माझें स्मरण केलें असतेंस, तर माझ्या नामस्मरणप्रभावानें सद्बुद्धि उत्पन्न होऊन हें पाप घडूं दिलें नसतें. खरेंच. आतां काय करूं तरी काय? हा कलंक कशानें जाईल? अरेरेरे, ही दुर्बुद्धि अकस्मात् मला सुचली तरी कशी? मीं मेलों कसा नाहीं? मीं अब्रू मिळविण्याकरितां आजवर किती जपलों? पण अशा वयांत शेवटीं फसलों. हाय हाय!! जशी झोंप लागण्याची वेळा कितीहि सावधगिरी ठेवण्यानें लक्षांत येत नाहीं व ती झोंपेची वेळ अमुकच होती, असें ठरीव मान सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणें ही कामाची लहर केव्हां येते तें समजून येत नाहीं व मनुष्य देहभान विसरून जातो. मना, काय हा विपरीत तमाशा करून मला फाशांत घातलेंस? अरे ( क्रोधानें ) दुष्ट मना, तूं या शरिरांत अमुक स्थळीं आहेस असें मला समजेल तर तुला बाहेर काढून तुझा चोळा मोळा पाचोळा केला असता. छेः. ( शांत होऊन ) तूं निराकार असून, योगसाधन करणाऱ्या योग्यांनांहि प्रसंगीं अजित

होतेस! मग कसपटाप्रमाणें जो मीं, त्या माझा हिशेब काय! असो. पुढें विचार कसा? हें कच्चें रसायण शरीर छिन्नाभिन्न होऊन बाहेर पडणार. मला पुष्कळ पश्चात्ताप झाला तरी झालेली कर्मकथा पुढें चालूं होणार, त्याचें निवारण? –( कांहीं वेळ विचार करून ) अं–हें असें केलें तर–असें होणार–बरें, तसें नाहीं. असें केलें तर–न जाणों– कदाचित् साधेलहि; परंतु भलत्याच मनुष्यावर त्याच गोष्टीचा आरोप. अं-हं. तसें केल्यावांचून परिणामच नाहीं. त्यानें ( मुलानें ) जर या बाबतींत मला प्रश्न केला तर उत्तर काय द्यावें! बरें, मीं कबूल झालों नाहीं तर माझी नाकबुली तो कां ऐकेल? "सबब सावाचे आधीं चोराची बोंब" असेंच केलें पाहिजे. ( निर्मला पाणी घेऊन येते )

**निर्मला**–हें पाणी आणलं आहे.

**प्रताप०**–आण इकडे ( पाणी पिऊन ) बरें जा आतां तूं आपल्या कामाला. मीं क्षणभर आडवा होतों ( निर्मला जाऊं लागते तीस पुन्हां बोलावून ) मघाशीं सांगितल्याप्रमाणें झाल्या गोष्टीबद्दल माझा किंचित्‌हि रोष नाहीं. तूं अगदीं भिऊं नकोस; पण माझेंहि तुला सांगणें आहे कीं, तूं देखील कोणापाशीं उच्चार करूं नकोस. माझेकडून तर मीं तुला कळविलेंच आहे. हें पहा तुला जास्त काय सांगूं? मला माझ्या जयदेवरावापेक्षां या जगांत कांहीं अधिक नाहीं; त्याची शपथ वाहून सांगतों कीं, तुजसंबंधानें माझें मनांत किंचित्‌हि कपट नाहीं व ही गोष्ट मीं कोणापाशीं बोलावयाचा नाहीं. घे तर याप्रमाणें तूंहि शपथ घे. नाहीं. तर एक करितां एक होईल. अशा गोष्टींचे संशयानेंच मोठमोठे अनर्थ होतात.

**निर्मला०**–मींहि शपथ घेऊन सांगतें कीं, एक अवाक्षरहि ओंठाबाहेर निघणार नाहीं. ( इतक्यांत पद्मलोचना व जयदे-

वराव येतात. पद्मलोचना जयदेवरावास त्यांचें भाषण ऐकण्यावि-षयीं खुणावते. त्यांचें भाषण ऐकत राहतो ) आपण शपथ घेत-तली आहे, तेव्हां पुन्हां सांगण्याचें कारण नाहीं; पण ( शोकानें ) मला भीति वाटते. त्याबद्दल तिकडे कळतां उपयोगी नाहीं. हें जर त्यांनां समजलं तर मीं जिवंत राहणार नाहीं. अगबाई ! कशी मीं लाज सोडली; सून सासरे, हें नातं मीं कशी विसरलें ! मीं पुन्हां आपणापाशीं असं कधीं बोलणार नाहीं.

**प्रताप०**—बरें, झालें तें झालें. तूं कां भितेस ? जा आपल्या कामाला. ( निर्मला जाते )

**पद्मलो०**—( जयदेवरावास उद्देशून ) ही गोष्ट होतां होईल तों छपवावी असं माझ्या मनांत होतं; पण असलीं कर्में देवाला कशीं सहन होतील ? पाप कधीं फार दिवस छपत नाहीं. आपो-आप बाहेर पडतं. असो. देवानं माझं गाऱ्हाणं ऐकलं. (शोकानें) काय सांगूं जयदेवराव, बायकांनां अब्रू ही कितीशी लागते ? या पंचाइतीमुळं मला दोन्हींकडून मरण असं झालं होतं. हें पाप तुमचे जवळ सांगावं तर तुमचा स्वभाव आहे रागीट. त्या मे-ल्या रागाला डोळे नसतात. तुह्मीं जर कांहीं भलतं सलतं केलंत तर मीं ही गोष्ट कळविल्याबद्दल लोक मला नांवं ठेवणार. न बो-लावं, नी पुढं मागं तुह्मांला समजलं ह्मणजे मीं हें प्रकरण चोरून ठेवलं, नी मींहि त्यांनां सामील आहें, असं तुह्माला वाटून माझाहि तुह्मांला राग येणार. आतां प्रत्यक्षच सर्व झालं; पण एक सांगतें-तुह्मीं तिकडं लक्ष न द्याल तर बरं. पुरषांनां बायकांचे सर्व अप-राध सोसतां येतील, परंतु हा अपराध कोणाला सहन होणारा नव्हे. पण करणार काय ? नशिबीं आलं तें सोसलं पाहिजे.

**जयदेव०**—आतां संशयाला जागाच नाहीं. आईसाहेब, आ-

पल्या बोलण्यावरून मला असें वाटतें कीं, हा प्रकार बरेंच दिवसांपासून चालू असून, तो तुह्मांला माहीत असतां मला कळविला नाहींत. छपवून ठेवण्याच्या गोष्टी दुसऱ्या पुष्कळ आहेत. त्यापैकीं हें कृत्य नव्हे. बरें, बाबासाहेबांना भेटूं चला. नंतर या गोष्टीचा विचार करितां येईल. तोंपावेतों मींहि स्वस्थच होतों.

**पद्मलो०**—बाळा साहेब, तुह्मीं ह्मणतां तें सारं खरं. पण आपण धड असावं, नी मग लोकांचं उणं काढावं. चुकून ह्मणा अगर कसंहि ह्मणा. अगबाई ! ( शोकानें ) काय मला भूतबाधा झाली होती ती असो. बाळासाहेब खरंच सांगतें, प्राण गेला तरी जें कर्म माझ्याच्यानं होणार नाहीं, तें मीं करण्याला कशी धजावलें, याचं माझं मला आश्चर्य वाटतं. काय सांगूं तुह्मांला? नाहींतर ह्मणाल बिचारी करून सवरून थोरपणा सांगते. काय ह्मणाल तें ह्मण। आलं ओघाला तें सांगतें. एक दिवशीं तुह्मीं सर्व बाहेर गेला होतां, अशी संधी राखून तो मेला सुभानराव आला, नी त्यानं काय जें केलं आहेन, तें सांगतां येत नाहीं. मेल्यानं माझ्या प्राणापर्यंत पाळी आणलीन; पण छेः—असलं कर्म करण्यापेक्षां मेलं तरी चिंता नाहीं; असा निग्रह करून ती वेळ कशी टाळली हें माझं मला माहीत. तिकडून ( नवरा ) दिखील याबद्दल मला नांवाजणं होतं. ह्मणतात, "इतर गुण कसेंहि असोत; पण एक—बळकट—आहे. खरंच सांगतें बाळासाहेब, बायकांनीं कांहीं जरी दुर्गुण केले तरी चालतील, पण येवढी गोष्ट करितां कामां नये. ह्मणून मीं बुद्धयाच तुह्मांला कळवणार होतें. सगळं खरं--पण मीं स्वतः कानफाटी. त्यांतून सासू. तीहि सावत्र. मग माझं बोलणं खरं कसं वाटावं ? ह्मणून बोललें नाहीं.

**जयदेव०**—सुभानरावासंबंधी सर्व मजकूर मला माहीत आहे; व त्याच वेळीं तुमची योग्यता मला पूर्णपणें समजून

आली; ह्मणून माझा तुमचेवर विश्वास आहे, व मजशीं चुकून घडल्या गोष्टीबद्दल मीं तुह्मांला दोष देत नाहीं.

( इतक्यांत एक नोकर येतो त्यास पाहून )

**पद्मलो०**—कां रे, पुन्हां कां आलास ?

**नोकर**—राणीसाबांनीं आपनासनी हटकलया. बिगीदीन घेऊनशेनी ये म्हंटलया.

**पद्मलो०**—चल आलें. पुढें हो. (बाळा साहेबास) बरं, आतां मला गेलंच पाहिजे. राणी साहेबांकडून हें सातवं बोलावणं. मला त्या काय बरं ह्मणतील ?

**जयदेव०**—चलावें आपण. मींहि तुमचे मागोमाग येतों.

**पद्मलो०**—पण संभाळाहो ! नाहीं तर मीं जातें आहें वाड्यांतनी, मागं कांहीं भलतं सलतं करून बसाल. मीं कशाला तुह्मांजवळ सांगितलं, असा मला पश्चात्ताप झाला आहे. बाळासाहेब, पुरुषांना राग येतो खरा; पण तो आंवरला पाहिजे. ( आपल्याशीं पण मोठ्यानें ) छेः ! मीं कळिवलं हेंच वाईट झालं. ( उघड ) बाळासाहेब, भिंत जशी जशी धुवावी तों तों अधिकाधिक चिखल निघतो. ह्मणून कांहीं वेळां कानाडोळा केला पाहिजे.

**जयदेव०**—असो चला आपण. जें होणार त्याला काय उपाय ? कसेंहि असो. होतां होईल तो मला आपली किंवा बाबासाहेबांची मर्जी तोडून वागणें नाहीं.

**पद्मलो०**—( मनाशीं ) आग तरी पेटती केली आहे. ( त्याजकडे पाहून ) पहा मुद्रा कशी होत चालली, विषाचा अम्मल चढत चालला. झालं माझं काम; ( उघड ) मीं जातें बरं ( निघून जाते )

**जयदेव०**—( आत्मगत ) हा काय प्रकार असावा बरें ? कांहीं असो. हें वर्तमान ऐकल्यापासून मनाची चलविचल

झाली आहे. ज्याप्रमाणें मनुष्य जन्माला आला ह्मणजे त्याला शितोष्णापासून ज्वर पित्तादिविकार दिवसांतरानें पीडा देतातच, त्याप्रमाणें संसार करणाराचे मागें ही गोष्ट केंव्हांना केंव्हां असावयाचीच कीं काय? निर्मला लहान होती, व मला थोडें थोडें समजूं लागलें, तेंव्हां मनाला असें वाटे कीं, ही थोर केंव्हां होईल व उभयतां एकत्र होऊन कधीं संसारसुखानुभव घेऊं? त्याप्रमाणें ईशकृपें तो दिवस येऊन चुकला. त्यापुढें आज हा प्रसंग आला. मीं फक्त सुखवृक्षमूलाजवळ मात्र आलों, तों अशी दशा! मग सुख लागणार तें कसचें व कधीं? मरणावर दीर्घ निद्रा घेण्याचे समयीं? ही हकीकत खरी ठरल्यास याचा मला लवकरच निकाल लाविला पाहिजे. इतरांची गोष्ट निराळी व आह्मांसारख्या दरबारी लोकांची गोष्ट वेगळी. थोरांचें दुष्कर्म लोकांत लवकरच प्रसिद्ध होतें. आह्मीं घांसभर अन्न एखादेवेळीं अधिक खाणें हा कांहीं आमचा विशेष अपराध असें नाहीं; परंतु लोक तेवढ्याच कारणानें आह्मांला राक्षसाची उपमा देऊन कुटाळकी करित बसतात. लोकांमध्यें वागणें हें तर कठीणच. त्यांतहि थोर ह्मणविणारांनां फारच सावधगिरी ठेवली पाहिजे. सामान्य लोकांचे दुर्गुणाकडे कोणी लक्ष पुरवित नाहींत; पण श्रीमान् लोकांवर सर्वांचा कटाक्ष असतो. मीं ऐकलेलें दुष्कर्म खरें असो वा खोटें असो, तें जसें विचारांतीं समजून येईल त्या सारखा त्याचा शेवट करतां येईल. पण सध्यां पहा मीं कसा गलित शक्ति झालों. पाण्यांत पडलेल्या ढेंकळासारखा विरघळून गेलों. आह्मीं थोर. कशाचे? दुःखाचे थोर. असेंच खरें. त्याहून गरिबी फार चांगली. त्यांनां दुःख असें एक फक्त दारिद्र्याचें. इतर संबंधांत ते फारसें लक्ष पुरवित नाहींत, व तशी बहुधा त्यांची स्थितिहि नसते; तसें आह्मांला करितां येत नाहीं. कारण—सत्कर्म किंवा

दुष्कर्म याचा आरंभ आह्मींच-प्रजेला जसें वळण दाखवावें तसा ते कित्ता गिरविणार-निर्मला-निर्मला! निर्मला अशी अमर्याद होईल! आजवर तसें असल्याचें कांहींच लक्षण दिसलें नाहीं. तिच्या पातिव्रत्याविषयीं तिचे वैरी साक्ष देतील असेंच तिनें आपलें वर्तन ठेविलें आहे. या कामीं माझे आईचाहि मला विश्वास नाहीं. एकंदरींत ठोकताळा पहातां त्यांचे ( मातोश्री ) विचार फारच चमत्कारिक आहेत. कोणतीहि गोष्ट एक प्रकारची असतां लोकांचे सांगण्यांत ती निराळी होऊन अनर्थ घडल्याचेंहि माझें ऐकिवांत पुष्कळ आहे. त्याअर्थीं संशयानेंच साप असें समजून दोरीला भिणें ठीक नव्हे. जेव्हां माझ्या मनाची खात्री होईल तेव्हां पहातां येईल. स्वल्प सुखानें संतुष्ट होणें व अल्प क्लेशानें तत्काळ कष्टी होणें हा क्षुद्र स्वभाव होय. पूर्ण विचारानें जें करणें तें करावें. मनुष्य जिकडे नांदावला, तिकडेच नांदावला. मीं कोणच्या कामाकरितां बाहेर पडलों होतों व केव्हां निघालों होतों, हें माझे स्मरणांतच नाहीं. बाबासाहेब तिकडे माझी वाट पहात असतील. चला चला लवकर तिकडेच जाऊं. तेथें गेल्यावर या संशयाचाहि उलगडा होईल. आपल्या सुखदुःखाविषयीं जसा आपण दक्षपणा राखतों, तद्वत आपल्या आप्तइष्ट मातापितरांविषयीं काळजी वहावी ह्मणजे त्यांनांहि तितकें अधिक अगत्य लागतें. तसेंच इतर लोकांविषयींहि दयार्द्र मन असावें, तेव्हांच आपल्या संकटसमयीं देव कोणालाहि पुढें करितो. दुसऱ्याविषयीं घस सोसणें ही सकृद्दर्शनीं नुकसानीची बाब असें वाटतें, परंतु जसा एक दाणा जमिनींत पेरल्यानें त्यापासून पुष्कळ धान्य प्राप्त होतें, तशीच ही परोपकाराची सत्कृति हितावह असून आह्मां सारख्या मूर्ख लोकांच्या लक्षांत येत नाहीं. ( जातो ) ( प्रतापराव पूर्ववत बिछान्यावर दृष्टीस पडतो )

प्रताप०–( मनाशीं ) आतां पुढें कशी गति–काय पहा नसता उपद्व्याप करून हा घोर मागें लावून घेतला. एका दुखण्याचे व्याधींतून मुक्त होतों तों ही दुसरी करून घेतली ! माझा पुण्यक्षय पूर्ण झाला. आतां विनाशकालाची कारकीर्द चालूं झाली. देवा, आजवर थोर थोर ह्मणून जो लौकिक मिळविला तो एका क्षणांत एकच अपशब्द उच्चारिल्यानें नाहींसा झाला. बाई जिव्हे, फार चांगलें केलेंस. हें सर्व तुझें चरित्र ! यांत मनाचा कांहीं दोष नाहीं. कारण कोणत्याहि कारणाला– दृष्टीचा दोष आधीं; कोणतीहि वस्तु चांगली किंवा वाईट हें दृष्टीला समजून येतें. नंतर तिचे प्राप्तिविषयीं मनाची इच्छा होते. त्यासंबंधानें पुढील भाषणाचा व्यवहार जिव्हेला करावा लागतो. मनांत शेंकडों गोष्टी आल्या तरी तें तृतीयालिंगीं मन काय करणार ? व मनांतील हेतु दुसऱ्यास समजण्याचा मार्ग नसल्यानें अर्थात् त्यापासून अपाय घडण्याचा संभव नाहीं. मनांत आपण शेंकडों अपशब्द उच्चारिले तरी त्यांची भीति बाळगावी लागत नाहीं. मानसिक हेतु जिव्हा वदेल त्याच वेळीं त्याचा परिणाम घडून येणार–ह्मणून ह्मणतात कीं, "जितं सर्व जिते रसे" ज्यानें जिव्हा स्वाधीन ठेवली, त्याचे आधीन सर्व जग झालें. ती जर बेफाम झाली तर आटपलें सर्व. तिला चवचाल होऊं दिलें, तिच्या इच्छेप्रमाणें गोड गोड पदार्थ मिळूं लागले, कीं मग क्रमानें एकेक अविचार आठवतात. साधूसंत कडूनिंबाचा रस पितात त्याचें हेंच बीज, कीं– ऐनजिनसी तिलाच नम्र ठेवली ह्मणजे झालें. असो, पुरे हा अनुवाद. पुढील प्रसंगाविषयीं कांहीं विचार करावा. जर हा आरोप बलात्कारानें तिच्यावर ( निर्मला ) करावा, तर एक महत्पाप करून चुकलों व आतां दुसरें करावें लागतें; असें केलें तर इतका वेळ पश्चात्ताप झाला तो फुकाचा असें ह्मटलें पाहिजे. इतकें होऊन सर्व संपलें

असें नाहीं. माझ्या जयदेवरावाला ती अंतरली व पुढें मागें तिच्याकरितां माझा बाळहि मला अंतरणार. तें कांहीं उपयोगाचें नाहीं. हजार बुद्धीनें मसलत फसेल तर पूर्वी ठरवून ठेवल्याप्रमाणें करावें, तरच अब्रूचा बचाव. बरें, पण अद्याप बाळासाहेब कसा आला नाहीं? त्याला निर्मलेकडून हें वर्तमान समजलें नसेलना? तिला शपथेमध्यें गोंवून घेतली आहे, मग तसें होण्याचा संभव नाहीं. अशा या पापभीरू लोकांनां शपथेमध्यें बांधून घेण्याचें साधन फार नामी आहे. अरेरे, काय ही अनीति! काय हें पाप! ज्या पापकर्माबद्दल तिरस्कार करून मीं लोकांत प्रौढी मिळवित होतों तें स्वतःच करण्याला तयार झालों. (पावलांचा शब्द ऐकूं येतो) आला बरें, आतां रागाचा आविर्भाव करून बसावें. (जयदेव जवळ येत आहेसें पाहून) येऊं द्या त्या जयदेवरावाला, म्हणजे या कारटीचें शासन करतों. वहावारे—अं अं. देवा देवा, माझा जीव मला नकोसा झाला आहे, पण ही पहा मागें ब्याद. (पुन्हां वर, वाटेकडे पाहून) मला वाटलें जयदेवराव आला, पण तो मिथ्या भ्रम. तो जितका लवकर न येईल तितका बरा. किंवा कोठें सध्यां चार दिवस तिकडच्या तिकडे परभारें जाईल तरी बरें. म्हणजे त्या अवकाशांत दुसरीहि कांहीं युक्ति आठवून ठेवितां येईल. अगर चार दिवस कोणतीहि गोष्ट मागें पडली म्हणजे तिचा अम्मल पुढें कमी होतो. किती तरी मीं पापी! ज्याचें दर्शन मला सूर्यासारखें संतोषदायक, त्याच पोटच्या मुलाचें दर्शन न व्हावें, अशी इच्छा करूं लागलों. चालूं दे, पापकर्म करण्याचा विडाच उचलला आहे. मग एक काय व हजार दोष काय? (जयदेवराव येतो, पूर्ववत कुंथणें चालूं होतें.)

**जयदे०**—बाबासाहेब, येथें आपणांशीं उत्तर करणारा परका मनुष्य कोणी दिसत नाहीं. मग तुह्मीं बोलतां कोणाशीं? व राग कोणावर? कोणी आपल्याला त्रास दिला?

**प्रताप**०-आलास बाळा ? ये. तुझीच मीं वाट पहात होतों, किती उशीर हा ? ( रुदन करित ) अरे, या म्हाताऱ्याची तुम्हांला कोणालाच दया नाहीं ? मर्जी तुमची ! अं. अं.

**जयदेव**०-बाबासाहेब, किंचित् उशीर झाला खरा. त्याचें कारण नंतर सांगतों. आधीं हें औषध घ्या व रडणें आटोपा. दुःखानें आपल्या डोळ्यांतून पाणी येतें ( करुणस्वरानें ) पण तें पाहून माझें मन कळवळतें. परमेश्वरा, माझे तीर्थरूपांनीं दुःख करावें व तें मीं पहावें असा प्रसंग यावाना ? बरें बाबासाहेब, सर्वथैव मीं दोषी आहें. मला पाहिजे तें शासन करण्याचा आपला अधिकार आहे, पण अगोदर हें औषध घ्या.

**प्रताप**०-फेंकून दे तें औषध. मला कोठें आतां वांचावयाचें आहे ? मीं कोठें पाहिजे आहे तुला ?

**जयदेव**०-बाबासाहेब, असा प्राणापर्यंत काय प्रसंग आला आहे तो मला कळवा, त्याचें निवारण माझे कडून न झालें तर मग माझी पूंजा होऊं द्या.

**प्रताप**०-( निजलेला वर उठून ) दुःखण्यानें शक्ति सारी गेली होती, पण आतां, हत्तीचें सामर्थ्य आलें आहे. हें पहा जयदेवराया, तुला सांगतों, ही पोरटी तुझी बायको, तिला आतां या वेळीं घराचे बाहेर काढ, नाहीं तर या म्हाताऱ्याला तरी मारून टाक. काय पहा चमत्कार ! माझा जीव मला नकोसा झाला आहे, त्यांत हा त्रास कोणी सोसावा ! असली ही गैरचालीची बायको जर तुला पतकरत असेल व त्याची तुला खंत नसेल तर खुशाल तिला घेऊन बैस. ( आपल्याशीं ) छे! छे! आज तर तिनें बेशरमपणाची कमाल केली. बरेंच दिवस हे तिचे खेळ चालले आहेत, पण आज जेव्हां तिनें नीचपणाचा कळस केला, तेव्हां माझ्या ध्यानांत आलें. ( त्यास उद्देशून ) बाबारे, हे दिवस

आले आहेत खोटे. तुह्मांसारख्या तरुण पोरांनां बायको ह्मणजे परब्रह्म. ह्मातान्याकोतान्या आईबापांचे आज्ञाधारक मुलगे आतां कोठें आहेत? मझ्याशीं ती इतका चावटपणा करत्ये, मग बाहेर बिचारी काय करित असेल हरि जाणें. ओ. ओ देवा, ( पुन्हां खालीं पडतो ).

**जयदे**०—बस्स. सर्व मजकूर ध्यानांत आला. इकडे तुह्मांपाशीं येण्याचेपूर्वीं यासंबंधानें मला किंचित् बातमी लागली व त्याच विचारामध्यें असल्यामुळें उशीर झाला. तिचें व आपलें नुकतेंच झालेलें भाषणहि मीं ऐकलें; परंतु तें मोघम असल्यामुळें संबंध लक्षांत आला नाहीं. आतां संशयाला जागाच राहिली नाहीं व तिला जें शासन करावयाचें तेंहि ठरवून चुकलों. मला तिजविषयीं अत्यंत लोभ आहे, अशी आपली खात्री झाली असेल त्याला इलाज नाहीं. पण खात्रीनें एकच गोष्ट आपल्याला सांगतों कीं, मला जगामध्यें आपल्यापेक्षां अधिक वस्तु दुसरी कोणतीच नाहीं. आतां दुसरा विचार—सोनें हें सर्वांनां पाहिजे खरें. पण तेंच जर कान खाऊं लागलें, तर त्याची इच्छा कशाला? तद्वत स्त्री वस्तु आहे, तिचे सहवासानें जें सुख व्हावयाचें तें न होतां उलट लौकिकहानी होऊं लागली, तर त्या अवदसेला घेऊन मला काय करायची? ही साडेसाती पांढऱ्या पायांची घरांत आल्यापासून सुख असें कोणाला नाहीं (रागानें) दुष्ट! दुष्ट!

**प्रताप**०—नगरांतहि तिचे नांवाचा बराच पुकारा आहे. एक दोन सभ्य गृहस्थांनीं याबद्दल मला पर्यायानेंहि जाणिवलें, तरी मीं तें त्यांचें ह्मणणें आइकलें न आइकलेंसें केलें; कां? तर कोणाचा संसार तोडूं नये, तो जोडण्याचा यत्न करावा. हा माझा समज. पण तो प्रकार मजपर्यंत येऊन थडकला. हरि! हरि!! हरि!!! काय तिचे एकेक डावपेंच. ही गोष्ट मीं तुला कळवूं

नये, याजकरितां मला शपथ घालते. भलत्याच विषयाबद्दल कोणी आपल्याला शपथेनें नडवूं लागला, तर ती शपथ कोण पाळणार ? बाळा, तुझे सद्गुण व सद्वर्तन कोणीकडे, व त्या पोरटीचें दुराचरण कोणीकडे !

**जयदेव०**-नको नको तें चरित्र बस्स. माझे कान फुटून गेले. आपण हे शब्द ऐकून तरी कसे घेतलेत? तेथल्या तेथें तिला बुकलून मारून टाकावयाची होती. माझी वाट पहाण्याचें कारण नव्हतें. असो. हा निघालों. त्या अवदसेचे तोडून दोन तुकडे-

**प्रताप०**-छे. छे. असा अविचार नको. स्त्रीहत्येचा मोठा दोष आहे. तिला घरांत मात्र ठेवूं नको. अग कपाळ करंटे, आपल्या हातानें आपल्या पायावर दगड मारून घेतलास ! बाळासाहेब, हें पहा, असें कर; तिचा मला त्यावेळीं राग आला खरा, तरी मीं तुला तिचें कृत्य कळविणार नव्हतों. पण अशा विषयीं क्षमा कशी करावी? बरें-एकवार झालें तें झालें. पुन्हां असें न होण्याविषयीं ताकीद दे. मूर्ख स्त्रियांची जात, आधीं मूर्खपणा करून नंतर त्याचें प्रायश्चित्त भोगित बसतात.

**जयदेव०**-बाबासाहेब, आपलें वचन मोडावयाचें नाहीं, असा माझा निर्धार आहे; त्या व्रताला आपण आडकाठी आणूं नये. मीं तिला ठारच मारली असती, पण आपणांकरितां फक्त घरांतूनच घालिवण्याचें शासन करितों. अगे दुष्टे, असें तुझें पापकर्म !

**प्रताप०**-( शोकानें ) बुडाली बिचारी ! सर्व प्रकारें नाश करून घेतलान ! बाळासाहेब, जा जा. पुढें माझ्यानें बोलवत नाहीं. तुला जें योग्य दिसेल तें कर. मला आतां स्वस्थ पडूं दे. ( निजतो. )

(जयदेव एकटाच आपल्याशीं सचिंत होऊन)

**जयदेव०**-आज माझ्या जीविताचा कडेलोट झाला. एकवार ऐकलेली आपल्या प्रिय मनुष्याची मृत्युवार्ता जशी सहसा खोटी होत नाहीं, तसें हें दुष्ट वर्तमानहि बहुधा टळावयाचें नाहीं. अरे- माझ्या शत्रूंच्या स्त्रीचेंहि जें दुराचरण असूं नये, अशी माझी इच्छा, त्या अनुभवाला मीं तयार झालों. आतां प्राण ठेवण्यामध्यें अर्थ तो काय ? गृहस्थाश्रमासारखा धर्म नाहीं, कीं ज्यांत प्रपंच आणि परमार्थ हीं दोन्हीं साधतात. गोष्ट खरी आहे, पण अशा प्रकारचा ज्याचा बेशरम आश्रम आहे त्याला सौख्य कसचें ? हर! हर! व्यर्थ व्यर्थ मीं फसलों गेलों. काय करूं आतां? उद्बंधन, किंवा जलसमाधि घेणें, अगर विष भक्षण करून अखंड दंडायमान होणें, ही प्राणहानी करण्याची रीति फारच सुलभ आहे; परंतु लोकविटंबन कसें चुकावें ? अथवा देहत्यागानंतर कीर्ति किंवा अपकीर्ति कांहीं होवो; असेंहि ह्मणतां आलें असतें. पण दुसऱ्या एक अपरिहार्य अडचणींत मीं गुरफटून गेलों आहें. त्यामुळें हा जीव, ज्या देहाला कंटाळून गेला आहे तो देह, मुळचा जड, त्यांतहि आतां अवजड झाला, तरी टाकतां येत नाहीं. कां ? तर-( शोकानें ) मागें ह्मातारा आहे, त्याचें कसें होईल ? त्याला वेळेवर घोंटभर पाणी पाजण्यालाहि अगत्याचें असें कोणीं नाहीं. ह्मातान्याचीं हाडें आहेत, तोंपर्यंत मला हे काळाचे खडतर दिवस काढलेच पाहिजेत. ( शांतपणें ) निर्मले- आ-हा-जिचें स्मरणानेंच दुःखाचें विस्मरण होऊन आनंदानें गहुंगहूं क्षणोक्षणीं मीं पुष्ट होत असें, तोच मीं, आतां झिजत झिजत जमिनींत जाणार. निर्मले- तुजवर जें पराकाष्टेचें मीं प्रेम करित गेलों, त्याचा मोबदला तूं फार उत्कृष्ट दिलास! तूं काय निमित्त आपला सन्मार्ग सोडलास तो तरी सांग ? काय, तुला वस्त्रप्रावर्णाची उणीव झाली किंवा कसें ? स्त्रिया बिघडण्याचीं जीं कारणें

आहेत, त्यांतून एकाचा तरी तूं आधार दाखव. किंवा जगांत असणाऱ्या कित्येक लोकांप्रमाणें मीं बाहेर ख्याली आहें, ह्मणून माझी खोड तोडण्याकरितां ही आड दिलीस ? तर तसेंहि नाहीं तुजवांचून ज्या स्त्रिया, त्या मला मातेसमान. याविषयीं तुझ्याच मनानें तुझी पूर्ण खातरी केली आहे व तुजविषयींहि मला विश्वास होता. दुसऱ्या कोणी एक हजार पुरावे तुझ्या वर्तनाविषयीं प्रतिकूल असे दिले असते, तरी ती बाजारबातमी समजलों असतों, परंतु बाबासाहेबांनींच ज्याअर्थी मला हा मजकूर कळविला, तेंव्हां पासून मीं अक्कलगुंग होऊन गेलों. बरें, एकपक्षीं हा त्यांचा खोटेपणा असें ह्मणावें, तर त्यांनीं असें सांगण्यांत कांहीं तरी हेतु धरिला पाहिजे. पण तो त्यांचे ठिकाणीं संभवत नाहीं. छत्–विष्णवेनमः विष्णवेनमः–छे,–छे,–या कवडीमोल बटिकेची तरफदारी करून त्या राजमान्य सत्पुरुषाला दूषण ? ( तोंडांत मारून घेऊन ) महत्पाप ! महत्पाप ! तें कांहीं नव्हे. निर्मले–तुझें अंतरंग मला समजलें. अगे दुष्टे, विवाहसमयीं अथेंच कामेच अशा वाणीनें देवब्राह्मणांसमक्ष जी मीं क्रिया केली, त्याप्रमाणें मीं तुजशीं वागत आलों; त्याचें हें प्रायश्चित्त काय ? हां–नाहीं ह्मणायला, मूर्खपणाचे समजुतीनें माझी एक चुकी झाली. कोणती ? तर–इतर लोकांप्रमाणें मीं कोणा त्रयस्त मनुष्याचे रूबरू तुझ्याशीं विनोद करित आलों नाहीं व तुजसंबंधानें मजपुढें गोष्ट निघाली असतां मला तुझी अति आवड आहे असें दर्शवूं दिलें नाहीं, किंवा माझा गुप्त प्रेमरस वाहूं दिला नाहीं. तसें पुरुषांचें करणें स्त्रियांनां हवेंसें वाटतें व लोकांकडून अमक्या तमक्या जोडप्याची प्रीति फार आहे असें ऐकणें, स्त्रियांनां मोठें भूषण वाटतें व त्या लाडानें त्यांच्या तोंडांस पाणी सुटतें; परंतु माझे स्वभावाला ती गोष्ट आवडत नाहीं. प्रीति ह्मणजे चारगटपणा नव्हे. त्या

प्रेमाला जितकी बंधनाची मर्यादा तितकी त्याला अधिक गोडी. असो, आतां चर्चा कशाला? आजपासून तुझा माझा संबंध तुटलाच. कमाल आहे बुवा या स्त्रीजातीची व त्यांच्या स्वभावाची! अरे, जिचें वर्तन बाहेरून पहाण्यांत इतकें निर्मल, तिचं अंतस्थ वर्तन अशा प्रकारचें! यावरून असें एक प्रमाण स्पष्ट होतें कीं-पातिव्रत्य हें आज मितीला विद्यमान नाहीं. जें आहे तें कसचें? तर-जिला सवड मिळत नाहीं, जिच्यावर कुटुंबांतल्या मनुष्यांचा सक्त पहारा, किंवा कुरूपपणामुळें कोणी पुरुष चहात नाहीं अगर जिला मुळचीच विषयाची गोडी नाहीं, ती पतिव्रता. बस्स. न होऊन कोणी स्त्री अरण्यांत सांपडली आहे, जिला चार आठ दिवसांचें उपोषण घडलें असून शरिरावर वस्त्र नाहीं, सर्वांग पावसानें भिजल्यामुळें थंडीनें कांकडून गेली व आसपास हिंसक पशूंची भीति, रात्रीची वेळा, त्यांतहि काळोखी रात्र, अशी स्त्री सुरूप व श्रीमान् पुरुषालाचशी काय, पण त्या अरण्यांत रहाणाऱ्या भिल्ल काळविटाचे उबेलाहि कांकूं करणार नाहीं. निर्मले, या तुझ्या गुप्तकर्माचा परिस्फोट झाला नव्हता तोंपर्यंत या संसारांत येणाऱ्या हजारों अडचणीबद्दल मीं काळजी केली नाहीं; परंतु आतां स्वर्गांच्या राज्यप्राप्तीनेंहि मीं स्मशानवासी जोग्याप्रमाणें झालों. अग दुष्टे, तूं कोणासारखी झालीस? तुझा बाप असा बदमाष नव्हता. तुझ्या आईच्या चांगुलपणाविषयींहि लौकिक ऐकला होता, पण सहवासावांचून खरें इंगित लक्षांत येत नाहीं. जसा पिता सद्वर्तनी किंवा निरोगी असेल तसा पुत्र होतो व माता ज्या शिलाची व प्रकृतीची असेल, तशी कन्या निपजते. पुत्र पित्याचा आत्मा व कन्या मातेचा आत्मा. 'यथाबीजं तथांकुरः, तें कांहीं असो. वास्तविक अनुभवावांचून कोणाचीहि प्रशंसा किंवा निंदा करणें हें पाप होय. पण ती

बिचारी तुझी आई तुझे निमित्त सदोषा होणार. तुला जन्म दिल्याचा हाच तिला फायदा ! !- ( जातो ).

## अंक ४ था. प्रवेश ३ रा.

( निर्मला बसली असून एक दासी जवळ उभी आहे. निर्मलेच्या पुढें पोथी मांडली आहे व जवळच कांहीं अंतरावर चंदनी चवकीवर केळीचें पान, त्यावर रुपेरी ताट, सभोंवतीं पांच दहा वाट्या व उजवीकडे तिवईवर ताम्हन, डावीकडे पेला व तांब्या, ( रुपेरी ) बसावया करितां व टेंकावयाकरितां पाट मांडले आहेत; असा देखावा दृष्टीस पडतो. )

**निर्मला**-अग कमळजे, मघां तुला इतकी घाई कसची सुटली होती, ती आतां सांग पाहूं.

**दासी**-बाईसाहेब घाई कसची ! मीं जवळ असतां मला आपण बोलवली नाहीं असं कधीं झालं आहे का ? मग आजच काय ह्मणून अबोला ?

**निर्मला**-अग वेडे, अबोला कसचा नी तो कां, मीं पोथी वाचित होतें. त्यावेळीं कोणाशीं बोलूं नये, असं मला घरांतून सांगणं झालं आहे.

**दासी**-बाईसाहेब, बायकांनां कशाला त्या पोथ्या नी पुस्तकं पाहिजेत ?

**निर्मला**-अग, रिकामपणीं चकाट्या पिटित बसण्यापेक्षां घटकाभर जर देवाचं नांव घेतलं तर तें चांगलं. शिवाय करमणूक, नी माझा तरी असा कुठं नेम चालणार आहे ? काय ग बाई आजची कथा ! ती बिचारी किती तरी दुःखी !

**दासी**-आईसाहेब, आज कसली कथा वाचलीत ?

**निर्मला**-आज नलदमयंतीची कथा वाचली. ती बिचारी

विनाकारण पतीपासून दुरावली. काय तिनं अपराध केला होता? बायकांचं जिणं परस्वाधीन दुसरं काय ?

**दासी**—बाईसाहेब, पुस्तकांतल्या त्या गोष्टी, त्याबद्दल इतकं कशाला वाईट वाटूं द्यावं तें ? बरं— आज आपणाला जेवण-खाण कांहीं नाहीं का ? त्यांतून कालचा उपास, घांसभर अन्न वेळेवारी खावं. मग "पित्त पित्त" ह्मणतां ! अशानं कां तें पित्त होणार नाहीं ?

**निर्मला**—अग सगळं खरं, पण नेमाला कसा अंतर आणूं ? त्यांतून माझ्या जेवणाचं काय आहे ? मला असं कुठं उद्योगावर जायचं आहे? तिकडचं जेवण झालं ह्मणजे माझं पोट भरलं, अग, घरांतून लवकर येणं होत नाहीं; ह्मणून मीं जेवल्या ताटांत जेवणाचा नेहमींचा नेम धरला.

**दासी**—त्यांचंहि जेवण नाहीं झालं का अजून ? हें काय बाई, दोनप्रहर उलटून गेले.

**निर्मला**—जा ग. स्वारी कुठं आहे ती पाहून ये. ( दासी जाऊं लागते ) अग कमळजे, इकडे ये तुला सांगतें; इथूनच ओरडत जाशील हो. असला चावटपणा तिकडं खपत नाहीं. मुकाट्यानं जा नी दृष्टीस पड, ह्मणजे येणं होईल; तोंपर्यंत माझा थोडासा जप राहिला आहे तेवढा करत्यें. समजलीसना ? मीं काय सांगितलं तें. माझं नांव सांगून बोलावशील संभाळहो. तूं दिखील दुसऱ्याच्या दृष्टीस पडूं नयेस; फक्त तिकडं दृष्टीस पडलीस ह्मणजे झालं.

**दासी**—आईसाहेब, इतकं मला चार चार वेळां बजावून सांगणं नको. पहा तर खरी. महाराजावांचून दुसऱ्या कोणाचे दृष्टीस-हि न पडतां खूण करून निघून येतें.

**निर्मला**—बरं जा लवकर. ( दासी जाते व निर्मला डोळे

झांकून जप करित बसते, तांच निद्रा लागते. इतक्या अवकाशांत जयदेवराव येतो व तिजकडे बराच वेळ पाहून, )

**जयदेव०**–( आपल्याशीं ) अहाहा ! किती तरी हें सुंदर रूप ! या सौंदर्यांत न्यून असें कांहीं तरी आहे ? क्षुधातिशयामुळें इला ग्लानी येऊन, गाढ झोंपीं गेली आहे. सुरूप मनुष्य निद्रासमयीं तेजहीन होतें; पण हिच्या लावण्यांत रतिमात्र तरी अंतर झालें आहे काय ? चतुर कारागिरानें जणूं काय आपलें बुद्धिकौशल्य दाखविण्याकरितां पुतळी तयार करून बसवावी, तशी ही सुंदरी शोभत आहे. तारुण्य हें गुण्य, व सौंदर्य गुणक, त्यानें गुणपरमावधि झाली. अशा निद्रावस्थेंत इला उचलून अरण्यांत वाघाच्या जाळीं जवळ नेऊन सोडली, तरी तो वाघहि इचा नाश न करितां, पाळींव कुत्र्या मांजराप्रमाणें इच्याशीं खेळूं बागडूं लागेल, अशी इची मोहक व करुणा उत्पन्न होणारी मुद्रा आहे. तरी इच्या दुष्कृतीची स्मृति झाली ह्मणजे हीच मला भयंकर वाघिणी सारखी क्रूर दिसूं लागते. निर्मले ! या हृदयस्थानापासून तूं आतां निघालीस. कांहीं दिवसांपूर्वी तूं दुखण्यानें पडली होतीस, तेव्हां अत्यंत कृश, कांतिहीन, पुष्कळ दिवस शीतभयानें स्नान न घडल्यानें अंगाला घाण येणारी, अशी असून तुझा मला वीट आला नाहीं. दुखण्यांत कित्येक वेळां माझ्या अंगावरहि तुला वांती व्हावी. मनुष्याला स्वतःचे घामटपणामुळेंहि किळस येतो, परंतु तुजसंबंधानें मला तसें कांहीं न वाटतां, उलटपक्षीं तुझी सेवा हौसेनें करण्याविषयीं मला एक प्रकारचें चमत्कारिक प्रेम वाटत असे. याचें कारण प्रथम संगसमयीं ज्या प्रेमदृष्टीनें तुला पाहिली, त्याच रूपानें तूं माझें अंतरीं वास केला होतास. काय तरी या प्रेमदृष्टीचा खेळ आहे ! मलीन वस्त्र नेसली असतां, शरिरावर अलंकार नसतां, केश अस्ताव्यस्त असतांहि तूं सदा-

सर्वदां अलंकृत अशीच वाटत होतीस. बरें, फारच लक्ष्यपुरवून पाहिलें व यावेळीं तुझे शरिरावर अलंकार नाहींत व उत्तम वस्त्रहि नाहीं, अशी खात्री करून घेतली तरी तींहि एक तुझे शरिराची विशेष व निराळी अशी शोभा दिसावी! फलशोभनकालीं शुभ्र जरतारी शालू नेसून अंगावर मौत्तिकाचे अलंकार घालून ढगांमध्यें वीज चमकावी, त्याप्रमाणें चमकत व पायांतले पैंजण छुम-छुम वाजवित, मांसल अशा त्या दंडांतील बाजुबंदांचे गोंडे हाल-वित, कमलासारख्या रक्तवर्ण करांगुलींमध्यें मला देण्याकरितां विडा घेऊन आलीस, मजकडे येण्याची उत्कट इच्छा असतांहि केवळ मर्यादेस्तव, तुला माझ्या महालांत पोंचवूं आल्या सख्यांशीं वक्रदृष्टि करून " मीं नाहीं, मीं नाहीं जायची. " असें वरकांतीं बोलून मजकडे प्रेमदृष्टीनें पहात एकेक पाऊल पुढेंच टाकित आलीस, तेव्हां परस्पर दृष्टादृष्ट होऊन किती तरी संतोष वा-टला! त्यावेळीं बहुत स्त्रियांनीं अनेक वेळां सौभाग्यालंकार दान केल्यानें व पुष्पांची जाळी बांधली असल्यानें तर त्या मुखाला भारीच शोभा आली होती, तेव्हां जी तुला मीं नखशिखाग्र निर-खून पाहिली, तशीच तूं कशाहि स्थितींत असलीस तरी दिसत होतीस; परंतु आतां शुद्ध शूर्पणखा, ताटिकाशी भासूं लागलीस. असो. तें आतां आठवतां कामाचें नाहीं. शैव ( लिंगाईत ) जसें शवाला शृंगारतात त्याप्रमाणेंच या वेळींचा माझा वृथा अनुवाद!- नाहीं पण-प्रयत्नानेंहि असाध्य असें स्त्रीरत्न दैववशात् साध्य झालें, त्याचा अव्हेर कसा करूं?-बरें.-आजमितीला माझ्या दुर्भाग्यामुळें ही निर्मला मृत्युमुखांत गेली व मीं तिला अंतरलों, अशी कल्पना करून चाललों तर तिजमुळें मला किती तरी दुःख होईल! छे. छे. नको ती दुष्ट वासना. तर कसें करूं?-बा हृद्-यस्थ विवेका, हा माझा एवढा न्याय कर.-या प्रकरणांत सद्गुण

हा वादी व दुर्गुण प्रतिवादी. सद्गुणा तर्फी सत्यपणा हा साक्षी. तसा साक्षी दुर्गुणाला कोणीं नाहीं. पण त्याचे वतीनें सौंदर्याची शिफारस आहे. तर या कामीं तूं काय न्याय निकाल देणार ?— काय ? तूं काय ह्मणतोस. ही फिर्यादच खोटी व आह्मींहि सर्व खोटे ? वाः खासा न्याय ! उघडच आहे. स्त्री संबंध, त्यांत सौंदर्य शिफारस; मग तूंहि फितुर होऊन माझ्या उलट जाणार. तर मलाहि पण तुझें ऐकावयाचें नाहीं. ( सक्रोध ) अशा रीतीचा कलंक लावून घेऊन यःकश्चित् स्त्री लोभ. छत्, हिचें मुखावलोकन केलें व अद्याप हिला घरांतून काढली नाहीं, हाच मीं मोठा अपराध केला. निर्मले, निर्मले, ऊठ चल. नीघ.

( तिला हांक मारतो. ती दचकून जागी होते व डोळ्यांस पाणी लावून जांभई देऊन जयदेवरावापाशीं येऊन उभी राहते. )

**निर्मला**—अग बाई ! हा काय चमत्कार, एकाएकीं येऊन असं ओरडणं झाल्यानं मीं किती तरी भ्यालें पण ! बरं, आज इतका उशीरसा ? माझी तर अलिकडे आशाच सोडली; पण आपल्या पोटापाण्याची तरी शुद्धि असावी. अग बाई, भुकेनं तोंड कसं सुकून गेलं आहे.

**जयदेव०**—तुझें खरें स्वरूप समजण्यापूर्वी हेंच तुझें भाषण अमृततुल्य वाटून मनाला संतोष होत असे; पण तेंच आतां विषाप्रमाणें वाटतें.

**निर्मला**—विनाकारण टाकून बोलावं, नी एखाद्याचं मन खट्टू करावं, असं मीं या जन्मांत ऐकलं नाहीं. माझं बोलणं आजच इतकं विषासारखं कडू कशानं झालं बाई ?

**जयदेव०**—तुझ्या पापाचरणानें माझ्या मनाला जो धक्का बसला, त्यानें या शरिराचा चुराडा उडाला. चरकांत सांपडलेल्या

उंसाप्रमाणें मीं पिचून गेलों. बस्स. पुरे झाली तुझी संगत. आतां तुला निक्षून सांगणें भाग आहे कीं, आज तूं अस्तमानापूर्वीं घरांतून निघून गेलें पाहिजे.

**निर्मला**–इश्श. हा काय बाई चमत्कार ! वेळ नाहीं, अवेळ नाहीं, भलत्याच वेळीं विनोद. दोन प्रहर उलटून गेले. अद्याप जेवण नाहीं ह्मणजे काय ! प्रकृति नाहींका बिघडायची ?

**जयदेव**०–पुरे, पुरे, हे लाडिकपणाचें बोलणें. मला ऐकण्याला नको आहे. चल नीघ. बाहेर हो.

**निर्मला**–ह्मणजे ? याचं काय नांव, हा बाई कसला प्राण घेण्याचा विनोद. " चल बाहेर हो " याचा काय अर्थ ! " जा. जा. " कुठं जाऊं ?

**जयदेव**०–कोठें ह्मणजे आपल्या घरीं.

**निर्मला**–हेंच माझं घर.

**जयदेव**०–हें नव्हे तुझें घर, तो संबंध आतां राहिला नाहीं. तूं आपल्या माहेरीं निघून जा.

**निर्मला**–माहेरीं राहण्याचे का हे माझे दिवस ? तिथं रहाण्याचे वेळीं तिथं राहिलं पाहिजे. इथं रहाण्याचे वेळीं इथं राहिलं पाहिजे. ' माहेरीं ह्मणे जा. ' याकरितां आईबापांनीं माझं लग्न केलं ? पण सगळं सोडून मध्येंच हें काय वेड मनांत भरलं ? याचं काय नांव ?

**जयदेव**०–( सक्रोध ) निर्मले, आतां हा लघळपणा कांहीं कामाचा नाहीं. दुष्टे, माझें रक्त तापवूं नकोस. तुला सर्व थट्टाच वाटली अं ? बस्स, यावेळीं तुला घराचे बाहेर निघून गेलें पाहिजे. बोल लवकर. एकच जबाब दे.

**निर्मला**–( भय पावून ) अग बाई ! मला इतका वेळ आपलं भाषण थट्टेचं आहे असं वाटलं होतं. ही थट्टा नव्हे. खरो-

खरीचा राग आलासा वाटतो. मीं कांहीं संबंधांत चुकलेंच नाहीं, असं कांहीं मला ह्मणतां येत नाहीं; पण चूक झाली असली तरी त्याची आपण मला क्षमा केली पाहिजे; नी कारण समजलं तर बरं होईल.

**जयदेव०**–तूं काय केलेंस आणि काय नाहीं, या संबंधाची विचारणा करण्याची मला बिलकुल जरूरी नाहीं. नेत्ररोग झाल्या मनुष्याला ज्याप्रमाणें दीप शत्रुवत, तशी तुझी मूर्ति माझ्या नेत्रांनां त्रासदायक झाली आहे. अग दुष्टे, इतकी तूं नीच अं. ?

**निर्मला**–( गहिंवरून ) महाराज, कधींच जें बोलणं ऐकलं नाहीं तें आज असं कां ? नका नका. असे डोळे लाल करूं नका. मला भारी भय वाटतं. याचं कारण तरी समजूं द्या.

**जयदेव०**–तुजप्रमाणें लज्जाहीन होऊन ते घाणेरे शब्द मीं उच्चारित नाहीं. वा: फार सुरेख काम केलेंस! असो. पाप्यांचा शासनकर्ता प्रभु समर्थ आहे. बरें; या उप्पर मला बोलण्याचा प्रसंग आणूं नको. माझ्या वाड्याबाहेर आतांचे आतां निघालें पाहिजे. निघणार कीं नाहीं, फक्त या शब्दाचें इतकेंच उत्तर पाहिजे.

**निर्मला**–कां पण ? कुठं जाऊं ? नी कशाकरितां. मीं बायको मनुष्य एकटी जा ह्मणजे ?

**जयदेव०**–निर्मले, तुला एकवार, दोनवार, तीनवार सांगितलें; तरी तूं जात नाहींस. पहा आपला विचार. ही गोष्ट वाईट परिणामाला जाणारी आहे. याचा विचार कर.

**निर्मला**–( सकरुण ) महाराज, हें काय बरं आपल्या मनांत वारं शिरलं आहे, असं कां बरं ? मीं असं केलं तरी काय ? मज दासीवर इतका राग कशाला ? मीं पायां पडतें.

**जयदेव०**–तूं अद्याप जात नाहींस अं ? नको जाऊंस. तु-झ्याच इच्छेप्रमाणें होऊं दे तर.

( खालीं बसून जमिनीवर कपाळ फोडून घेऊं लागतो. )

**निर्मला**–( घाबरून घाईनें ) नको नको. असं करूं नका. मीं जातें. ही निघालें. सांगाल तसें ऐकतें.

**जयदेव०**–( पुन्हां पूर्ववत करूं लागतो ) सोड सोड. मीं तुझ्या पायांजवळ आपला प्राण देतों.

**निर्मला**–( त्यास दाबून धरून ) मामंजी, मामंजी, धांवा लवकर. सासूबाई, लवकर कोणी या तरी. घात झाला. महाराज, ही पहा निघालें. आतांच बाहेर पडतें.

**जयदेव०**–चल नीघ तर बाहेर हो. तूं घरांत राहिलीस तर मीं हा जीव ठेवणार नाहीं.

**निर्मला**–( शोकानें ) मज निमित्त जर आपल्या जिवाला अपाय होणार, तर मीं कशाला राहूं ? ही आज आतां निघतें. जसं सांगणं होईल तसं ऐकतें; पण जर राग येत नसेल तर एक शब्द विचारतें, कृपा करून त्याचं उत्तर द्यावं.

**जयदेव०**–बोल. लवकर बोल. जें तुला विचारणें असेल तें लवकर विचारून घे. पाहिजे असल्यास माझे दोन तोंडांत मार. परंतु आपलें तोंड काळें कर.

**निर्मला**–महाराज, असं निष्ठुर भाषण आपण बोलूं नये. माझ्या काळजाला घरें पडतात. आपण आपल्या वैऱ्याला दे-खिल असं बोललेलं मीं आजवर ऐकलं नाहीं. मग मीं आपली जन्माची सोबतीण. मजवर कां अशी अवकृपा ?

**जयदेव०**–पुरे पुरे. मजपाशीं तपशील नको आहे. आतां तें पूर्वींचें नातें राहिलें नाहीं. बरें, आटप. काय विचारणें आहे तें झट् समजूं दे.

**निर्मला**–दुसरं काय विचारणार ? मजमुळं आपण प्राणावर उदार होण्याजोगा असा मीं अपराध तरी काय केला ? तो समजला ह्मणजे निघालें.

**जयदेव०**–( धिक्कारयुक्त ) अरे वाः–'अपराध मीं काय केला.' असें अं ? भले भले. एकून तूं जें कर्म केलेंस त्याचें इतक्या अवकाशांत तुला स्मरण नाहीं? ( सक्रोध ) दुष्टे, तूं जारकर्म केलेंस. तूं शिंदळ आहेस. सबब आपलें काळें कर.

**निर्मला**–( कानांवर हात ठेवून ) शिव शिव शिव ! असे अमंगळ शब्द आपण उच्चारूं दिखील नयेत. आपण मजवर दुसरा पाहिजे तो आळ घालावा; पण भलतंच बोलल्यानं पातक लागेल.

**जयदेव०**–तुज सारख्या पापी स्त्रीशीं मीं विवाह केला, तेव्हां तुझ्या पापाचा मीं वांटेकरी झालोंच. शास्त्रदृष्टचा मीं अर्ध्या पापाचा अधिकारी आहें. पण तें सर्वच पातक मीं आपल्या माथीं खुषीनें घेतों. पण या उप्पर तुझी संगत पुरे.

**निर्मला**–अग आई, काय करूं आतां ! कसं चोहोंकडूनच माझ्यावर आकाश कडकडून कोसळून पडलं. आतां कसची लाज धरूं नी काय करूं ! बरें महाराज, आपण जें ह्मणतां तें पाप मीं केलं असं आपल्याला कुणीं सांगितलं ? त्यानं मला कधीं कुठं पाहिली ?

**जयदेव०**–निर्मले, बस्स कर हे तुझे लपंडाव. अगे, सर्व अपराध करून सवरून मीं त्या गांवचीच नव्हे असें करून दाखवितेस ? परंतु तुझ्या पापकर्माचे साक्षी हयात आहेत. अगे कुटिले, प्रत्यक्ष माझे वडील, जे तुझे सासरे, तेच. समजलीस ? त्यांच्याशीं केलें नाहींस; पण करूं गेली होतीस. तिकडे लाथा बसल्या, तुझी छी थू झाली तशी तेथून निघून गेलीस. त्या वां-

चून इतर ठिकाणीं शेण खाण्याला काय कमी केलें असशील, तें यावरून समजत नाहीं का ?

**निर्मला॰**-माझं भविष्य खरं झालं. हा आपला भोळसर स्वभावच आपला वैरी होणार. थट्टेनं जर कुणीं कांहीं सांगितलं तर तेंच खरं मानून गोष्ट विकोपाला नेणं बरं नव्हे. मामंजींनीं आपलं मन पहाण्याकरितां कदाचित् असें सांगितलं असेल तर तेंच आपण मनावर घेऊं नये. मीं कशी आहें याबद्दल त्यांनींहि संशय फेडून घेतला आहे.

**जयदेव॰**-निर्मले, ही थट्टेची गोष्ट नव्हे. तुला पुन्हां सांगतों कीं, तूं जारकर्म करणारी स्त्री, तुला जर मीं घरीं ठेवली, तर माझे पितर नरकीं पडोत, हीच शपथ. दुसऱ्या तिसऱ्याच्या सांगासांगीनें मीं वळणारा नव्हे. स्वतः बाबासाहेबांचा हुकूम आहे.

**निर्मला**-असं जर आहे तर मींहि निक्षून सांगतें. या कामीं मामंजींचाच दोष आहे. त्यांनीं आपले प्रताप झाकण्याकरतां ही बतावणी केली, यांत कांहीं खोटं नाहीं.

**जयदेव॰**-अग दुष्टे, तूं किती तरी नीच आहेस ! या कामीं शिक्षण घेण्याचीहि तुला जरूरी नाहीं. तूं पक्की तरबेज, स्यंपभू जारिणी होस. अग अवदसे, तूं बाबासाहेबांनां दूषण देतेस, त्या तुझी जीभ गळून जाईल. त्यांची योग्यता काय ? केवढें त्यांचें पवित्र वर्तन ! थोर मन, न्यायनीति, त्यांच्या गुणांची प्रशंसा स्वतः राजेसाहेब करितात, त्यांनां सारी दुनया पछानते. अशा पुण्य पुरुषाला, माकडा, तूं काय नांवें ठेवावीस ?

**निर्मला**-आपण कांहीं ह्मणा. पण मींहि खरं खरं सांगतें या गळ्यांतल्या मंगळसूत्राची शपथ वाहून सांगतें कीं, हें आपण ह्मणतां हेंचसं काय, परंतु दुसरं कोणतंहि पातक आजवर जर मीं केलं असेल तर माझी जीभ झडो. डोळे फुटोत, सर्वांगाला

किडे पडोत. महारोग होवो. जन्म जन्मातरीं मला वैधव्य येऊन नरकवास घडो; पण- जर कांहीं पाप घडलं असेल तर.

जयदेव०-अबबब ! अगे, प्रत्यक्ष मनुष्य खाणाऱ्या राक्षसानें जशी रक्ताची शपथ घेणें, त्याप्रमाणें हें तुझें वर्तन व त्याला अनुसरून भाषण आहे.

निर्मला-महाराज, असा अविचार करूं नका. यापासून आपणालाच पुढं मागं पश्चात्ताप होईल. माझा जर आपल्या मनाला वीटच आला असेल तर उपाय नाहीं. तुह्मीं दुसरं लग्न करून घ्यावं, मीं उभयतांची सेवाचाकरी आनंदानं करीन. मला कांहीं इतर बायकांप्रमाणं त्या गोष्टीचा खेद होणार नाहीं. कुणीकडून आपल्या जिवाला सुख झालं ह्मणजे त्यांत सर्व आलं. पण मला पायां जवळ ठेवून घ्यावी. आपल्या पायांनां अंतरेन असं करूं नये. तेंहि पुरवत नसलं तर मला काव्याच्या पिंजऱ्यांत ठेवावी, कुत्र्याला घालाल त्यांतलाच एक वाळलेला भाकरीचा तुकडा नी ओंजळभर पाणी द्यावं. उपाशी तापाशी ठेवा तरी चालेल. मीं माहेरीं कोणच्या तोंडानं जाऊं ? आईनं माझ्या ( गहिवर येऊन ) कां आलीस ह्मणून विचारलं तर उत्तर काय देऊं ? ( अति दुःखानें ) अग आई ! कसं माझं कर्म ओढवलं. महाराज, कोणतीहि गोष्ट प्रत्यक्ष पाहिली नाहीं. असं पाप केल्याचं जर दृष्टीस पडेल तर मला तापल्या तव्यावर उभी करा. तोफेच्या तोंडीं उडवा. तेलांत तळून काढवा. नाहींतर आतांच माझ्या नरडीला नख लावून मारून टाका. अग आई ! ( दीर्घश्वास सोडते ) कुण्या दुष्टाचं आज तोंड दृष्टीस पडलं असेल तें असो.

जयदेव०-निर्मले, ही तुमची स्त्रियांची नागमोडी बंगाली भाषा, मायावी कृति, इचा मला बराच अनुभव आला आहे. त्या-

अर्थीं या वृथावल्गनेचा कांहीं उपयोग होणार नाहीं. तुह्मीं गेलें पाहिजे हीच गोष्ट खरी. चलो जाव.

**निर्मला**—जातें तर. आपण सुखी असावं. ईश्वरच मजवर कोपला ह्मणून अशी बुद्धि झाली. रस्त्यावर भिकारी पाहिला तर त्याची स्थिति पाहून मन कळवळावं. तेंच मन मजविषयीं आज कठोर व्हावंना ? बरं प्रसंगाला पाठ दिली पाहिजे. ( चोहोंकडे पाहून ) देवा ! देवा ! या माझ्या प्रसंगाला आज कोणीं नाहींना ? माझा पाठीराखा कोणीच नाहींना ? अग बाई ! कोणच्या वेळीं कोणा बिच्याऱ्यावर कसा प्रसंग येईल याचा कांहीं नेम नाहीं. या अर्ध्या घटके पूर्वीं असं पुढं होणार ह्मणण्याचा मागमूस दिखील नव्हता, नी इतक्यांत काय हें विपरीत झालं ? रे कर्मा ! बरं, महाराज, घरांतून जाण्याविषयीं जरी मला सांगणं झालं आहे, तरी पण मीं माहेरीं ह्मणून जाणार नाहीं. हें काळं तोंड मीं माझ्या आईबापांनां दाखविणार नाहीं. जिकडं वाट फुटेल तिकडं जातें. जें जें या नशीबीं लिहिलं असेल तें कसं चुकणार ?

**जयदेव**०—खुशाल. चारी दिशा तुला मोकळ्या आहेत. तूं असें कां करितेस, ह्मणून विचारणारा असा तुला कोणीं नाहीं. तुला वाटल्यास बाजारांत पाल मांडून बैस—" मीं ह्मणे माहेरीं जात नाहीं " कशाला जाशील ! तुझे हे भलभलते थेर त्या बिचाऱ्या वृद्ध मातापितरांनां कसे पाहवतील ? सबब मनसोक्त वागण्याची तेथें तुला अडचण येईल हें उघड आहे.

**निर्मला**—महाराज, असं अभद्र आपण मला बोलूं नये. देवा ! कोणा चांडाळ पुरषानं माझ्या सौभाग्यदात्याच्या शरिरांत आज संचार केला असेल ! शूद्र लोक दिखील कधीं आपल्या बायकांनां बोलत नाहींत, असलं बोलणं मीं ऐकून घेतें आहें. नारायणा, तुझी मर्जी. तुझ्यावांचून या घटकेला मला कुणीच नाहीं.

दुसऱ्या कुणाजवळ मीं फिर्याद जाऊं? ह्मण आहे ना कीं–पावसानं भिजिवलं, नी भ्रतारानं मारलं तर फिर्याद कुणाजवळ करायची? (हात जोडून पूर्ववत शोकानें) आई तुळसी माते, माझे माहेरचे कुलस्वामिणी, तुळजा आई, जगदंबे, कायग बाई माझ्यावर हा डोंगर कोसळला? आई हा अन्याय तुला कसा तरी सहन होतो? आई, माझ्या वांट्याला कशीग पाठमोरी झालीस? माते, तूं सर्वांनां पावतेस, नी आजच तुझं सत्व गेलं तरी कुठं? (श्वास सोडून) मनुष्यानं मनुष्यपणा सोडला मग देव तरी आपलं देवपण कसं राखतील? बरं, आई जेव्हां तुला दया येईल तेव्हां येवो. जगंदबे, घडल्या गोष्टीला तूंच साक्ष आहेस. दुसरं कांहीं दुःख असतं तर मीं या मेल्या जिवाकरितां इतकी गयावया झालें नसतें; पण (अति दुःखानें) जे शब्द स्वप्नांतहि ऐकले नाहींत, तो दोष माझे पदरीं आलाना? याची लाज तुला असो. दुसरा कांहीं माझा तुजवर भार नाहीं. (दीनवाणीनें) महाराज, जाऊंचना तर, या बटकीची कांहीं दया येऊं द्यायची होती. जाऊं का?

**जयदेवराव**–(सक्रोध) होय–चल–जा. नीघ दुष्ट. दुष्ट. अवदसा, (चढत्या स्वरावर) जा-जा-जा.

**निर्मला**–बरं तर येतें आतां, दया असूं द्या. एक आपली वेडी नावडती बटीक होती, असं स्मरण राहूं द्या. आजवर तळहातच्या फोडाप्रमाणं माझा संभाळ केला. कधींच मला कोणत्याहि गोष्टीची वाण पडली नाहीं. कोणचीहि हौस पुरविण्याला कमी केलं नाहीं. या शहरांत दुसऱ्या खंडोगणती बायका असतील, पण मजसारखी दैववान् अशी बिचारी एकहि नसेल. कोणाचंहि पाहिलं तर कांहींना कांहीं कमी असं असतंच. पण मीं सर्वच रीतीनं दैवाची होतें. तो माझा मींपणा सर्व गेला. देवानंच मला खालीं पहायला लावली, तिथं कुणाचा उपाय!

आमचा संसार पाहून परक्या मनुष्यानं दिखील थक्क व्हावं. आपल्या सहवाससुखानं मीं आपल्या जन्मदात्या आईबापांनां विसरलें, आपणाला सोडून माहेरीं जाणं दिखील माझ्या जिवावर येत असे. देवा, आतां कसं करूं ! मीं जाऊं तरी कुठं ?

**जयदेव**०–निर्मले, या तुझ्या लटपटपंचीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. एकवार जो मीं निग्रह केला तोच खरा. केवळ विषयसुखाचीच इच्छा करणारा मीं मनुष्य नव्हे. तसें असतें तर हे तुझे ढोंगी खेळ माझेपाशीं चालले असते.

**निर्मला**–आपल्यापाशीं एक वस्तु मागायची आहे तेवढी शेवटची मला भिक्षा मिळावी.

**जयदेव**०–तूं लवकर बाहेर नीघ ह्मणजे तूं जें मागशील तें देतों. हे माझे प्राण पाहिजे तरी देतों.

**निर्मला**–आपल्या पायांतले जोडे द्यावेत. ते आपल्या पदरांत बांधून घेऊन गेलें ह्मणजे मला सर्व मिळालंसं झालं.

**जयदेव**०–( मनाशीं ) काय पहा स्त्रियांची लबाडी ! कशा कशा रीतीनें मला मोह घालूं पहात आहे ! पण हें कृत्रिमप्रेम काय उपयोगाचें ? एकवार जो निश्चय झाला तोच खरा. (उघड) हां. आटप. ते घे जोडे; त्याच योग्यतेची तूं आहेस.

**निर्मला**–कांहीं बोलणं झालं तरी त्याचा मला राग नाहीं. जरी आपण दोन लाथा मारल्यात तरी आपल्या शरिराचा मला शेवट एकवार स्पर्श झाला ह्मणून आनंदच होणार आहे. असो. जें आजवर सुख भोगलं तें आपल्या कृपेनं. आतां जें दुःख भोगावं लागेल तें माझ्या पापानं, असा माझा भाव आहे तो पुढं देव चालवो. ( जोडे आपल्या पदरांत बांधून घेऊन नवऱ्याचे पायांवर डोकें ठेवून व पायांचें चुंबन घेऊन जाऊं लागते. )

**जयदेवरा**०– ( आपल्याशीं ) बाहेर उन्हाची वेळ; अशा

उन्हांत हिला उपाशी घरांतून घालवून देणें मोठें पाप होय. कसे-हि तिचे दुर्गुण असोत, तिकडे दृष्टि देणें उपयोगी नाहीं; तर तिला जेवण करून जा असें सांगावें. ( उघड ) निर्मले, जेवणाची वेळ झाली आहे, मनांत असल्यास जेवण करून जा; त्याबद्दल मजकडून हरकत नाहीं.

**निर्मला**–इतकं आपल्या मनांत आलं हेंच अधिक. सर्व मला पावलं.

**जयदे०**–तरी उत्तम. ( निर्मला पुनःपुन्हां त्याजकडे पहात निघून जाते. ) असो चला. ज्या गोष्टीचा मला निकाल लावावयाचा होता, तो तर लावून चुकलों; पण हा मीं न्याय केला, कीं अन्याय केला ? माझ्या समजुतीनें तर मीं न्यायच केला. तर मग अशी हुरहुर कां ? तिच्या माझ्या झालेल्या संवादावरून तिनें अपराध केलाच असें ह्मणवत नाहीं. तर मीं विनाकारण तिजवर गहजब केला असें कबूल करणें भाग आहे. कारण–साधारणतः असा एक नियम आहे कीं, कोणाहि मनुष्याची परीक्षा त्याचे मुद्रेवरून होते. त्यांतहि जे अल्पस्वल्प गुप्त दोष ते भाषणावरून समजून येतात; पण कोणी धूर्त मनुष्य वरून आपलें वर्तन शुद्ध दाखवितो, व सभ्य भाषणानें खरें स्वरूप सहसा लोकांचे दृष्टोत्पत्तीस येऊं देत नाहीं. पण कांहीं दिवस त्याची संगत घडली ह्मणजे त्याचा स्वभाव झट् समजला जातो. याच गणितानें निर्मलेची मुद्रा पाहून, भाषण ऐकून, आणि आजवरच्या संगतीच्या अनुभवानें तिची वागणूक कांहींच वावगी दिसली नाहीं. बरें, मीं जो अपराध तिजवर शाबित केला, तो बुद्धचा केला किंवा कोणा लबाड मनुष्याचे कान फुंकण्यानें केला असें नाहीं. माझ्याच सावत्र आईनें ही गोष्ट मोठ्या चातुर्यानें माझे नजरेस आणली; तरी मीं तिकडे दुर्लक्ष्य केलें. परंतु बाबासाहेबांनीं

स्वतः होऊन ज्याअर्थी तिला घालवून देण्याविषयीं मला हडसून खडसून सांगितलें, तेव्हां त्यांच्या हुकमाप्रमाणें केलेंच पाहिजे. नाहींपेक्षां पित्रिच्छेचा अनादर केल्या पापाचा मीं अधिकारी होईन. पितृवत्सलतेचा दरकार केला नाहीं, तर स्वप्नांतहि सुख नाहीं. तिजबाबद मीं जी हकीगत ऐकली, त्यावरून हें तिचें जारकर्मकांड फारच माजलें आहे असें समजतें; मग तिला घरांत बाळगून काय उपयोग ? तिचा जो कोणी जार असेल, तो मला किती तुच्छ मानित असेल ! त्याची माझी प्रसंगोपात बोलाचाल झाली तर तो माझी जी विटंबना करील, ती माझ्यानें ऐकवणारहि नाहीं. आतां या सर्वच गोष्टी मिथ्या आहेत व निर्मलेनें सांगितल्याप्रमाणें माझे तीर्थरूपांचा खोटेपणा ह्मणावें तर—शिव शिव ! त्यांचे वयाकडे पाहिलें असतां, वयाचीहि गोष्ट बाजूला राहूं द्या, व इतरहि सर्व सद्गुण सोडून पाहिलें, तरी हें पाप त्यांचे ठिकाणीं संभवत नाहीं. कारण मीं प्रत्यक्ष त्यांचा पुत्र व माझी स्त्री त्यांनां कन्येसमान. कोणतेंहि काम पूर्ण विचारानें करावें असें ठिकठिकाणीं अनेक ग्रंथांतरीं सांगितलें आहे व विचारवंत पुरुषांची मोठी प्रशंसाहि केलेली आहे. परंतु असा दुष्ट प्रसंग ज्या दैवहीनावर येईल त्यानें काय विचार करावा ? विष्णुशर्मानामक पंडिताचीहि अक्कल येथें गुंग होऊन जाईल. ईशकृपें व वडिलांचे पूर्ण आशिर्वादपुण्याईनें कारणपरत्वें मीं कित्येक लोकांनां मसलत सांगत आलों, तोच मीं आज शुद्ध वेडा बनलों. प्राचीनकालीं राजे लोक आपल्या पंचप्रधानादिकांवर न्याय निवाडा करित असत व प्रकृतकालींहि तीच रीत आहे; ह्मणून ही माझी फिर्याद पंचांवर सोंपवावी, तर तसेंहि करितां येत नाहीं. कारण या प्रकरणांत पृच्छकाचाच पुरा फजिता; तोंड बांधून बुक्यांचा मार, तशी माझी गत झाली. अरे पण आतां मीं

विनाकारण कोळसा वांशित बसलों, याचें काय नांव ? व यांत असा विचार करित बसण्यासारखा तथ्यांश तो कोणता ? काय ? तिनें डोळ्यांस पाणी आणून रडूनभेंकून आक्रोश करून दाखविला, येवढ्यावरून मीं तिला निर्दोष समजावें ? छे. छे. असें करणें त्यांचें साहजिक कृत्य आहे. त्या पक्केपणीं समजून असतात कीं, आपला अपराध छपवून आपण साखसुरत होण्यास पुरुषांपाशीं, बरेंचसें रडून दाखविलें ह्मणजे झालें. अशा दुष्ट स्त्रियांनां ही विद्या चांगली साधलेली असते. दुःख नसतां शोक व सुख नसतां संतोषवृत्ति दर्शविणें, हें त्यांचें स्वाभाविक चातुर्य आहे. राम, राम, राम ! ज्या शब्दाचा उच्चारहि करूं नये, अशा प्रकारचा घाणेरा प्रकार माझ्या कुटुंबांत ! शिव शिव ! प्रत्यक्ष माझी विवाहिता स्त्री, तिची इच्छा माझे पित्याचे ठिकाणीं, व माझे सापत्न मातेची माझें ठिकाणीं दुष्ट वासना ! ( मागें पुढें पाहून ) कोणी येथें नाहींना ? हंः (दीर्घ श्वास सोडून) या गोष्टी कदाचित् कोणी ऐकतील ही एक निराळीच भीति. आह्मी नांवाचे मोठे इतकेंच. वरकड रीतीनें पहातां असा झारवडा अंत्यजादिकांमध्येंहि नाहीं. असो. इतःपर शुद्ध नरकवास असा जो संसार त्याची आशाच नको. ( निघून जातो )

( निर्मला येते )

**निर्मला**–( सचिंत ) मला पुन्हां पुन्हां असं आश्चर्य वाटतं कीं, मजविषयीं एकाएकी विनाकारण इतका वीट कसा आला ? अगबाई ! काय ती प्रीति, ती पाहून लोकांनींचसं काय, पण माझं मीं थक्क व्हावं. एवढी मीं लहानाची मोठी झालें; परंतु कधीं एक दिवस तरी मजवर राग, किंवा शिवीगाळ ? कांहीं नाहीं. फारच कधींकाळीं जर राग आला तर “ हं. असं काय तें वेड्यासारखं करावं, लबाड मनुष्य ” झालं. इतकं ह्मटलं ह्मणजे

मोठी शिक्षा झाली. अरे देवा, त्या प्रीतीचा हा असा शेवट व्हावाना ? देवा, आतां वरचेवर तेंच आठवित धायधाय रडत बसावंना ? प्राणनाथ ! पुढं मला अशी फसवायची होती, ह्मणून कांहो अशी माया लावलीत ? देवा, असं माझं होणार हें जर मला आधीं समजलं असतं, तर मीं इतकी तुमच्या मायापाशांत अडकलें नसतें हो. आई जगदंबे, मला जर स्वप्न पडलं असतं, तर मीं सावध राहिलें असतें; नाहींतर मनाची सर्व हौस तरी पुरवून घेतली असती. महाराज, आपल्या पायांपासून मला दूर करून दुःखसमुद्रांत ढकलून दिलीत; पण तुमच्या जिवाला तरी सुख आहे कांहो ? ( दीर्घ शोकानें ) नाहीं, नाहीं ! पुढं कांहीं दिवसांनीं तरी ही तुमची चूक तुह्मांला समजली ह्मणजे प्राणनाथ, काय तुमची दशा होईल ? तें भविष्य आतांपासून माझ्या डोळ्यांपुढं दिसतं आहे हो. पळभर जर कांहीं कारणानं मीं कुठं दृष्टीआड झालें तर, आंत बाहेर आंत बाहेर अशा सारख्या खेपा होत असत. घटकाभर मजवांचून चइन पडत नसे. आतां तुमचा वेळ कसा जाईल ? कोण तुमच्याशीं हितगूज करून तुमचं मन रमवील ? कामाकाजाच्या दगदगीनं कपाळ तापलं ह्मणजे औषधोपचार कोण करील ? तुह्मांला लवकर जेवूं कोण घालील ? काळजीनं रात्रीं झोंप येईनाशी झाली ह्मणजे गोष्टी सांगत तुमचे पाय चेपित कोण बसेल ? मस्तकाला थंडावा येण्याकरितां पायांनां तूप कोण चोळील ? महाराज, हजारों लोकांचे तुम्हीं अन्नदाते आहांत. तुमची सेवाचाकरी करण्याला कुणी नाहीं असं नाहीं; परंतु किती झालं तरी चाकर ते चाकर, नी बायको ती बायको. बायकोवर जशी सत्ता चालेल किंवा तिचं जसं अंतःकरण ओढवेल तसं दुसऱ्याचं नाहीं हो ओढवणार. या ईश्वरानं घातलेल्या जन्माच्या गांठी आहेत. ( इतक्यांत कोणी येत आहे-

सें दिसल्यावरून ) इकडं तें कोण येत आहे? ही लोकांच्या वर्दळीची वाट आहे, तर दुसरीकडं कुठं तरी जावं हें फार चागलं.
( निर्मला निघून जाते )

( अंक ४ था समाप्त. )

## अंक ५ वा. प्रवेश १ ला.

( विलासिनी ( राणी ) पद्मलोचना ( प्रधानस्त्री )

( रत्नपूर )

**विलासिनी**-सखे, काल दोनप्रहरीं मध्येंच मला तिकडचं ( राजाचं ) बोलावणं आलं, ह्मणून निघून गेलें. मीं गेल्यानंतर आणखी काय काय गोष्टी स्वामींनीं सांगितल्या त्या सांग पाहूं?

**पद्मलोचना**-तिथवर तुह्मीं सर्व आइकलंच आहे. सत्यवतीचे मुलगे मेले, पुढें वंश चालविण्याला कुणी नाहीं, ह्मणून संतान होण्याकरितां पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या व्यासाजवळ आपल्या सुना पाठिवल्या. त्यांच्यापासून पुढं संतति झाली.

**विलासिनी**-इश्श-हें कायग तुझं चमत्कारिक सांगणं? पहिल्या नवऱ्यापासून झालेला व्यास, ह्मणजे दोन का तिचे नवरे होते?

**पद्मलोचना**-दोन नवरे होतेच, हें कांहीं खोटं नव्हे. पहिला नवरा पराशरऋषि.

**विलासिनी**-व्यासऋषि ह्मणजे कोणसे मोठे साधु पुरुष आहेत असं सांगतात तें खरं का?

**पद्मलोचना**-ज्यांनीं हीं शास्त्रं पुराणं रचलीं, तेच ते व्यासऋषि. राणीसाहेब, यांत त्यांनीं वाईट असं काय केलं? संतति होण्याकरितां असं जरी कांहीं केलं, तरी त्याचा दोष नाहीं. स्वतः नवरे दिखील आपल्या बायकांनां तसं करण्याला सांगतात.

**विलासिनी**–पुरे बाई तुझं बोलणं. नवरे आपण होऊन बायकांनां असं कधीं सांगणार नाहींत.

**पद्मलोचना**–राणीसाहेब, तुह्मीं कुंतीची कथा आइकली आहे का? स्वतः पंडुराजानंच सांगितलं, ह्मणून तिनं पांच निरनिराळ्या नवऱ्यांपासून पांच पुत्र मिळिवलेन.

**विलासिनी**–हो हो. ही बरीक कथा मीं आइकली आहे. बरं सखे, असं जर आहे तर तूंहि मुलाकरतां फार काळजी करित असतेस. गुरुमहाराजांकडून कांहीं तरी उपाय विचारून घेऊं नयेस?

**पद्मलोचना**–हें काय विचारणं, मीं जी ही अहोरात्र त्यांचे सेवेकरितां शरीर झिजवतें तें व्यर्थच का? कुंतीप्रमाणं स्वामिमहाराजांकडून दोन वर घेतले आहेत.

**विलासिनी**–गडे, सांग सांग पाहूं, ते वर कसे आहेत? ते जपायाचे कसे? नी पुढं मुलं कशीं होतात. ह्मणजे मींहि कांहीं उपाय करून पाहीन.

**पद्मलोचना**–त्यांनीं दोन मंत्र देऊन असं सांगितलं आहे कीं, "प्रथम दिवशीं जसं नवऱ्याजवळ जायचं त्याप्रमाणं न्हाऊन माखून अंगावर सगळे दागदागिने घालून मंत्राचा जप करित बैस; ह्मणजे देव माझ्या रूपानं येऊन तुला भोग देईल" नी त्यानं संतति होईल. प्रत्यक्ष देव ह्मणे या काळीं पहिल्या सारखे येत नाहींत. साधूच्या वेषानं येतात, नी भक्तांची इच्छा पूर्ण करितात. आतां मला हळुहळू त्या तयारीला लागलं पाहिजे.

**विलासिनी**–तयारी तयारी ती काय, नी ती कसली तयारी करायची? चार जास्ती कमी अंगावर दागिने घालायचे, त्याला कसचा उशीर? नेहमींचं जें तुझं नटणं आहे तें काय कमी आहे?

**पद्मलोचना**–हात् तिच्यारे. दागिने घातले ह्मणजे झालं का? नाचायला शिकलं पाहिजे. गायला शिकलं पाहिजे. राणीसाहेब, त्याची पुष्कळ खटपट आहे.

**विलासिनी**–काय बाई एकेक तुझ्या बोलण्याचा चमत्कार तो! त्यांत थट्टाहि समजत नाहीं, नी खरंहि समजत नाहीं. सत्यवती ह्मणजे कोळ्याची मुलगी. तिच्याशीं पराशरांनीं कसं लग्न लावलं, नी पुन्हां तिला राजानं कशी वरली? आणखी तिनं आपल्या सुनांनां तरी कशा व्यासापाशीं धाडून दिल्या? बरं तें काय असेल तें असो. आतां दुसरं तूं काय ह्मटलंस? नाचणं गाणं शिकलं पाहिजे, तें कशाला?

**पद्मलोचना**–भिल्लिणीनं जसं शंकराला नाचून गाऊन प्रसन्न केलं, तसं साधुमहाराज समाधी लावून बसले ह्मणजे त्यांनां प्रसन्न केले पाहिजेत.

**विलासिनी**–अग पण आमच्या सारख्या गरती बायकांनीं नाचणं गाणं शिकूं नये असं ह्मणतातना?

**पद्मलोचना**–अहो ती गोष्ट आमची नव्हे. भट्टाभिक्षुकांच्या बायकांची ती गोष्ट. आह्मीं राजघराण्यांतल्या बायका, तो दोष आह्मांला नाहीं. उत्तरा विराटराजाची लेक, बृहन्नडेपाशीं नाचणं गाणं शिकत नव्हती का? अशा दुसऱ्या पुष्कळ क्षत्रियांच्या बायका पूर्वीं नाचत, गात असत.

**विलासिनी**–पतिव्रतेची ह्मणे त्यांनीं कायशी एक चमत्कारिक कथा सांगितली ती सांग पाहूं?

**पद्मलोचना**–हं-हं-तें का? हो सांगतें. साधुमहाराज ह्मणाले-" अलिकडे मूर्ख लोक कांहीं शब्दांचा भलताच अर्थ करून दोष मानूं नये अशा गोष्टींचा दोष मानितात, व ज्याचा दोष बाळगावा तो बाळगित नाहींत. पूर्वींच्या काळांत ह्मणे जि-

ला एकापेक्षां अधिक नवरे ती पतिव्रता. सत्यवतीला दोन नवरे, अहिल्येला दोन नवरे, तशीच तारा, अशा पुष्कळ बायकांनां दोन दोन नवरे असत. द्रौपदीला पांच नवरे ह्मणून ती सर्वांत मोठी पतिव्रता.

**विलासिनी**-या सर्व गोष्टी मीं प्रत्यक्ष एकदां स्वामिमहाराजांनां विचारतें आणि ते जर हें खरं ह्मणाले, तर आपणहि असं करूं, ह्मणजे लोक आह्मांलाहि पतिव्रता ह्मणतील; पण महाराजांची कृपा पाहिजे.

**पद्मलोचना**-यांत त्यांचं तरी काय अनहित आहे? जसं बायकांनीं एकापेक्षां अधिक नवरे केले ह्मणजे पतिव्रता होतात, तसं पुरुषांनीं एकीपेक्षां अधिक बायका केल्या ह्मणजे त्यांनां साधु असं ह्मणतात. बरं मीं तुह्मांला विचारतें, कृष्णाला किती स्त्रिया होत्या, ह्मणूनच त्याला बालब्रह्मचारी ह्मणतात. बरं, तें असो. बाईसाहेब मला तुम्हीं आपली मैत्रीण असं ह्मणवतां, नी माझ्याशीं दिखील कपट करायचंना?

**विलासिनी**-कसलंग मीं तुझ्याशीं कपट केलं?

**पद्मलोचना**-कसलं ह्मणजे? तुमच्या बोलण्याचा अर्थ असा होतो कीं, अद्याप साधुमहाराजांची, नी तुमची कांहीं ओळख नाहीं. रोज मीं पहातें, दोन दोन तास एकांतामध्यें असतां, नी माझ्याशीं चोरी अं?

**विलासिनी**-अग, रोज जी मीं एकांतात असतें ती कशाकरितां, तें तुला नाहींका माहीत? उपदेश घेण्याकरितां. समजलीस?

**पद्मलोचना**-हो तर. तो उपदेश मला आहे माहीत. राणीसाहेब, पण खरं पाहूं गेलं तर हें करणं तुह्मांला शोभत नाहीं. कारण ज्याच्या घरचं सुरळीत असेल त्यानं असं बाहेरचं

पाहूं नये. माझं मेलं तसं धड असतं तर मीं काहीं तसं केलं नसतं. अहाहा! तुमचा कसा पण अगदीं राधाकृष्णाचा जोडा!

**विलासिनी**–सखे, तें सगळं खरं. पण कृष्णाला जर एकच राधा असेल तर ना? काय सांगूं गडे, तुला सर्व माहीतच आहे. अग, सहा सहा महिन्यांत भेट दुर्मिळ, मग वरकड नांव कशाला घेतेस?

**पद्म०**–बरं तें असो. आजचं स्मरण आहेना? आज मंगळवार, तेव्हां देवीच्या पूजेची तयारी लवकर केली पाहिजे. पांच दहा प्रकारची दारू, पांच पंचवीस प्रकारच्या श्वापदांचं मांस, हें सर्व आणलेलं आहेना? नाहींतर महाराज रागावतील.

**विलासिनी**–काय गडे असेल ते असो. मीं आपली तुझ्या संगतीनं पाहिजे तशी वागते इतकंच; पण खरं जर ह्मणशील तर हीं असलीं खाणीं, नी हीं पिणीं, मीं कधीं कोणा साधूचीं ऐकलीं नाहींत नी पाहिलींहि नाहींत.

**पद्म०**–राणीसाहेब, असा जर तुह्मांला कांहीं संशय येत असेल तर समक्ष कां विचारित नाहीं? त्यांतून दुसरं असं, जसा ज्याचा भाव तसा त्याला देव पावतो. धडधडीत दगडाला आपण देव मानून पूजा करतों, त्याला जर दगडच आहे असा हट्ट धरला, तर त्याचं फळ दगडच होणार.

**विला०**–आज महाराजांची गांठ पडली ह्मणजे त्यांनां पुष्कळ गोष्टी विचारणार आहें. त्यांनीं जर समर्पक उत्तरं देऊन माझा संशय दूर केला, तर मीं हा देह सर्वस्वी त्यांनां अर्पण करीन; पण गडे, आतां तूं घरीं जाऊं नकोस. जिकडं जातेस तिकडंच नादावतेस, मग मागचं स्मरण रहात नाहीं.

**पद्म०**–तुमच्या पहिल्या बोलावण्याला माझ्याकडून तयारी. घर नी दार पाहिजे कशाला? आहे काय त्या घरांत नी त्या नव-

ऱ्यांत ! पुण्याहवाचनाला का बसायचं आहे ? तेवढ्याच कामाचा तो नवरा. आज मीं घरीं दिखील गेलें नसतें, पण तशीच कांहीं जरुरीची गोष्ट आहे, ह्मणून जाऊन येतें. ( मनाशीं ) निर्मलेला नवऱ्यानं घालवून दिली, हें इला कळवितां उपयोगाचं नाहीं. ( उघड ) मग आल्यावर कारण सांगेन. जाते तर आतां.

**विला०**–लवकर ये हो. ( दोघी निघून जातात ).

## अंक ५ वा. प्रवेश २ रा.

( नदीतटाक )

**सुभानराव**–( आपल्याशीं ) वाः वहावारे सदानंद ! तुह्मीं तर खूपच आनंद करून सोडलात. राजे लोकांनां स्वप्नांतहि जें सुख दुर्मिळ तें मीं अनुभवतों. अधाशी व उपाशी ब्राह्मणापुढें चांगलीं चवदार पांच पंचवीस पक्वान्नें वाढून ठेवलीं, ह्मणजे त्याला जसें काय खावें व काय टाकावें असें होतें, तसें त्या सुंदर छबकड्या स्त्रियांमध्यें मीं वेडा होऊन जातों. एकून श्रीमान रूपवान तरुण पुरुषांनां स्त्रिया वश होतात, असा जो आजवर लोकांचा समज होता तो खोटा ठरला. तें मन्वंतर आतां नाहीं. अलिकडे हें एक वेडगळच मन्वंतर चाललें आहे, ह्मणजे काय ? कीं बरोबरीचीं सुस्वरूप स्त्रीपुरुषें एकत्र असून कांहीं भाषण अगर सहजीं दृष्टादृष्ट झाली तर तेवढ्यावरच त्यांच्यावर भलतासलता आरोप होतो, सबब त्या कामासक्त स्त्रियांनीं आपली इच्छा, नोकर, चाकर, खासदार, यांच्याशीं पूर्ण करण्याचा क्रम चालविला आहे. नाहीं तरी असेंच पाहिजे; ज्याला पुरी लुच्चेगिरी करणें आहे, त्यानें बुढ्ढ्या अगदीं पुचाट गबाळ्या सारखें वागावें, पोषाक उंची नसून अस्ताव्यस्त असावा, डोकीवर शेंडी

पुष्कळ किंवा जास्त घेरेदार नसावी, बारीक दाभणकांठी मिशी ठेवावी, सुंदर स्त्री नजरेस पडली तर तिजकडे चोरून पहावें; पण आसपास असणाऱ्या लोकांसमक्ष तोंड बाजूस फिरवावें व तिची कोणी थट्टा केल्यास असा प्रकार आपणांस बिलकुल आवडत नाहीं, असें मुद्रेनें दर्शवावें व नेहमीं प्रौढ भाषण, एखादा भारत, भागवत अगर गीता यांतील श्लोक ह्मणावा. कोणी थट्टा, मस्करी किंवा खुबीदार भाषा बोलूं लागल्यास, तिकडे लक्ष्यच देऊं नये. आणि वेडगळासारखे-" कायहो, इष्कबाज इष्कबाज असें जें नेहमीं लोक ह्मणतात याचा अर्थ काय ?" असा प्रश्न करावा. सदोदित कांहींतरी शुष्काशुष्क बाबीमध्यें गढून गेलों आहों, असें लोकांच्या पहाण्यांत आणावें. कोणीं कांहीं सवाल केल्यास समर्पक उत्तर देऊं नये, ह्मणजे हा शुद्ध भ्रमिष्ट आहे असा सर्वांचा पूर्ण ग्रह होतो. गांजा, भांग, अफू, दारू, हीं सर्व व्यसनें करावीं, पण तीं चोरून. फक्त क्षणोंक्षणीं तपकीर मात्र नाकांत भरित रहावें. कारण हें संभावितपणा साधण्याचें व्यसन आहे. बस्स. असा काशीकरी कावाच केला पाहिजे. पहा-मीं आपल्या रूपाचें बेरूप केलें, ह्मणून या नागिणी पद्मिणी सारख्या स्त्रियांशीं मजा मारावयाला साधते. असो. हा आपला यत्न या मजलेपर्यंत येऊन थडकला. बस्स. आतां हां हां ह्मणतां निकाल. ( सक्रोध ) अरे दुष्टा प्रतापरावा, तुझ्या बेपर्वाईमुळें माझीं बायकापोरें देशोधडीस लागलीं. अन्नाला मोताद झालीं. हाच आपला प्रताप तूं जुन्या अधिकाऱ्यांनां दाखवून प्रतापराव नांव मिळविलेंस ? काय पहा बेट्याचें नांव ! प्रतापराव ! शिवाय दिवाणसाहेब, मुख्य प्रधान हीं टोपण नांवें ! अरे दिवाण्या, अरे परधानाबैला, दमखा. तुझी दुर्दशा उडवीन, तरच नांवाचा सुभानराव फाकडा होईन.

या डोक्यामध्यें अशी एकेक कल्पना भरली आहे कीं, ज्याचें नांव यंव. प्रधान, राजा, राजाचा भाऊ, सेनापति, सर्वांनांच लोळवितों. तोंवर हें माझें कपट मात्र कोणाच्या समजण्यांत येतां नये. दिवसेंदिवस हा दांभिकपणा वाढवला पाहिजे. शहरांतील बहुतेक लोकांची मजवर पूर्ण भक्ति बसत चालली आहे. आज तो श्रीवर्धनशेट जवाहिरवाला माझ्या दर्शनाला येणार आहे; त्याच्या घरची रेषानूरेषा मला माहीत आहे. त्याला त्याच्या खुणेच्या चार गोष्टी सांगितल्या कीं झालें. बहुतेक बनयाभाई आमचा देव्हारा माजवितात. मीं याच नगरींतला असल्यामुळें प्रत्येकाचें गृहछिद्र काय आहे, हें मीं जाणतों. वाः ! केवढी ही कल्पना ! ज्याला देवमनुष्य व्हावयाचें आहे त्यानें आपलें स्थलांतर करावें. तिकडून दोनचार वर्षांनीं वेषांतर करून यावें; कीं बनले साधु. झालें तर. पुढें कसें काय करावयाचें हेंच ठरविण्याकरितां गंगास्नानाचें निमित्तानें आपण बाहेर पडलों. त्या बिजल्यांनीं मला खूपच नादावलें. आतां भस्माचे ऐवजीं ही थोडी राख फांसून स्नानाचें सोंग बनवावें. थंड पाणी सोसतें कोणा लेकाला ? ( जातो ).

( वेषधारी निर्मला येते )

**निर्मला**-( सचिंत ) कांहीं नाहीं बरं. सर्व भ्रांति आहे. कोणतीहि गोष्ट अनुभवावांचून कळत नाहीं. माझ्या दुःखामुळं मला वाटत होतं कीं, धिक् तें जळ्ळं बायकांचं जिणं; पण नाहीं, तो लटका समज. सुखदुःख देवानं सारखं वाटलं आहे, कांकणभर पुरुषांनां अधिक ताप, असंच खरं. कोणत्याहि आणीबाणीच्या प्रसंगाला त्यांनां पुढं व्हावं लागतं. बायकांनीं खुशाल सुखासावलींत राहून, "मला हेंच पाहिजे तेंच पाहिजे" ह्मणून नवऱ्यावर अम्मल चालवावा. मग त्या बिचाऱ्यानं पैशाकरतां सेवाचाकरी, धन्या-

ची मन धरणी करावी, वेळ पडल्यास आपला जीव गहाण ठेवावा, पण घरची भर करावी. असं काय बरं जडजोखीम आह्मां बायकांनां ? एक नवऱ्याची जेमतेम मर्जी संभाळली कीं, आटपलं तें दिखील कोणाला ? ज्या माउलीला अब्रूची चाड आहे, जिला आपल्या आईबाप, गणगोताला, काळं लावयचं नसेल तिला. नाहींतर आमची सावत्र सासूबाई आक्काबाई ! नवऱ्याला पायानं पाणी पाजते. ते तरी कुठं सुधे आहेत ! जशास तसं. त्यांनींच माझ्या जन्माचं मातेरं केलं. पण ज्यांनां मीं केवळ जीव की प्राण अशी होतें, तेहि निष्ठुर झाले. प्राणनाथ, असा काय हो या तुमच्या बटकीनं अपराध केला ? सगळी नगरी तुमच्या सद्गुणाला वाखाणते, नी मजवरच कां अशी डोळेझांक केली ? अहो माझे पंचप्राण, ( सशोक ) मला घरांतून घालवून दिली या गोष्टीचं मला इतकं दुःख नाहीं हो. या पृथ्वीच्या पाठीवर बिचाऱ्या कित्येक बायका दुःखी असतील, पण हा खोटानाटा आळ माझ्यावर घातलात, यानंच मीं फार कष्टी झालें. मीं इतक्या आणा शपथा वाहिल्या, इतकी काकुळतीला आलें, तरी मीं लबाड ठरलें, नी मामंजींचं बोलणं प्रमाण झालं ? ( कांहीं शांत होऊन ) मीं जरी आतां किती रडरड रडलें, तरी कोण माझं समाधान करणारं आहे ? माझा मला पुढचा पल्ला मारला पाहिजे. मीं आतां पुरुष तर झालेंच. एकदां वाटतं कीं, पुरुषच कशाला झालं पाहिजे ? एरव्हीं नाहीं का दुसऱ्या हजारों गोसाविणी बैरागिणी असत. या अशा तुफान शहरांत शेजारी मनुष्याची कित्येक दिवस गांठ पडत नाहीं. जो तो आपआपल्या निरनिराळ्या उद्योगधंद्यांत चूर. मग आमच्या सारख्या बावा बैरागी भिकाऱ्यांची इतकी विचारपूस कोण करणार ? पण मेलं हें स्त्रीरूप, यानं आणखी कांहीं अनर्थ ओढवेल. याकरतां हा पुरुषवेष घेतला

आहे हाच बरा. आतां माझ्या शब्दावरून मला कुणी ओळखील हें भय आहे. याला काय युक्ति ? अं.–हां–हां. जसा वेष तशी भाषाहि बदलावी. आ–हा. झालं काम. झाली तयारी. पण आतां जावं कुठं नी करावं काय ? दुसरं काय–( सशोक ) कोण्या देवाची सेवा करून काळ ढकलावा; त्याच्यावांचून दुसऱ्या कुणाला दया येणारी आहे ? इतका माझा आज अर्धा जन्म फुकट गेला. स्वस्थ चित्तानं घटकाभर दिखील देवधर्म सुचत नसे. काय तो परमेश्वर, देवधर्म, नवरा. असं समजून त्यांच्या सुश्रुषेंत दिवस काढले; पण परिणाम चांगला झाला नाहीं. व्यर्थ रे देवा व्यर्थ ! दुःखाचे वेळीं देव. असाच जर सुखाचे वेळीं आठवला तर दुःख कां होईल ? बरं, जें जें नशिबाला येईल तें तें भोगलं पाहिजे. भगबाई, आज दोन दिवस अन्न नाहीं, त्यानं मला उभं रहाण्याचंहि अवसान राहिलं नाहीं; तर आधीं पोटापाण्याची सोय पाहिली पाहिजे. अन्न मिळेनासं झालं ह्मणजे मग लाज, भीड, नाजुकपणा सारा जातो. किती दुःख झालं नी कांहीं प्रसंग आला, ह्मणून ही मेली पोटाची आग का थांबणार आहे ? माध्यानकालापुढं अंतकालाचंहि महत्व नाहीं तर अगोदर ती सोय लावावी.

( जाते )

( सुभानराव ऊर्फ सदानंद स्वामि येतो )

**सदानंद०**–पुढें कसें काय करावयाचें हा विचार ठरलाच. तर आतां त्या उद्योगाला लागण्याची जलदी केली पाहिजे. हल्लीं जें सुख भोगतों, तें कायमचें नव्हे. कधींना कधीं हें पाप बाहेर पडणारच; मग जो घाट रचला आहे तो व्यर्थ जाईल. सध्यां चालता काळ आहे, तेव्हां करीन तें साधेल. प्रतापरावाच्या व राजाच्या स्त्रीचा आपणावार पूर्ण भरंवसा आहे. मीं त्यांनां कांहीं सांगो, मग तें खरें असो वा खोटें असो; तें त्यांनां मान्य होतें.

कांहीं गोष्टींविषयीं त्यांनीं शंका घेतली, कीं आम्ही अर्थाचा अनर्थ करून, मध्यें एक पदरचा शब्द ढकलून, " असें शास्त्रांत सांगितलें आहे." म्हटलें, कीं झालें त्यांचें तोंड बंद. हा आपल्या अनुकूल काळाचा महिमा. बस्स. चालता काळ असला, म्हणजे अन्याय, न्याय होतो. विषाचें अमृत होतें. नाहीं तर तेंच याचे उलट, असा क्रम आहे. ही संधी गेली कीं, मग शहाणपणाचा कांहीं उपयोग होणें नाहीं. मनुष्य कांहीं उद्योग करो, कितीहि शहाणा असो, पण त्याचें ग्रहमान जर इष्ट नाहीं, तर " हत्ती तेथें रति " या न्यायानेंहि करतबगारीचें फळ मिळणार नाहीं. उद्योगाला सहाय दैव होय. उद्योगानें डोंगर पालथा घालून उंदीर काढणारे, व दैवबलानें मातींत पुरलेला मोहरांचा हांडा मिळविणारे, अशीं शेंकडों उदाहरणें आहेत. त्यांपैकींच मीं एक. आपण होऊन नादी लागलेली प्रधान स्त्री, तिनें तशा वेळीं मला दगा दिला आणि आतां तीच काय पण प्रत्यक्ष राणी व शेंकडों बायका मजपुढें नांक घांसतात. एकंदरींत सार काय ? मीं अमुक केलें, करतों व करीन, असा कोणीच अभिमान वाहूं नये.

( निर्मला येते. )

**निर्मला**–हे समोरून कोण बरें येत आहेत ? हं, समजलें. हेच ते सदानंदस्वामि महाराज. मोठे साधु आहेत, असं लोक म्हणत असतात. इतके दिवस हे या नगरांत असून मला दुर्भागिणीला यांचं दर्शन घडलं नाहीं. आज हा माझ्यावर असा प्रसंग आल्यामुळं दर्शनाचा लाभ झाला. देवा, असं जर आहे तर नेहमीं माझ्यावर पुष्कळ संकटं कोसळूं देत; म्हणजे त्या निमित्यानं साधुसंताचं दर्शन घडेल. देवा, पण मजवर जो भलता आळ आला, तो माझी कोणी वैरीण असली तरी तिजवर न येवो. अगबाई, हे साधुमहाराज अगदीं जवळ येऊन पोचले. यां-

च्या पायांवर लोटांगण घालतें. पायांजवळ आश्रय मिळाला तर यांची सेवाचाकरी करून काळाचे दिवस काढावे. बरं, मीं काय काय योजून ठेवलं आहे ? हं. हां-हां. पण नांव काय सांगूं ? हो. असंच. ( सदानंदाचे पायां पडून ) महाराज, मैं दीन अनाथ हूं, मुजको पावन करो. मैं महाराजकूं शरण आया हूं.

**सदानंद०**-अरे बाबा तूं कोण आहेस ? माझे पायांवर कशा-करतां डोकें ठेवलेंस ? काय तुझें नांव गांव ? आलास कोठून ?

**उदासगीर**-महाराज मैं ब्रह्मचारी हूं. मुजको उदासगीर कहते है. बहोत रोजसे बहोत दुरसे आपका महिमा सुनकर गुरु कर लेनेके लिये आया हूं.

**सदानंद०**-( मनाशीं ) आतां थोडा साधूचा डौल घालून आपली व्याजनिंदा करून घेतली पाहिजे. ( उघड ) जिसका नाम तुम सुनकर आये हो, ओ मैं नही हूं. जैसे और लोक दुनयामें हैं, वैसा मैभि एक परमेसरका पापी प्रानी हूं.

**उदासगीर**-महाराज, सुरज कहीं कपडेमें छुपानेसे छुपता है ? वैसे आप न छुपे जावोगे. हे दीनके दयाल, मुजपर अनुग्रह करके ये संसारमोहसे पार लगाव. मैं आपकी चरनसेवा कर रहूंगा. और झोलीके टुकडे खाकर बतोर कुत्तोंके, जुतोंके नजदीक पडा रहूंगा.

**सदानंद०**-( मनाशीं ) अरे तुजसारख्या धटिंगणाकडून सेवा घेणारा हा कंगाल सन्यासी नव्हे. हा राजविलासी कामसाधू आहे. याच्या चरणसेवेला कांकणांचे नाजुक हात लागतात. ( उघड ) छोडो भाई, हमारे पांवमें क्या है ? मंदरमें जाव और भगवत्की सेवा करो.

**उदासगीर**-हे अनाथके नाथ, अगर आप मेरा कहेना न मानोगे तो मैं चरनपर जान देके मर जाऊं.

**सदानंद०**-( मनाशीं ) अरे वाः ! हा बरा गळेपडू धंदा ! आतां कसें ! मीं साधूचें सोंग आणल्याप्रमाणें याला जवळ केला, तर न जाणों, आपलें छिद्र उघड होईल. अनादर करणें हें या वृत्तीला शोभत नाहीं; तर याची पुरी चौकशी करून त्याप्रमाणें काय तें ठरवावें ( उघड ) अच्छा. बेटा तूं कहांसे आया ? तेरी जात कोनसी, तेरे माबापका क्या नाम, सब कह देव.

**उदासगीर**—महाराज कैलासपति सदासिव मेरा पिता, पार्वती माता मेरी मय्या, धरत्रि हमारी बस्ती. भीक हमारा बतन और मानव ये मेरी जात.

**सदानंद०**-( मनाशीं ) खऱ्या उदास वृत्तीचे उद्गार कांहीं निराळेच असतात. पहा याच्या या साहजिक भाषणामध्यें भक्तीची कशी पूर्ण छाया भरून गेली आहे. खरा साधु तो हा; व खोटा तो मी. असो. याजपासून कोणतीच भीति बाळगण्याचें कारण नाहीं; शिवाय याला आपली प्राकृतभाषाहि येत नाहीं. ( उघड ) बेटा, उपदेश लेना ये तुह्मारी मनीशा है, मगर खूप गौरकर; इन् जवानीके दिनोंमें तेरेसे ये फकीरी कैसी होगी ? इस बिखयसे बडेबडे बिघड गये. बिसवामितरऋषीकी क्या हवाल हुवी ? कुत्ताबन, कामिनके पीछे था.

**उदासगीर**—महाराज, पहिले ओ राजे थे. सब संसारसुखका भोग लिये फिर साधु बने थे, इस सबब ये उनका अहवाल. मैंनें आजतक् शक्कर क्या चीज है, सो चखी नहीं, तो मुजको शक्कर खानेकी बिच्छा कैसी होगी ?

**सदानंद०**-(मनाशीं) अरे वाः ! हा प्रत्येक शब्दांत मला निरुत्तर करूं लागला ! आपलें भांडवल संपूं देतां कामां नये( उघड ) अच्छा, चलो अभि मेरे साथ.

( दोघे जातात )

## अंक ५ वा. प्रवेश ३ रा.

( विदूषक, सूत्रधार )

**सूत्रधार**—अहो विदुषकपंत, नमस्कार. आज ही स्वारी कोणीकडे निघाली ?

**विदुषक**—नमस्कार सूत्रधारा, हरिद्वारा, साडेसातीचा फेरा, शहाण्याच्या पोरा, वहावारे तेरा तोरा, कसपटा केरा, हाच आमचा तुह्मांला शेरा.

**सूत्र॰**—शाबास ! काय हा तुझा अर्थगौरव, भाषणालंकार, प्रास पद्धति ! शर्थ आहे बुवा तुमच्या अक्कलेची !

**विदु॰**—अहो गृहस्थ, या अक्कलेवर मीं मोठा हुद्दा मिळविला आहे.

**सूत्रधा॰**—या तुमच्या गुणाला लुब्ध होऊन तुमचा सन्मान करणाराहि पण मोठा विद्वानच असला पाहिजे.

**विदुषक**—मोठा अरण्यपंडित असून फारच दयाळू. केवढें त्याचें पोट ! किती नामी त्याचा कोरडा ! कसला त्याचा विलायती करकरीत कुरकुरीत, चुरचुरीत, बुटाचा थाट ! आणि त्याहून शाबासरे मेरी पाठ !

**सूत्रधार**—विदुषका, या तुझ्या नागमोडी खोल भाषणांचा अर्थ उघड करून मला सांग. अरे, मोठें पोट असणें हें का विद्वत्तेचें लक्षण ? बरें, त्याचे दयाळूपणाचा आणि तुझ्या पाठीचा संबंध काय ?

**विदुषक**—अहो सूत्रधारपंत, तर्क करण्याचें कामीं तुमचें नांव तर्कटी असें जगजाहीर आहे; पण येथेंच कसा तुमच्या अक्कलेनें हिसका दिला ? अहो अवघड फक्कड, या माझ्या सा-

ध्या सुळसुळीत जाणाऱ्या भाषणाचा जर तुह्मांला अर्थ होत नाहीं, तर एखाद्या मादरचोद स्वामीचें लटपटगुंडा शास्त्र ऐकलेंत ह्मणजे तुमच्या अक्कलेचें सोडावॉटर बनून जाईल.

**सूत्रधार**–बरें, तुह्मांला हुद्दा मिळण्याचें कारण सांगा पाहूं ?

**विदुषक**–हो, हो, त्या कामगिरीवर मीं मोठी सर्किपाटी मिळिवली आहे.

**सूत्रधार**–हां–हां–याहि भाषेचें तुला ज्ञान आहे ह्मणा !

**विदुषक**–ज्ञान ह्मणजे काय विचारतोस; मीं मोठा गाजरबेट ( ग्रॅज्युएट ) आहें. जी (ग) एफ् (फ) डी एच (ढ) आर (र) हे सारे किताब माझे नांवामागें लागतात. आतां याचा अर्थ ऐक. जी- गर्विष्ट, एफ्- फजितखोर. डी एच-ढ आणि आर ह्मणजे रडवा इत्यर्थः

**सूत्रधार**–( मनाशीं ) कोण्या नक्षत्रावर हें रत्न झालें, ईश्वर जाणें ! ( उघड )बरें, आटप. सरटीपिकिट दाखव.

**विदुषक**–हो, हो. आपलें हत्यार आपलेपाशीं. उचल्याचा धंदा करणें आहे तर मग खिसे कापण्याची कातर जवळ पाहिजेच. बाबारे, विंचवाचें बिऱ्हाड विंचवाचे पाठीवर. अशा वस्तु नेहमीं मिळणाऱ्या नव्हत; शिवाय त्यांवर तुह्मां सारख्यांचा डोळा.

**सूत्रधार**–पण पाठीवर सरटीपिकिट बाळगण्याची ही तऱ्हा कसची ?

**विदुषक**–याचें कारण हल्लीं सर्किपाटीवांचून कोणतेंच काम भागत नाहीं. परवांचे दिवशीं मीं एका महमद बिन डिसोझा दिक्षिताचे घरीं त्याचे मुलाचा सुन्ता करण्याकरतां गेलों, तेथें दुसरेहि बरेच सुनी, यहुदी, इस्त्रायल, असे भिन्न भिन्न शाखेचे

पादरे व सुलतान ब्राह्मण जमले होते; पण एकापाशींहि सर्टि-फिकेट नाहीं. मीं लागलेंच माझें त्यांनां दाखवून मोठा सन्मान मिळविला. अलिकडील जनरूढी अशी आहे कीं, श्राद्धाच्या निमंत्रणाला, स्वयंपाकाच्या नोकरीला, अधिक तर काय, नापिकाला देखील आपल्या पोलादी हत्यारांबद्दल डागदाराचें सर्टीपीठ बाळगावें लागतें. कां बुवा लोकांचें शहाणपण शिखरास पोंचलें कीं नाहीं?

**सूत्रधार**—मित्रा, तूं ह्मणतोस अशा प्रकारचा क्रम चालूं आहे; पण तो सर्वत्र नाहीं.

**विदुषक**—सर्वत्र सर्वत्र काय तुझें आतां कपाळ राहिलें आहे? परवां दुसरी एक अशीच जम्मत उडाली. एका आकाशांतील बापाची दीक्षा घेतलेल्या पंचरशी बड्या धेंडाच्या तरुण एज्युकेटेड मुलीचा पुनर्विवाह व्हायचा होता.

**सूत्रधार**—अरे, असा हा चावटपणा मला आवडत नाहीं. बोलणें असेल तर सभ्य व सरळ असें बोल. पंचरशी याचारे काय अर्थ?

**विदुषक**—अरे ज्याला जात नाहीं तो पंचरशी. तपशील ऐक. पायांत विंग्रजी विष्टाकीन, त्यांवर ब्राह्मणी जोडा, त्यावर वाऱ्यानें उडणारा बिन कासोट्याचा परकऱ्या, चोळी ऐवजीं मोठ्या कामगाराप्रमाणें अर्ध्या अस्तनीचे पोलके, नांकास चुन्यासारखी पांढरी पूड, याचें नांव पंचरशी.

**सूत्रधार**-बरें तें असो. विवाहप्रकरण काय तें चालूं दे.

**विदुषक**-हं, ऐक तर; अलिकडील सांप्रदायाप्रमाणें स्वतः मुलीनेंच नवरा पसंत करण्याची चाल आहे. मुलीला पहिल्या लग्न संबंधानें बरेंच अनुभवजन्यज्ञान, शिवाय शिकलेली. तेव्हां जमलेल्या होतकरू नवरोजींजवळ पुरुषपणाचें सरकीपीट मागूं लागली. त्या जुन्या चालीच्या वेड्यांनां हें गूढ समजेना; पण

आह्मीं पडलों जाडे विद्वान ! तेंव्हां मीं पुढें सरसावून तिला झट प्रश्न केला कीं, तूं आपलें स्त्रीपणाचें सरकीपीठ दाखव.

**सूत्रधार**–शाबास शाबास ! त्या वेळीं बरी बहार केलीत. पुढें ?

**विदुषक**–पुढें काय, तिच्या व आमच्या सरटीपिटाची झाली टक्कर. मग जो मजा उडाला, कीं यंवरे !

**सूत्रधार**–एकून तुम्हीं दोन बायकांचे मोठे भाग्यवान यजमान झालां.

**विदुषक**–तें कांहीं विचारूंच नका. हा दुसरा समंध जडल्यापासून काम ना धाम. अपेशांत ( आफिसांत ) तीच जाऊन स्वतः साहेबाचें काम उरकते, ह्मणून तिच्यावर खूस मर्जी. त्यामुळें माझेमागें कांहीं लचांड उरलें नाहीं. फक्त घरचा स्वैंपाक, लुगडें धुणें, कधींकाळीं आमच्या मडमीवर साहेबांच्या कामाचा फार त्रास झाला तर पाय चेंपणें, बस्स. यावांचून–उं, हुंः–

**सूत्रधार**–काय हो, एवढे प्रतिष्टित गृहस्थ ह्मणवितां, त्याचें असें लक्षण ?

**विदुषक**–अहो, ही एक बड्या लोकांत आपली गणना करून घेण्याची आयडिया.

**सूत्रधार**–बरें, या भाषेचा अभ्यास कधीं पासून केलात ?

**विदुषक**–बाबारे, या काळांत निदान थोडें तरी या भाषेचें ज्ञान पाहिजे. नोकरी मिळविण्याची आतां आशा नाहीं ह्मणा, परंतु एखाद्या कठीण प्रसंगांतून सुटका होण्याची सवड असते.

**सूत्रधार**–ती कशी काय समजूं दे.

**विदुषक**–संसारांत घरच्या मनुष्यांनीं एकमेकांची सोय करावी हें तर खरें ? मीं एके दिवशीं डोकीवरून बायकोचा खाना पोंचविण्याकरितां बंगल्यांत गेलों, तों आमचें कुटुंब साहेबाज-

वळ अगदीं कामांत गर्क. तेथें जाऊन त्यांच्या कामाची न जाणतां हरकत केली. मग काय विचारतां? साहेबी हरकतीमुळें कायद्याप्रमाणें आह्मीं अपराधी ठरलों.

**सूत्रधार**—मग त्यांतून कसा निभावलास?

**विदुषक**—बस्स. कामाच्या हरकतीमुळें साहेबांचे डोळे लाल होणारच. मग काय, बुटाच्या लाथांचा आमच्यावर वर्षाव. आम्हीं एक्स्क्यूज, थ्यांक यू, सर, असें ह्मणतों, साहेब वर बुटाच्या लाथा मारतो; असा बराच वेळ गेला. ही पहा पाठ. मोळे मारलेल्या बुटाचा कसा गोपद्मासारखा कायमचा ठसा. हेंच तें आमचें सर्टीपीट; येथें आला हरिदास मूळपदावर.

**सूत्रधार**—मारांतून सुटका कशी झाली तें समजूं दे.

**विदुषक**—साहेबाचा बूट थांबेना; तेव्हां असा विचार केला कीं, साहेब फार गरम झाला आहे, तो अशा हलक्या इंग्रजीनें शांत होणार नाहीं, ह्मणून मोठी इंग्रजी भाषा सुरूं केली; तेव्हां पार पडलों.

**सूत्रधार**—इंग्रजी मोठी भाषा! ती कशी काय?

**विदुषक**—मग साहेबाला अशी विनंती केली, साहेब रागावूं नका; हमारी लेडी तुमारी वाइफ, हमारी लेडी तुमारी वाइफ, असें ह्मणतांच साहेब हंसून शांत झाला. मला ज्या शहाण्या मनुष्यानें हे इंग्रजी दोन शब्द शिकविले, त्याचे उपकार मानले पाहिजेत. लेडी ह्मणजे चूक व वाइफ ह्मणजे माफी. मिळून हमारी लेडी तुमारी वाइफ—ह्मणजे आमची चूक आहे तुह्मीं माफी करा. सूत्रधारा, हे दोन शब्द असे अमोल आहेत कीं, कोणी मनुष्य कसाहि रागाला आला असो, त्याला जर—हमारी लेडी तुमारी वाइफ असें ह्मटलें कीं, विरघळला त्याचा राग. सूत्रधारा, तुझ्यावर प्रसंग आल्यास या इंग्रजीचा उपयोग कर.

**सूत्रधार**-चल मूर्खा, आग लागो त्या तुझ्या इंग्रजीला व त्या तुझ्या गुरूला. आज ही स्वारी निघाली कोठें?

**विदुषक**-मीं आज तीन दिवसांपासून तुमचा शोध करित आहें. अंधारकोठडी, मोठा तुरुंग, पांजरपोळ, अशा दोन तीन जागीं शोध केला, पण पत्ता नाहीं; तेव्हां अंतरदृष्टीनें विचार करतां असा अंदाज झाला कीं, तुमचा शोध करणें तो कोठें? घराच्या वळचणीला, रात्रीचाच केला पाहिजे, ह्मणून येथें येणें झालें. आज हा काय प्रकार चालला आहे?

**सूत्रधार**-हा मीं एका नवीन नाटकाचा प्रयोग करित आहें.

**विदुषक**-नाटक? मग मला कां निमंत्रण नाहीं? अरे बाबा, नाटक या वऱ्हाडांत विदुषक सूत्रधार हीं नवरानवरी. नवरा जर त्यांत नाहीं तर तुला नवरीला कोण पुसणार? बरें, नाटक जें करावयाचें त्यांत हा असा हलकटपणा? बस्स. उद्यां तुजवर फिर्याद. तुजवर दोन अपराधांची फिर्याद. काय तो सदनंद! ती पद्मलोचना! कायरे हा चावटपणा?

**सूत्रधार**-तूं ह्मणतोस तसा प्रकार मुळींच नसून, दुष्ट लोकांचें शेवटीं कसें शासन होतें, हाच सिद्धांत यांत केला आहें. चल मूर्खा, तूं फिर्याद करून माझें काय होणार?

**विदुषक**-काय होणार? चांगलासा वकील देऊन तुझी खोड मोडणार.

**सूत्रधार**-पण हें न्यायी दौलतराव महाराजांचें राज्य आहे.

**विदुषक**-हो, हो. माझें तरी ह्मणणें तेंच. दौलत ह्मणजे पैसा, पैशाचा न्याय, व पैशाचें राज्य. तो मजपाशीं आहे; ह्मणून त्या जोरावर आजवर शेंकडों अपराध छपिवले; पांच दहा खून जिरिवले, समजलास? कायदा याचा अर्थ तुला सांगू?

**सूत्रधार**-हो हो. पडूं दे प्रकाश.

**विदुषक**-हिअर ह्मणजे ऐका,-( शाळेंतील लहान मुलासारखे हेल काढून ) खोटें कसें बोलावें व खोटें कसें ल्याहावें, आणि खऱ्याचें खोटें कसें करून दाखवावें, हें कायदा ह्मणजे न्यायशास्त्र शिकवितें. कायद्याचे मुख्य भाग दोन, एक काळा व एक गोरा. गोऱ्या कायद्यानें गोऱ्यांचें उखळ पांढरें व काळ्या कायद्यानें काळ्यांचें तोंड काळें. बरें सूत्रधारा, तूं जो हा नाटकाचा धंदा मांडला आहेस, यांत आतां मजा राहिली नाहीं; त्यापेक्षां जर तुला पैसा मिळवावयाचा असेल तर तूं हें माझ्या गुरूचें इंग्रजी शीक-हमारी लेडी तुमारी वाइफ ! अरे, या विद्यासाधनानें ज्या लोकांनां कोणी पूर्वीं+ + जवळ बसवून घेत नसत त्याच लोकांपैकीं आज कित्येक मोठे हुद्देदार आहेत.

**सूत्रधार**-अरे, असे भलतेसलते शब्दांचे अर्थ करून लोकांनां फसविणारांची पुढें कशी दुर्दशा होते, हेंच तुला दाखवावयाचें आहे तर चल आपण त्या ढोंगी सदानंदाकडे जाऊं.

( दोघे निघून जातात )

## अंक ५ वा. प्रवेश ४ था.

( स्थळ-सदानंदाश्रम )

**सदानंद०**-( विलासिनी व पद्मलोचना नमस्कार करितात ) इच्छित प्राप्तिरस्तु. भक्तांनों, हा पहा, आज नवीन एक चेला आणला आहे; पण या चेल्यापासून मला कांहीं उपयोग नाहीं. तो बहुत दिवस अरण्यवासी असल्यानें त्याला इकडील रीत कांहीं नाहीं. शिवाय त्याला तुमची भाषा येत नाहीं. ( मनाशीं ) हें असें आधींच सांगून ठेवलें ह्मणजे माझ्याशीं यांनां स्वेच्छ वागण्याला शंका वाटणार नाहीं.

पद्म०-महाराज आपण साधु. आपणांशीं उघड मनानें वागण्याची आम्हांला अगदीं भीड वाटत नाहीं; पण परक्या-

विला०-हो आम्हीं कुलस्त्रिया पडद्यांत राहणाऱ्या; परकी मनुष्या देखत वागण्याची लाज वाटते.

सदानंद०-छे, छे, त्याविषयीं तुम्हांला संकोच वाटूं देऊं नका. तो एक मनुष्याकार चालता बोलता दगड आहे.

पद्म०-(राणीस) असं असलं तर मग कांहीं भीति नाहीं.(साधूस) महाराज, आज प्रसादाला उशीर झाला. आतां तयारी करूंना ?

सदा०-आम्हांला उशीरचसा काय, परंतु त्याची स्मृति देखील नसते. फक्त तुमच्या इच्छेकरतां प्रसादग्रहण. ( मद्यमांसादि सर्व भोजनाची मांडणी होते व दोहों बाजूंस दोघी बसतात )

विला०-साधुमहाराज, आज आमच्या हातानं भोजन व्हावं असा आमचा नवस आहे.

सदा०-फार उत्तम. भक्तांची कामना पुरविण्याकरितांच हा देह. ॥ सतां स्वयं परहितेषु कृताभियोगः ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति ॥ ( दोघी त्यास भरवितात. ) भक्तांनों, हा घ्या प्रसाद.

( दोघींच्या तोंडांत घांस देतो )

( याप्रमाणें भोजनाचा प्रकार चालतो. मधून मधून मद्यपान होतें, व कांहीं वेळानें सर्व विधि आटपतो )

उदासगीर-( मनाशीं ) शिवशिव ! कायग बाई हा अमंगळपणा ! कोण ही दुर्गंधी ! जिवंतपणीं नरकवास म्हणतात तो हाच. देवा ! सगळ्याच जगामध्यें कारे असा तमाशा चालला आहे ? कीं जेवढं म्हणून मोठं तेवढं खोटं ? हा मेला मोठा साधु म्हणवतो, नी ही याची वागणूक ! देवा ! अशा पाप्यांनां कशालारे जिवंत ठेवलंस ? कां यांचे डोळे झांकित नाहींस ? या मेल्या

ढोंगा पाप्याची जेव्हां पहिल्यानं गांठ पडली, तेव्हां मला किती तरी संतोष वाटला ! मीं माझ्या या अशा प्रसंगामुळं कांहीं खरं कांहीं खोटं असं बोललें, नी जरी त्यांत कांहीं कोणाचं अनहित केलं नाहीं, तरी साधूशीं प्रतरणा करणं हें बरं नव्हे, असं मला वाटून माझंच मन मला खात होतं, पण तसं केल्यानंच बरं झालं, असं मला आतां वाटूं लागलं आहे. एकंदरींत कोणाच्या मनाची खरी परीक्षा केल्यावांचून कुणाला वंदू नये, नी निंदूंहि नये. या मेल्याचा तोंडवळा माझ्या पहाण्यांतला आहे. हा कांहीं कुणी नवखा नव्हे, इथल्याच कुणी लुच्चा लबाडानं हें साधूचं ढोंग माजिवलं आहे. कोण असावा बरं हा ? अं (कांहीं वेळ विचार करून) तो मेला सुभानराव तर नव्हेना ?—होय तोच हा. अग बाई ! काय हें याचं धाडस ! नी केवढं तरी हें कपट ! ! पण सर्वांनांच कशी भूल पडली ? कोणीच कसं याला ओळखलं नाहीं ! थोरांच्या घरीं अंधेर ह्मणतात तो हाच. जो तो आपआपल्या बडेजावींतच चूर. अशा पडद्यांतल्या गोष्टीकडं लक्ष जातं कोणाचं ? ह्मणून लुच्चे लबाड लोकांनां थोरांच्या घरीं पाहिजे ते खेळ करतां येतात. एखादं फळ वरून कसं सुरेख दिसतं, फोडून पहावं तों आंत बुचबुच किडे; तशी मेल्याची करणी. तशाच या काळतोंड्या बायका. या माझ्या सासूनं तर सर्व दुर्गुणांचा झेंडा मिरविलान, आणखी इच्या संगतीनं या राणीसाहेबांनींहि ताळ सोडला. या मेल्या पोटजळल्या विजवल्या बायका अशा बेफाम झाल्या ह्मणून पुरुषांचा विश्वास उडत चालला. मेल्या चांडाळणी करणी करणाऱ्या करून जातात, पण त्यांचं प्रायश्चित्त सर्वांनां घ्यावं लागतं.

पद्म०—राणीसाहेब, मघां तुह्मीं महाराजांनां काय विचारणार होतां तें आतां विचारा.

**विला०**—पण महाराजांनां राग येईल; हुकूम होईल तर—

**सदा०**—माझें खुलें दरबार आहे. मला माझे भक्तांचा रागच नाहीं.

**विला०**—महाराज, दारू पिणं मोठं पाप आहे असं कित्येक ह्मणतात.

**सदा०**—असें ह्मणणारे झक मारतात. ते शुद्ध पशु होत. वा:, या मद्याची काय योग्यता आहे ! याचं वर्णन मला एक मुखानें कधीं करतां येणार नाहीं. हें सागरमंथनापासून निघालेल्या चवदा रत्नांपैकीं प्रधान रत्न. हें आदिशक्तीचें मुख्य पेय. मात्र इतकेंच कीं, नीच जातीनें स्पर्श करणें हें मोठें पाप आहे. कारण हें शक्तीचें पेय, त्यास शक्तिउपासकांवांचून स्पर्श करण्याची दुसऱ्याची योग्यता नाहीं; ह्मणून इतर लोकांनां दोषाची भीति बुद्ध्या सांगितली आहे. जो प्राणी मद्यप्राशन करतो त्याला कसाहि दुःखाचा प्रसंग सोसावा लागला तरी त्याची त्याला कांहींच पर्वा वाटत नाहीं. त्याचें लक्ष्य ईश्वरा ठिकाणीं पूर्ण लागतें, त्याची आनंदवृत्ति होते; अशा लौकिक व शास्त्रदृष्टचा हें मद्य फार योग्यतेचें आहे. हें मद्यप्राशन करून सर्वच देवीउपासक होऊन मोक्ष प्राप्त करून घेतील, मग सर्वच समान झाले तर आपलें महत्व रहाणार नाहीं, असा स्वार्थसाधू धूर्त लोकांनीं विचार करून, "मद्य पिणें हें पाप आहे," असें एक वाक्य शास्त्रांत घुसडून दिलें. शुक्र या नांवाचा एक दैत्याभिमानी लोभी ब्राह्मण होता, तो मद्यप्राशनानें फसला, ह्मणून त्यानें आपला मूर्खपणा छपविण्याकरितां या वाक्याचा उपयोग केला. अमृतपानाचा निषेध आहे असें जर चोरव्या राहूनें सांगितलें, तर सत्य मानावें काय ? तद्वतच वरील प्रकार आहे.

**पद्म०**—बरं महाराज, मांस खाऊं नये असं ह्मणण्याचें कारण ?

**सदानंद**०-पूर्वींप्रमाणेंच हा प्रकार. हें जर खरें असतें तर ईश्वरनिर्मित जी ही मानवजाति आहे, हिचें पोषण कसें होईल ? ॥ जीवो जीवस्य जीवनं ॥ या श्रुतिवाक्याला बाध येतो. ईश्वराचा आवडता प्राणी जो हा मानव, त्याच्या भक्षणार्थ मच्छ, मृग, मेष, इत्यादि जीव उत्पन्न केले आहेत. राम लक्ष्मणादि पूर्वींचे देव व मोठमोठे ऋषी, यांचें मुख्य खाद्य मांस असे. याविषयीं शास्त्रपुराणांमध्यें अनेक आधार आहेत. घृत शर्करादि पदार्थांपासून शरिराला जडत्व येतें, आणि ते नियमापेक्षां जास्त खाण्यांत आले कीं त्यांचा वीट येतो; प्रसंगीं वांति होण्याचें भय आहे. शिवाय कृमि उदरशूलादि विकारांचा विशेष संभव. तसा प्रकार मद्यमांसाचा मुळींच नाहीं; तीं जसजशीं सेवन करावीं तसतशीं अधिक रुचकर व गुणकर होतात. या विषयावर जितकें सांगावें तितकें कमीच आहे.

**उदासगीर**-( आपल्याशीं ) अहारे मेल्या पाप्या ! काय मेला मन मानेल तसं बरळत सुटला आहे ! लोक ह्मणे,-" मद्य पिऊं नये असं ह्मणतात ते झक मारतात ". चंडाळा, तुला शेण खाणं असेल तर खुशाल खा; लोकांनां कां दोष ? मेल्या, तुझ्या पुढं जर पांच पकान्नं मांडून ठेवलीं तर तुला त्यांची काय चव ? डुक्कर जसं सर्व सोडून घाणींत तोंड घालतं तसं तुझं तोंड घाणींत जाणार. रामानं असं केलं नी, कृष्णानं तसं केलं; त्यांची साक्ष तुला माकडाला कशाला ? त्यांनीं कांहीं असं केलं नाहीं. जरी केलं असलं तरी बाकींचीं त्यांनीं पुष्कळ सत्कृत्यं केलीं. रामानं रावण मारला, तुला जर एका गाढवानं लाथ मारली तर त्या थोबाडाचे तुकडे होतील. कृष्णानं दहा गांव अग्नि खाल्ला, तुझ्या त्या मुसकटाला एक कोलीत लावलं, तर तें जळून त्याचे कोळसे होतील.

**विलासि०**–स्वामिमहाराज, स्त्रियांनीं परपुरुषांशीं संग केला तर मोठं पाप आहे असं ह्मणतात याचं काय कारण ?

**सदानंद०**–भक्तांनों, याविषयीं मीं पूर्वी तुह्मांला अनेक गोष्टी सांगितल्या आहेत व पुढेंहि सांगेन. आतां माझी समाधीची वेळ झाली. तुमचा आग्रहच असला तर आतांच सांगतों.

**उदास०**–( आपल्याशीं ) समाधि लावतो; कसली कपाळाची ? तुझी पुरी समाधि लागेल तर बरं होईल. या नगरीचं अर्धं पाप जाईल.

**विलासि०**–आतां सवड नसली तर उपाय नाहीं; पण मेली ही हुरहुर नको.

**सदानंद०**–गोष्ट खरी आहे. मनांत संशयशेष उपयोगाचा नाहीं. मूर्ख लोक जे आहेत, ते कोणत्याहि विषयाचें खरें तत्व न जाणतां मनाची भलतीच समजूत करून घेतात. तुह्मीं ह्मणतां तसा प्रकार असता तर आज जे क्षत्रीय पृथ्वीवर आहेत ते दिसले नसते. परशुधरानें एकवीस वेळां निःक्षत्रीय पृथ्वि केली, तेव्हां क्षत्रियांच्या स्त्रियांनीं ब्राह्मणांपासून प्रजोत्पत्ति करून घेतली, मग दोष कोठें राहिला ? हें पहा–सुगंध हा नांकाला घ्यावासा वाटतो, मधुर भाषण कानाला गोड वाटतें, तद्वत या इंद्रियांचे जे जे धर्म आहेत, तिकडे त्यांची सहाजिक गति होते. चांगली सुंदर वस्तु पाहिली ह्मणजे तिजविषयीं इच्छा होणें हा मनाचा धर्म आहे व ती वासना पूर्ण झाली नाहीं तर मन स्वस्थ होत नाहीं; वासना हीच जनन मरणाचें उपादान कारण आहे. ॥ अंते मति सागती ॥ अंतकालीं जेथें मनाची गति तीच अवस्था पुढच्या जन्मीं; अशी परंपरा चालली ह्मणजे देहाला स्वास्थ्य नाहीं. ॥ पुनरपि जननं, पुनरपि मरणं ॥ पुनरपि जननी जठरे शयनं ॥ मग मोक्षप्राप्ति ती कधीं मिळणार ? इतका अनर्थ हा कशानें ?

तर वासना नष्ट न झाल्यानें. करितां जी जी मनाची वासना नाम इच्छा होईल ती ती पूर्ण करून देहाला सौख्य द्यावें. देह हाच परलोक प्राप्तीचें साधन आहे. ॥ आत्मानाम सततं रक्षै, दारैरपि धनैरपि ॥ धनदारादि स्वकीयांचा नाश झाला तरी चिंता नाहीं; पण हरयत्नानें देहाला ज्या गोष्टीनें सौख्य होईल तें करावें; असा जर सत्य सत्य प्रकार आहे तर भक्तांनों, तुमच्या संशयास जागा नाहीं.

**उदासगीर**–( मनाशीं ) तुला लागला आहे समंध, ह्मणून अशी बडबड चालवली आहेस. जेव्हां एखादा चांगला पंचाक्षरी भेटेल, तेव्हां तुझे दांत पडतील. मला पुष्कळ राग येतो; पण मीं पडलें बायको माणूस; त्यांतून अशा संकटांत ! देवानं जर तशी संधी आणली तर पाहीन. काय मेल्याचं पांडित्य ! ह्मणे, असं वाक्य आहे, नी तसं आहे. कोणत्याहि गोष्टींचं मूळ, नी शेवट सोडून मधलंच कांहीं तरी सांगायचं. कोणी दुखणेकरी गांवाला चालला, वाटेंत नदी ना ओढा, त्याला जर तहान लागून प्राण जाऊं लागला तर तशा वेळीं त्याला कुणब्याचं पाणी पाजावं असं सांगितलं ह्मणून सर्वांनींच पाहिजे त्यावेळीं कुणब्याचं पाणी प्यावं, अशाचपैकीं तुझीं शास्त्रं; आग लागो त्या शास्त्रांला.

**सदानंद**०--असो, स्त्रियांनों, बरेच दिवस झाले, मीं आपला पूर्वपंथ सोडून भक्तांकारणीं हा नवीन मार्ग स्वीकारला; पण तो या कालांत कांहीं उपयोगाचा नाहीं. आमचे गुरुबंधु मच्छिंद्रनाथ पद्मिणीच्या सहवासाला राहिले ह्मणून लोक त्यांची निंदा करूं लागले. आह्मीं साधुलोक वरून कसे जरी वागलों तरी आमचें सर्व लक्ष सदासर्वदां निरंजनीं एकाग्र होऊन गेलें असतें. जनक-राजाचा एक पाय विस्तवामध्यें व दुसऱ्या पायाला त्याची सुंदर स्त्री पीनपयोधारानें नवनीत मर्दन करित असे, ह्मणून अग्नीपासून

दुःख किंवा नवनीता पासून सुख, हे विकार त्याला मुळींच नसत. तीच स्थिति सार्वकाल साधुजनांची असते. हें वर्तन हल्लींच्या अज्ञानी व दुराभिमानी लोकांनां कसें पसंत होईल ?

**विलासिनी**—महाराज, आह्मीं अज्ञान स्त्रिया, भलतंसलतं विचारतों ह्मणून का राग ?

**पद्मलोचना**—गुरुमहाराज, ही तनु, मन, धन, सर्व आपल्या पायीं अर्पण केलं आहे. आपल्यावांचून इष्ट असं काय आहे ? असं असून जर आह्मांला सोडून जाणार, तर आमचा प्राणहि बरोबर न्यावा हेंच मागणं आहे.

**सदानंद०**—स्त्रियांनों, तुह्मीं संसारी लोक, आमचा फकीरी बाणा, हें जमावें कसें ? हा नवरा, हीं माझीं बायकामुलें, हें माझें गृह, द्रव्य, यांकडे दुसऱ्यानें पाहूं नये, याचा भोक्ता मीं, असा ज्या अज्ञानी लोकांचा समज त्यांचा सहवास सुखावह नाहीं. अहाहा ! धन्य त्या लोकांची. तुकारामसाधूनें व कबिरानें प्रत्यक्ष आपल्या स्त्रियाहि दुसऱ्याला अर्पण केल्या. अहीची चंद्रसेना इनें प्रभु रामचंद्राकरितां आपल्या नवऱ्याचें मरण कळिवलें. हरिश्चंद्रानें ब्राह्मणाची दक्षणा देण्याकरितां स्वस्त्रीचा विक्रय केला, श्रियाळानें यतीला पुत्रमांस भोजन घालून संतुष्ट केलें. अशा हजारों इतर गोष्टी आहेत. अनुसूयेनें नग्न होऊन अतिथी जेवूं घातले; भेदाभेद दृष्टीच नाहीं. देवब्राह्मण, यती, तापसी, यांवर काय तो विश्वास. अशी निरभिमान स्थिति होण्याला गुरोपदेश पाहिजे, ह्मणजे तदाकार वृत्ति होते.

**पद्मलोचना**—गुरुमहाराज, आह्मांला आपण उपदेश करावा ह्मणजे आमचंहि मन शुद्ध होईल.

**सदानंद०**—काय ? तुह्मांला उपदेश पाहिजे ? उपदेश ही

वस्तु तोंडानें उच्चारण्याला सोपी आहे; पण ती घडणें परम दुर्घट आहे बरें.

**विलासिनी**-आपली जर आमचेवर पूर्ण कृपा आहे तर कांहीं कठीण नाहीं.

**सदानंद**०-पहा बरें, पूर्ण विचार करा. मग जर, कांकूं केलें तर ( रागानें ) शापून भस्म करीन. आह्मीं साधुलोक दयार्द्रमनाचे खरे, पण अपमान झाला तर अग्नीसारखे प्रखर.

**पद्मलो**०-महाराज, स्वतःचा प्राण जर आपल्यावरून ओंवाळून टाकला आहे, तर यापेक्षां अधिक तें काय पाहिजे? वाटल्यास आमची परीक्षा घेऊन नंतर उपदेश करावा.

**सदानंद**०-कां? विलासिनी, ही गोष्ट खरीना? मीं तुमच्या मनाचा निग्रह पहाण्याकरितांच बुद्ध्या पाहिजे तें साहस करण्यास सांगणार.

**विलासिनी**-माझा पूर्ण निश्चय झाला आहे. साधूशीं प्रतारणा केली तर माझं कधीं बरं होणार नाहीं; हें मीं समजून आहें.

**सदानंद**०-हें खरें असेल तर चला पाहूं, या क्षणीं तुह्मीं आपापल्या नवऱ्याचें शिर कापून आणा, ह्मणजे तुमच्या स्थिरमनाविषयीं माझी खातरी होईल.

**पद्मलो**०-हात् तिच्यारे, एवढंचना? तें माझं काम. चला राणीसाहेब.

**विलासि**०-महाराज पण पुन्हां ते जिवंत होतीलना?

**सदानंद**०-( एकीकडे तोंड करून, नीच स्वरानें, पण त्यांनां ऐकूं जाईलसें ) हें जर आमच्यामध्यें सामर्थ्य नाहीं, तर आह्मीं साधू कशाचे! ( उघड ) एकून त्यांनां पुनरपि जिवंत करण्याची कबुली घेऊन, मग हा उद्योग करणार, हाच का

तुमचा दृढनिश्चय ? प्रसंग कोणाशीं आहे याचा विचार केलात का ?

**पद्मलो०**—राणीसाहेब, याचं नांव काय ? असा जर तुमचा चानवा होता, तर कबूल तरी कशाला झालांत ? बरं मीं म्हणतें ते जर जिवंत न झाले तर काय कमी होणार आहे ? हेंच-ना सुख ?

**विलासि०**—अग चांडाळणी, असं बोलूं नकोस; कसें झालें तरी ते आपले लग्नाचे नवरे; त्यांच्या नांवांवर कुंकू तरी लावतोंना ?

**पद्मलो०**—त्यांच्या मागं कपाळभर मळवट भरला तर कोण नको म्हणणार आहे ? पण या भलत्याच गोष्टी कशाला ? अहो जरी त्यांचीं शिरं कापलीं तरी त्यांनां महाराज पुन्हां जिवंत करणारच. महाराज फक्त परिक्षेकरतां हें सांगत आहेत.

**सदानंद०**—काय स्त्रियांनों, तुम्हीं या साधूची थट्टा मांडली आहा ? अद्याप मला ओळखलं नाहीं ? ( हातांत पाणी घेऊन ) पहा या मंत्रोदकानें शापून टाकतों.

**पद्मलो०**—राणीसाहेब, आतां अनर्थ होणार; चला चला लवकर. ( तिला ओढते )

**विलासि०**—अग दम खा. आणखी एक गोष्ट विचारूं दे. गुरुमहाराज, प्रत्यक्ष त्यांचीं शिरं कापण्याला सवड कशी मिळेल? कोणत्या तरी उपायानं प्राण घेतला तर ?

**सदानंद०**—( मनाशीं ) हो ही शंका खरी आहे व असें करूं गेल्यानें कामगिरी न साधतां बोभाटा मात्र होईल; तर हीच तोड बरी. ( उघड ) हरकत नाहीं. शिरें तरी कापून मला काय कर्तव्य आहे ? फक्त तुमचा निश्चय पहावयाचा. हं-चला आटपा.

( दोघी निघून जातात )

( आपल्याशीं ) अहाहा! किती तरी या स्त्रीसहवासाचें प्रेम आहे ? माझे पुढील हेतू कांहींच शेवटाला गेले नाहींत तरी पर्वा नाहीं. अधिक तर काय, मला वस्त्र नको, पात्र नको, कसलें तरी, शरीर रक्षणापुरतें उष्टेंमाष्टें अन्न मिळालें व मला आमरण तुरगांत ठेवलें तरी कबूल; परंतु या प्रेमळ स्त्रियांचा वियोग नको. अहाहा! काय त्यांचें सौंदर्य ? कदाचित् या पृथ्वीच्या पाठीवर आणखीहि कांहीं सुंदर स्त्रिया असतील "बहु रत्ना वसुंधरा" हा आधार आहेच. परंतु असं मिठ्ठा, मधासारखं भाषण, नीटनेटकेपणा, लुगडें नेसण्याची खुबी, कांसोट्याची निरी. वाहवा! ( आनंदानें हंसून व टाळी वाजवून ) तो चेहरा किती तरी लाडका गोड! डोळ्यांवर गुंगी आल्याप्रमाणें ती पहाण्याची ढब! बुद्धाच्या, बोलतां बोलतां मधून मधून पदर सरसावतेवेळीं, जो वक्षस्थल प्रदेश दृष्टीस पडतो, त्यानें तर पोटांत चर्र होऊन काळजाचें पाणी होतें. काय सांगूं रे राया ब्रह्मदेवा! स्त्री हा मोहक पदार्थ जर तूं उत्पन्न केला नसतास, तर मोक्षसा काय, तो तळहाताचा मळ; पण तुझें ब्रह्मपद हां-हां ह्मणतां छिनावून घेऊन तुला वाटेला लावला असता.

**उदासगीर**-( कानांवर हात ठेवून ) शिवशिव! देवा, हें अभद्रभाषण ऐकण्याकरतां कां मीं इथं आपण होऊन चालून आलें ? होय. माझ्या पापानं मला ओढून आणलं अगबाई! माझ्या कपाळीं कुणीं कुऱ्हाड घातली तरी सहन करीन, पण हे शब्द नकोग बाई! अरे ढोंग्या, "आह्मीं साधू आह्मीं साधू, जगाच्या उद्धारा करतां इथं आलों" असं ह्मणतोस; त्या तुझी जीभ झडून किडे कसे पडत नाहींत ? अरे ढोंग्या, जगाचा उद्धार नाहीं, पण आपल्या बेचाळीस कुळांचा उद्धार केलास. मेला पापी ब्रह्मलोक घ्यायला निघाला आहे; पण तो नरकलोक तुझी वाट पहातो

आहेना ? आतां या पाप्याजवळ दुसरं कुणी नाहीं, तेव्हां ज्याचं तोंड पाहूं नये त्याच्याशीं भाषणाचा प्रसंग येणार, तर युक्तीनं आपण इथून सध्यां पाय काढावा.–नको पण. इकडं कोणी बरीच मंडळी येत आहेत-हां-ही नगरांतली भक्त मंडळी. आणखी काय चमत्कार होतो पाहूं.

( नागरीक येतात )

**रतनरामगुजर**–महाराजजी, जयगोपाळ करूं छूं. ( नमस्कार करतो )

**सदानंद०**–जय हो. शेट बेसो. सूं खबरबात छे ?

**रतनराम०**–मारे पोत्राने आजे त्रण दाडाथी आराम नथी.

**सदानंद०**–हां, येम खबर छे ? पाछे तमे सूं केओछो ?

**रतनरा०**–बिजूं सूं कहूं ? महाराजनां पगनूं तीरथ ज्यूये.

**सदानंद०**–वारूं. आपूं, बेसो.

**गुलजारखां**–साधुमहाराज, आदाब करता हूं. ( सलाम करतो )

**सदानंद०**–क्यों गुलजारखां, फिलहाल आपके औतरकी मिजाज कैसी हय ?

**गुलजार०**–अब तो मिजाज बहोत अच्छी है. देखो, गुरुमहाराज, आजतक, तोभि जरूर मैंनें सेंकडो बलके इस्से जायेद इलाज किया. मगर ओ कुछ काम नहीं आया. आखर आपके मेहेरबानीसे फायदा मिला.

**सदानंद०**–मैं क्या बडी चीज हूं ! क्या मुझे दो मू है, या चार हात है, क्या पांच पांव है ? जैसे तुम, वैसा मैंभी एक अदना इनसान हूं. सबका वाली ओहि भगवत है. ओहि कुलखलकतका मालीक ( वर पाहून कानांस व गालांस हात लावतो )

**गुलजार०**–सही. ये तो मुजको कुबूल है. मगर आपसे खुदा

कुछ जुदा नहीं. वली और अल्ला, ये दोनों एकसा कहते है.
( विदुषक येतो. )

**विदुषक**-आमच्या नगरींत कोणी सदानंद या नांवाचे पाजी, ढोंगी, भोंदू, गृहस्थ आले आहेत, व त्यांचा देव्हारा अतिशय माजला आहे असें ऐकतों; तर चला पाहूं कसा काय तिकडील रावरंग आहे. बनल्यास त्यांची थोडी पूजाहि करूं.

**गुलजार०**-( रतनरामास ) क्यौं सेट, आज बहुत दिनसे महाराजके दरबारमें आये ?

**रतनरा०**-हां. मारे पोत्रानें आराम नथी ते सबब थी वखत मळतो नथी.

**गुलजार०**-फिर महाराजसे कुछ तरकीब सुन लेना नहीं ? अरे यार, एक घडीमें अच्छा हो जायेगा. देखो, उनके दहशतसे बडेबडे शैतान भाग जाते है. फिर तो बेमारीकी क्या बडी बात ? देखो. तुम और किसी हकीमोसें दरकार नहीं रखना. उस्से क्या होगा ? कहते है के- " सौ दवा, और एक दुवा. "

**विदुषक**-( सदानंदाकडे वेडीं वाकडीं तोंडें करित पाहून ) अरे वाः! या स्वारीनें सोंग तर खूप थाटाचें आणलें आहे. जसा काय खरा साधु ! ' दुनया झुकती है, झुकानेवाला चाहिये. ' येथें भक्त मंडळी बरीच येत असते. हा कोण दाढी दिक्षीत, शिखा-नष्ट ? हां. ज्याच्या बायकोला खविस लागला होता तो हाच, अल्लाचा मुल्ला. बरें हे अजगरासारख्या पोटाचे गृहस्थ कोण ? हां हे आमचे शेटसाहेब. या तर बेस्यांनीं ताळच सोडला. गावांत कोणी साधु आले, इतकें ऐकलें कीं बस्स. बायका, पोरें, जसा लमाणांचा तांडा कोसळला. यांच्या देशांत यांच्या गुरुमहाराजांची मोठी गमतीची गोष्ट सांगतात.

( इतक्यांत एक विधवा बाई बरोबर आपल्या मुलीस घेऊन येते व साधूचे पायां पडून बाजूस उभी राहते. )

**सदानंद०**–बाई, कां येणें केलें होतें ? काय इच्छा आहे ?

**उमाबाई**–महाराजांचे दर्शनाकरितां आलें होतें.

**विदुषक**–आं. हां.–सवाशिनी, अखंड सवाशिनी, विठ्ठल सवाशिनी, असा सर्व जातींच्या मालाचा येथें खप आहे ह्मणा. आतां आपणहि भक्त मंडळींत शिरून थोडी लटपट करावी.

( साधूस नमस्कार करतो )

**सदानंद०**–या बसा. आपलें नांव ? धंदा काय ? ज्ञात कोण ? कां येणें केलें ?

**विदुषक**–नांव पुखानंद. धंदा लोकांनां फसविण्याचा. जातीचा पत्ता नाहीं. आपलें नांव पुष्कळ दिवसांपासून ऐकून आहें. पण रिकामपणामुळें सवड होईना; तरी खाटकाचे घरीं जसा मेंढा आनंदानें पाय ओढित जातो, तसा इकडे झुकत झिंगत आलों. पुढें आमचें नांव चालविणारा तुमच्या प्रसादाचा मुलगा मिळावा ही इच्छा.

**सदानंद०**–गृहस्थाश्रम घेऊन किती दिवस लोटले ?

**विदुषक**–छे छे. लग्न वगैरे तसलें मला सोसत नाहीं. व आतांच त्याची घाई कशाला ? मीं नुकता पहिल्या ऐशींतला कोंवळा ह्मातारा आहे; मग इतक्यांत लग्नाची कशाला गडबड ? आणखी शें दोनशें वर्षांनंतर पाहूं.

**सदानंद०**–विवाह झाला नाहीं, तर संतानाचें कसें जमेल ? व तें कोणाला होईल ?

**विदुषक**–मला.

**सदानंद०**–तें कसें ?

**विदुषक**–तरच तुमचा खरा साधूपणा. नवरा बायको एकत्र आहेत, तर मूल होणें हें सर्वांचे स्वाधीन आहे. एखाद्या गृहस्थाचे बायकोस मूल होत नाहीं, असें कांहीं संधान असलें तर मला सांगा, ह्मणजे फाल्गूनशंखीनी चरित्राला प्रारंभ करतों.

**सदानंद**०–असें भलतेंच बोलूं नये. लग्न करा ह्मणजे ईश्वर सर्व इच्छा पुरवितो.

**विदुषक**–छे. हो. मला नाहीं लग्नाचें धारजीण. मागें एकदां लग्न केलें होतें, पण तिचें लक्ष्य साधुमार्गाकडे फार लागलें तेव्हां ती एका तुमच्यासारख्या साधूची शिष्यीण होऊन अदृश्य झाली.

**सदानंद**०–( मनांत ) हा मनुष्य मोठा धूर्त दिसतो. याला माझें कपट तर समजलें नसेलना ? तर आतां याच्याशीं बोलणें सोडून दुसरें कांहीं काढावें ( उघड ) कां ? बाई तुमच्या मनांत कांहीं विचारावयाचें आहे असें वाटतें. काय तें बोला.

**ठमाबाई**–अहो भटजी इकडे या.

**विदुषक**–ऊं. हूं. मीं नाहीं येत.

**ठमाबाई**–अहो, इकडे या. तुमच्याजवळ कांहीं निरोप सांगायचा आहे. येत कां नाहीं ह्मणतां ? कारण काय ?

**विदुषक**–अहो, बायकांशीं कानमंत्र केले ह्मणजे साधूपणाचें वारें अंगांत येतें; मग लोक मुष्टिमोदकांचा नैवेद्य दाखवून पाद्यपूजा करितात. बरें, हा आलों, बोला काय तें लवकर.

**ठमाबाई**–हें बघा ( त्याचें कानांत कांहीं मजकूर सांगते )

**विदुषक**–हं. हं. असें असें. ( हंसून व साधूजवळ येऊन ) साधुमहाराज, या बाईचें असें ह्मणणें आहे कीं, मीं इचे लेकीवर प्रीति करावी.

**ठमाबाई**–जळो मेल्याचं तोंड. कोणी गांवांत जवळ येऊं देत नाहींत, त्याचं हेंच कारण.

**सदानंद**०–बाई रागावूं नका. मला काय तो मजकूर कळवा

**ठमाबाई**–अलिकडं माझ्या मुलीचं व तिच्या नवऱ्याचं अगदीं जमत नाहीं, ह्मणून त्याबद्दल कांहीं तरी उपाय करावा असं ह्मणतें.

**सदानंद०**-ठीक आहे. उदईक सोमवार अमावास्या आहे, एक पंचधातुमिश्रित ताईत तयार करून घेऊन या; तो मंत्रून देतों, ह्मणजे गुण येईल.

**विदुषक**-( मनाशीं ) आ-हा. नाहींतर तुह्मींच ताईत होऊन आपल्याला तिच्या गळ्यांत बांधून घ्या, ह्मणजे जमला बेत. हूं. चालूं दे. मार मजा.

**गुलजारखां**-महाराजजी एक दो चीज सुनाना ऐसा इरादा है, फेर मर्जी आपकी.

**सदानंद०**-अच्छा चलने देव. गाना ये एक पंचम बेद कहते है. बडे बडे नारद, तुंबर, अयसे ऋषी इस गानेसेंहि भगवानकू प्रसन्न करलेते है.

**विदुषक**-( मनाशीं ) हूं. चालूं दे. मार पाहिजे त्या गप्पा; गाणें पांचवा वेद, बजावणें सहावा वेद, नाचणें, विलास करणें, चोरी करणें, लोकांच्या बायका नादीं लावणें, हे सर्व वेदच आहेत. आपणाला जी गोष्ट कर्तव्य तिला आधार जवळ आहेच. अरे पाजी, देव हे दगडाचेच बनिवतात, ह्मणून +++ तिकडच्या इमारतीच्या चिऱ्याला देव ह्मणतां येत नाहीं. गाणें, हा वेद खरा, पण त्याचे सूर, त्याचा अर्थ कोणीकडे व इतर संगीत विचकटपणा कोणीकडे ? ( उघड, गुलजारखांस ) कसें काय ? खांसाहेब, तुमच्या बायकोची प्रकृति आतां कशी काय आहे ?

**गुलजार०**-हां, आतां माजी औरत चांगली है.

**विदुषक**-( मनाशीं ) हो, चांगली होती ह्मणूनच साधूंनीं उपटली. गांवांत कोणी ढोंगी साधु आल्याची बातमी पसरली कीं झालें. सोद्या बायकांचे अंगांत भुतें येऊं लागलीं. बिघडली दुनया, अगदीं बिघडून गेली ! ( उघड ) बरें, खांसाहेब तुमचें गाणें सुरू होऊं द्या. ( गाणें सुरूं होतें, व इतरहि कांहीं नाग-

रीक लोक येतात. कोणी पोशाख, फुलांचे हार, साधूचे अंगावर घालून मेवामिठाई पुढें ठेवितात याप्रमाणें कांहीं वेळ चालून पडदा पडतो. )

## अंक ५ वा. प्रवेश ५ वा.

( स्थळ रत्नपूर–दरबार. )

**दौलतराव**–मानाजीराव, ईश्वरी संकेत कसा चमत्कारिक असतो पहा. लहानपणीं आपणां उभयतांमध्यें किती विलक्षण प्रकारचें प्रेम होतें ? परंतु दुष्ट लोकांचे कुट्टकारस्थानानें परस्परांत वैर येऊन आज इतकीं वर्षें ऐकमेकांच्या प्रेमाला अंतरलों; सबब त्या दुष्ट लोकांनां राज्यकारभारांतून दूर केलें, तरी त्यांनीं आपला पिच्छा सोडला नाहीं. तुझा व प्रतापरावाचा नाश करण्याच्या हेतूनें मणिपुरास आले, परंतु ईशकृपेनें त्यांचा बेत शेवटास न जातां कैद झाले, व आज दरबारांत त्यांची चौकशीहि करणें आहे. बरें मानाजीराव, मीं तुला एक गोष्ट विचारतों.

**मानाजी०**–छे. छे. मला कांहींच गोष्ट येत नाहीं व ऐकण्याचीहि इच्छा नाहीं.

**दौलत०**–मीं तुला गोष्ट ह्मणजे कथा सांग असें ह्मणत नाहीं. तुला असा प्रश्न करतों, तूं अलिकडे दिलगीर दुःखी असा कां ? पूर्वींचें तुझें लहानपणचें तेज, तो चपलपणा, हा गेला कोठें ?

**मानाजी०**–स्थितीच्या मानानें स्वभावांत पालट होतो.

**दौलत०**–गोष्ट खरी; पण अशी तुझी स्थिति कशानें बिघडली, ती समजली तर कांहीं उपाय करतां येईल.

**मानाजी०**– ( मनाशीं ) ती माझी सुधारणा होण्याला

आतां दुसरा अवतार घेतला पाहिजे. ( उघड ) तसें कांहीं विशेष नाहीं; बाळपणचा हूडपणा जाणतेपणीं कसा राहील ?

( जयदेवराव येतो. )

**जयदेवराव**-उभयतां सरकारांनां मुजरा करतों.

**दौलत०**-जयदेवराव,

**जयदेव०**-जी सरकार. काय हुकूम आहे ?

**दौलत०**-प्रतापरावांची प्रकृति आतां कशी आहे ?

**जयदेव०**-आतां प्रकृतीला आराम असून गुरुमहाराजांचे भेटीला गेले आहेत, व तिकडूनच साधुमहाराजांबरोबर परस्पर इकडे दरबारांत येणार.

**दौलत०**-हा एक त्यांचे वरील अपमृत्यूच टळला ह्मणायचा ?

**जयदेव०**-जी सरकार पायांची पुण्याई ! ( प्रतापराव, सदानंदस्वामि व उदासगीर येतात. )

**दौलतरा**-यावें, गुरुमहाराज. मीं आपलीच वाट पहात आहें.

**सदानंद०**-माझी वाट ? ती कशा करतां ? येथें राजदरबारांत आमचें फकिराचें काम काय ?

**दौलतराव**-आज तशाच कांहीं महत्वाचे गोष्टींचा विचार व्हांवयाचा आहे. या प्रतापराव प्रधानावर एका वैद्यानें विषप्रयोग केला, तें प्रकरण समजलेंच असेल ?

**सदानंद०**-( धिक्कारयुक्त ) हंः अशा विषानें काय होणार ? राखणार देव समर्थ आहे.

**दौलत०**-आपल्या चरणप्रसादानें गुण आला, परंतु रीतीप्रमाणें त्याचा विचार केला पाहिजे. ( नोकरास ) त्या वैद्याला माझे समोर आण पाहूं.

**सदानंद०**-( मनांत ) माझा चरणप्रसाद दाखविण्याची संधी गेली. बरें, असाच तुमचा मजवर बळकट विश्वास राहो. मीं खूपच खेंचून धरली आहे. अशी कांहीं या मेंदूतून अजब शक्कल काढतों कीं, जेथल्या तेथें सर्व चीत. ( नोकर वैद्यास धरून आणतो. )

**दौलतराव**-आणा त्यांनां असे माझे समोर. काय हो वैद्यबुवा, बोला. तुह्मीं प्रतापरावांला औषधाचे मिषानें विष घातलें कीं नाहीं ? तुमचा यांनीं असा काय अपराध केला होता ? अशा या न्यायी, पुण्यवान पुरुषाला विष घातल्यानें आज साऱ्या दुनयेचें तुह्मीं अनहित केलेंत. राजाश्रयाला राहून असे उद्योग ?

**सदानंद०**-" न्यायी मनुष्य दुष्ट लोकांचा वैरी, " असें एक वाक्य आहे.

**दौलतरा०**-काय सांगूं गुरुमहाराज, आणखी कांहीं वेळ जर हें विषप्रयोगाचें प्रकरण समजलें नसतें, तर केवढा अनर्थ होता ? एक तर त्यांच्या स्त्रीपुत्राला व आह्मांला अत्यंत दुःख, व दुसरें, राज्यांत बखेडा. कारण हें सर्व राज्यसूत्र त्यांचेवर अवलंबून आहे; मीं फक्त गादीवर बसण्या पुरता; या माझ्या अफाट राज्यामध्यें दोन रत्नें. एक आपले पाय व हे प्रधान.

**उदासगीर**-( मनांत ) खरी गोष्ट. एक कली, नी दुसरा द्वापार.

**जयदेव०**-वैद्य बुवा, असे समोर या. महाराज सरकार बोलावतात.

**दौलतराव**-जयदेवराव, रीतीप्रमाणें त्यांची चौकशी करा.

**जयदेव०**-काय हो, असें कृत्य करण्याबद्दल तुह्मांला कोणीं शिकवलें ?

**वैद्य**-( भयानें ) कोणीं नाहीं.

**जयदेव०**–तर ही स्वतःची अक्कल ?

**वैद्य**–नव्हे.

**दौलतराव**–तर हें कसें झालें ?

**वैद्य**–या विषप्रयोगासंबंधानें मला कांहीं माहीत नाहीं.

**दौलतराव**–( रागानें ) तुह्मांला माहीत नाहीं, तर काय या भूतचेष्टा झाल्या ? बोला लवकर. वाः, ह्मातारपणीं चांगला लौकिक मिळविलात ! अशा रीतीनें आजपर्यंत बरेच खून केले असावेत असें वाटतें; बोला खरें जें असेल तें, नाहींतर आतां तुमचेकडूनच सर्व वदिवतों. ( नोकरांस ) कोण आहेरे ? ओढा कोरडे, आणि करा कबूल. ( नोकर वैद्यास मारतात. )

**वैद्य**–( दीन स्वरानें ) सरकार, मीं खरी खरी हकीकत सांगतों. या संबंधानें मला एक अक्षरहि ठाऊक नाहीं. प्रतापरावांनां मीं औषध देत होतों, ही गोष्ट खरी. महाराज दयाळू आहेत, खऱ्या खोट्याचा न्याय करावा. कोणी दुष्टानें संधी राखून हें कृत्य केलें असावें. मीं ईश्वर साक्ष हें कृत्य केलें नाहीं. माझे बायका-पोरांची शपथ वाहून खरें सांगतों. मीं जातीचा ब्राह्मण आहें. या यज्ञोपविताची शपथ आजवर कधीं वाहिली नाहीं; पण या प्रसंगाला त्याचीहि शपथ वाहतों; मीं जर दिवाण साहेबांनां विष घातलें असेल, तर मला अंत्यजा घरींहि अन्न न मिळो व चांडाळाचा जन्म येवो.

**दौलतरा०**–बस्स, बस्स. जास्त बडबड कामाची नाहीं. तुह्मीं कबूल झालां असता तर कांहीं कमी शिक्षा दिली असती; पण हा तुमचा हट्ट तुह्मांला नडला; चला. तुह्मांला सुळावर चढविण्याची शिक्षा दिली आहे.

**उदासगीर**–( मनाशीं ) सत्ते पुढें शहाणपण चालत नाहीं ह्मणतात तें हें. तो बिचारा आपली खरी खरी हकीकत सांगतो

आहे; ती न्यायकर्त्यानें पुरी ऐकून न घेतां, "बस्स बस्स नी उठ उठ" केल्यानें न्याय होतो ? आधींच मनुष्य अशा ठिकाणीं घाबरून जातं, त्यांत त्याला अधिक भय दाखिवलं ह्मणजे त्याची गाळण उडून संगतवार बोलतां येत नाहीं.

वैद्य-महाराजांनीं मला सुळावर चढविण्याची शिक्षा दिली, ( शोकानें ) मर्जी. तारते मारते सरकार समर्थ आहेत. मरणाला मीं भीत नाहीं. आतां मीं त्याच पंथाला लागलों आहें. झालें माझें ह्मातारपण. परंतु अशा वयांत हा डाग लावून घेण्याचें, मरणापेक्षां दुःख वाटतें. मीं अपराध केला असा दयाळू महाराजांचा समज झाला, त्याअर्थीं माझेंच पाप उभें राहिलें. एक शेवटची विनंती आहे. माझ्या मागें दोन कच्चीं बच्चीं अज्ञान पोरें आहेत, तीं सरकारच्याच अन्नानें आजवर वाढलीं, तिकडे कृपादृष्टि केल्यास मला जीवदानापेक्षां अधिक दिलेंसें होईल. ( दीर्घ श्वास सोडून ) हरि हरि काय हा मोहपाश ! माया जंजाळ ! हा अजून सुटत नाहीं.

उदास०-(मनाशीं सकरुण) खरें आहे बाबा, मायापाश मोठा कठीण आहे. दम धर, ब्राह्मणा, जर खरीच तुजवर तशी वेळ आली तर पहातें. तोंवर बघूं.

जयदेव०-सरकार पायांजवळ या सेवकाचा अर्ज आहे, हुकूम झाल्यास—

दौलतराव-अहो बोला बोला; तुह्मीं आमचे भावी प्रधान. तुह्मांला बोलण्याची आह्मांकडून कशी हरकत होईल ? छत्. चालूं द्या.

जयदेव०-अर्ज ह्मणून इतकाच कीं, या वृद्ध ब्राह्मणाचें या वेळ पर्यंत जें भाषण झालें त्यावरून त्यांचे ठिकाणीं हा अपराध अंशतःहि संभवत नाहीं. व असें यांनीं करण्याचें सबळ कारण

कांहींच दिसत नाहीं. तीर्थरूपांचें व यांचें आजवर चांगलें सख्य असल्याचें मला पूर्ण माहीत आहे. यांनींच विषप्रयोग केला असें सिद्ध करण्याला आधार मुळींच नसून हा संशय आहे.

उदासगीर–( मनाशीं ) मला वाटलं होतं, हें दरबार ह्मणजे आपला शुद्ध वेड्यांचा बाजार; पण नाहीं. गरिबाचा दयाळू, दीनाचा कृपाळू कोणी तरी आहे.

दौलतराव–यावरून तुमचे वडिलांनीं वैद्यावर हा आळ घेतला असें झालें तर ?

जयदेव०–वैद्यबुवांनींच विष घातलें असें ह्मणण्याचा बाबासाहेबांचा आशय नसून फक्त कोणी तरी हें कृत्य केलें, असें ह्मणणें आहे व तें खरें आहे. कोणा दुष्ट मनुष्याचे मसलतीनें अगर द्रव्यलोभानें वैद्यबुवांनीं हें पापकर्म केलें असावें, अशा तऱ्हेचा या प्रकरणांत एक आक्षेप आहे, पण तो दुर्बल होय; कारण जे पिढीजाद या गादीचे नोकर, ज्यांच्या सर्व घराण्यामध्यें आज कित्येक वर्षें असें तर नाहींच, पण अल्पस्वल्प अपराध घडल्याबद्दल कोठें आधार किंवा बोलवाहि नसून, सर्व नगरामध्यें त्यांच्या कुलशीलाची मोठी ख्याति आहे. बरें, द्रव्यलोभ ह्मणावा, तर सरकारकृपेनें त्यांनां कांहीं कमी नाहीं. द्रव्यलोभ सर्वांनां असतो ही गोष्ट खरी; पण त्यांतहि विचार आहे. ज्याला सालीना हजारों मोहोरांची मिळकत तो मनुष्य थोड्याबहुत पैशाचे लोभानें असें पापाचरण करील हें घटीत नाहीं. दुसरें कारण–कांहीं असो, बलात्कारानें किंवा दुराग्रहानें हा अपराध त्यांचेवर स्थापित करावयाचाच असेल तर उपाय नाहीं, पण शास्त्रदृष्ट्या प्रतिबंध येतो. यापूर्वीं अगदीं सत्ययुगापासूनच असा निर्बंध आहे कीं, साक्षीवांचून अपराध स्थापित करणें हें अनुचित होय. या दोषारोपाबद्दल जर कोणी साक्ष देत असेल तर त्यानें पुढें यावें.

**उदासगीर**-( मनाशीं ) अग बाई ! काय हें शहाणपण ! केवढं धैर्य ! काय निःपक्षपातीपणा ! किती तरी ही न्यायाची आवड ! पण मला अभागिणीला त्याचं धारजीण नाहीं ! !

**दौलतराव**-शाबास तुमची जयदेवराव. बापसे बेटा सवाई, अं ! बरें, प्रतापराव आह्मांला तर यापुढें कांहीं सुचत नाहीं. तुमचें काय ह्मणणें आहे ?

**प्रतापराव**-महाराज, त्याचें ह्मणणें खरें- ( कुंथत ) त्या बिचाऱ्या वैद्यानेंच-मला विष-अं-घातलें-असें माझें ह्मणणें नाहीं. दुसऱ्या जर कोणी अं-अं-हें पाप- अं-पाप केलें असेल, तर विनाकारण ब्रह्महत्या मस्तकावर-अं-तो दोष कोणी घ्यावा ? ज्याचें कर्म त्याचे बरोबर. अं सरकार. अशक्तपणामुळें मला बोलवत नाहीं. अं- द्या परता ब्राह्मणाला सोडून. करा विचार-अं.

**उदासगीर**-( मनाशीं ) अरे कसाबा, असाच कुंथत बिछान्यावर लोळत होतास; मीं तुझी कींव केली, त्याची चांगली फेड केलीस. बरं, देव आहे !

**दौलतराव**--असो. ( सदानंदाकडे बोट दाखवून ) या दरबारांत ही प्रत्यक्ष न्यायमूर्ति आहे, यांचा जसा हुकूम होईल त्याप्रमाणें करावें. गुरुमहाराज, या संबंधानें आपला विचार काय आहे तो कळवा. मला गुरुवचन मान्य.

**सदानंद**०-( मनाशीं ) हें विषप्रकरण बहुधा पद्मलोचनेचें असावें. या ब्राह्मणाला जर जिवंत राहूं दिला, तर हें पाप पुढें मागें उपस्थित होईल, तर असें करावें. ( जपाची माळ डोळयांस लावून खालीं ठेवतो व उर्ध्व दृष्टि करून ) राजा, या राज्यप्रकरणांत आह्मांला काय समजणार ? तुह्मी एका पेक्षां एक राजधुरंधर आहांत, मग यामध्यें मीं काय सांगणार ? मला काय कळतें ?

**दौलतराव**—महाराज, आपणांला समजत नाहीं, असा कोणता विषय आहे ?

**सदानंद॰**—आह्मांला तुमचा न्यायअन्याय तो समजत नाहीं. आमच्या विचारास येईल त्याप्रमाणें सांगणार, तसें न वागल्यास साधुशब्ददोषाचें पाप.

**दौलतराव**—गुरुमहाराज, आपलें वचन मला वेदासमान वंद्य आहे व तेंच मला प्रमाण. इतर शास्त्रादि गोष्टी मला नकोत.

**सदानंद॰**—या जयदेवरावानें जो आपला विचार तुला सांगितला, हा सर्वथैव खोटा असें ह्मणतां येत नाहीं; परंतु हा लौकिक विचार झाला. इतर तत्वांकडे त्यानें मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. न्यायकर्त्या मनुष्यानें सर्व गोष्टी ध्यानांत आणल्या पाहिजेत. अशी कल्पना कर कीं, कोण्या धूर्त मनुष्यानें कोणा संभावीत मनुष्यावर द्वेषभावानें कांहीं कुंभाड रचलें व न्याय समयीं साक्षी इत्यादिकांची पूर्ण पूर्तता केली, ह्मणून सदर संभावितास न्यायाधिशानें शासन करावें कीं काय ? धूर्त मनुष्य दोष छपविण्याकरितां दुःख, भय, कंपादि पाहिजे ते अभिनय करतो व सत्यवादी होतो. ज्याला कधीं राजदरबारीं जाण्याचा प्रसंग नाहीं, तो भय पावल्यानें दोषी ठरतो. या करतां न्याय अन्यायाचा विचार मोठ्या चातुर्यानें करावा लागतो. सारांश काय—हा ब्राह्मण शासनाला पात्र आहे असें मला वाटतें. अपराध्याला क्षमा केली असतां राजधर्मांत मोठा दोष सांगितला आहे, तरी तुला योग्य दिसेल तें कर. मला साधूला यांत लक्ष पुरविण्याचें प्रयोजन नाहीं.

**दौलतराव**—झालें तर. झाला माझा निश्चय. वैद्याला सुळावर द्या आणि त्या त्रिवर्ग दरोडेखोरांनां घेऊन या.

( सयाजी, भवानराव, व जाधवराव यांस शिपाई बांधून आणतात. )

**दौलतराव**-कारे चोरांनों-

**जाधवराव**-असें ह्मटल्यास जबाब मिळणार नाहीं.

**जयदेव०**-( रागानें ) याचें कारण ? असा उद्धटपणा कामाचा नाहीं. तुह्मीं हल्लीं कोठें आहांत ? तुह्मांला प्रश्न कोण करित आहे, हें लक्षांत वागवून सरळ उत्तर द्या. न्याय निकाल होणें बाजूसच राहील; पण राजाधिराजांची अमर्यादा केल्याबद्दल देहांत प्रायश्चित्त मिळेल; खूप समजून रहा.

**भवानराव**-त्याची आह्मांला मुळींच डर नाहीं. आह्मीं मरणाला तयार आहोंत.

**सयाजीराव**-तुह्मांला सरळ उत्तर पाहिजे असेल तर सरळ प्रश्न येऊं द्या.

**जयदेव०**-मला वाटतें, तुह्मीं कांहीं अम्मल करित असतां ?

**जाधवराव**-अमली पदार्थ मिळत नाहीं ह्मणूनच आह्मीं असे दुर्बल झालों.

**भवानराव**-तुह्मीं मात्र सध्यां अम्मल चालवितां ह्मणून भलतेंच बोलतां.

**दौलतराव**-कांरे फारशी बडबड चालिवली आहे ? चवदावें रत्न पाहिजे ?

**जाधवराव**-चोरांनों, असें ह्मटल्यास असेंच उत्तर. इतके आह्मीं हलके लोक आहोंत कीं काय ?

**दौलतराव**-मग तुह्मांला काय ह्मणावयाचें ?

**जाधवराव**-बंडवाले, लुटारू, शिपाई बच्चे, अशा नांवानें हांक मारा.

**जयदेवराव**-सरकार, या लोकांनीं देहांत शासना योग्य असा अपराध पूर्वींच केलेला आहे, त्यावर पुन्हां राजाधिराजांचा व सर्व दरबारी लोकांचा मोठा अपमान केला, तर यापुढें यांनां कोणताहि प्रश्न न करितां शासनाचा हुकूम मिळावा.

**प्रतापराव**–पण यांचा चवथा साथीदार–अं–अं–कोण-कोण होता, तें समजून-अं-घेऊन, त्याचाहि-शोध-अं-केला पाहिजे. अं.–

**दौलतराव**–कायरे तुमचा चौथा साथीदार कोण होता ?

**सयाजी०**–माहीत नाहीं.

**जाधवराव**–( सयाजीस ) असें भ्याडासारखें कां ? ( राजास ) माहीत आहे, पण आह्मीं त्याचें नांव सांगत नाहीं.

**दौलतराव**–तर तुह्मांला कडक शिक्षा करावी लागेल.

**जाधव०**–कबूल.

**सदानंद०**–( मनांत ) हीच वरें ती माझी जाधवरावादि मंडळी. कारागृहवासांतील दुःखामुळें बिचाऱ्यांच्या कायांच्या बेकाया होऊन ओळखूंहि येत नाहींत; पण खरे हिय्येदार. मरणापर्यंत प्रसंग आला तरी यांनीं माझें नांव सांगितलें नाहीं; तर यांनां सोडिवलें पाहिजे.

**दौलतराव**–गुरुमहाराज, या त्रिवर्गाबद्दल आपला विचार काय आहे ?

**सदानंद०**–हे कोण आहेत, यांचा काय वृत्तांत आहे ?

**दौलतराव**–हे याच शहरांतील बंडखोर लोक आहेत. यांनीं पूर्वीं कांहीं कपटकारस्थानें केल्याबद्दल यांनां हद्दपार केलें; सबब तो द्वेष मनांत बाळगून, हे आमचे प्रतापराव प्रधान, माझ्या या मानाजी बंधूला आणण्याकरतां मणिपुरास गेल्या वेळीं, मार्गांत रात्रौ त्यांचा जीव घेण्याच्या इच्छेनें हे गेले होते, व त्या अपराधाबद्दल हे कबूल आहेत.

**सदानंद०**–कांरे गड्यांनों, राजाचें हें ह्मणणें खरें आहेना ?

**जाधवराव**–होय.

**सदानंद०**–असें करण्याचें कारण ?

**सयाजी०**-पोट.

**जाधवराव**-पूर्वीं, आमचा कांहीं अपराध नसतां, आमचे-वर राजद्रोहाचा आरोप स्थापित करून व आमची जहागीर कमी करून, आह्मांला राजाश्रयांतून दूर केलें, तरी आह्मीं हर-हुन्नर करून आपला चरितार्थ चालवित होतों; असें असतां जु-लमानें आह्मांला नसता दोष देऊन हद्दपार केलें. त्या त्वेषानें असें करणें भाग पडलें.

**सदानंद०**-महदान्याय ! महत् अन्याय ! ! राजा, अशा प्रकारच्या राज्यव्यवस्थेनें केवळ नरकाचें मात्र साधन करित आ-हेस. अरे, प्रत्येक वर्णाश्रमाचे मार्ग निरनिराळे आहेत. आमचा पंथ हाच कीं, कोणी आपल्यास सुख देवो वा दुःख देवो, सुखानें संतोष किंवा दुःखानें कष्ट हें आह्मीं मुळींच मानित नाहीं; पण तुमचा मार्ग फार निराळा; सर्व ठिकाणीं दूरवर लक्ष पोंचविलें पा-हिजे. चतुर राज्यकर्त्या पुरुषानें अनेक धोरणें लक्षांत आणून वा-गावें लागतें. आपल्या राज्यांत जरी कोणी अनीतिप्रवर्तक अस-ला, तरी त्याचा निषेध न करतां, बुद्ध्या त्याला थोर अधिकार देऊन संतुष्ट राखल्यानें, जे वैरी ते मित्र, व जे चोर ते साव हो-ऊन राजाचें इष्ट चिंतन करितात. पहा, या बिचाऱ्यांनां तूं आश्र-यांतून दूर केलेंस, तेव्हां यांनीं काय करावें ? आह्मीं साधू, सर्वसंग-परित्याग करतों; परंतु पोटानें कोणाला सोडलें नाहीं. त्याची जर यांनां मारामार पडूं लागली तर यांनीं काय करावें ? मनुष्य क-साहि शांत, विचारी असो, पण त्याजवर जर असा कठीण प्रसंग आला तर पोटाकरतां तो पाहिजे तें निंद्य कर्म करण्यास तयार होईल. अरे, हे तुझ्या प्रजेपैकीं लोक. प्रजेला राजानें पोटच्या मुलासारखें पाळावें. प्रसंगीं मुलानें कांहीं दोषास्पद कृत्य केलें, तर पित्यानें त्याला असें कडक शासन करणें अप्रशस्त होय. असा माझा विचार. तुला जें इष्टानिष्ट दिसेल तें खरें.

**दौलतराव**-अहाहा ! महाराज, आपण आज मला मोठ्या दोषांतून मुक्त केलेंत. अशा प्रकारें जर प्रजेला अप्रिय झालों तर लवकर नाश पावेन, ही गोष्ट खरी आहे.

**उदासगीर**-( मनाशीं ) "गरिबाचे काळ नी वाघाचे प्रतिपाळ". तो हा मासला. राक्षस राजा पिशाच प्रधान. तिथं असाच न्याय. काय करूं ? जर मीं पुढं झालें तर-या ठिकाणीं प्रत्यक्ष पति, सासरे आहेत; हे मला ओळखतील, काय करूं तरी काय ?

**सदानंद**०-कां राजा, माझें भाषण तुला मान्य असेल तर यांना बंदमुक्त करून, दरबारांत आसनांवर बसवून यांचा सन्मान कर.

**दौलतराव**-( नोकरांस ) अरे गुर्वाज्ञेप्रमाणें त्या शूर शिपायांस श्रेष्ठासनांवर बसवून त्यांनां उंची पोषाक द्या. ( तसें करितात ) गुरुवर्य, या वैद्याला ठरल्याप्रमाणें शासन करतों. ओढा त्या दुष्ट ब्राह्मणाला आणि चढवा सुळावर. ( ब्राह्मणास ओढूं लागतात. )

**वैद्य**-( शोकानें ) महाराज सरकार, या ब्राह्मणाची कांहीं दया येऊं द्या. देवा, काय हा तुझे घरीं न्याय ! अरे सत्याभिमानी येथें कोणी नाहीं ?

**उदासगीर**-( मनाशीं ) ही विचाराची वेळ नव्हे. देवा, जर कांहीं माझ्या वडिलांचा पुण्यांश असेल तर तो मला आतां यश देवो. ( उघड ) हं. चुप रहो. अगर इन पंडतके छावकू छिवोगे तो ये खपरसे तुह्मारी खोपरी फोड देउंगा समजो ? हटजाव पिछे. नही तो बाद पश्तावोगे. ( राजास ) वाः वहावा ! राजा, ये क्या अंधेर है ? वहोत अच्छे तऱ्हे इनसाफ तेरे दरबारमें हो रहा है.

**सदानंद**०-हं. चेला चिप. आपने आसनपर बैठ जाव. ये क्या तूनें धूम मचादी ?

**उदासगीर**–ये मेरी धूम नही-ये तुह्मारी दूस ( पुच्छ ) बहोत बढ गयी, उसीका ये तमाशा हो रहा है. ( राजास क्रोधानें ) राजा, उठाव इस पापीको आसन परसें, और जुतोंके नजदीक खडा कर देव.

**दौलतराव**–जयदेवराव, प्रतापराव, हा काय चावटपणा दरबारांत ? हा कोण मनुष्य आहे ? अशा लोकांनां दरबारांत कोणीं येऊं दिलें ? अरे प्रत्यक्ष साधुमहाराजांचा असा अपमान ?

( सर्व त्याचें निवारण करूं पहातात )

**जयदेव०**–अरे चल हो दूर.

**उदासगीर**–राजा, तूं आपने हातसे आपना मंदर जला देने चाहता ? अरे ये कोन साध है ? नही. ये तेरा और सब दुनयेका दुशमन सुभानराव है. पछान लेव ( सुभानराव भयानें आसनावरून खालीं पडतो. )

( सर्व जवळ येऊन त्यास पाहून आश्चर्य करितात. )

**प्रतापराव**–अरे हाच तो महापापी सुभानराव. अद्याप ओळखला नव्हता.

**जयदेव०**–अरे बेरडा, रामोशा, काय हें तुझें धाडस !

**दौलतराव**–परंतु आजवर याला कोणीं ओळखला नाहीं, हें केवढें आश्चर्य ! ( उदासगिरास ) हे बटो, हा काय प्रकार आहे ? आपण कोण ? येथें कसे आलां ? कां आलां ? या सुभानरावाचें कपट तुह्मांला कसें समजलें ? हा ब्रह्मघोंटाळा आहे तरी काय ?

**उदासगीर**–सब हकीकत मैं कहतां हूं, लेकिन, ये सुभानराव और ये इनके बाकी ( जाधवरावादि ) लोगोंकू पहिले कैद करके यहां बांध रखो, फीर कैसी मजा बताता हूं सो देख लेव.

( त्याप्रमाणें करितात. )

**उदासगीर**–भला. आपसे मैं पुछता हूं के ये पंडतकू फांसी देनेकी क्या सबब ?

**दौलतराव**–त्याजवर विषप्रयोगाचा आरोप स्थापित झाला सबब.

**उदासगीर**–नही, नही. ये आपका कहेना गलत है.

**दौलतराव**–तर मग हें कृत्य कोणाचें आहे ?

**उदासगीर**–ये दिवाने साहेब. इनके लुगाईकी ये कारवाई है. समजो ?

**प्रतापराव**–काय ? माझ्या स्त्रियेनें मला विष घातलें ?

**उदासगीर**–हो-हो-तुह्मारे स्त्रीनें तुमकू जेहर पिलाया. बुलाव उनको अभि दरबारमें. फीर सुनलेव.

**जयदेव**०–राजसभेंत स्त्रियांनीं येणें हा गैरशिस्त मार्ग आहे.

**उदासगीर**–वाः, ये आपकी बहोत अच्छी समज है. दिल आवे, इस तऱ्हे बद्फेली कीयी तो पर्वा नहीं; और फकत राजदरबारमें आनेसे इज्जत घटती है ?

**दौलतराव**–असें असेल तर हें मोठें आश्चर्य ह्मटलें पाहिजे.

**उदासगीर**–राजेसाहेब, आपभी आपने रानीसाबको यह बुला लेव.

**दौलतराव**–अं ? तिचा या कृत्याशीं काय संबंध ?

**जयदेवराव**–सरकार, यांचे सांगण्याप्रमाणें एक तर सुभानरावाचा आपल्याला मोठा चमत्कारिक अनुभव आला. व या प्रकरणांत कांहींतरी विशेष प्रकार आहे असें वाटतें. तर या बटोच्या सांगण्याप्रमाणें विचारपूस व्हावी असें मला वाटतें. ( नोकरांस ) जारे, त्यांनां घेऊन या.

**दौलतराव**–बरें. हा मजकूर खरा ठरल्यास ठीकच

झालें. पुढील व्यवस्था सर्व तुमचे इच्छेप्रमाणें होईल पण खोटा झाल्यास ?

**उदासगीर**–इस गुन्हेके बदला मेरा सीर हजर है. बस्स हो गया ? राजा, औरभी कहता हूं सुनो, देखो, इन बातोंसे मुजकू कुछ जरूर नही थी, या इसबारेमे मेरा कुछ फायदा कर लेनेकी मेरी मनीशा नही. फकत् इतनाहि है, के बेचारा बुजरुग ब्राह्मन हकीम मारा जाताथा. सो देख मुजकू रहम आया. अगर इनसाफकी आपकू जरूर नही तो छोड देव मैं चला जाता हूं.

( राजस्त्री व प्रधानस्त्री येतात. )

**विलासिनी**–( राजास ) कां बोलावणं झालं ? राजसभेंत बायकांनीं यावं असं काय अडलं ?

**उदासगीर**–जो कुछ आपको सवाल करना है सो मुजको करो; मैं जवाब देता हूं.

**विलासिनी**–हा कोण ?

**पद्मलोचना**–अहो, हा मेला तो वेडा, महाराजांनीं आणलेला नवा शिष्या.

**उदासगीर**–हां, वेडा. सच है. ओ देखो तुह्मारे साथ समाधी लगाते है. तुमको ये ढोंगीनें आपआपके खाविंदका खून करनेकू कह दियाथा के नंही ? और इस्से तुह्मारी दोस्ती हुवी या नही कहो ?

( दोघी चपापून एकमेकीकडे पहातात ).

**दौलतराव**–कां विलासिनी, तुझी अशी चंचल मुद्रा कां झाली ? त्यांचे प्रश्नास उत्तर दे. ( रागानें ) अगे दुष्टे. ( तीस मारावयास जातो. )

**उदासगीर**–( राजाचें निवारण करून ) हां ऐसा करना आपकू सजावर नही. और आइंदा इस्से बहोत नक्शा है. देख लेव.

**पद्मलो०**–झालं राणीसाहेब, माझ्या सारखीच तुमची गत झाली. ह्यातारचळ लागण्यांत आतां काय बाकी राहिलें आहे ?

**विलासिनी**–अग, हें खूळ आहे तरी काय ? हा मेला भीकमाग्या भिकारडा तो काय ! (उदासगिरास उद्देशून) या मेल्याच्या बरळण्यावर विश्वास ठेवून, काय हे भलभलते खेळ ! ( साधूस ) महाराज, हा आपला अपमान कुणीं केला ?

**दौलतराव**–अगा दुष्ट स्त्रियांनों, आतां कशाला ही बतावणी ? आह्मां सर्वांच्या डोळ्यांत धूळ टाकूं पहातां काय ? तुमचें सर्व पापकर्म उघड होऊन गेलें. तुमच्या पातकाचा घट आज पूर्ण भरला. या ढोंगी साधु सुभानरावाशीं जो तुमचा व्यवहार घडला तो समजला. आतां मरणाला तयार व्हा. (सुभानरावास) कांरे लुच्चा पाजी, ही गोष्ट खरी आहे कीं नाहीं ? बोल. (नोकरांस) ओढारे कोरडे या हरामखोराला.

**सदानंद०**–कोरडे कशाला ? मीं सर्व गोष्टींस कबूल आहें. तुह्मी माझी अज्ञानदशा केलीत, तो सूड उगविण्याकरितां मला असें करावें लागलें. थोड्यानें मसलत फसली, नाहींतर सर्वांचा निकाल लावून टाकला असता. असो. माझा बहुतेक सूड उगवला. आतां मीं मरणाला तयार आहें. चला, आटपा. मला तोफेच्या तोंडीं उडवा. पाहिजे तें मला शासन करा. इहलोकच्या माझ्या मनांतील सर्व गोष्टी सिद्धीस गेल्या. अनेक स्त्रियांचा उपभोग घेतला, पाहिजे ते विलास केले. राजा, तुला जर आपल्या स्त्रीचे संबंधानें गुप्त गोष्ट निःशंकपणें विचारणें इष्ट वाटत असेल तर मला विचार. अरे, आतां मला तुझें कांहींच भय वाटत नाहीं. काय सांगूं ? या दुष्ट ( उदासगीर ) बटूला जर मीं शिष्या करून बरोबर आणला नसता, तर थोडक्याच दिवसांत या रत्नपुरीचा राजा होऊन गेलों असतों, पण स्वल्प गोष्टीनें मसलत फसली.

**प्रतापराव**–पण या दुष्टेनें मला विष घालण्याचें कारण काय ?

**सदानंद०**–तिला मीं सांगितलें. व हा इतका अनर्थ होण्याचें कारण तूंच होस. अरे राजा राजा ह्मणजे काय, कळसूत्री बाहुली आहे. तुह्मीं लोक जसें त्याला नाचवाल तसें तो नाचणार.

**उदासगीर**–राजा, सुन ले. ये खुद्द आपसे सब गुन्हे कबूल करता है.

**दौलतराव**–पण हें विष तिला कोणीं आणून दिलें, त्याचीहि चौकशी केली पाहिजे.

**पद्मलो०**–ज्याला जी गोष्ट करणं आहे ती तो कशाहि रीतीनं शेवटास नेतो; मीं तरी आतां कशाला भिऊं ?

**जयदेवराव**–स्त्रियांनीं पुरुषांस लाजावें खरें, पण आतां पुरुषांनींच लाजण्याची पाळी आली.

**पद्मलोचना**–पुरुष पुरुषाप्रमाणें आमच्याशीं वागते तर असं न होतं.

**दौलतराव**-बरें, हें विष कोणीं आणून दिलें ?

**पद्मलोचना**–जखमेला लावण्याचं जें औषध तें विष आहे, असं मला ठाऊक होतं, ह्मणून तें मीं पिण्याचे दुधांतून दिलं.

**दौलतराव**-असें करण्याचें कारण ?

**पद्मलो०**–त्यांनीं माझी वाट सोडली ह्मणून मीं त्यांची वाट लावणार होतें.

**प्रतापराव**-अग चांडाळणी मीं तुला जीव की प्राण करित होतोंना ?

**पद्मलोचना**-काय उपयोग तें मळमळीत सौभाग्य ?

**दौलतराव**–विलासिनी, तुझें ह्मणणें काय आहे ?

**विलासि०**-तसंच.

**दौलतराव**–तसेंच कसें ?

**विलासि०**–तुमच्या वागणुकी सारखं. आतां काय वाघ्या ह्मटलं तरी खाणार आणिखी वाघोबा ह्मटलं तरी खाणार. मग कशाला भिऊं ?

**दौलतराव**–अग चांडाळणी, तूं इतकी उद्दाम कशानें झालीस ?

**उदासगीर**–( पद्मलोचनेकडे बोट दाखवून ) इनके सोहोबतसे.

**दौलतराव**–अग अवदसे, तूं स्त्री असून कांहीं तरी लाज ?

**विलासिनी**–बायकांनां पुष्कळ लाज असते; पण पुरुषांनीं त्यांची विचक्षणा केली, ह्मणजे त्यांनां निर्लज्ज व्हावं लागतं.

**दौलतराव**–( रागानें ) कोण आहेरे–या दुष्टेला नेऊन विस्तवाचे खाईंत घालून जाळून टाका. ओढा. इला माझे दृष्टीसमोरून काढा.

**प्रतापराव**–तशीच या हत्येला ( पद्मलोचनेला ) तापलेल्या तेलाच्या कढईंत लोटा.

**उदासगीर**–राजा, जरा ठेर जाव. और इस्से बडा भारी तमाशा दिखलाता हूं.

**जयदेवराव**–काय या स्त्रिया ! शिवशिव ! सर्व दुनयाभर जारिणी झाल्या अं ?

**उदासगीर**–पढीक मूरख, जो कहते सो आप जैसेंकू. अगर कुलदुनयाकी औरत छिनाल हुवी, तो ये दुनया घडीभर नही चलेगी. भगवतनें तुमकू अकल् दियी है, मगर बे फायदा. आप दिगरके बचनसे पानी पिनेहारे हो. खबरदार. सब् स्त्री अयसी है ?

**प्रतापराव**–हे बटो, आपणाला यांत राग येण्याचें काय

कारण ? माझ्या बाळाला असे कठोर शब्द बोलूं नका. तोहि याच दुःखानें होरपळून गेला आहे. आह्मीं सर्व समदुःखी आहों.

**उदासगीर**–( त्वेषानें हात चोळून ) ओ हो. अरे पापी हत्यारी, यहांसे तूं आपना मू काला कर. तूं आदमी नही. बडा पापी शैतान है. ( राजास ) राजा, अयसा पापी, तमाम दुनयामें न होगा. यहांसे इसकू उठाव, और दरबारके बहार हकाल देव. सदानंद सुभानरावका ये गुरू है.

**जयदेवराव**–हां. हां. बटो, आपण हें कोणाला उद्देशून बोलतां याचा विचार ?

**उदासगीर**–तुह्मारे बाबाकू. मैं कुछ पैसेका भूका प्यासा नही. सो डर जाऊं ?

**जयदेवराव**–गोष्ट खरी, तुह्मीं लोक निस्पृह खरे. पण भलत्याच मनुष्याला असें बोलणें योग्य नाहीं. माझा प्राण गेला तरी मीं हें सहन करणार नाहीं.

**उदासगीर**–नाहाक किसीकू बदनाम करना इस्मे हमकू खुषी नही. ( राजास उद्देशून व प्रतापरावाकडे बोट दाखवून ) राजेसाहेब, मैं क्या कहूं ? इस जमीनके परदेपर बहुत किसमके पापी लोग है. कोही परस्त्रीभिलाषी, कोही मद्यपी, और चोर, चुगली खोर, अयसे एकसे एक है; लेकिन अयसा पापी आजतक हुवा नही; और, दिगर इस्से न होगा. सुनिये राजेसाहेब, ये, खास आपने लडकेके औरतसे इष्कबाजी करने चहाता था. लेकिन उसीनें फूल तो नही उडाया लेकिन मूमें धूल फेंकके हकाल दिया. कहो भला, अयसा जानवरसा आदमी आजतक किसीने देखा था ?

**प्रतापराव**–( उदासगिराचे पायांवर लोटांगण घालून ) महाराज, आपण कोणी तरी स्वर्गांत राहणारे देवपुरुष आहांत, यांत संशय नाहीं. माझें अनिर्वाच्य पापकर्म आजवर कोणांस स-

मजूं दिलें नाहीं, पण तें आपणांस समजलें. आतां आपण मला देहांत प्रायश्चित्त देऊन दोषमुक्त करा, आणि या जगांतून नाहींसा करा. कारण हें लज्जेनें काळें झालेलें तोंड जगास दाखविण्याची मला लज्जा वाटते. यापेक्षां मरण मला सुखावह होईल. हाय हाय ! त्या बिचारीवर मीं नसतें कुभांड रचून तिला घरांतून घालवून दिली. पतिव्रतेचा छल देवास कसा सहन होईल ?

**जयदेवराव**–( दीर्घ श्वास सोडून व मोठ्यानें ओरडून ) हाय हाय ! घात घात ! ( डावे उजवे हातांनीं मस्तकावर दोन चार बुक्या मारून बेशुद्ध होऊन पडतो. )

**दौलतराव**–हां. हां. काय हा अनर्थ ! अरे कोणी वारा घाला, पाणी आणा.

( सर्व घाबरून जवळ येतात व त्यास सावध करितात. जयदेवराव आणि प्रतापराव यांस त्यांचे जागीं नेऊन बसवितात. )

**जयदेवराव**–( दुःखानें ) नको नको. या तुमच्या उपचार उपकारानें माझ्या स्थितीला अपकार होतात. मला आतां या जगीं वांचणें नाहीं. झाला, माझा कडेलोट झाला. मला माझ्या दुर्दशेनें दुःखसमुद्राच्या तळाशीं पोंचविलें. जरी मीं क्षणमात्र शुद्धीवर आलों, तरी लवकरच तुमचे दृष्टीस माझें प्रेत पडेल, व तसें झालें तरच परिणाम आहे, नाहींतर मीं वेडापिसा होऊन दुनयाभर भटकत फिरेन. हाय हाय ! निर्मले ! निर्मले ! !

**दौलतराव**–जयदेवराव, किती हा आक्रोश, अरे, माझी तुला कांहीं मुरवत नाहीं ? काय तूंच तेवढा दुःखी आणि आम्हीं सर्व सुखी आहों ? विचार करून पहा बरें. अरे, तुझी स्त्री नाहींशी झाली. हेंचना तुला दुःख ? कदाचित् ती मेली असा समज घेतला तरी ती आपल्या सद्गुणरूप जोतीनें जिवंत आहे व या आमच्या कुलटा जिवंत राहिल्या तरी मेल्याप्रमाणें आहेत.

**जयदेवराव**–( दुःखानें ) सरकार, काय सांगूं ? प्रत्यक्ष हा माझा जनक, याचें मजशीं असें वर्तन !

**प्रतापराव**–बाळा, मीं नरपशु महापातकी. तुझ्या दुःखाला मीं कारण झालों, तर बाळा, तें हातांतलें शस्त्र माझ्या काळजांत घाल; नाहीं तर मजपाशीं दे. ( शस्त्र घेऊं जातो त्याचें निवारण करितात. )

**जयदेवराव**–( शोकानें ) ह्मातार्‍या, फार चांगलें कृत्य केलेंस. पित्यानें जें पुत्राचें कल्याण चिंतावयाचें तें चांगलें चिंतिलेंस. अरे, तुजकरतां मीं जीव का प्राण असें करित होतों, त्याचा चांगला उतराई झालास ! पोरवयांत न जाणून जर तुझी अवज्ञा झाली असेल तर सांगवत नाहीं; पण समजूं लागल्यापासून तुझा शब्द तोडून पुढें पाऊल टाकलें नाहीं. तुमची थुंकी तळहातावर झेलली, असें असतां मजसंबंधानें ही दुर्बुद्धि ! ( त्वेषानें ) मीं मन मोकळें करून उघड उघड सांगतों. परदेशांत असतां मारेकर्‍यांनीं जो तुह्मांवर हल्ला केला त्यांत तुम्हीं ठार मारले गेले असतां तरी बरें झालें असतें; त्यावेळीं मरतां तर पश्चात् शाश्वत कीर्ति रहाती. वांचून हाच तुमच्या व माझ्या तोंडाला कलंकना ? अयोग्य स्थलीं कामेच्छा ! शिव शिव ! अहो, हें तुमचें दुष्कर्म उघडकीस आलें नव्हतें, तोंवर केवढा तुमचा दरारा ! दरबारांत सर्वांवर वर्चस्व ! केवढा तुमचा लौकिक ! महाराजसरकारचें अप्रतिम प्रेम ! त्याचा आतां मागमूस तरी राहील ? छेः ! ज्या ज्या वेळीं ज्या ज्या ठिकाणीं तुमच्या संबंधानें तुमचे गुणानुवाद ऐकूं येत तेव्हां मला किती तरी संतोष वाटावा ? मीं प्रतापराव दिवाणांचा मुलगा असें लोकांनां सांगण्यांत मला पराकाष्ठेचें भूषण वाटावें, व मीं असा वेडा, लहान असतांहि तुमच्या नांवावर माझा केवढा सत्कार होई ! आतां सर्व उलट होणारना ? (शोकानें) मीं रस्त्यानें

फिरूं लागलों तर लोक मजकडे पाहून नाकें मुरडतील, कपाळास आठ्या घालतील. परस्पर स्नेहीसोबती कुजबूज करून मजकडे बोटें दाखवतील; कुटाळ लोक माझी हुर्यो करित मागें लागतील. लज्जेस्तव देशत्याग केला तरी हा कलंक माझे पाठीवर आहेच. निर्मले, तुझें सौंदर्य माझे बापाचे मानहानीस कारण झालें; व तुझे सद्गुण माझ्या नाशाला निमित्त होत आहेत. ( कांहीं शांत होऊन ) छे. छे, मीं फारच भकलों. हा इतका बाइलवेडेपणा लोकांसमक्ष शोभत नाहीं.( बापाचे पायां पडून ) बाबासाहेब, मीं देहभानावर नाहीं. काय शब्द माझे तोंडांतून निघाले ? जर आपल्या मनाला त्यानें दुःख झालें असेल तर क्षमा करा. ( राजास ) सरकार, मीं दरबारचा व सरकारचा अपराधी आहें. या दुःखाचे वेडगळ लहरींत माझे कडून अयोग्य असें वर्तन झालें असेल तर या आपल्या लेंकरावर कृपा करा, काय करूं ! मीं अगदीं गोंधळून गेलों आहें ( डोक्यास हात लावून सचिंत उभा रहातो. ) ..

**दौलतराव**—जयदेवराव, तुझ्या कोमल अंतःकरणावर हा दुःखाग्नीचा लोट आल्यामुळें तें होरपळून जाऊन तुझी अशी अवस्था होणें रास्त आहे. तरी तुझ्या ठिकाणीं धैर्य आहे; पण माझ्या असह्य अपमानानें मीं शुद्ध वेडापीर बनलों आहें.

**प्रतापराव**—बाळा जयदेवराया, माझ्या अपराधाला ही निंदा कांहींच नव्हे. मीं वंद्य खरा, परंतु गाय जशी पूज्य असून अमंगल कृत्य करते तसें मीं केलें. बाळा, माझ्या वधाचें पाप मनांत न आणतां निकाल करून टाक.

**जयदेवराव**—काय ? तुमचा वध मीं करूं ? मला जरी या जगांत जगणें असतें तरी हें अघोरकृत्य करतोंना. क्रोधावेशांत हवी तशी बडबड केली त्याचाच मला पश्चात्ताप झाला आहे.

**प्रतापराव**-( राजास ) सरकार, इहलोकपापाचें शासन जो राजदंड तो झाला तर परलोकचा यमदंड टळेल. करितां येथेंच मला दोषमुक्त करा. अरेरेरे-नको नको ती परस्त्रीभिलाषा बद्दलची यमराजाची शिक्षा.

**उदासगीर**-( मनाशीं ) आणखी थोडी याची निंदा झालीच पाहिजे. ( उघड ) देखो, भारतमें श्रीकृष्णपरत्माओनें ऐसा बचन कह दिया है के-आत्मस्तुति ये आत्मवधके समान है. और सज्जन निंदा उनके नाश समान है. इसवास्ते तुम औरभी आपने पिताजीकी थोडी निंदा शुरू करो. बस्स हो गया होगा तो छोड देव.

**जयदेवराव**-साधुमहाराज, नको नको, या विशेषणानें या दुष्ट सुभानरावाची कल्पना मनांत येते. साधु ह्मणजे पक्का लबाड मनुष्य. असा लोकांचा समज होत आहे व तो खरा आहे. हे निर्मल सिद्धपुरुषा, आपण सांगतां त्या शास्त्रपुराणांवर आतां कोणाचा विश्वास राहिला आहे ? लोक महा नास्तिक होत चालले. अरे, शास्त्रप्रतिपादित गोष्टी अनुभवशीर असून आह्मां मूढ लोकांनां मिथ्या वाटूं लागल्या, हेंच आमच्या दुःखस्थितीचें कारण आहे. कलीयुगांतील भावीस्थितीचें पुराणांतरीं वर्णन आहे कीं-लोक परद्रव्याभिलाषी, परस्त्रीसक्त, मद्यमांस सेवन करणारे असे होतील त्याचा मासला, हे जाधवराव, भवानराव, सयाजी, सुभानराव होत. स्त्रिया पतिद्रोह करून परपुरुषलंपट अशा होतील. पहा, त्याची साक्ष, या राणीसाहेब व माझी उपमाता. पतिव्रता स्त्रियांचा छल पति करतील. तोच मीं दुष्ट राक्षस. श्वशुर स्नुषागामी होणार. हे आमचे तीर्थरूप, प्रत्यक्ष कलीपुरुष. मित्र मित्रांचा नाश द्रव्य लोभानें करतील.

**मानाजी०**–तो मीं आहें. ज्यानें मला माझ्या विपत्तींमध्यें आश्रय दिला त्याच माझ्या परममित्र मणिपूरच्या राजपुत्राशीं मीं कृतघ्नपणा राज्यलोभानें केला; व बलात्कारानें त्याच्या स्त्रीशीं विवाह केला. ही गोष्ट आजवर गुप्त होती. मीं कपटानें मित्राचा नाश केला, यामुळें माझें मन मला खाऊं लागलें आहे. हे सिद्ध-पुरुष अंतरज्ञानी आहेत. यांचेपाशीं कोणतीहि गोष्ट छपली जा-णार नाहीं, व क्रमाक्रमानें त्यांनीं जसें प्रत्येकाचें वर्म कर्म उजे-डास आणून त्यांची फजीती केली, तशी माझी होणार, असें ल-क्षांत आणून मीं हा मजकूर कळविला. हे देवपुरुषा, मला खातां, पितां, उठतां, बसतां चैन नाहीं; दोन दोन वटका माझें मला, मीं काय करित आहें, कोठें आहें, याचें भान नसतें. कोणी काल-पुरुष हातांत शस्त्र घेऊन माझे मागें लागला आहे, असा नेहमीं मला भास होतो; तर ही काय पिशाच्चबाधा, किंवा काय आहे? कांहीं जरी असलें तरी भीति ही आहेच; तर यांतून मला मुक्त केल्यास मीं आजन्म तुमचा दास होऊन राहीन.

**दौलतराव**–( आश्चर्यानें ) काय? मानाजीराव, मणिपूरचा राजपुत्र उधोजी मेला?

**जयदेवराव**–माझा गुरुबंधु परममित्र उधोजी परलोकीं गेला?

**प्रतापराव**–अरेरे, फारच वाईट गोष्ट झाली! काय त्याचे सद्गुण! त्या बिचाऱ्याचें मरण मला येतें तर! गुणवान् मनुष्य अल्पायुषी!

**दौलतराव**–काय हें संसारसुख! चोहोंकडूनच कसा हा प्रसंग! ( उदासगिरास ) महाराज, यापेक्षां आपली स्थिति फार चांगली. चला. मला नको हें राज्य, मीं लंगोट नेसून आपल्या-बरोबर येतों.

**जयदेवराव**—अहो देव पुरुष, मलाहि आपली दीक्षा देऊन संगतीं न्या.

**उदासगीर**—( मनाशीं ) तुमच्या संगती करतांच इतके आयास !

**प्रतापराव**—महाराज, प्रत्येकाला कांहींना कांहीं कारणानें अनिवार दुःख झालें आहे, हें आपण जाणतां तर आमचे दोषपरिहाराचा कांहीं मार्ग सांगून सर्वांनां मुक्त करावें, अशी चरणीं प्रार्थना आहे.

**उदासगीर**—दौलतराव, मानाजी, प्रतापराव, ( सर्व जी जी असें ह्मणून उभे रहातात ) तुम सबकू पूर्ण वैराग्य हुवा है. कहते है के—“ पश्चातापेन शुद्धचति ” ऐसा शास्त्रबचन है. तोभि तुमको कहता हूं के- जाव, तुम सब लोग अश्नान कर पवित्र होके आव, तबलग मैं आपने गुरूका स्मरन करता हूं. ओ, तुह्मांरा उद्धार करेंगे.

**दौलतराव**—आपली आज्ञा मान्य आहे, आह्मीं स्नानें करून येतों; पण या अपराधी लोकांचें काय करावयाचें ?

**उदासगीर**—उनकोभि अश्नान कर आने देव. फिर सजा करो. ( जयदेवराव शिवाय करून सर्व जातात. )

**जयदेवराव**—( शोकानें ) हे देवपुरुषा, माझी एक पायांजवळ विनंती आहे. आपण कृपा करून एक वार अंतरदृष्टीनें पहा बरें—माझी निर्मला अद्याप जिवंत आहे कीं बिचारी परलोकवासी झाली ? जर ती जिवंत असेल तर तिचें मला शेवटचें एकवार दर्शन करवा, ह्मणजे कृतदोषांबद्दल मीं तिची क्षमा मागून नंतर जिकडे न्याल तिकडे येतों, व जसें सांगाल तसें ऐकतों.

**उदासगीर**—( मनाशीं ) अग चांडाळणी निर्मले, अजून का अंत पहातेस ? पण नको, उतावीळपणा बरा नाहीं. ( उघड )

अच्छा. जयदेवराव, तुह्मारी प्यारी मर गई नही, और उसीको दर्शनभि कर देता हूं. लेकिन फिर तुम उस्के मोहबतसे निकल जावोगे, हमारे साथ न आवोगे.

**जयदेवराव**–( करुणस्वरानें ) छे:, असें कालत्रयीं घडणें नाहीं. मजसारख्या मूर्ख, परबुद्धि, निर्दय पतीचा ती सहवास करणार नाहीं. ती मोठी विचारी आहे. हाय हाय, देवा ! किती तरी तिचे गुण आठवूं ! मीं मांगानें विनाकारण छळ केला, परंतु तिच्या तोंडांतून एक शब्द तरी वांकडा ? महाराज, माझा प्राण जातो. लवकर सोक्ष वा मोक्ष काय तो होऊं द्या.

**उदासगीर**–तुम कहते के-" ओ अब मेरे साथ न रहेगी. " अगर ओ दिल जानसे चहाती होगी तो फिर कैसा ?

**जयदेवराव**–आपल्या सेवेला येण्याचा जो माझा निश्चय झाला आहे तो खरा.

**उदासगीर**–देखो, आपने प्यारीके साथ जावोगे, तो मेरे साथ नही आना होता. फिर मैं घुस्सेके मारे क्या करुंगा इस्का भरोंसा नही. खैर. मेरे साथ आवोगे तो धर्मपत्नि छोड देना येभि बहोत पाप है. इन बातोंका खूब गौर करके जबाब देव.

**जयदेवराव**–आपण तिची भेट करवा; मग आह्मीं दोघेंहि आपल्या बरोबर येऊं. मीं अशा अडचणींत आहें हें तिला समजलें तर तीहि आपल्या सेवेला आनंदानें येईल; अथवा दुसरी कांहीं युक्ति करील. ती मोठी चतुर आहे. तिनें आपली विनंती केली तर तुह्मीं तिच्या ह्मणण्याला कधीं नाकबूल होणार नाहीं. ( करुणस्वरानें ) अहो, नेहमीं हत्या करणें हा ज्याचा व्यवसाय, त्या पाषाणहृदयाच्या मांगाला तिची दया येईल, अशी ती गुणवान् आहे.

**उदासगीर**– ( मनाशीं ) आतां काय परीक्षा करणं

राहिलं ? असो फारच ओढून चंद्रबळआणणं उपयोगाचं नाहीं. ( उघड ) अच्छा, अब तुम यहां ठेर जाव. मैं अभि थोडे आरसेमें तुह्मारी बिच्छा पूर्ण कर देताहूं. ( जाते )

जयदेव०–( दीर्घ श्वास सोडून सचिंत ) काय हा मीं! कोण्या प्रकारची ही गचाळ दुर्दशा! कसा हा यमस्वरूपी राक्षसी बाप! कशी कृत्या पापिणी माझी आई! शिव शिव! चुकलों चुकलों! माझी जन्मदाती आई तिची योग्यता, पातिव्रत्य, दयाळूपणा हा कोणीकडे, व या नीच महापातकी कुलटेची अमानुष दुष्कर्मे कोणीकडे! माझी आई! माझी आई! (शोकाकुल होऊन) आई, माझा कळकळीचा असा प्राणी साऱ्या दुनियेंत एक तरी आहे काय? आई माझें दुःख सांगण्याला देखील कीं ग कोणी नाहीं. तुझ्या मागें तुझ्या बाळाची अशी अनास्था होईल हें तुझ्या अंतकाळ समयीं तुला स्मरलें नाहीं काय? आई, या तुझ्या परदेशी पोरानें कोणच्या आशेवर दिवस काढावें? मातोश्री, तुमच्या वांचून मीं स्वदेशी असून विदेशी झालों. हा सर्व ऐश्वर्यानें भरलेला वाडा मला स्मशानभूमीसारखा शून्य भासतो. तुह्मीं स्वहित साधण्याकरतां परलोकनिवासी झालां, पण तुमच्या मरणानें मागें आमच्या राजमान्य घराण्यांत बखेडा होऊन त्याचा बोजवार उडाला. त्याच कारणानें हा घरांत द्वितीय संबंध नव्हे, समंध शिरला. त्यानें आपल्या नांवाप्रमाणें कीर्ति केली. मातोश्री, तुमचें शुद्ध उदर हें माझ्या उत्पत्तीचें स्थान, ह्मणून मला अशा कर्माचें दुःख. जारीणिच्या पोटीं जन्म घेणारांनां कसचा मानापमान! मोरीमध्यें उत्पन्न झालेल्या किड्यांनां कसली दुर्गंधी! तेंच त्यांचें सुखस्थान. आई, तुझी जर कांहीं पुण्याई उभी राहिली तर निभाव आहे!

( मूर्च्छा येऊन खालीं पडतो इतक्यांत निर्मला येते. )

**निर्मला**–प्राणेशा, ही आपली गरीब दासी निर्मला नमस्कार करते.

**जयदेव०**–( उठून व आश्चर्यानें ) कोण तूं? माझी, माझी निर्मला? ( सानंद ) अहाहा! जगदीशा, केवढा हा आनंद! प्रिये, निर्मला ती तूंच काय? अथवा मला मोह उत्पन्न करण्याकरितां कोणी देवांगना आली आहेस? सांग, लवकर सांग. देवांगना असलीस तर निघून जा. मीं परस्त्रीशीं भाषण करणारा पुरुष नव्हें.

**निर्मला**–महाराज, मींच ती आपली नावडती हतभाग्या, गरीब बटीक आहें.

**जयदेव०**–हे पतिव्रते, तूं जर निर्मला आहेस तर ये जवळ, आणि आधीं माझ्या पांच तोंडांत मार. देवा! केवढा हा आनंदाचा दिवस! प्रिये, तुझ्या आकस्मिक दर्शनानें मजवर पर्वतप्राय कोसळलेलें सर्व दुःख मीं अर्ध्या क्षणांत विसरून गेलों. (शोकानें) परंतु प्रिये, हें काळें तोंड तुला दाखविण्याची मला मोठी लज्जा वाटते. मीं मोठा पापी, तुझा अपराधी आहें. तूं आपल्या लाथेनें मला झुगारून द्यावेंस असें मीं नीच वर्तन केलें, याची मला क्षमा कर. ( तिचे पायां पडतो. )

**निर्मला**–( गहिंवरून ) असं भलतं काय बोलावं तें? पायांत जोडा असला ह्मणजे चालणाराला खडे कांटे लागत नाहींत, सुख होतं; ह्मणून ते जोडे कुणी डोकीवर का घेतं? पायांतली वस्तु पायांत शोभते, एवढी माझी देवपूजा नको.

**जयदेव०**–निर्मले, पतीची इतकी योग्यता जाणणारी, जसा प्रसंग येईल त्याप्रमाणें धैर्य धरून शहाणपणानें वागणारी, अशी स्त्री या काळांत ज्याला मिळेल, त्याचें भाग्य काय सांगावें! प्रिये, आतां मला अंतर देणार नाहींसना? ( शोकानें ) लाडके, तूं ख-

न्या जातिवंत कुलीन घराण्यांतली ह्मणून आजचा दिवस तुझ्या कृपेनें मीं पाहिला. विनाकारण तुजवर मीं तोंड सोडून तुलां घालवून दिली, तो राग प्रिये मजवर नाहींना ? ये ये लाडके, तुझ्या पवित्र कायेनें या पापी देहाला शुद्ध कर.

**निर्मला**–( आलिंगून व त्याचे डोळे पुसून ) प्राणेश्वरा, हें काय बरं ? मला सुख द्यायचंना? आतां गत गोष्टींबद्दल कां शोक? तें आपलं सर्व दुःख देवानं दूर केलं. ( शोकानें ) अगबाई ! मीं चांडाळणीनं किती तरी अंत पाहिला ! प्राणेशा, दुःख आंवराहो; आपलं दुःख पाहून माझ्या पोटांत कसं कालवतं पहा. ( शांतपणानें ) चला आतां. महाराज, मामंजी व इतर सर्व लोक आपली वाट पहात असतील.

**जयदेव**०–छे छे. तिकडे येण्याविषयीं माझें मन धजावत नाहीं. फाजील पितृभक्ति करूं नये ती मीं केली, तीच बाधक झाली. पुढें जेव्हां हे तुझे इंगित समजलें तेव्हां बेफाम होऊन त्यांची फारच निर्भत्सना केली. दोहोंकडून माझा वेडेपणा झाला.

**निर्मला**–असं मनांत दिखून आणूं नये. आपण काय, मामंजी काय, नी तिसरं कोणी असलं तरी सारखंच; एखाद्या वेळीं मोठ्या शहाण्या मनुष्याचं सुद्धां चुकून वाकडं पाऊल पडतं. आपण कांहीं बोललांत तरी मामंजींनां राग येणार नाहीं. आपल्या पोटच्या गोळ्याचा का कधीं कोणाला राग ? छेः, आणखी आपण जर वडलांच्या वचनांत राहिलां तरच कल्याण आहे. ( दौलतरावादि सर्व लोक येतात. निर्मला दूर होते. )

**दौलतराव**०–काय हो, जयदेवराव, अद्याप तुह्मीं येथेंच आहां ? ती बटुमूर्ति कोठें आहे ?

**निर्मला**–( जवळ येऊन ) महाराज, मींच ती आपल्या

दासाची दासी. नमस्कार करतें. मामंजी नमस्कार करतें. छोटे सरकार ( मानाजी ) नमस्कार करतें.

**दौलतराव**-जयदेवराव, हीच काय ती तुमची धर्मपत्नि निर्मला ?

**प्रतापराव**-होय सरकार, हीच ती गुणवती महा पतिव्रता; बेटा, तूं कशाला माझ्या पायां पडतेस ? मींच तुला साष्टांग नमस्कार करतों ( पायां पडतो )

**निर्मला**-छेः मामंजी असं कसं होईल ? आपल्याच आशिर्वादाचं हें फळ. ( पुन्हां पायां पडते )

**जयदेव०**-बाबासाहेब, तुमच्याशीं उद्धटपणा करणारा हा तुमचा मूर्ख पोर तुमच्या पायां पडतो, अपराधाची क्षमा केली पाहिजे.

**प्रतापराव**-बाळा जयदेवराया, तूं माझा कांहीं अन्याय केला नाहींस, ऊठ ऊठ. ( उठतो )

**दौलतराव**-जयदेवराव, हा प्रकार आहे तरी काय ? तुह्मीं आपल्या बायकोचा पक्ष घेऊन पित्याशीं वाद केलात, पुन्हां पहावें तों एकीची तयारी. या निर्मलाबाईनें वेषांतर करून अद्भुत चमत्कार केला; त्यांत आह्मां सर्वांची मानखंडना झाली आणि तिनें आपल्या पतीची प्रीति संपादन केली. या चित्रचरित्राचा मजकूर तरी मला कळीव बाळे.

**निर्मला**-सरकार मायबाप, ती सर्व हकीकत सांगण्याला सगळी रात्रहि पुरणार नाहीं.

**दौलतराव**-बेटा, या तुझ्या अपूर्व कृत्यानें मीं संतुष्ट आहें, याबद्दल तुला काय मागणें असेल तें माग; मीं देण्याला तयार आहें.

**निर्मला**-देणार दाते महाराज आहेत, तर याचकांनां काय तोटा ? पण बाबासाहेबांचं वचन पाहिजे.

**दौलतराव**-मीं होऊन जर देण्याला कबूल आहें, तर वचनाची काय समजूत बुवा ?

**निर्मला**-वचन, असं ह्मटल्यावर तें बोलणं फिरवितां येत नाहीं इतकंच.

**दौलतराव**-बरें. हें माझें त्रिवार वचन आहे, तुला पाहिजे तें माग.

**निर्मला**-सरकार, ज्यांनां ज्यांनां आपण दोषी ठरवून अटकेंत ठेवलं आहे, त्यांची कृपा करून सुटका व्हावी, एवढी मला भिक्षा द्यावी ( पदर पसरते. )

**दौलतराव**-असें असें ? याकरितां वचन पाहिजे होतें अं ? बरें बुवा मर्जी तुझी.

**निर्मला**-राणीसाहेब, सासूबाई, ही तुमची नावडती सून पायां पडते, मला क्षमा करा. ( राजास ) महाराज, या वैद्यबुवाचा विनाकारण अपमान झाला; याकरितां त्यांचा सर्वांसमक्ष चांगला सत्कार व्हावा. सुभानराव, जाधवराव, सर्व लोकांनों, मीं एक तुमची गरीब वेडी बहीण आहें, असं समजून बहिणीच्या अपराधांची माझ्या भावांनीं क्षमा करावी. एवढं हें तुह्मीं बहिणीचं माहेर केलं पाहिजे.

**सुभानराव**-हे गुणवती पतिव्रते, आह्मीं तुला शेंकडों लोटांगणें घालावीं, अशी तुझी योग्यता ! अहाहा ! केवढा तरी हा मनाचा थोरपणा ? निर्मलाबाई, या तुमच्या सद्गुणांवरून ओंवाळून मरून जावें, आणि तुमच्या पोटीं जन्म घ्यावा तर सार्थक !

( सर्व पायां पडतात )

**वैद्य**-अरेरे, सर्वांनीं गर्दी उडवून दिली. या ह्मातान्याला त्या बाईचें दर्शन घेऊं द्या. बाई, केवढा हा थोरपणा ! ज्याचें मन

थोर तोच थोर. बाई, तूं आह्मां सर्वांची पूर्व जन्माची ऋणी हो-तीस. धन्य तुझ्या माउलीची कुशी !

**निर्मला**—देव ब्राह्मणांच्या आशिर्वादाचं हें फळ—नमस्कार करतें.

**वैद्य**—वज्रचूडाभव.

**प्रतापराव**—बाळे, पापाच्या पडद्यानें झांकलेलें हें तोंड तुला कसें दाखवूं !

**निर्मला**—मामंजी या पोरीची जी एवढी बडेजावी झाली ती आपल्याच पुण्याईनं.

**दौलतराव**—जयदेवराव, निर्मले, यांतील बहुतेक प्रकार मला पसंत नव्हता, पण वचनानें फसलों. निर्मले, मीं तुझी इच्छा ...याप्रमाणें तुह्मीं माझी एक इच्छा पूर्ण केलीच पाहिजे. ...यदेवरावानें आपल्याला माझा पुत्र असें ह्मणवून ...न राज्य करावें. ( रागानें ) या दुष्टेला ( राणीस ) कडक शासन करावें व या हरामखोर सुभानरावाला व इतर अप-राध्यांनां देहांत प्रायश्चित द्यावें असा फार हेतु होता, पण आ-जपासून राज्याचे धनी तुह्मीं झालांत- मला इहलोक नाहीं. आतां वृद्धपणीं तरी परलोक साधनार्थ मीं अरण्यांत जाणार. माझ्या इच्छेविरुद्ध जर कोणी शब्द काढील तर त्याला गोहत्या के-ल्याचं पातक लागेल.

**प्रतापराव**—बस्स. माझाहि महाराजांप्रमाणें निश्चय झाला, व तीच शपथ.

**विलासिनी**—महाराज, संगतीनं किंवा कशा तरी कारणानं ह्मणा, मीं पाप केलं त्याचा मला पश्चात्ताप झाला, तर मींहि अ-रण्यांत येणार. ( हात जोडून राजाचे पायां पडते )

**पद्मलो०**—कांहीं तरी कारणानं कां होईना, पण मीं मोठं

पातक केलं खरं. आतां या देहाला त्यांतलं सर्व सुखदुःख पुष्कळ झालं. तर माझाहि तोच निश्चय.( प्रतापरावाचे पायां पडते )

**जयदेव०**-आतां काय करणार? शब्दोच्चार करण्याला मार्गच नाहीं.

( सर्व जाऊं लागतात )

**निर्मला**-मूर्खांची पुष्कळ बडबड; शहाण्याचा एकच शब्द; पुढं काय बोलणार ! सर्वांनीं आपलं सार्थक करून घेतलं. ( दुःखानें ) शेवटीं आह्मीं परदेशी.

**जयदेवराव**-दुर्दैवी कोठें गेला, काय झालें तरी त्याचे मागें दुःख दत्त ह्मणून आहेच.

**दौलतराव**-जयदेवराव, निर्मले, परलोकयात्रेच्या साधनार्थ आह्मीं खुषीनें निघालों, मग हें अमंगल रुदन करणें शोभतें का? बरें येतों आतां. तुमचा सदां विजय असो. स[र्वांनीं] एकवार यांचा जयघोष करावा.

**सर्व लोक**-निर्मला जयदेवरावकी जय-( सर्व जातात-पडदा पडतो. )

( समाप्त )